म. ग्रं. सं. ठाणें
विषय निबंध
सं. क्र. १२०३

…जवलकरांचे लेख

# शेजवलकरांचे लेख

२

REFBK-0010274

# शेजवलकरांचे लेख

पुस्तक २ रें

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें, मुख्यशाखा
अनुक्रम २५९२० वि: ..................
क्रमांक ९२०३ ...... नों: दि: ......

त्र्यंबक शंकर शेजवलकर

REFBK-0010274

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
९०२६८
स्थळ प्रत

ह. वि. मोटे प्रकाशन

किंमत सहा रुपये

आवृत्ति १ ली

© १९५९ त्र्यं. शं. शेजवलकर

प्रमुख विक्रेते
पॉप्युलर बुक डेपो
लॅमिंग्टन रोड, मुंबई ७

मुद्रक
वि. पु. भागवत
मौज प्रिंटिंग ब्यूरो
खटाववाडी मुंबई नं. ४

प्रकाशक
ह. वि. मोटे
३, वेस्ट व्ह्यू
दादर, मुंबई १४

# नि वे द न

प्रा. त्र्यंबक शंकर शेजवलकर यांचा हा दुसरा लेखसंग्रह वाचकांना सादर करीत आहें. रियासतकार सरदेसाईकृत 'नानासाहेब पेशवे', 'शेजवलकरांचे लेख भाग पहिला' आणि 'विभावरीचे टीकाकार' या पुस्तकांना प्रा. शेजवलकरांनीं लिहिलेल्या प्रस्तावना आणि १९३७ ते १९५९ या काळांत त्यांनीं लिहिलेले कांहीं लेख यांचा अंतर्भाव या पुस्तकांत केला आहे. शिवाजी महाराजांपासून महात्मा गांधींपर्यंत मुख्यतः महाराष्ट्राच्या आणि अंशतः भारताच्या राजकीय आणि सामाजिक इतिहासांतल्या महत्त्वाच्या टप्प्यांचें दर्शन या पुस्तकांत अभ्यासू वाचकांना आढळेल अशी उमेद वाटते.

**प्रकाशक**

ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत.
२६१९९ वि: निबंध
१२०३ नों: दि: ४।२।६०

# अनुक्रमणिका


| | |
|---|---|
| नानासाहेब पेशवे | १ |
| —शय्येवरून | ३२ |
| विभावरी–वाङ्मयाच्या निमित्तानें | ४५ |
| महाराष्ट्राच्या मानगुटीचा समंध | ७६ |
| महाराष्ट्राच्या इतिहासाची आबाळ | ७९ |
| शिवाजीचा मार्ग | ८५ |
| पेशवाईच्या सावलींत | ९१ |
| आचार्य बाळ गंगाधरशास्त्री जांभेकर | १०७ |
| लोकहितवादी | १२२ |
| न्यायमूर्ति रानडे | १२९ |
| लोकमान्य टिळक | १३५ |
| गांधीप्रणीत समाजरचना अस्तित्वांत येणें शक्य आहे काय ? | १४४ |
| डॉ. श्रीधर व्यंकटेश केतकर | १४८ |
| ब्राह्मण्याचा ऱ्हास | १५६ |
| विश्वशांतीची समस्या | १७३ |

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत.
अनुक्रम २६९८९ वि: ९.८२
क्रमांक ९२०५ नों: दि: ८/१२/४०
मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
९०२०८

# नानासाहेब पेशवे

ती. रा. गोविंदरावनाना सरदेसाई यांच्यासारख्या विख्यात इतिहासकारांच्या ग्रंथास वास्तविक दुसऱ्या कोणा माणसाची प्रस्तावना जोडण्याचें कारण नाहीं. त्यांतहि ग्रंथकाराहून त्या त्या विषयांत जास्त अधिकारी व सुप्रसिद्ध माणसानें ती लिहिली तर असो, पण हे गुण नसणाऱ्यानें तर ती लिहूंच नये. परंतु या माझ्या मताला विरोध एकाच गोष्टीचा व ती गोष्ट म्हणजे ग्रंथकारांची इच्छा. आणि या इच्छेचें कारण ग्रंथकारांचा व माझा मराठ्यांच्या इतिहासांतील बऱ्याच मुद्द्यांवर होणारा मतभेद. ग्रंथकारांच्या मतें हा मतभेद मी आपल्याजवळच राखून न ठेवतां जगांतहि त्याचा प्रसार करावा! त्यांच्या इच्छेस मान देणें हें माझें कर्तव्य असल्यानेंच मी लेखणी हातीं धरीत आहें.

ग्रंथांतील गोष्टी व घडामोडी कालस्थलादि दृष्ट्या तपासणें हा या ठिकाणीं माझा हेतु नाहीं. असलें काम संशोधकांच्या बैठकींत यथावकाश करतां येईल. मराठ्यांच्या इतिहासांतील अनेक घडामोडींची रूपरेषा ग्रंथकारांना प्रथमच एकट्यानें ठरवावी लागल्यामुळें, त्यांत तपासणी करण्यास बरीच जागा राहिली असणें हें अगदीं साहजिक आहे. मराठ्यांच्या इतिहासाचें कार्य अजून अपूर्ण स्थितींत आहे व त्यांत बरेच फेरबदल करावे लागतील. माझा हेतु ग्रंथकारांपेक्षां जरा जास्त उंचीवर चढून व जरा खोल बुडी मारून मराठ्यांच्या इतिहासाचा पट डोळ्यांसमोर आणणें व त्याचा ठाव घेणें हा आहे.

'ज्या राष्ट्रांस भूतकाळ नाहीं त्यांस भविष्यकाळहि नाहीं,' अशी बहुतेक इतिहासकारांची समजूत आहे. त्यांच्या मतानें मराठे, शीख, राजपूत वगैरे ज्या लोकांनीं पूर्वी इतिहासांत नांव गाजवलें त्यांचाच भविष्यकाल उज्ज्वल होणें शक्य आहे. हिंदुस्थानाबाहेर जाऊन यूरोपाकडे पाहावयाचें तर रोमन, ग्रीक, फ्रेंच वगैरे लोकांच्या वंशजांचाच भावी इतिहास बनणार आहे! ही समजूत इतकी दृढ आहे कीं, जगाच्या इतिहासकारांपैकीं बहुतेक हें सूत्र पुढें ठेवूनच आपला इतिहास लिहीत असतात. इतिहासाची सरणी याच सूत्रान्वयें लावण्याची त्यांची रीत असते. फार काय, या सूत्राशीं न जुळणाऱ्या बऱ्याच गोष्टी दडविण्याची व त्यास पोषक अशा गोष्टी निर्माण करण्याचीहि त्यांची तयारी असते. गेल्या महायुद्धापूर्वीच्या काळांत जर्मनींत या प्रवृत्तीचा

अतिरेक झालेला पहावयास सांपडतो. भूतकाळांत केलें काय तें आमच्या पूर्वजांनीं व अर्थात् पुढेंहि करणार काय ते आम्हीच, अशी जर्मन लेखकांची गर्जना होती. याच कल्पनेनें लिहिलेल्या इतिहासांचें प्राथमिक शाळांपासून अध्ययन जर्मन मुलें करीत असत. व सर्वांत महत्त्वाची गोष्ट म्हणजे, या सत्यापलापाचें समर्थन करण्यांत जर्मनींतील अनेक विद्वान् भूषण मानीत व समाजांतून ते उजळ माथ्यानें फिरत. त्यांच्या सिद्धांतास धक्का दिला काय तो महायुद्धाच्या निकालानें! आमच्या इकडेहि असे इतिहासकार अविश्रुत नाहींत. पण राष्ट्राच्या सध्यांच्या विप्लवांत आपल्या सिद्धांतांचें समर्थन करणें त्यांस जड जातें एवढेंच. एक संशोधक माझ्याशीं बोलतांना म्हणाले, 'अहो, पेशव्यांबद्दल लिहितांना आपणांस जरा जपूनच लिहिलें पाहिजे, नाहींतर हे ब्राह्मणेतर आपल्याच वाक्यांचा अहेर आपणांस करावयाचे व त्यांचा ब्राह्मणांविरुद्ध उपयोग करून घ्यावयाचे.' या गृहस्थांची इतिहासाबद्दलची कल्पना काय असावी याचें अनुमान करणें कठीण नाहीं. यांच्या मतानें इतिहासाचा उपयोग शहाणपणा शिकण्याकडे करावयाचा नसून, वर्तमानपत्रांच्या एखाद्या चळवळींतील लेखांप्रमाणें लोकांस दोषांबद्दल अंधकारांत ठेवून एखाद्या मार्गास प्रवृत्त करण्याकडे करावयाचा असतो. शास्त्रीय वर्गीकरणाच्या परिभाषेंत बोलावयाचें तर त्यांच्या मतानें इतिहास हें शास्त्र नसून ती एक उपयुक्त कला आहे.

ज्यांस भूतकाळ नाहीं त्यांस भविष्यकाळ नाहीं, या सिद्धांताचा अर्थ जर, ज्यांच्याजवळ भूतकालीं संपादन केलेल्या कांहीं गोष्टी संग्रहीं आहेत त्यांस भविष्यकाळ उज्ज्वल करण्यास सोपें जाणार आहे, एवढाच असला तर तो खराच आहे. जसें व्यक्तीच्या उद्याचा विचार कर्तव्य असतां त्याचा आनुवंशिक पिंड आपण पाहतों तसें राष्ट्राचा पिंडहि पाहणें गैर नव्हे. पितरांपासून उतरलेला पिंडच जर रोगग्रस्त असेल तर त्या व्यक्तीस पुरुषार्थ साधण्यास मुळांतच अडचण येणार हें उघड आहे. परंतु हा सिद्धांत प्रतिपादणाऱ्यांचा उद्देश वेगळ्याच आशयाचा असतो. उदाहरणार्थ, आज आमचे प्रभु जेव्हां आम्हांस सांगतात कीं, हिंदुस्थान स्वराज्यास अपात्र आहे, कारण पूर्वीं कधीं य देशानें स्वराज्य वहिवाटलेलें नाहीं, तेव्हां त्यांची या सिद्धांताचा अर्थ लावण्याची रीत काय हें कोणास सांगावयास पाहिजे? ते इतिहासांतील कांहीं गोष्टींचा उपयोग जित राष्ट्रास कायमचेंच खची करण्याकडे करीत आहेत व ते इतिहासाकडे कला या दृष्टीनें पाहतात हें उघड होतें. इतिहासाचा तसाच उपयोग आज गोरीं राष्ट्रें तदितरांविरुद्ध करीत आहेत. आम्हांस मात्र हा सिद्धांत अशुद्ध वाटतो. आमच्या दृष्टीनें ऐतिहासिक भूतकाल नसणाऱ्या नीग्रोसारख्या लोकांसहि भविष्यकाल आहे. तसें नसेल तर, जगांतील कांहीं धर्मपंथ ज्याप्रमाणें त्यांच्या बाहेर असलेले लोक कायमचेच मोक्षास आंचवलेले समजतात, त्यांचाच सिद्धांत खरा म्हणण्याची आपत्ति ओढवेल! म्हणजे शंकराचार्यांच्या भाषेंत ईश्वरावर "वैषम्यनैर्घृण्यप्रसंग" आला! पण ज्या अर्थी ईश्वर हा आपण, कांहीं लोकांबद्दल मत्सरग्रस्त व क्रौर्यप्रेरित समजत नाहीं; ज्या व्यक्ति इतिहासप्रसिद्ध सरदार

घराण्यांत न जन्मलेल्या, त्या पुढें सरदार होणारच नाहींत असें म्हणत नाहीं; किंवा गुजराती वाणियांत गांधी, अमेरिकेंतील नीग्रोंत ड्युबॉय अथवा मूठभर उंचीच्या जपान्यांत टोगो निपजत नाहींत असा आपला अनुभव नाहीं; त्या अर्थी हा सिद्धांतच अबाधित म्हणणारांचें म्हणणें अर्थातच फोल ठरतें.

इतिहासाचा वास्तविक उपयोग शहाणपण शिकणें हा आहे. मागील चुका व दोष नेहमीं डोळ्यांसमोर वागवून, ते दोष आपल्यांतून जावे, तशा चुका पुनः घडूं नयेत, असा जर आपला प्रयत्न नसला, तर इतिहाससंशोधकांची खटपट व्यर्थ मानावी लागेल. हे दोष नाहींसे करीत असतां आपल्या भूतकाळाची काळजी करण्याचें आपणांस कारण नाहीं. तो चांगला असला तर उत्तमच, नसला तरी, त्याचा भविष्यावर मोठासा परिणाम घडणार आहे असें नाहीं. व्यायामशाळेंत प्रवेश करणाऱ्यानें, आपले पूर्वज भीमसेन होते किंवा काय याचें संशोधन करावयास नको. मात्र जे आनुवंशिक दोष आपल्यांत आले असतील, तेवढे नाहींसे करण्याची खटपट करावी म्हणजे झालें. पण त्याच्या ऐवजीं जर तो, आपल्यांत दोष आलेलेच नाहींत, आपले पूर्वजच भीमसेन होते, असा अभिमान धरून बसेल, तर तो स्वतः कधींच तालिमबाज होण्याचा संभव नाहीं हें उघड आहे.

प्रस्तुत ग्रंथकारांच्या ठिकाणीं असला दुरभिमान नसल्यामुळें तत्संभव दोषहि या ग्रंथांत नाहींत. पूर्वजांबद्दल योग्य अभिमान व त्याबरोबर प्रगतिप्रियता, यांचें माफक मिश्रण त्यांच्यांत झालें असल्यानें, इतिहासलेखकास आवश्यक अशीच त्यांची मनोरचना आहे. अर्थातच आपला चरित्रनायक हा सर्व सद्गुणांचा पुतळा, अशा भावनेनें हें चरित्र लिहिलें गेलेलें नाहीं. त्याच्यानंतर दुसरी एक गोष्ट चरित्रलेखकांस सांभाळावी लागते. ती म्हणजे तरतमभावाची तीव्र जाणीव. नाहीं तर ज्याप्रमाणें कांहीं वर्षांमागें एका नटचरित्रलेखकानें आपल्या नायकास शिवाजीमहाराज व नेपोलियन यांच्या मालिकेंत गुंफलें व 'श्वानं युवानं मघवानमाह' या सुभाषिताची सार्थता पटवून दिली, तसें व्हावयाचें. सरदेसायांच्या हातून अर्थातच असलें हास्यास्पद कृत्य घडणार नाहीं हें कांहीं सांगावयास नको. परंतु ज्या इतिहासकारांना लेखनासाठीं संशोधनहि करावें लागतें, त्यांचें कार्यक्षेत्र आकुंचित राहतें व त्यामुळें दृष्टिहि कांहींशी संकुचित होते. ज्याप्रमाणें एखाद्या खेड्यांतच जन्म जाणाऱ्याला त्या गांवांतील खडान्‌खडा ज्ञात होतो, परंतु तुलनात्मक दृष्ट्या पाहतांना त्याकडून ग्रामकुठाराला नाना फडणीस नांव देण्याची चूक सहजगत्या होते, तसेंच कांहींसें संशोधकांचें होतें. ज्या व्यक्तींचे इतिहास जुळविण्याची खटपट करण्यांत त्यांचे दिवसांचे दिवस मोडतात त्यांच्याबद्दल साहजिकच त्यांस आदर उत्पन्न होतो. एखाद्या व्यक्तीचे विशिष्ट प्रकरणीं वर्तनोद्देश समजण्यास अर्थातच त्यांची सूक्ष्म तपासणी फार उपयुक्त असते. पण नुसतें मराठी वाङ्मय वाचून ज्याप्रमाणें हरिभाऊ आपट्यांस कांहींजण पहिल्या नंबरचे कादंबरीकार समजतात, परंतु

त्यांसच टॉलस्टॉय, ट्युर्गेनेव, डोस्टोवस्की, न्यूट हॅमसन, बाल्झॅक, ड्यूमा, झोला, डिकन्स प्रभृति प्रख्यात पाश्चात्य कादंबरीकारांच्या कृति वाचण्यास मिळाल्या कीं, हरिभाऊंस पहिल्या वर्गांत तरी घालवें कीं नाहीं याची शंका पडते, तीच गत आपला इतिहास सोडून जगाचा इतिहास पाहूं जातां होते. वरवर पहाणाराला नानासाहेब पेशव्याची कर्तबगारी पाहून साहजिकच विल्यम पिटशीं त्याची तुलना करण्याची कल्पना सुचते, पण जगाच्या इतिहासाचें विहंगमावलोकन करीत जाऊं लागलें तर पिट् व पेशवा हे एकाच तोलाचे कीं काय याची शंका वाटेल. जी गोष्ट नानासाहेब पेशव्याची तीच नाना फडणिसाची. आपण या सर्वांस मुत्सद्दी समजतों. परंतु खरोखरी ते मुत्सद्दी होते किंवा काय याचा कयास कोणी काढीत नाहीं. 'नाना जिवंत असेपर्यंत पुण्याच्या कारभारांत आपला हात शिरणार नाहीं;' असें एखाद्या इंग्रजाचें शिफारसपत्र वाचून आपण नाना फडणीस म्हणजे मोठा मुत्सद्दी असें मानतों, परंतु खरा मुत्सद्दी कोणास म्हणावयाचें याचा विचार आपण करीत नाहीं.

मराठींतील मुत्सद्दी या फारशी शब्दाचा अर्थ केवळ दरबारी कारकून एवढाच मूळ आहे. पण सध्यां आपण हा शब्द स्टेट्स्मन् या इंग्रजी शब्दाशीं समानार्थानें योजतों. या इंग्रजी शब्दाचाहि मूळ अर्थ केवळ दरबारी एवढाच. राज्याशीं ज्यांचा लहानमोठ्या कामानिमित्त रोज संबंध ते सर्वच स्टेट्स्मेन्. राज्याचीं कामें अनेक प्रकारचीं असतात. तीं करण्यासाठीं अनेकांचा संबंध दरबाराशीं येतो. पण या सर्वांसच जर मुत्सद्दी ही संज्ञा लावावयाची, तर आम्ही म्हणतों तशा पुरुषांस वेगळीच संज्ञा निर्माण करावी लागेल. आमच्या मतें मराठशाहींत शिवाजीखेरीज अन्य मुत्सद्दीच झाला नाहीं व शिवाजीच्या मुत्सद्दीपणाबद्दल सुद्धां अस्सल पुरावा थोडकाच आहे, बऱ्याचशा गोष्टी अभिप्रेत घ्याव्या लागतात. ज्या पुरुषांचें लक्ष राज्यापुढें येणारे रोजचे प्रश्न सोडविणें एवढ्यांतच गुरफटून गेलेलें दिसतें त्यांस आमच्या मतें मुत्सद्दी हा शब्द लावणें योग्य नाहीं. आजच्या राज्यपद्धतींत अशीं कामें अधिकारीवर्ग करीत असतो व त्यांच्या कृत्यांचे प्रेरक किंवा टीकाकार दुसरे लोकप्रतिनिधि, वर्तमानपत्रकार, वगैरे लोक असतात. या सर्वांस मुत्सद्दी म्हणावयाचें काय? पूर्वींच्या राज्यपद्धतींत राज्यांचीं सूत्रें ज्यांच्या हातांत असत त्यांस तत्संबंधीं उत्पन्न होणाऱ्या अनेक भानगडींचें परिमार्जन करणें भागच होतें. पण त्यांच्या पलीकडे जाऊन, आपल्या देशाच्या किंवा राज्याच्या हितावर चिरंतन परिणाम होणारी अशी कोणती कामगिरी ते करीत होते? मराठ्यांचें राज्य वाढत जात होतें व त्या वाढीच्या कार्यांत त्यांचा हात होता, एवढ्यावरच त्यांस मुत्सद्दी म्हणावयाचें काय? आमच्या मतें नाहीं. कारण मराठ्यांच्या राज्याची वर्धिष्णुता ही कांहीं त्यांनीं निर्माण केलेली चीज नव्हती. तिचा उगम व त्याबरोबरच श्रेय शिवाजीकडे जाईल. शिवाजीनें निर्माण केलेल्या आयुधांचा उपयोग करण्यांत ते तरबेज होते एवढेंच त्यांच्याबद्दल म्हणतां येईल. जर नाना फडणिसास मराठ्यांचें राज्य होतें तेवढें तरी

कायम राहील अशी व्यवस्था करितां आली असती, तरच त्यास मुत्सद्दी म्हणणें योग्य झालें असतें. जर नानासाहेब पेशव्यास इंग्रजांसारख्या नूतन राष्ट्राचा ठाव लगूं शकला नाहीं, तर त्याचें मुत्सद्दीपण तें कशांत राहिलें ? आपल्या सभोंवारच्या स्थळांच्या व काळाच्या पार ज्यांची दृष्टि पोहोंचते, व त्या दूर दृष्टीनें जे राज्यकारभार करितात, त्यांसच मुत्सद्दी ही संज्ञा लावणें योग्य आहे. मराठशाहींत असा पुरुष झालेला दिसत नाहीं. कित्येक पुरुषांत शहाणपण होतें असा भास कोठें कोठें होतो, पण त्यांच्यांत कर्तबगारी नव्हती. कर्तबगार माणसांपैकीं मात्र कोणांत ही दूरदृष्टि दिसत नाहीं. जर ती होती असें मानलें, तर त्यांच्यांत कर्तबगारी नव्हती असें म्हणणें भाग पडेल.

आपणांस मराठशाहींतील इतर पुरुषांशीं सध्यां कांहीं कर्तव्य नसून फक्त नानासाहेब पेशवाच प्रस्तुत आहे. सरदेसाई त्यास शिवाजीच्या खालोखाल पुरुष समजतात. त्याच्या अमदानींत मराठ्यांच्या राज्योत्कर्षाच्या भरतीची सीमा झाली हें उघडच आहे. तो शिवाजीप्रमाणें तलवारबहादूर नव्हता किंवा अस्त्रैणहि नव्हता. म्हणजे राज्याच्या वाढीचें बहुतेक श्रेय त्याच्या सरदारांस द्यावें लागेल व समाजास आदर्शभूत होण्याजोगा तो नव्हता असेंहि ठरतें. मराठशाहींतील दुसऱ्या अनेक पुरुषांप्रमाणें तो राज्यकारभारांत निपुण होता, पण हें नैपुण्य म्हणजे मुत्सद्दीपणा मात्र नव्हे. मराठशाहींतील ज्या पुरुषांस मुत्सद्दी म्हणतात ते वास्तविक हुषार राज्यकर्ते होत. त्याच्या मुत्सद्दीपणाची मीमांसा आतां आपण करूं.

जर एखाद्या पुरुषास मुत्सद्देगिरी दाखवण्यास योग्य समय पाहिजे होता असेल, तर तो नानासाहेबाच्या काळीं होता. जगाच्या इतिहासांत जे क्रांतीचे काळ कांहीं शतकांनीं एकदां येतात, अशा एका काळाच्या दरवाजावर तो उभा होता. अशी मुत्सद्देगिरी दाखविण्यास स्थळ पाहिजे होतें असेल, तर अठराव्या शतकाच्या मध्यांतील हिंदुस्थानाखेरीज तसें अन्यत्र क्वचितच आढळतें. साधनें पाहिजे होतीं असतील, तर तीं तशीं नानासाहेबाजवळ नव्हतीं असें कोण म्हणेल ? पण जेथें कर्त्याचाच अभाव तेथें अधिष्ठान व करणें काय करणार ? बाकी ' दैवं चैवात्र पंचमम् ' असें म्हणण्यास सर्वांसच मोकळीक आहे.

नानासाहेबाची कारकीर्द सन १७४० पासून १७६१ पर्यंतची. इंग्लंडांत ज्यास औद्योगिक क्रांतीचा काळ म्हणतात, त्याची सुरवात स्थूलमानानें १७६० पासून झाली. यानंतर अनेक शोध लागून जगास आधुनिक स्वरूप येण्यास सुरवात झाली. या पूर्वीच्या म्हणजे जुन्या काळांत नानासाहेबाची अमदानी झाली. ज्या त्रिखंडांत चाललेल्या युद्धांतील जयानें इंग्लंड फ्रान्सचा पराभव करून जगांत पहिलें राष्ट्र बनलें, तें विख्यात ' सप्तवार्षिक युद्ध ' सन १७५६ पासून १७६३ पर्यंत चालू होतें. हिंदुस्थानांत कर्तबगारी दाखवतां दाखवतां जगाच्या इतिहासास निराळें वळण देणें ही गोष्ट नानासाहेबास त्या वेळीं शक्य होती. अशा तऱ्हेचें वळण, आंधळेपणानें नव्हे जाणून बुजून, चॅथम् सारखे मुत्सद्दी त्या वेळीं इंग्लंडांत बसून देत होते. जगाचा नकाशा पुढें घेऊन,

या मार्गानें गेलें कीं आपण जगज्जेते होऊंच होऊं, या आत्मविश्वासानें ते बुद्धिबळाचा डाव खेळत होते. त्यांचा तो डाव पूर्णपणें सिद्धीस गेला, हें आज आपण अनुभवीत आहों. नानासाहेबाची हिंदुपदपातशाही मात्र मध्येंच कोठें जिरली व त्याच्या वंशजांचें स्वातंत्र्यसुद्धां राखलें गेलें नाहीं. असें कां झालें याचें उत्तर नाहीं काय?

एखाद्या राष्ट्राचें भवितव्य एकाच माणसावर अवलंबून असतें, ही विचारसरणी आम्हांस मान्य नाहीं. मुख्य पुरुष हा केवळ समाजस्थितिदर्शक असतो असें आमचें मत आहे. या दृष्टीनें पाहतां व्यक्तींचीं चरित्रें हीं आमच्या दृष्टीनें कांहींशीं आभासात्मक असतात, त्यांत पूर्ण सत्य दिसूं शकत नाहीं. पण ज्यांना सरदेसायांप्रमाणें कार्लाइलची वीरपुरुषांची कल्पना मान्य आहे, ते जर राष्ट्रीय भरभराटीचें श्रेय एका पुरुषास देणार, तर त्या पुरुषानें राष्ट्रीय अधःपाताबद्दलहि जबाबदार झालें पाहिजे हें ओघानेंच आलें. विचारसरणींतील हा भेद केवळ तात्त्विक नसून मूलभूत आहे. याच भेदावर राजकीय प्रगति आधीं कीं सामाजिक प्रगति आधीं हा प्रचलित वाद उभारलेला आहे. नानासाहेबाच्या जागीं आमच्यांत त्या काळीं चॅथॅम् कां निर्माण झाला नाहीं, याचें उत्तर आमच्या मतें हिंदी समाज हा इंग्रजी समाजाप्रमाणें नव्हता असें आहे. नानासाहेबाची बुद्धि चॅथॅम्इतकीच तीव्र होती असें धरलें तरी, चॅथॅमच्या आज्ञा अंमलांत आणण्याची जर हिंदी समाजाची पात्रता नव्हती, तर नानासाहेब काय करणार? पण तशी ती तीव्र असणें शक्य नाहीं, कारण आडांतच नाहीं तें पोहोऱ्यांत कोठून येणार? समाजांतच जे गुण नाहींत ते उत्कर्षानें व्यक्तींत कसे दिसतील? जर ते दिसतील तर मात्र ती व्यक्ति लोकोत्तर दूरदृष्टीची, म्हणजेच मुत्सद्दी, असें आम्हीं म्हणूं. अशी व्यक्ति शिवाजीनंतर मराठशाहींत निपजली नाहीं हेंच आमचें म्हणणें आहे.

मराठशाहीच्या इतिहासाचे एक मार्मिक अभ्यासू कै. खरेशास्त्री यांनीं एके ठिकाणीं असे उद्गार काढले आहेत कीं, 'पेशवाईच्या कृत्यांसंबंधीं हल्लींच्या काळांत चर्चा होते तेव्हां, अमक्यानें अमूक केलें असतें तर अमुक झालें असतें, असें पुष्कळ टीकाकार लिहीत व बोलत असतात. परंतु पेशवाईची घटना कशी होती, तिचे अधिकारी कोणत्या बंधनानीं बांधले गेले होते, हें माहीत नसल्यामुळें ही टीका बहुधा अप्रयोजकपणाची असते.' शास्त्रीबोवांच्या मताप्रमाणें पेशव्यांच्या प्रत्येक सदिच्छेस व कृत्यास अनिराकरणीय अशी अडचण होती असें मानलें, तर इतिहासाचें अध्ययनच करावयास नको. ऐतिहासिक टीका नेहमींच अमक्या वेळीं अमक्यानें असें असें करणें योग्य होतें, तें त्यानें केलें किंवा नाहीं, या मुद्द्यावरच उभारलेली असणार. व आमच्या मतें अशी इतिहासरचना असेल तरच त्याच्या अध्ययनानें फायदा होण्याचा संभव आहे. नुसतें घडलेल्या हकीकतीचें समर्थनच ज्यांत असेल तो खरा इतिहास नव्हे, ती 'कथा' होईल. म्हणून आम्ही त्या काळीं पेशव्यानें काय केलें पाहिजे होतें, काय करणें त्यास शक्य होतें, तें त्यानें कां केलें नाहीं व त्याचे काय परिणाम झाले ह्याचाच ऊहापोह करणार आहों.

इतिहासविदांचा असा एक वर्ग आहे कीं, त्यास इतिहासांतील साऱ्या गोष्टी ईश्वराच्या प्रेरणेनें व जगाच्या हितासाठींच घडतात असें वाटतें. रानडेप्रभृति माणसांची मनोवृत्ति अशाच ठेवणीची होती व त्या समजुतीवरच त्यांचा आयुष्यक्रम उभारलेला असे. इंग्रजांचें हिंदुस्थानांत येणें हें हिंदी लोकांच्या हितासाठीं ईश्वरी घटनेनें झालें अशी त्यांची समजूत. अर्थात् इंग्रजांवर त्यांचा बिलकुल राग असणें शक्य नव्हतें. हा सिद्धांत खरा मानला तर मुसलमानांनीं हिंदुस्थानावर स्वाऱ्या करून जो अनर्थ केला, तोहि ईश्वरी प्रेरणेनें व हिंदुस्थानच्या कल्याणासाठीं असेंच ठरेल. मग त्याचाच उपसिद्धांत असा कीं, या परकीयांस जोरानें तोंड देण्याची बुद्धि आमच्या पूर्वजांस व सत्ताधीशांस झाली नाहीं, तीहि ईश्वरी सूत्र घडून येण्यासाठीं; तो कांहीं त्यांचा दुर्गुण किंवा कमकुवतपणा नव्हे! अर्थात् नानासाहेब पेशव्यानें बंगाल व मद्रास वेळींच ताब्यांत आणून इंग्रजांचा पाय रुतूं नये अशी व्यवस्था केली नाहीं ती केवळ इंग्रजांचें आगमन सुकर होऊन हिंदुस्थानचें कल्याण त्यांकडून व्हावयाचें ही जी विधिघटना, ती मोडली जाऊं नये म्हणून. ही विचारसरणी इतकी प्रबळ आहे कीं, आजचे इतिहासांतील अग्रगण्य प्रो. यदुनाथ सरकार हेहि तिचाच पुरस्कार करतांना आढळतात. “History when rightly read is a justification of Providence, a revelation of a great purpose fulfilled in time.” असा गंभीर उपसंहार ते आपल्या औरंगजेबाच्या इतिहासाच्या शेवटीं करतात. आपल्या पुराणांतून जेव्हां ऐतिहासिक राजांच्या हकीकती देतात, त्यांचाहि उद्देश इतिहासकथनाचा नसून ईश्वरी लीला कशी पुरी झाली हेंच दाखवावयाचा असतो. आम्हीं एवढेंच सांगतों कीं ही विचारसरणी आम्हांस खोटी वाटते. ही विचारसरणी आमची असेल तर आम्ही इतिहासवाचनाच्या भानगडींत कधींच पडणार नाहीं. ईश्वरी लीला वर्णावयास संशोधनाचा खटाटोप नको, काल्पनिक गोष्टीनेंहि तें कार्य होईल. आम्ही मनुष्यांच्याच प्रेरणेनें कार्यें घडतात असें धरून इतिहास पाहतों. आमच्या दोषांचें खापर ईश्वरावर लादण्याची आमची तयारी नाहीं.

या मंडळींचें मत, आज श्वेतेतर जग जें श्वेतवर्णीयांच्या ताब्यांत गेलेलें दिसतें तें ‘A great purpose fulfilled in time,’ एक मोठें विधिघटित योग्य समयीं पुरें झालें, असें समजावयाचें. त्यांनीं खुशाल तसें समजून आपल्या मनाचें समाधान करावें! आम्ही, आमच्या नामर्दपणाच्या अभावीं तसें घडण्यास कांहीं कारण होतें, असें समजत नाहीं. नानासाहेब पेशव्यालाहि, या विधिघटनेस न जुमानतां, हिंदुस्थानांत इंग्रजांचा पाय न रुतेल अशी व्यवस्था करणें शक्य होतें असें समजतों. तर त्यानें काय करावयास पाहिजे होतें तें पाहूं.

जर नानासाहेबांत खरें मुत्सद्दीपण, म्हणजे भोंवतालच्या लोकांपेक्षां जास्त ज्ञान व दूरदृष्टि, असतीं तर, हिंदुस्थानचें समुच्चित राजकारण त्याच्या डोळ्यांसमोर आलें पाहिजे होतें. तसें तें होतें किंवा नाहीं याची आमच्या मतें एकच कसोटी. ती म्हणजे

त्याच्या अनुरोधानें त्याचें वर्तन घडलें किंवा नाहीं हें पाहणें. हिंदुस्थानचें राजकारण या संज्ञेंत हिंदुस्थानशीं संबंध आलेल्या लोकांचेंहि राजकारण अंतर्भूत धरलें पाहिजे. कारण तसें धरलें नाहीं तर, इंग्रज, फ्रेंच, पोर्तुगीज प्रभृति परक्या राष्ट्रांचा प्रतिकार करणें त्यास कसें शक्य होणार होतें ? नानासाहेबाच्या काळीं या लोकांचा संबंध हिंदुस्थानाशीं येऊन दोन शतकें लोटलीं होतीं. त्यांचे गुणावगुण समजण्यास एवढा काल पुरेसा होता. त्यांचें बल कशांत आहे हेंहि हिंदी राजकर्त्यांच्या मनांत ठसण्यास हा काल भरपूर होता. हे पाश्चात्य लोक आपल्यापेक्षां अनेक बाबतींत श्रेष्ठ आहेत, ही साधी गोष्टहि ज्यांच्या लक्षांत आली नसेल, तर ते एकतर अहंमन्य किंवा मूर्ख म्हटले पाहिजेत. पण तसेच आमचे पूर्वज होते असें म्हणणें भाग आहे. तत्कालीन युरोपीय ज्या अनेक उपयुक्त कलांत निपुण होते त्यांतील पहिली छापण्याची कला. वास्को द गामा इकडे येण्यापूर्वींच या कलेचा शोध लागलेला असून हिंदुस्थानांतसुद्धां पोर्तुगिजांनीं ती कला चालू केली होती. गोवें, क्रँगानूर वगैरे ठिकाणीं त्यांनीं बायबलें छापण्याचे कारखाने काढले होते. एका जेझुइट पाद्रीबोवानें अकबर बादशहास स्पेनच्या दुसऱ्या फिलिप बादशहासाठीं मुद्दाम छापलेली बायबलची एक बहुमूल्य सुंदर प्रत नजरहि केली होती. त्यानें त्या प्रतींतील येशू व मेरीचीं चित्रें पाहून त्यांच्या प्रती आपल्या चित्रकारांकडून करून घेतल्या. पण एवढ्या शहाण्या अकबरासहि इकडे छापखाना काढणें फायदेशीर आहे हें सुचलें नाहीं ! जी गोष्ट अकबरासारख्या जगद्विख्यात् शहाण्याची तीच नानासाहेबाची. चौकसपणानें दुसऱ्याचा ठाव घेऊन त्याच्या चांगल्या गोष्टींचें अनुकरण करावें हें आम्हांस ठाऊकच नाहीं. त्याचा परिणाम काय झाला पाहा. त्या काळीं यूरोपांत वर्तुळाकार जगाचे नकाशे सर्वत्र फैलावले होते. तिकडील लोकांस आपले देशबांधव साहा साहा महिन्यांच्या सफरी समुद्रांतून कोठें जाऊन करतात, याची स्पष्ट कल्पना येत होती. आम्हांस मात्र हे येतात कोठून, जातात कोठें, करतात काय, याची कल्पना तिळमात्र नव्हती. म्हणूनच नानासाहेब पेशवा कुकडी नदीवर मोगलांशीं युद्ध चालू असतां ग्रहण पडलें तेव्हां, गोमुखींत हात घालून पाण्यांत उभें राहून जप करीत राहिला, व मागें शत्रूनें गिऱ्यास न भितां पेशव्याच्या देवांची उचलबांगडी केली. जर यूरोपीय कलाज्ञानाचा इकडे प्रसार झाला असता, तर आम्हांस पाश्चात्यांपेक्षां मागें पडण्याचें कारणच उरलें नसतें. मग नानासाहेबास पाश्चात्य युद्धज्ञानपटु बुसीस आपल्याकडे ओढण्याचा हव्यास नको होता. पण—

नानासाहेबाच्या काळच्या मराठ्यांच्या सत्तेचा विचार करतां शिवाजीचें राज्य तें किती ? टीचभर. परंतु राज्यरक्षणाच्या बाबतींत त्याची दृष्टि इतकी तीक्ष्ण कीं, त्यास, तो देशावर रहाणारा होता तरी, आरमाराची आवश्यकता पटली. त्याच्या आरमारांत कांहीं पोर्तुगीज किंवा त्यांनीं शिकवलेले बाटगे गोलंदाजीच्या वगैरे कामावर होते. त्यानें पोर्तुगिजांच्या अनुकरणानें दारूखाना म्हणून एक वेगळाच कारखाना रायगडास उघडला.

सारांश, त्यास पाश्चात्यांच्या नौकानयनज्ञानाची पूर्ण जाणीव होती व म्हणून त्यानें शक्य ती खटपट या प्रकरणीं करून, शत्रूंस दहशत वाटण्यासारखें आरमार उभारून ठेवलें. आरमाराचें महत्त्व व पाश्चात्यांची या कलेंतील पारंगतता याची केवढी छाप शिवकालीन प्रधानांवर होती हें पाहणें असेल त्यानें, अमात्यांच्या राजनीतींतील या विषयावरील स्वतंत्र प्रकरण वाचावें. ही शिवकालीन नाविकपरंपरा आंग्र्यांच्या घरांत उतरली. तुळाजी आंग्र्याची मदत पाश्चात्यांसहि हवीशी वाटे. डुप्लेचा दुभाषी आनंदरंग पिले यानें, तुळाजीचें आरमार इंग्रज फ्रेंचांच्या युद्धांत तेलिचेरीस सात हजार सैन्यासह आलें होतें असें लिहिलें आहे. अशा आरमारास पैशाचा भरपूर पुरवठा होता, तर शिद्दी, फिरंगी, इंग्रज, फ्रेंच, यांची डाळ पश्चिम किनाऱ्यावर शिजली असती असें मुळींच वाटत नाहीं. पेशव्यांस असें आरमार स्वतः उभारतां येणें, ते म्हणते तरी शक्य नव्हतें. कारण ते किंवा त्यांचे विश्वासू सरदार दर्यावर्दी बनण्यासारखे नव्हते. व दुसरें, दर्यावर्दी नाविक लोकांची संख्या घोडदळाप्रमाणें वाटेल तितकी वाढवितां येण्यासारखी नव्हती. समुद्रकिनाऱ्यावरील गांवांतच असले लोक निपजावयाचे व तेहि हिंदुधर्माच्या जातिभेदामुळें विशिष्ट जातींतून. आजहि असे लोक पाहिजे असल्यास थोडेच मिळूं शकतील. अशा परिस्थितींत ज्याच्या जागीं आपणास दुसरा लायक इसम निर्माण करणें शक्य नाहीं, अशा आंग्र्यास आणि तें इंग्रजांची मदत घेऊन बुडविणें, या इतकी मुत्सद्देगिरीची वाण दाखविणारी दुसरी गोष्ट करणें पेशव्यास शक्य नव्हतें. या घोडचुकीचा सरदेसाई प्रभृति सर्वांनींच जोरानें निषेध केला आहे. पण त्याचे अपरिमार्जनीय दुष्परिणाम मात्र त्यांच्या मनावर ठसलेले दिसत नाहींत. राजवाडे या प्रकरणावर लिहितांना म्हणतात, 'एवढा चाणाक्ष नानासाहेब पेशवा, पण तो असा चकला.' आम्हीं अशी अक्षम्य चूक करणारास चाणाक्ष म्हणावयासच तयार नाहीं. अशी चूक पेशव्याच्या हातून घडण्याचें कारण एकच, गाढ अज्ञान.

ज्या पाश्चात्य राष्ट्रांशीं आपला संबंध येतो त्यांच्या आपआपसांतील राजकारणाची पुरी,–उडती उडती नव्हे,–बित्तंबातमी नानासाहेबानें ठेविली असती, तर त्यानें इंग्रजां-ऐवजीं फ्रेंचांसच जवळ केलें असतें. दुर्बलांसच मित्रांची जास्त आवश्यकता भासते व असे मित्र आपले शत्रु होण्याचा संभव नसतो. या काळीं यूरोपांत फ्रेंचांची स्थिति खालावलेली होती. त्यांच्यांत पुष्कळ हुषार व्यक्ति पैशासाठीं नोकरीस राहण्यासारख्या होत्या. अशा लोकांस इकडे आणवून त्यांच्याकडून यूरोपीयांचें शास्त्रीय ज्ञान पेशव्यांस इकडे फैलावणें शक्य होतें. पण ही कल्पनाच सुचेल तेव्हां ना! मागसलेल्यांना पुढार-लेल्यांशीं संबंध आला असतां आपलें रक्षण करण्याच्या दोनच युक्त्या आहेत. एक तर त्यांस आपल्या घरांत उतरावयासहि न देणें, किंवा दुसरें त्यांच्यासारखें पुढारणें. पहिल्या पद्धतीनें कांहीं काल आपलें स्वातंत्र्य राहूं शकेल, पण आपण कायमचेच मागसलेले राहण्याचा संभव फार, व त्यामुळें परिणामीं आपलें स्वातंत्र्यहि टिकवणें महादुष्कर जातें.

दुसरी पद्धत स्वीकारतांना अडचण अशी कीं, परकीय लोक आपली विद्या दुसऱ्यास शिकवीत नाहींत व दुसरा शिकून आपल्या तोडीचा होण्यापूर्वींच त्याची मान मुरगळतात. या सर्व संकटांतून आपल्या राष्ट्रास सुरक्षित पलीकडे नेऊन त्यांस कायम निर्भय करणें हें खऱ्या मुत्सद्यांचें कार्य. असे मुत्सद्दी प्रथमच असे डोळ्यांत तेल घालून असतील कीं, ते आपलें राष्ट्र मागें पडूंच देणार नाहींत. यदाकदाचित् पूर्वजांच्या चुकीनें मागें राहिलें, तरी स्वतः त्याची प्रगति ते करवितील. पिटर दी ग्रेटच्या वेळीं रशिया अगदीं मागासलेला होता. पण त्या राजश्रींनीं स्वतः सुतार बनून हॉलंडांत प्रवेश केला व प्रजेस उदाहरण घालून दिलें. त्यामुळें रशिया हें एक प्रबल राष्ट्र झालें. दुसरें मुत्सद्दे-गिरीचें बिनतोड उदाहरण जपानचें. हें एवढेंच श्वेतेतर राष्ट्र पाश्चात्य गिधाडांच्या तडाख्यांतून सुटून पुनः त्यांच्या जोडीस कसें येऊन बसलें बरें ? त्यानें वर सांगितलेल्या दोनहि युक्त्यांचा यथाकाल अवलंब केला. ज्या काळीं पाश्चात्यांनीं आमच्या किनाऱ्यावर प्रवेश केला त्याच सुमारास जपानच्या किनाऱ्यावरहि केला. पण या लोकांची परस्व-हरणाची अजब चलाखी ओळखून, वेळींच त्यांस आपल्या देशांत पाऊल ठेवण्यासहि बंदी जपानी लोकांनीं केली. त्यामुळें धर्म, स्वातंत्र्य व पैसा हीं तीनहि त्यांनीं रक्षिलीं. पण हें करण्यास त्यांच्यांत अभेद्य एकी होती. या प्रकारानें जपान जगांतील इतर देशांच्या सुधारणेस पारखें होऊन, होतें त्याच स्थितींत राहिलें. अशा स्थितींत दोन शतकें गेल्यावर सन १८५३ सालीं एका अमेरिकन कमांडरनें जपानच्या किनाऱ्यावर येऊन लगट केली. या पूर्वींच चीनच्या किनाऱ्यावर इंग्रजांनीं जबरीनें प्रवेश केला होता. तेव्हां आपल्या जुन्या आयुधांनीं स्वातंत्र्य रक्षण होणें नाहीं हें अगदीं ऐनवेळीं ओळखून जपाननें आधुनिक जगांत प्रवेश केला. ताबडतोब राक्षसी जोरानें कामास लागून युरोपीयांची चारशें वर्षांची सुधारणा त्यांनीं अवघ्या पंचवीस वर्षांत आत्मसात् केली. या क्रांतीच्या काळांत जर त्यांनीं मूर्खपणानें कोणत्याहि पाश्चात्य राष्ट्राशीं कुरापत काढली असती, तर त्यांच्या स्वातंत्र्याचा चुटकीसरशीं होम झाला असता. पण या काळांत त्यांनीं इतक्या शिताफीनें राजकारण चालविलें कीं, कोणाशीं तोंड लागूं नये. दुर्बलांचा बलवानानें अपमान केला तरी, त्यानें स्वतः बलवान् होईपर्यंत त्यास गम खावा लागतो. पण जर कां मूर्खपणानें नुसता तालिमखान्यांत प्रवेश करून हा दंड पिटूं लागेल, तर त्याचा त्वरित नाश होईल, हें जपानी मुत्सद्यांनीं इतकें पुरेपुर ओळखलें होतें कीं, त्यांनीं सर्वांशीं 'सुसरीबाई, तुझी पाठ मऊ' या तत्त्वावर घेतलें होतें. जपानी लोकांच्या या क्रांतिकालीन मुत्सद्देगिरीला जगाच्या इतिहासांत तोड नाहीं. कोणत्याहि पाश्चात्य राष्ट्रानेंहि इतक्या अल्प काळांत एवढी कर्तबगारी दाखविलेली नाहीं. या जपानी मुत्सद्यांच्या पासंगालाहि पुरणारी हुषारी दाखविणारा पेशवाईंत कोणी निघाला नाहीं ही केवढ्या शरमेची गोष्ट आहे ?

नानासाहेबाच्या कालीं हिंदुस्थानांत परक्यांस दूर ठेवण्याचा मार्गच मोकळा नव्हता. असें करण्यास सर्व देशावर एकच अकुंठित सत्ता गाजविणारा प्रभु लागतो.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत.
अनुक्रम ................ विः ...................
क्रमांक ................ नोंः दिः ...............



खेरीज लोकांतहि इतकी एकी व इतकें देशप्रेम लागतें कीं कोणीहि घरभेद्या न निघावा. हिंदुस्थान हा देश एवढा अफाट, इतक्या वेगवेगळ्या सत्ताधीशांनीं व्यापलेला व इतक्या भिन्न भिन्न जातींनीं भरलेला कीं, या सर्वच गोष्टी अशक्य होत्या. दुसरा मार्ग म्हणजे परक्यांस मोकळीक ठेवून आपली सुधारणा करीत रहाणें व योग्य वेळीं एकएकाचा काटा काढणें; हेंच नानासाहेबास करणीय होतें. तें त्यानें केलें, किंवा करण्याचा आटोकाट प्रयत्न केला कीं नाहीं, यावरच त्याची कसोटी लागणार आहे. त्यास यश आलें किंवा नाहीं हा प्रश्न गौण आहे. मुत्सद्देगिरीचें पहिलें लक्षण म्हणजे कालज्ञान. आपण कोणत्या कालांत आहों व त्या कालाचा विशेष काय हें ओळखून ज्याचा कार्यक्रम ठरतो त्यासच मुत्सद्दी होणें शक्य आहे. कार्लाईल हा आपल्या वीरपुरुषविवेचनांत नेहमीं Zeitgeist किंवा Time-spirit ऊर्फ कालात्मा असा एक शब्द नेहमीं योजतो. हा आत्मा ज्यास ओळखतां येतो त्यासच यशप्राप्ति होणें शक्य असतें. नानासाहेबास किंवा पेशवाईतील कोणासहि या आत्म्याची ओळख पटली नाहीं. अठराव्या शतकांत हिंदुस्थानांत अराजक इतकें बोकाळलें होतें कीं, नानासाहेबासच काय पण शिवाजीसारख्या पुरुषांसहि त्यास आटोक्यांत आणणें दुरापास्त झालें असतें. समाजांत सर्वत्र एकमुखी सत्तेविरुद्ध एक प्रचंड लाटच जणूं निर्माण झाली होती. छत्रपतीचें पेशव्यानें ऐकूं नये, पेशव्यांचें सरदारांनीं ऐकूं नये, त्यांस क्षुद्र पथक्यांनींहि जुमानूं नये, अशी कांहीं जनमनोरचना त्या काळीं बनली होती. प्रत्येकासच राजा होण्याची हांव सुटली तर राज्याची काय स्थिति होणार ? व्यक्तिस्वार्थ जर इतका बळावला तर कर्तव्यनिष्ठा कोठें राहणार ? आपण सर्व एक, आपलें सर्वांचें हित एकच, ही भावनाच जर समाजांतून नष्ट झाली, तर चार लोकांनीं एकमार्गानें कसें जावें ? पण अशीच कांहीं स्थिति त्या काळीं होती—दुर्दैवानें आमच्यांत ती तशीच आजहि कायम आहे—अशी कल्पना त्या काळचे अस्सल लेख वाचणाराची होते हें खास. हें कालमहात्म्य त्या काळीं ओळखून नानासाहेबानें शिवशाहीचा कार्यक्रम आंखला पाहिजे होता.

शिवाजीनें स्वतंत्र राज्य स्थापण्याचा प्रयत्न यशस्वी करून दाखविल्यापासून, हिंदुस्थानांत त्याचेंच अनुकरण करून स्वतंत्र सत्ताधीश होण्याचा पायंडा पडत गेला. शिवाजीच्या समकालींच छत्रसाल व राजसिंह यांनीं औरंगजेबास न जुमानतां जवळ जवळ स्वतंत्र होण्याचा पंथ काढला. त्यानंतर औरंगजेबानें विजापूर, गोवळकोंडें, महाराष्ट्र, येथील राज्यें जिंकलीं त्यामुळें, मध्यवर्ती सत्तेचा दरारा हिंदुस्थानच्या जास्तच भागांतून नष्ट झाला. कारण दक्षिणेंत जुन्या सत्तांची वेसण मात्र नष्ट होऊन नव्या सत्तेची वेसण अडकण्यास कालावधीच मिळाला नाहीं. या अराजकी काळांत अनेक महत्त्वाकांक्षी व स्वाभिमानी मराठ्यांनीं जोर मारून बराच मुलूख हाताखालीं घातला. पण या नव्या मराठ्यांच्या राज्याचा विशेष हा होता कीं, तें मध्यवर्ती सत्तेच्या पगारी नोकरांनीं कमावलेलें शिवकालीन राज्य नसून, स्वतःच्या पराक्रमानें व हुषारीनें अनेक व्यक्तींनीं

जिंकलेलें राज्य होतें. या अनेक व्यक्ति एकएकट्या स्वतःच्या पायावर उभें राहाण्यास दुर्बळ होत्या. त्यामुळें त्यांस शिवछत्रपतींच्या नांवाखालीं एकत्र जमणें अवश्यच होतें. या एकांड्या शिलेदारांस एकत्र राखण्याचा प्रयत्न रामचंद्रपंत अमात्यांसारख्या स्वाभिमानी लोकांनीं केला. तरीहि ते इतके दोन दगडींवर पाय ठेऊन असत कीं, प्रत्येकाचें मोगली अंमलदारांशीं सूत असे. रामचंद्रपंतानें शिवकालीन शिस्त गाजवण्याचा विचार केला असता तर हे सर्व मोगली जहागिरदार बनले असते. शिस्त सुटल्यामुळें नवीन धारे पडत चालले. प्रत्येक सरदार मुलुखगिरीवर निघण्याच्या आधींच जिंकावयाच्या मुलुखाची सनद छत्रपतींकडून करून घेई. छत्रपतीच्या दरबारचे प्रधान, हे निदान इतका तरी मान ठेवतात, एवढेंच समजत. शाहूच्या आगमनानें या प्रकारांत वाढच झाली. पेशव्यांनीं जुन्या शिरजोर सरदारांस मोडण्याचा प्रयत्न केला, पण असें करण्यासाठीं त्यांस नवीन स्वतःचे सरदार निर्माण करावे लागले. तात्पर्य काय? एकसूत्रीपणास बाध यावयाचा तो आलाच. नानासाहेबास जयाप्पा शिंद्यासारख्या सरदारांस जें चुचकारावें लागे व मल्हाररावाच्या मनस्वीपणापुढें मान वांकविण्याची पाळी येई, ती यामुळेंच. मात्र असें पेशवे न करते तर मराठ्यांचें जें नांव गाजलें तेंहि गाजलें नसतें. कारण मराठ्यांत एकांडेपणाचा दोष हा मूलभूतच आहे. आम्हीं अजूनहि पारशांसारख्या संहतीनें जाणाऱ्या लोकांस कावळ्यांची उपमा देत असतों. पण अशा कावळ्यांसारख्या जुटीनें वागणाऱ्या लोकांचीच कायमची भरभराट शक्य असते हें मात्र विसरतों. मराठ्यांच्या एकांडेपणास शौर्याची जोड असल्यामुळेंच त्यांचें नांव कांहीं काळ गाजलें. मराठ्यांचा इतिहास शिवाजीपासून आरंभ करून बहुतेक या एकांड्यांनींच बनविलेला आहे. नानासाहेबाच्या अमदानींत सुद्धां जयाप्पा, दत्ताजी, मल्हारराव, दमाजी, रघूजी, जानोजी प्रभृति मनस्वी एकांड्यांच्या एककल्ली पराक्रमानेंच राज्याची थोडीफार भरभराट झाली.

अठराव्या शतकांत पराक्रमी एकांड्यांची व्याप्ति मराठ्यांपुरतीच नसून हिंदुस्थानांतील इतर जातींतहि त्यांची उपज होत होती. पडत्या बादशाहीचे सफदरजंग, अलिवर्दीखान, निजामुल्मुल्क प्रभृति सुभेदार; रोहिले, शीख, जाट, बुंदेले प्रभृति जातींतील असंख्य सरदार; दक्षिणेंतील सावनूर, कडपें, कर्नूळ, अर्काट प्रभृति ठिकाणचे नबाब; व म्हैसूर, सोंधें, बिदनूर, त्रिचनापल्ली, चित्रदुर्ग प्रभृति असंख्य लहानमोठ्या संस्थानांचे स्थानिक राजे; हे सर्वच आपापल्या ठायीं स्वतंत्र होण्याच्या विचारानें वागत असून, ज्या आपल्याहून प्रबळ सत्ताधीशाचें सैन्य प्रत्यक्ष आपल्या दारांतच येऊन ठेपेल, त्यापुढें अगदीं तात्पुरतीच मान वांकविण्याचा त्यांचा प्रघात असे. सैन्य माघारें फिरलें कीं हे पूर्ण स्वतंत्र. पेशव्यांच्या फौजा सालोसाल गेल्या तरच खंडणी जमा व्हावयाची. मराठ्यांस उत्तरेंत काम पडलें तर दक्षिणेंतील खंडणी बंद, दक्षिणेंत स्वारी गेली तर उत्तरेस मराठ्यांचा अंमल उठण्याची भीति. अशी सर्व देशाची स्थिति असतांना ज्यांस हिंदुपदपातशाही स्थापण्याची महत्त्वाकांक्षा, त्यांनीं कोणत्या मार्गास लागावयाचें? पण मार्ग ठरण्यापूर्वी

महत्त्वाकांक्षा पुरी करण्यास मराठ्यांजवळ पुरेशी साधनसामग्री होती किंवा काय हें पाहिलें पाहिजे.

हिंदुपदपातशाही म्हणजे हिंदूंच्या प्रदेशांत हिंदूंचें वर्चस्व असणें. अठराव्या शतकांत हा हिंदुस्थान प्रदेश केवढा होता? दहाव्या शतकापर्यंत काबूल-कंदहारपर्यंत तो पसरलेला होता, परंतु मुसलमानांच्या लाटेनें त्यास सिंधूच्या पलीकडे हांकून दिलें होतें. काबूल-कंदहार हा प्रदेश वास्तविक लष्करी दृष्ट्या हिंदुस्थानावर स्वामित्व गाजविणाऱ्या सत्तेच्या ताब्यांत असावयास पाहिजे, तरच हिंदुस्थानचें रक्षण शक्य होतें. औरंगजेबापर्यंतच्या मोगल बादशहांचा अंमल या प्रदेशावर होता. तदनंतरसुद्धां राघोबादादाच्या सन १७५८ च्या अटकेपर्यंतच्या भरारीतागाईत हा प्रदेश दिल्लीपतीच्या कक्षेंतील अशी प्रचलित समजूत होती. इराणची व हिंदुस्थानची सरहद्द एकमेकांस भिडलेली असावी अशी पूर्वपरंपरा. त्यामुळेंच राघोबाच्या पत्रांत अब्दाली हा या पातशाहींतील बंडखोर उपटसुंभ अशीच भावना आढळते. पण नानासाहेबाच्या काळीं या सिंधुपार प्रदेशांत हिंदूंची वसती अत्यल्प असून हिंदुपदपातशाहीच्या कक्षेंतून हा प्रदेश कायमचा सुटला होता. हा प्रदेश, आजच्या काश्मीरच्या राज्यापैकीं खुद्द काश्मीर खोरें सोडून इतर प्रदेश, बलुचिस्थान, वगैरे हिंदूबाह्य प्रदेश वगळून; पण नेपाळ, सिंहलद्वीप वगैरे हिंदू वसती असलेले प्रदेश जमेस धरतां, हिंदुपदपातशाहीचें कार्यक्षेत्र उणेंपुरें पंधरा लक्ष चौरस मैलांचें ठरतें. बृहन्महाराष्ट्राचें क्षेत्रफळ एक लाख चौरस मैल. मराठ्यांनीं सर्व हिंदुस्थानावर अधिराज्य गाजवावयाचें म्हणजे आपल्या पंधरापट मुलखावर सत्ता चालवावयाची. आधुनिक शोधांनीं अंतर तोडण्यांत शिकस्त केल्यामुळें ही गोष्ट सोपी झाली आहे. आज पुण्याहून पेशावर म्हणजे दोन दिवसांची वाट, त्या काळीं ही वाट चालण्यास निदान महिना लागला असता. पुलांच्या अभावीं अब्दाली व सदाशिवराव यमुनेच्या दोन तीरांवर महिनेच्या महिने अडकून राहिले. त्या काळीं तारायंत्र असतें तर पानिपताहून पुण्यास तार जाऊन नानासाहेब केव्हांच साहाय्यास आला असता! क्षेत्रफळाची बाब सोडली तर जेत्यांजवळ निदान जास्त मारक शस्त्रास्त्रें तरी पाहिजेत. मराठ्यांजवळ तींहि नव्हतीं. राहतां राहिलें शौर्य व युद्धकौशल्य. यांवरच मराठ्यांचा जोर, पण याहि बाबतींत त्यांस अब्दाली, पोर्तुगीज, हैदर, इंग्रज असे वस्ताद प्रसंगोपात भेटतच.

आतां संख्याबलाकडे वळूं. त्या काळीं हिंदुस्थानची लोकसंख्या अजमासें बारा कोटींहून जास्त नसावी. महाराष्ट्राची आमच्या मतें पन्नास साठ लाखांहून जास्त नव्हती. हे आंकडे तर्कावर रचलेले असले तरी त्यांस मुळींच आधार नाहीं असें नव्हे. पण हे आधार व त्यांची गोळाबेरीज करण्याचें हें स्थळ नव्हे. हिंदुस्थानच्या बारा कोटींत मुसलमानांची संख्या सुमारें दोन कोटी असावी. जर्मन लष्करी रीतीच्या मापानें पहातां लोकसंख्येचा दहावा हिस्सा लढाऊ लोकांची संख्या असते. म्हणजे त्याकाळीं साहा लाख मराठे लढाईस योग्य ठरले असते असें होतें. परंतु जर्मन गणतींत

जातीची अडचण धरलेली नाहीं. हिंदुस्थानांतील बऱ्याच जातींतून लष्करी शिपाई मिळणें कठीण होतें. उदाहरणार्थ ब्राह्मण जात घेऊं. मराठ्यांत पुष्कळ ब्राह्मण सरदार होते तरी मराठ्यांच्या लष्करांत ब्राह्मण शिपायांचा फारसा भरणा होता असें दिसत नाहीं. लष्कराबरोबर असलेले हत्यारबंद कारकून वगळले तर केवळ शिपाईपेशा ब्राह्मण थोडेच आढळले असते. उलटपक्षीं अलाहाबाद अयोध्येकडील अनेक ब्राह्मण जाती शिपाई पेशाच्या आहेत. आपण इकडे तत्प्रांतीय जे परदेशी भय्ये अशाच कामावर ठेवतों त्यांतील बरेच ब्राह्मण असतात. सत्तावन सालच्या बंडांत बंगाल्यांत पहिलें बंड या परदेशी ब्राह्मण पलटणींतच झालें. आजहि त्यांचा शिपाईपेशा सुटलेला नाहीं. गेल्या महायुद्धांत या ब्राह्मणांनीं ४६ हजार लोक पुरवले असें युद्धानंतर त्यांची एक परिषद झाली तिच्या अध्यक्षांनीं अभिमानानें सांगितलें. त्या काळीं सुजाउद्दौल्याच्या सैन्यांत या लोकांचा भरणा होता. असे लोक वगळले तर बंगाल, मद्रास, गुजरात वगैरे प्रांतांतील ब्राह्मणांत मात्र लढवय्ये मुळींच कोणी नव्हते. क्षत्रिय व शेतकरी वर्गात शिपायांचा भरणा जसा होत असे तसा वैश्य व शिल्पी लोकांत होत नसे. अस्पृश्य जातींसहि लष्करी पेशांत मज्जाव नसला तरी त्यांच्याशीं बरोबरीनें काम करण्यास इतर उच्चवर्णीय तयार नसल्यामुळें त्यांची भरती होत नसावी. त्यांचा उपयोग मजूर, भारवाहक, असा करीत असत. या सर्व अडचणींचा विचार करतां त्या काळीं मराठ्यांस तीन लाखांपेक्षां जास्त सैन्य महाराष्ट्रीयांचें असें उभारणें कठीण होतें असें म्हणतां येईल. लोकसंख्येच्या वाढीनें सैन्यांतील कामास आलेल्या लोकांच्या जागीं नवीन भरती वेळोवेळीं होण्यासारखी होती. या तीन लाख सैन्याचें आधिपत्य एकाच एकसूत्री सत्तेकडे असतें तरीसुद्धां त्याच्या बळावर सर्व हिंदुस्थान जिंकणें व त्यावर अव्याहत सत्ता चालविणें त्या काळीं मराठ्यांस शक्य होतें असें वाटत नाहीं. पण तेंहि कधीं घडलें नाहीं. मराठ्यांचें बरेंच सैन्य निजामापाशीं होतें. पेशव्याशीं जुटीनें न वागणाऱ्या लहान सत्ताधीशांजवळहि बरेच मराठे शिपाई नोकरीस असत. म्हणजे पेशव्याजवळ दोन लाखांपेक्षां जास्त मराठे जमणें शक्य नव्हतें व त्यांच्या बळावर हिंदुपदपातशाही स्थापण्याचा त्याचा विचार होता.

वरील विवेचनावरून केवळ मराठ्यांस सर्व हिंदुस्थानची रखवाली करणें शक्य नव्हतें हें उघड झालें. म्हणूनच मराठ्यांस कानडी व मुसलमान शिपायांचें गाडदी सैन्य इब्राहिमखानाबरोबर ठेवणें भाग झालें. उत्तरेस शिंद्यांच्या फौजेंत हिंदुस्थानी शिपाई ठेवण्याचा प्रघात पडला. नारो शंकराजवळ अरब शिबंदी असे व पानिपतच्या वेळीं तर गिलच्यांची एक रुसून आलेली तुकडी मराठ्यांनीं नोकरीस ठेवली होती. अर्थात त्यापासून होणारे तोटेहि मराठ्यांच्या वांटणीस आले. आतां मराठ्यांच्या सैन्यास कितीपट सैन्याशीं झगडावें लागलें असतें याचा विचार करूं.

सर्व हिंदुस्थान मराठ्यांविरुद्ध एकदम उठलें असें धरलें तर एक कोटीवर

शिपायांशीं त्यांस झगडणें भाग आलें असतें. पण हें जास्तींत जास्त गणिती प्रमाण झालें. प्रत्यक्ष एवढ्या मोठ्या सैन्यास नोकरीस ठेवून त्यांकडून काम घेणारे सत्ताधीश हिंदुस्थानांत नव्हते हीच त्या वेळीं मराठ्यांच्या फायद्याची गोष्ट होती. मात्र अनेक वेळीं, विशेषतः स्वभूमीसाठीं लढण्याचा प्रसंग येई तेव्हां, हें अमूर्त सैन्य मराठ्यांस जाचक होत असे हें, त्यांच्या बुंदेले, राजपूत वगैरेंशीं झालेल्या झगड्यांत दिसून येत असे. अशी परिस्थिति सोडून इतर सत्ताधीशांकडे पाहतां त्यांच्या फौजेची बेरीज दहा लाखांपेक्षां जास्त नव्हती. हें सैन्य अटकेपासून रामेश्वरापर्यंत पसरलेलें असून तें एकत्र होण्याचा कधींच संभव नव्हता. पेशवा प्रसंगोपात एक लाखापर्यंत फौज एका वेळीं समरांगणांत आणूं शके. तितकीहि त्यास तोंड देण्यास कोणी आणूं शकत नसे. पानपतच्या वेळीं अब्दाली, रोहिले, सुजाउद्दौला असे एकत्र झाले, तेव्हांच मराठ्यांशीं सामन्यास आले. पण या काळीं मराठ्यांच्या तोट्याची अशी गोष्ट, हें सैन्य अनेक सत्ताधीशांच्या हातीं होतें हीच होती. एकाच्या हातीं मोठें सैन्य नसणें ही जशी मराठ्यांस स्वारी करण्यास उत्तेजक गोष्ट, तशीच एकाच सत्ताधीशाचा एका दिशेस पराभव करून दुसरे संस्थानिक दबूं शकत नसत ही गैरसोईची गोष्ट होती. वर ज्या कालतत्याचें वर्णन केलें त्याचा जोर अठराव्या शतकांत एवढा मोठा होता कीं, पेशव्यानें मोठ्या निजामाचा पराभव केला तरी कर्नाटकांतील एखादा क्षुद्र देसाईसुद्धां त्यामुळें दहशत खात नसे. त्याच्यावर स्वतंत्र सैन्यासह वेगळी स्वारी करावी तेव्हांच त्याच्याकडून खंडणी वसूल व्हावयाचा संभव. कर्नाटकांत स्वारी येऊन पुनः जर पेशवा एकाच जागीं राहील, तरीहि हे क्षुद्र सत्ताधीश भरणा करावयाचे नव्हत, प्रत्येकाच्या गांवास वेढा बसेल तेव्हांच त्यांकडून कांहीं मिळण्याची आशा पेशव्यानें धरावी! आणि पेशव्याचें उत्पन्न तर असल्या खंडण्यांवर अवलंबून. तें न आलें तर फौजेचें धरणें बसण्याची धास्ती. या सर्व परिस्थितीचा परिणाम असा होत असे कीं, पेशव्याची स्वारी बुंदेलखंडांत गेली तर दक्षिणेंत निजामानें पुनः जमवाजमव करून सामन्यास तयार व्हावें, पेशवा निजामावर आला तर राजपुतांनीं उचल करावी. एवंच जेथें मराठ्यांचें सैन्य तेथें तेवढें त्यांचें राज्य, बाकीचा प्रदेश बहुतेक स्वतंत्र अशी स्थिति होती.

वरील विवेचनावरून अशी शंका निघणें शक्य आहे कीं, जिंकलेल्या प्रदेशांत मराठ्यांनीं कायम शिबंदी ठेवून व्यवस्थित अंमल कां चालू केला नाहीं? या प्रश्नास अनेक उत्तरें आहेत. एक तर मराठ्यांनीं एखादें राज्य जिंकिलें याचा अर्थ तें संपूर्ण त्यांच्या ताब्यांत आलें असा कधींच नव्हता, त्याचा अर्थ त्या संस्थानिकाचा मराठ्यांनीं युद्धांत पराभव केला एवढाच असे. पण अशीही गोष्ट नेहमीं घडत नसे. धूर्त संस्थानिक मराठ्यांची परिस्थिति पुरी ओळखीत असत. युद्ध करून आपलें सैन्य जायां होण्यापूर्वींच ते शरण येऊन खंडणी ठरवीत व कांहीं रक्कम रोख देत. त्यांस माहीत असे कीं, एकदां हें सैन्य माघारें फिरलें कीं पुनः तीन वर्षें धास्ती नाहीं, तें

दुसऱ्या दिशांस गुंतलें जाणार, पुनः येईल तेव्हां पाहतां येईल. या वागणुकीचा परिणाम, मराठ्यांवर प्रसंगोपात उलटूं शकणारें सैन्य शाबूत अस्तित्वांत राही, कायमचें नष्ट होत नसे. याच गोष्टींत पेशव्यांच्या राजनीतीचा लंगडेपणा निदर्शनास येतो. एकच दिशा रोंखून तिकडील प्रदेश निःशेष–शत्रु करण्याचें टाकून त्यांनीं अनेक बाजूचीं राजकारणें एकदम हातांत घेतलीं. हरिवंशांतील,

**शत्रुशेषमृणशेषं शेषमग्नेश्च भूनृप ॥**
**पुनर्वर्धेत संभूय तस्माच्छेषं न शेषयेत् ॥**

ही शिवाजीनें ओळखलेली राजनीति पेशव्यांनीं अवलंबिली नाहीं. अशी नीति आचरावयास एक प्रकारचा करडेपणा लागतो तो शिवकालीन मराठ्यांत होता, पेशवाईत उरलेला दिसत नाहीं. जेतृपणा हा एक प्रकारें क्रूरपणाच आहे, त्या क्रूरपणाची भरपाई पुढें सम्यक् प्रजापालनानें करावयाची असते. जेतृपणाचा राजधर्म आचरतांना ज्याचें मन व्यक्तिधर्मास विसरत नाहीं तो जेता होण्यासच अयोग्य होय. या दृष्टीनें पहातां नानासाहेब पेशव्याची मोटी चूक, एक एक कांटा पुरा काढून न टाकणें ही होय. त्यानें कसें वागावयास पाहिजे होतें याचा विचार आतां करूं.

बाजीरावाच्या मृत्यूपर्यंत मराठ्यांचा अंमल अर्धेउणें महाराष्ट्र, गुजरातचा दक्षिण-भाग, माळवा, बुंदेलखंड, मध्यप्रांतांतील बराच भाग इतक्या प्रदेशावर साधारणपणें बसला होता. साधारणपणें म्हणण्याचें कारण माळवा, बुंदेलखंड वगैरे ठिकाणीं सुरळित अंमल चालू झाला नसून केवळ जुजबी खंडणी वसूल होत असे. सरदारांत तंटे होऊं नयेत म्हणून शाहूनें वेगवेगळ्या सरदारांस अनेक दिशांस पाठविण्याचा प्रघात सुरू केला. त्याचा परिणाम असा झाला कीं बाजीराव फक्त उत्तरेस जाऊं लागला. दक्षिण बाजू ही फत्तेसिंग भोसले, प्रतिनिधि, बाबूजी नाईक, यांचें कार्यक्षेत्र म्हणून राखण्यांत आली. या गोष्टीचा परिणाम मराठ्यांच्या राज्यास अत्यंत विघातक झाला. ज्या बाजूस अपराक्रमी सरदार जावे अशी योजना होती ती बाजू लंगडी राहिली. वास्तविक सर्व मराठ्यांच्या हितावर लक्ष ठेवणें व परराष्ट्रांपुरती तरी एकमुखी सत्ता राखणें या दृष्टीनें काम चालण्यास सर्वांवर एका हुषार माणसाची योजना झाली पाहिजे होती. स्वतः शाहू असें काम करण्याचा प्रयत्न करी, पण असल्या कामास तो जात्याच नालायक होता. बाजीरावाची मुख्य प्रधान या नात्याची हुकमत पाळण्यास कोणीच तयार नव्हता. बाजीरावाच्या वेळीं दिल्लीची बादशाही बरीच जोर धरून होती. वजीर कमरुद्दीनखान, निजामउल्मुल्क, सफदरजंग वगैरे हुषार गृहस्थ तिला टेकू देऊन होते. अशा वेळीं बाजीरावाच्या स्वाऱ्या तिकडच्या प्रदेशांत होण्यांत कांहींच फायदा नव्हता, व तसा झालाहि नाहीं. या वेळीं हिंदुस्थानांतील राजनीतीचें धोरण जुन्या वृक्षाच्या बळकट खोडावर घाव घालण्याचें नसून तिच्या फांद्यांवर हत्यावर चालविण्याचें होतें. बादशाही

कमजोर झाली असली तरी तिचीं पाळेंमुळें इतकीं खोलवर गेलेलीं होतीं कीं, तिच्यावर प्रत्यक्ष उठणें म्हणजे गांधिलमाशीच्या पैकडीस हात लावण्यासारखें होतें. सारी दक्षिण मोकळी पडलेली असतांना नर्मदा ओलांडण्याचें मराठ्यांस कांहींच प्रयोजन नव्हतें. बाजीरावाची झडप कर्नाटकावर पडती तर अर्काट, सावनूर, कडपें, म्हैसूर वगैरे लहान संस्थानें जागच्या जागीं विराम पावून, महंमदअली, चंदासाहेब, हैदर, व त्यांच्या बरोबर इंग्रज, फ्रेंच वगैरेंचीं नांवें पुढें येणेंच अशक्य झालें असतें. हा सर्व प्रदेश अनेक, आपआपसांत भांडणाऱ्या, क्षुद्र संस्थानिकांच्या ताब्यांत राहूं दिला, ही मराठ्यांच्या दक्षिणेंतील राजकारणांतील मोठी चूक. यामुळेंच धूर्त व युद्धशास्त्रांत जास्त निष्णात अशा परकीय व्यापाऱ्यांस बोट शिरकावण्यास अवकाश मिळाला, बरें बाजीरावाच्या वेळीं बाजू चुकली तर निदान नानासाहेबानें तरी ती सुधारावी कीं नाहीं? सन १७४०–४१ सालांत शाहूनें तंजावरच्या आपल्या भाईबंदाच्या मदतीस म्हणून कां होईना, तिकडे रघूजी भोसले प्रभृतींस पाठवून मराठ्यांचा दरारा पुनश्च बसविला. हा सर्व प्रदेश शहाजी, शिवाजी, राजाराम यांच्या काळीं मराठ्यांच्या परिचयाचा झालेला असून तिकडील कांहीं प्रदेशांवर त्यांचें राज्यहि होतें. असा प्रदेश हातीं आलेला असतांना तेथील राज्य पक्कें करण्याचें सोडून मराठ्यांस परत येण्याचें कांहींच कारण नव्हतें. पण आपसांतील चुरशीमुळें रघूजीस वाटलें कीं, नानासाहेब उत्तरेंत गेला आहे तेव्हां आपला तिकडील मुलूख सुरक्षित नाहीं, त्यामुळें तो परत आला. यापुढें तरी नानासाहेबानें उत्तरेंतून परत आल्यावर कर्नाटकाकडे लक्ष पुरवावें कीं नाहीं? पण नाहीं, तो रघूजीच्या पाठीवर बंगाल्यांत गेला व तेथें एकाच छत्रपतीचे दोन सरदार आपसांत लढतात असें दृश्य उत्तरेंतील मुसलमानांस दिसलें! या कृत्याचा लष्करी दृष्ट्या झालेला तोटा बाजूस ठेवला तरी राजनीतींतीत ही केवढी घोडचूक समजावयाची बरें! अतःपर उत्तरेंतील राजेरजवाडे मनांत पुरे समजले कीं, एका मराठा सरदाराविरुद्ध आपणांस दुसऱ्याची मदत घेतली कीं झालें काम! राजपूत, जाट, वजीर, रोहिले यांनीं या कानमंत्राचा पुढें कसा उपयोग करून घेतला हें इतिहासविदांस माहीत आहेच. अशा तऱ्हेची चूक नानासाहेबाच्या हातून घडते तेव्हां त्याच्या मुत्सद्देगिरीची काय तारीफ करावी! मराठ्यांच्या राजकीय नीतिमत्तेचें यापरतें प्रदर्शन तें काय राहिलें!

हे दोन प्रबल मराठे सरदार दूरच्या बंगाल प्रांतांत गुंतले आहेत ही संधि धूर्त निजामानें व्यर्थ दवडिली नाहीं. त्यानें याच वेळीं (सन १७४३) कर्नाटकांत उतरून मराठ्यांचें दोन वर्षांचें कार्य चुटकीसरशी कोसळून टाकलें. यावेळीं त्यास शह देणें हें मराठ्यांच्या साम्राज्याच्या मुख्य प्रधानाचें कर्तव्य नव्हतें काय? पण त्याच्या मनांत, कर्नाटक गेलें तर भोसल्याचें व बाबूजीचें. दुर्बळांचा कनवाळू शाहू तें त्यांकडून काढून आपणास थोडेंच देणार आहे? त्यापेक्षां निजामाशीं गोडी ठेवून आपण (बाजीरावानें आधींच जिंकलेल्या) माळव्याच्या कोरड्या बादशाही सनदा आपल्या नांवें मिळवणें हेंच

बरें. एवंच हा प्रदेश कायमचा मराठ्यांच्या कक्षेंतून सुटला व याच प्रदेशांत इंग्रज, फ्रेंच, हैदर वगैरे यथावकाश वाढीस लागले. मराठ्यांच्या हाताखालचा मुलूख गमावून हिंदुपदपातशाहीचें पाऊल पुढेंच पडणार होतें नव्हे!

मराठ्यांच्या राज्याचा कायमचा दुष्मन् म्हणजे निजाम. एवढी पेशव्यांची अमदानी होऊन त्यांचें नांवहि राहिलें नाहीं, पण निजाम आजसुद्धां कायमच आहे. पेशव्यांनीं निजामाचा दहावीस वेळ पराभव केला असेल, पण सर्व मराठी बोलणारे लोकहि कधीं त्याच्या ताब्यांतून सुटले नाहींत, अजूनहि ते त्याच्या राज्यांत आहेत. असें कां बरें? 'मराठा तितुका मेळवावा' हा शिवाजीस दिलेला गुरुमंत्र "शिवाजी महाराजांच्या शिष्यांस" आठवला नाहीं काय? हिंदुधर्माभिमानी राजपूत राजांवर आपले पराक्रमी सरदार वर्षानुवर्ष गुंतवून ठेवणाऱ्या पेशव्यास तितक्याच श्रमांत निजामाचें समूळ उच्चाटन करतां आलें नसतें काय? पण दुष्टांचें शेषहि शिल्लक ठेवूं नये ही साधी पुराणांत सांगितलेली नीति पेशव्यास समजलेली दिसत नाहीं. हिंदुपदपातशाही करूं इच्छिणाऱ्या पेशव्यास राजपूत, जाट, बुंदेले, हे स्वधर्मीय परके वाटले. त्यांच्यावर ज्या चिडीनें व आवेशानें मोहिमा झाल्या तशा निजामावर होत्या, तर कपाळास लावावयास त्याची रक्षासुद्धां उरली नसती! त्यास शिल्लक ठेवून दिल्लीच्या राजकारणांत हात घालण्याची पेशव्यास काय आवश्यकता होती? निजामाच्या मदतीस कोणीहि मुसलमान उत्तरेंतून येत नव्हता. त्याचें राज्य बुडतें तर दिल्लीच्या बादशाहीप्रमाणें लोकांस त्याचें प्रेम थोडेंच होतें? त्या काळीं या सर्व स्वतंत्र झालेल्या व दिल्लीपतीस न पुसणाऱ्या सुभेदारांस मोडणें हें एका दृष्टीनें बंडखोरांचें पारिपत्यच भासण्यासारखें होतें. निदान तसा राजकारणी पुकारा करण्यास पेशव्यास सवड होती. दक्षिणेंत मुसलमानांची संख्या इतकी थोडी होती कीं, त्या सर्वांस हद्दपार करणेंहि त्याकाळीं शक्य झालें असतें. पण हें सर्व करण्यास जो कडवा धर्माभिमान, जी करडी राजनीति, जो करारीपणा, चिकाटी व निश्चय हीं लागतात, तीं कोठून आणावयाचीं?

प्रत्येक युगाचा कालात्मा जसा वेगळा, तसेंच त्या कालात्म्यास प्रसन्न करून घेण्याची रीति वेगळी. ज्या आरोळीनें सोळाव्या शतकांत कार्य होतें, त्याच आरोळीनें अठराव्या शतकांत होण्यासारखें नाहीं; किंवा सत्राव्या शतकांत ज्या गर्जनेस जनतेनें हांक दिली, तिचा टाहो विसाव्यांत उपयोगी पडण्यासारखा नाहीं. कालात्म्यास वश करूं इच्छिणाऱ्या भक्तास विशिष्ट वेष परिधान करावा लागतो, नवा मंत्र जपावा लागतो, नवा शंखनाद करावा लागतो. सत्राव्या शतकांत शिवाजीनें धर्माची आरोळी ठोकून कार्यसाधना केली, त्या आरोळीच्या समर्थनार्थ प्रतापगडची भवानीहि त्याच्या मुखें बोलूं लागली, व त्या भवानीचे भक्तहि शिवाजीच्या कार्यांत सामील झाले. शिवाजीला यशोलाभ होण्यास एकनाथ, तुकाराम, रामदास, अशा 'टाळकुट्या' भक्तांनीं जें वातावरण निर्माण केलें होतें तेंच उपयोगी पडलें. तसें तें वातावरण नसतें तर शिवाजीच्या

अंगांतील भवानीस पळून जाण्याची पाळी आली असती. अठराव्या शतकांत अशा धर्मश्रद्धेचा पूर बराच ओसरला होता, तरी प्रवाह चालू होता. कुशल कर्णधारास नाव हांकण्याइतकें पाणी नदींत शिल्लक होतें; नाव केवळच रुतली नसती. पण या कालाला अशा नव्या मंत्राची मात्र जोड पाहिजे होती कीं, ज्याच्या जपानें जें पिशाच कालदेवतेच्या मानगुटीस बसलें होतें तें अंतर्धान पावावें. शिवाजीच्या कार्यक्षेत्रास व काळास पुरण्यासारखा मंत्र 'मराठा तितुका मेळवावा' हा रामदासांनीं सांगितला, पण या नव्या काळास लागू पडणारा मंत्र नानासाहेबास सांपडला नाहीं. तो मंत्र विसाव्या शतकाप्रमाणें 'हिंदी तितुका मेळवावा' इतका विस्तृत नसता तरी 'हिंदू तितुका मेळवावा' एवढा विस्तृत पाहिजे होता खास. अशा मंत्राचा जप नानासाहेब करता तर कालदेवता त्यास निश्चित अनुकूल झाली असती. पंजाबांत पिछाडी संभाळण्यास शीख; मध्यें हिंदुस्थान संभाळण्यास राजपूत, जाट, बुंदेले; व दक्षिणेस मराठे; असे ठांसून उभे राहते तर हिंदुपद्पातशाहीहि झाली असती आणि मानगुटीस बसण्यासाठीं आकाशांत घिरट्या घालणारीं परकी पाश्चात्य पिशाचेंहि अंतर्धान पावलीं असतीं. सत्राव्या शतकांत शिवाजीला उत्तराभिमुख सैन्यरचना संग्रामासाठीं करणें भाग होतें, अठराव्यांत ती दक्षिणाभिमुख करणें जरूर होतें. पण हें सर्व कालात्मा जाणणाऱ्या कुशल सेनापतीसच कळण्यासारखें होतें; पेशवा तें समजण्याइतका धूर्त नव्हता, म्हणूनच तो पिछाडीचें महत्त्व न ओळखतां उत्तराभिमुख मुमूर्षु बादशाहाकडे तोंड करून उभा राहिला होता व त्याहि स्थितींत योग्य मंत्राचा जप न केल्यामुळें पराभूत झाला.

बीजगणितांतील उदाहरण सोडविणाऱ्या विद्यार्थ्यास एका गोष्टीचें विशेष अवधान ठेवावें लागतें. ती गोष्ट म्हणजे एक अज्ञात वस्तु ज्ञात होण्याचा प्रयत्न करीत असतांना दुसऱ्या अज्ञात वस्तूचा समीकरणांत प्रवेश न होऊं देणें. नाहीं तर एक अज्ञात वस्तूचें दुसऱ्या अज्ञात वस्तूच्या रूपांत उत्तर मिळून, दोनहि वस्तू पुनः अज्ञात राहतात त्या राहातातच. हिंदुस्थानच्या राजकारणाचें समीकरण सोडवितांना नानासाहेबाची तीच गत झाली. हुषार गणिती इष्ट उत्तर काढण्यासाठीं नव्या अज्ञातांचा समावेश समीकरणांत करतो, नाहीं असें नाहीं, पण सर्वच अज्ञातें परस्परांस खोडून टाकतील अशी त्याची योजना असते. आपला कारभार एकसूत्री करण्यासाठीं नानासाहेबास तुळाजी आंग्र्याचा बींमोड करणें इष्ट होतें असें गृहीत धरलें, तरी त्यासाठीं इंग्रजांचा प्रवेश हिंदी राजकारणाच्या समीकरणांत करून देण्याची त्यास गरज नव्हती; तीहि होती असें धरलें, तर निदान या नव्या पाहुण्यास खोडून टाकण्याची व्यवस्था त्यास करणें जरूर होतें. तशी व्यवस्था त्यानें काय केली? कर्नाटकाच्या रंगभूमीवर इंग्रज-फ्रेंचांचें झुंज लागलें असतां दोघेहि नष्ट होतील अशी योजना करणें पेशव्यास शक्य होतें; पण या वेळीं त्यानें तिकडे अगदीं दुर्लक्ष केलें. उत्तरेंतील बादशाही हें हिंदी राजकारणांतील कायमचें मोहरें होतें. त्याचा समाचार पुढेंमागें घेतां येण्यासारखा होता.

पण इंग्रज व फ्रेंच या नव्या मोहऱ्यांची तशी स्थिति नव्हती. त्यांच्या गतीचेंहि आपणांस चांगलेंसें ज्ञान झालें नव्हतें. या अज्ञातकुलशील नव्या पाहुण्यांना येथें वसती करूं न देणें हेंच मुत्सद्दीपणाचें होतें. तें न करतां, जिच्याबद्दल जुनाटपणामुळें सर्वांस आदर, त्या बादशाहींत नानासाहेबानें अगदीं अयोग्य वेळीं हात घातला. वृद्ध बादशाहीला आपोआप मरूं देऊन नंतर तेथें आपलें बस्तान बसवणें, हा डाव त्या काळीं खेळण्याचा होता. त्या ऐवजीं दिल्लीकडे अजाण रघुनाथरावाची रवानगी करून पेशव्यानें केवढी चूक केली पहा. या वेळीं अब्दाली हा नवा मोहरा हिंदुस्थानच्या राजकारणांत प्रवेश करीत होता. मराठे दिल्लीस न येतां पूर्वेस वजिराच्या मुलखांत काशी प्रयाग सोडविण्यास जाते, तर इकडे हिंदी मुसलमान व पठाण आपसांत लढून मेले असते किंवा निदान दुर्बळ होते. काशी प्रयाग सोडविण्याच्या धर्मयुद्धांत राजपूत, जाट, बुंदेले वगैरेंची थोडीबहुत मदत व सहानुभूति मिळण्यासारखी होती. निदान त्यांचा उपसर्ग खास झाला नसता असें म्हणतां येतें. त्या ऐवजीं दिल्लींत मराठ्यांचा तळ पडल्याबरोबर हिंदी मुसलमानांस अब्दालीसारख्या शत्रूच्या गळ्यांत पडणें भाग झालें व दोघांच्या एकत्र शक्तीशीं झगडण्याची पाळी मराठ्यांस आली. या कामांत जाट, राजपूत वगैरे बादशाहीबद्दल आदर असणाऱ्या हिंदूंचीहि मदत त्यांस मिळणें अर्थातच शक्य नव्हतें.

जी चूक दिल्लीच्या राजकारणांत झाली तशाच स्वरूपाची चूक म्हैसूर प्रकरणीं पेशव्याच्या हातून घडली. एकतर आधीं शेजारचें निजामाचें मुसल्मानी राज्य कायम ठेवून पूर्ण हिंदू म्हैसुरावर जाण्याचें पेशव्यास कारण नव्हतें. जावयाचें तर तें पूर्ण ताब्यांत घेण्याची तयारी पाहिजे होती. जिंकलेला मुलूख ताबडतोब ताब्यांत घेऊन तेथें आपलें राज्ययंत्र व्यवस्थित सुरू करणें हें मराठ्यांस ठाऊकच नव्हतें. किंबहुना तशी त्यांची तयारीच नव्हती. सर्व हिंदुस्थानचा कारभार चालवण्यास भरपूर मराठी सैन्य जसें पुरण्यासारखें नव्हतें, तसेंच शांततेच्या काळांत काम चालवण्याइतके कारकून, कमाविसदार, सुभेदार वगैरे माणसेंहि महाराष्ट्रांतून पुरलीं असतीं असें वाटत नाहीं. मराठ्यांचें मनुष्यबळच इतकें नव्हतें. त्यामुळें चौथाईच्या नुसत्या कबुलीवर मराठे माघारे जात. म्हैसूरच्या नंजराजाचा पराभव करून पुनः मराठ्यांनीं त्यास कायम ठेवल्याचा परिणाम असा झाला कीं, त्यास हैदराची मदत घ्यावी लागली; व अशा रीतीनें अप्रत्यक्षपणें हैदराच्या उदयास पेशवा कारणीभूत झाला. अशाच मराठ्यांच्या अमुत्सद्देगिरीच्या वागणुकीनें, निजामास फ्रेंचांची, महंमदअलीस इंग्रजांची, जंजिरेकरास मुंबईकरांची, अशी मदत घ्यावी लागून मराठ्यांच्या शत्रूंची संख्या वाढली व त्यांचा जोरहि वाढला. शत्रूचें एकतर समूळ उच्चाटन करणें किंवा निदान इतरांची मदत त्यास घेतां येऊं नये अशी योजना करणें, हीं नानासाहेबांस करतां आलीं नाहींत.

वर सांगितलेल्या सर्व चुकांपेक्षां मोठी चूक पेशव्याकडून बंगालप्रकरणीं घडली व तीमुळें त्याच्या शहाणपणाचें योग्य माप घेतां येतें. या चुकीचें कडू फळ केवळ

मराठ्यांच्याच वांट्यास न येतां, सर्व हिंदुस्थानास तें चाखावें लागत आहे. सन १७४३ च्या भांडणानंतर रघूजीनें दक्षिण सोडून बंगाल हें आपलें कार्यक्षेत्र केलें व सालोसाल स्वाऱ्या करून त्या सुभ्याची चौथाई त्यानें मिळविली व खेरीज ओढ्या प्रांतहि आपल्या राज्यास जोडला. चौथाईचा करार पाळावयाचा म्हणजे त्याप्रमाणें, बंगालवर कोणी स्वारी केल्यास त्या प्रांताचें रक्षण करणें हें भोसल्याचें कर्तव्य होतें. करार बाजूस ठेवला तरी आपली चौथाई आपणांस पुढेंहि अव्याहत मिळण्यासाठीं तरी तसें करणें मराठ्यांस इष्ट होतें हें उघड आहे. सर्व हिंदुस्थानांत त्या काळीं बंगालसारखा अव्याहत उत्पन्न देणारा प्रांत नव्हता. कारण या प्रदेशास दुष्काळाची बाधा क्वचित् होते. गंगेच्या पुरांमुळें हा प्रदेश फार सुपीक झालेला होता. खेरीज हा प्रदेश हिंदुस्थानच्या एका टोकास असल्यामुळें बाहेरच्या स्वाऱ्यांचें त्यास फारसें भय नसे व लोकहि गरीब असल्यामुळें अंतस्थ बंडेंहि फारशीं होत नसत. जर हा सुभा पेशव्यानें पुरा जिंकला असता, तर त्यास त्याच्या बाकीच्या सर्व राज्याइतकें उत्पन्न झालें असतें. अलिवर्दीखानानें जो चौथाईचा करार केला त्यांत दुसरा कोणी मराठा सरदारहि बंगालवर आल्यास रघूजीनें रक्षणास आलें पाहिजे अशी अट होती. शाहूनंतर मराठ्यांच्या राज्याचा सर्वाधिकार नानासाहेबाकडे आला तेव्हां राज्याचे सर्व करार पाळले जातील हें पाहणें व तशी व्यवस्था करणें हें त्याचें कर्तव्य झालें. पण हें कर्तव्य पाळण्याऐवजीं बंगाल स्वतःच हाताखालीं घालण्याचा त्याचा विचार होता असें त्याच्या जयापा शिंद्यास गेलेल्या आज्ञेवरून दिसतें. सन १७५५ च्या आरंभीं रघूजी भोसले वारला. त्याचे दोन मुलगे जानोजी व मुधोजी यांचें भांडण सुरू झालें. रघूजी जिवंत असेपर्यंत नागपुरच्या कारभारांत पेशव्यास हात घालतां येत नव्हता. तशी संधि या वेळीं आली. पेशव्याच्या अंगांत मुत्सद्दीपण व राज्यहितैषा असती तर त्यानें हें भांडण आपल्या जोरावर मोडून दोघांसहि मराठशाहीच्या उद्योगांत सामील करून घेतलें असतें. पण तसें कांहींच न करितां नानासाहेबानें दोघांसहि आपणाजवळ माशा मारीत ठेवलें. हिंदुस्थानची पूर्व बाजू संभाळण्याचें काम भोसल्यांचें होतें. त्यांनीं नागपुरास राहून बंगाल्यावर पाहारा ठेवणें हेंच त्यांचें मराठीशाहींतील कार्य होतें. सन १७५६–५७ हीं वर्षें हिंदुस्थानच्या इतिहासांत क्रांतीचीं होतीं. पेशव्यानें इंग्रजांच्या मदतीनें १७५६ च्या फेब्रुआरींत तुळाजीचा उच्छेद केला, व इंग्रजांस आरबी समुद्र मोकळा करून दिला. स्वतः पेशवा या वेळीं सावनूरच्या मोहिमेवर गेला होता. बरोबर भांडण तोडण्याच्या निमित्तानें भोसले बंधु त्यानें दिवसगत लावून मुद्दाम घेतले होते. याच वेळीं बंगाल्यांत अलिवर्दीखान मरून त्याचा उनाड नातू सिराजउद्दौला सुभेदार झाला. मराठ्यांचें पाऊल त्या बाजूस पुढें सरकवण्यास ही अमूल्य संधि होती. मृत नबाबाच्या दुसऱ्या मुलींचे नवरे हेहि वारस होते. दिल्लीचा बादशहा मराठे सांगतील त्यास सुभेदारीचीं वस्त्रें देता. अशा वेळीं भोसल्यांच्या संगनमतानें पेशव्यानें बंगालच्या राजकारणांत स्वतः लक्ष घातलें पाहिजे होतें.

विजयदुर्ग पडल्याबरोबर इंग्रज किती शेर झाले होते हें, किल्ला पेशव्याच्या स्वाधीन करण्यांत त्यांनीं जी टाळाटाळ चालविली होती त्यावरून कळून चुकलें होतें. या वेळीं इंग्रजफ्रेंचांत सप्तवार्षिक युद्ध सुरू होऊन कलकत्तेकर इंग्रजांची सिराजनें तळी उठवून दिली म्हणूनच इंग्रज जरा नरम येऊन त्यांनीं विजयदुर्ग सोडलें इतकेंच. नाहींतर नानासाहेबास इंग्रजांचा कावा याच वेळीं समजावयाचा. पेशव्यास मात्र या संधीचा मराठ्यांस फायदेशीर उपयोग करून घेणें सुचलें नाहीं. किंबहुना कलकत्त्याच्या भांडणाची हकीकत तरी त्यास कळली होती किंवा कसें याचीहि शंका वाटते. सर्व दिशांची ज्यास बातमीहि राखतां येत नाहीं त्यानें हिंदुपदपातशाहीची महत्त्वाकांक्षा बाळगावी याचें मात्र आश्चर्य वाटतें. परदेशांत वकिलाती ठेवणें दूरच पण बंगालच्या नवाबाजवळसुद्धां पेशव्याचा वकील नव्हता. त्याचा परिणाम व्हायचा तोच झाला. रघुनाथरावाची स्वारी कंगाल बनलेल्या दिल्लीवर गेली व नानासाहेब स्वतः श्रीरंगपट्टणावर गेला. मध्यंतरीं इंग्रजांस मोकळें रान सांपडून क्लाइवनें भली मोठी शिकार केली. विजयदुर्गाहून तो मद्रासेस गेला व मद्रासेसहि इंग्रजांवर कोणी नसल्यानें त्यास, कलकत्तेकर इंग्रज हुगळीच्या तोंडावर हिंवतापानें उपाशी मरत होते त्यांच्या मदतीस जातां आलें. नबाबाच्या दरबारीं या वेळीं मराठ्यांचा मुळींच शह नसल्यानें क्लाइवनें सावकाश कारस्थानें रचून युद्धावांचून बंगाल घशांत टाकला. याच तीन कोटीच्या सुभ्याची बारा लाख चौथाई मिळण्यासाठीं, भोंसल्यास दहा वर्षें सालोसाल स्वाऱ्या कराव्या लागल्या होत्या. एवंच, ज्यांत स्वारीचा खर्चहि उभा होत नाहीं अशा अब्दालीवरील स्वाऱ्या कराव्या मराठ्यांनीं, व केवळ बुद्धिबळावर व हिंमतीवर राज्य संपादावें इंग्रजांनीं, असा प्रकार झाला. आणि हा प्रकार होतो केव्हां? काय रावबाजीच्या अंमलांत? नव्हे; पेशव्यांतील दिग्विजयी नानासाहेब, भाऊसाहेब, राघो भरारी यांच्या हयातींत व ते ज्या हिंदुस्थानांत हिंदुपदपातशाही (कीं भटकुलबादशाही?) स्थापण्याच्या महत्त्वाकांक्षेनें कमर बांधून तयार होते तेव्हां. बरें, हा प्रकार होतो कोठें? काय कानडांत व मॉरिशस बेटांत? नव्हे, नव्हे, या भरतभूमींतच गंगासागरसंगमीं!!

या प्रकरणाबद्दल नानासाहेबास वेळींच बातमी मिळाली नाहीं, किंवा मिळूनहि त्याचें महत्त्व त्या वेळीं लक्षांत येण्यासारखें नव्हतें असें मानलें, तरी प्लासीनंतर सुद्धां चार वर्षें नानासाहेब जिवंत होता. इंग्रज-फ्रेंचांचें युद्ध रंगास चढलें होतें. नानासाहेब यावेळीं मोठी फौज घेऊन कर्नाटकांत उतरता तर फ्रेंचांच्या साहाय्यानें मद्रासचें उच्चाटन करतां आलें असतें. मद्रास व मुंबई येथें दबाव पडता तर कलकत्तेकर इंग्रजांस काबूंत आणणें जानोजी भोसल्यास अगदीं सोपें होतें. कारण मीरजाफरासहि इंग्रज नको असून त्यानें डच लोकांच्या मदतीनें त्याच्या ताब्यांतून सुटण्याचा यत्न चालविला होता. जानोजीस त्यानें चौथाईच्या कराराची पुनः कबुली दिली होती व त्याची मदतहि मागितली होती. या प्रकरणीं निजामाचीहि मदत मिळण्यासारखी होती. कारण त्याचा उत्तर सरकार

प्रांत कर्नल फोर्डनें कलकत्त्याहून भोसल्याच्या ओढ्या प्रांतांतून येऊन जिंकून घेतला होता. पेशव्याच्या शहामुळें बुसीला सलाबतजंगाच्या रक्षणास राहावें लागल्यामुळें त्यास फोर्डच्या विरुद्ध जातां आलें नाहीं. जानोजी भोसल्यास, फोर्ड आपला मुलुख तुडवीत जात असतां त्यास अडवितां आलें असतें, पण त्यानेंहि नानासाहेबाच्या चुरशीमुळें या वेळीं इंग्रजांशीं गोडीनें घेतलेलें दिसतें. एरवीं आपल्या चौथाईच्या क्षेत्रांत दुसरे शिरले असतां तो स्वस्थ कां बसला होता याचा उलगडा होत नाहीं. बाकी त्याचें वर्तन कसेंहि असलें, तरी या प्रकरणाकडे नानासाहेबाचें जे सर्वस्वी दुर्लक्ष झालें त्याचें समर्थन करतां येत नाहीं. सर्व हिंदुस्थानांत आपल्या संमतीशिवाय पानहि हालूं नये अशी व्यवस्था राखणें हें त्याचें काम होतें. हिंदुपदपातशाही करणें त्याचें ध्येय होतें, तर त्या हेतूच्या सिद्ध्यर्थ तरी त्यानें इकडे लक्ष पुरवावयाचें होतें. मुत्सद्देगिरीच्या दृष्टीनेंहि हिंदी रंगभूमीवर नवीं पात्रें तरी न येतील अशी काळजी त्यास घेतली पाहिजे होती. यांपैकीं एकहि बाब ज्यास सांभाळतां आली नाहीं त्यास मुत्सद्दी म्हणणें धाष्टर्याचें आहे.

ज्याच्या हातीं लोकांचें कल्याण करण्याची सत्ता असते, त्याच्याकडूनच त्यांचें अकल्याण होण्याचीहि धास्ती राहाते. एकसूत्री राजसत्तेचा लंगडेपणा याच गोष्टींत आहे. ज्या जर्मन कैसरनें तो देश वैभवास चढविला, त्याच्याच हातून त्यास अधोगति प्राप्त झाली. ज्यांच्या वर्तनानें जगाच्या इतिहासाचा ओघ बदलूं शकतो, अशा पुरुषांत नानासाहेबाची गणना करावी लागेल. कारण तशीच महत्त्वाची जागा त्याच्या वांट्यास आली होती. तो काळही ओघ वळण्याचा होता. मात्र या गोष्टीची जाणीव नानासाहेबास होती असें दिसत नाहीं. मराठ्यांना हिंदुस्थानभर धिंगाणा घालण्याचा अधिकार जेणेंकरून प्राप्त झाला होता, त्याच कारणानें त्या देशाचें रक्षण करण्याची जबाबदारीहि त्यांवर आली होती. हिंदुस्थानांतील सर्व जातींत हुशार असे जे ब्राह्मण, त्यांपैकींच कांहींच्या वांट्यास ही जबाबदारी पार पाडून दाखविणें आलें होतें. अशी जबाबदारी ज्यांस तोलली नाहीं त्यांनीं अर्थात् दोषास पात्र व्हावें हें योग्यच आहे. हिंदुस्थानांतील तत्कालीन कोणाहि सत्ताधीशापेक्षां पेशव्यास हें महत्त्वाचें काम बजावण्यास जास्त संधि व शक्ति होती. पेशव्याकडून हें काम तर झालें नाहींच, पण उलट त्याच्या वर्तनाचा असा चमत्कारिक परिणाम झाला कीं, परक्यांस हात घालण्यास संधि प्राप्त झाली. आपल्या वर्तनाचा असा परिणाम होईल हें न लक्षांत येणें, हेंच त्याच्या शहाणपणास कमीपणा आणतें. ल्युसिटानिया सारख्या बोटी बुडवण्याच्या आपल्या कार्यक्रमानें अमेरिका युद्धांत पडेल हें लक्षांत न आल्यामुळेंच कैसरसारख्यांचा पराभव होतो व म्हणूनच त्यांचें वर्तन गैरमुत्सद्देगिरीचें ठरतें. नानासाहेबास पाश्चात्यांचें स्तोम हिंदुस्थानांत न माजेल अशी काळजी निश्चित घेतां आली असती. त्या काळीं पाश्चात्यांचें बळ, हिंमत व धूर्तता यांचा अंत कोणास लागण्यासारखा नव्हता हें म्हणणें पोकळ आहे. अमात्याच्या राजनीतींत त्यांच्या गुणांची पुरी पारख केलेली दिसते. 'हातीं

आलेलें स्थळ हे सोडावयाचे नव्हत', 'हे हट्टी जात', 'आरमाराच्या जोरावर नूतन दुर्गंच निर्माण करणार' अशीं त्यांतील वाक्यें वाचून शिवकालीन मुत्सद्यांस तरी पाश्चात्यांची पूर्ण ओळख पटली होती असें दिसतें. इतकें असूनहि जर ती पेशव्यांस नसली तर मग काय म्हणावें? नानासाहेबाच्या दुर्लक्षामुळें बंगालप्रांत इंग्रजांच्या ताब्यांत जाऊन इंग्रजांचें राज्यस्थापनाकार्य सुकर झालें. त्या व्यापारी लोकांस बंगालच्या भांडवलावर बाकी हिंदुस्थानचें व्याज पाडण्याची कला पूर्ण अवगत होती. हिंदुस्थानच्या भांडवलावर इंग्रजांचे धंदे उभारले जाणें शक्य झालें. ईस्ट इंडिया कंपनीच्या 'नबाब' नोकरांनीं बऱ्यावाईट मार्गानें हिंदुस्थानांतून नेलेला पैसा भांडवल म्हणून मिळाला नसता, तर अठराव्या शतकांतील नवे शोध शोधकांच्या घरीं पडून राहून इंग्लंडांत 'औद्योगिक क्रांति' झाली नसती. नवीन धंद्यांच्या पैशावर जगांतील फ्रान्ससारख्या इतर प्रतिस्पर्ध्यांस त्यांनीं नेपोलिऑनिक युद्धांत चीत केलें व पुढें अर्धे जग ताब्यांत आणलें. बाकीच्या अर्ध्यासहि त्यांचें ग्रहण आहेच. तात्पर्य, परंपरेनें पाहूं जातां नानासाहेबाच्या चुकीचे एवढे घोर परिणाम झाले.

आमच्या या विवेचनाचा उपयोग आतां कांहींच नाहीं हें उघड आहे, पण त्यामुळें वर दिलेली कार्यकारणपरंपरा मात्र खोटी पडत नाहीं. जर कोणा एक माणसाच्या हातांत ही अनर्थपरंपरा मुळांतच थांबविण्याचें होतें असें मानलें, तर ती व्यक्ति निश्चयानें नानासाहेब पेशवा होय असें इतिहास वाचणारांस म्हणणें भाग आहे. न्यायाच्या कोर्टांत हुषार वकील कदाचित् पेशव्यास या आरोपांतून मुक्त करूं शकतील, पण तें व्यक्तीवर किती जबाबदारी ठेवावयाची याच मुद्यावर. आम्हीं वरील सर्व विवेचनांत नीतिमत्तेचा मुळींच संबंध आणलेला नाहीं हें लक्षपूर्वक वाचणारांच्या ध्यानांत असेलच. कृत्यांची नीतिमत्ता शोधीत बसण्याच्या भानगडींत न पडतां, त्यांमुळें इष्ट हेतु सिद्धीस गेला कीं नाहीं एवढेंच आम्ही पाहतों. नीतीच्या सूक्ष्म विचारांत शिरल्यास महाभारत रचावें लागेल. सर्व हिंदुस्थानांत हिंदुपदपातशाही स्थापन करणें व त्याचें परकीयांपासून रक्षण करणें हीं दोन कर्तव्यें मराठ्यांनीं आपल्या शिरावर घेतलीं होतीं. अशी पातशाही स्थापन करणें न्याय्य होतें किंवा नाहीं हा प्रश्न वेगळा. ती स्थापन करण्याची खटपट करीत असतांना जीं बरींवाईट कृत्यें करावयास पाहिजे होतीं तीं पेशव्यानें खुशाल करावयाचीं होतीं, त्यांची नीतिमत्ता ठरवावयास आम्हीं आलों नसतों. त्यानें रामराजास राहूं दिलें तशा स्थितींत राहूं देणें न्याय्य होतें कीं काय? दाभाड्याची गुजरात घेणें न्याय्य होतें किंवा कसें? राजपुतांशीं सरदारांनीं आधीं केलेला करार पाळणें योग्य होतें किंवा नाहीं, असल्या प्रश्नांची चौकशी आम्ही करूं इच्छीत नाहीं. पण ही सर्व मुभा इष्ट हेतु साध्य होईल तर; जर तो होत नसेल तर त्याच्या सर्व कुळकथेची तपासणी करणें भाग येईल. कारण अपयशाचें कारण शोधतांना तें कृत्याच्या अनीतिमत्तेमुळेंच बुडालेलें आढळणें शक्य आहे. एरवीं क्लाइवनें एक खोटा कागद करून बंगाल घेतला असला तर, नानासाहे-

बानें दोन खोटे कागद करून तो घ्यावयाचा होता असें आम्ही म्हणूं. असा प्रयत्न करीत असतांना सुद्धां, अकल्पनीय सृष्टीच्या आपातांनीं किंवा एकटा नानासाहेब तेवढा प्रयत्न करीत असतां, त्याच्या सांगण्यास न ऐकतां बाकीचें सारें हिंदुस्थान इंग्रजांस जाऊन मिळालें म्हणून जर कार्य विफल होतें तर वेगळी गोष्ट होईल. पण तसा पुरावा नाहीं तोंपर्यंत, त्या मार्गानें जाणें हेंच त्यास कळलें नाहीं किंवा कळूनहि त्यानें प्रयत्न केला नाहीं असें समजून त्यावर दोष ठेवणें भाग आहे.

नीति-अनीतींचा विचार करावयाचा तर, आजच्या राष्ट्रीय हक्कांच्या मनूंत, मराठ्यांस हिंदुस्थानांतील इतर प्रांतांवर स्वाऱ्या करण्यास योग्य कारण होतें असें म्हणतां येणार नाहीं. राजपूत, जाट, बुंदेले; फार काय, मुसलमान नबाबाच्या अमला-खालीं राहणारे गरीब बंगाली; या परप्रांतीय हिंदूंचें मत मराठ्यांविषयीं अनुकूल नव्हतें हें स्पष्ट आहे. 'महाराष्ट्रपुराण' या बंगाली काव्यमय इतिहासाचा कर्ता गंगाराम यानें, भास्कर रामाच्या स्वाऱ्यांचें जें वर्णन दिलें आहे तें, मराठ्यांच्या लौकिकास भूषणास्पद नाहीं खास. टॉडनें दिलेली राजपुतांवरील स्वाऱ्यांची हकीकतहि त्याच मासल्याची आहे. आमच्या मतें मराठ्यांस हिंदुस्थान काबीज करण्याचा नैतिक हक्क एकाच गोष्टीनें मिळण्या-सारखा होता. ती गोष्ट म्हणजे हिंदूंचें हिंदुस्थान यवनाक्रांत झालें होतें तें मोकळें करण्याची धार्मिक इच्छा. शिवाजीनें अशीच गोब्राह्मणप्रतिपालकाची भूमिका स्वीकारून कार्यास हात घातला. औरंगजेबाच्या कडव्या धर्माभिमानामुळें शिवाजीच्या कार्यास जोरच आला. तशीच परंपरा शिस्तीनें व नीतीनें चालती तर प्रांतोप्रांतीं मराठ्यांच्या स्वाऱ्यांस स्थानिक हिंदूंची मदत मिळणें शक्य झालें असतें. पण त्याच्या जागीं, 'पुण्याची रुक्षता' दूर करण्यासाठीं दक्षिण व उत्तर या दिशांचे 'सुवर्णनदीप्रवाह' आणण्याची कल्पना आल्याबरोबर मराठ्यांचा नैतिक अधःपात झाला व परप्रांतीय स्वधर्मीयसुद्धां त्यांचे शत्रु बनले. हिंदुस्थान मोकळें करीत असतां मराठे नीतीनें वागते तर त्यांस मिळाला त्याहूनहि जास्त पैका मिळाला असता, असें तत्कालीन कागदपत्र वाचून आमचें मत झालें आहे. मराठ्यांच्या स्वाऱ्यांनीं, ते जिकडे जिकडे गेले त्या ठिकाणच्या समाजाची आर्थिक घडी विसकटून जात असे. जर मुसलमानांचें राज्य जुलमी होतें असें समजावयाचें तर, मराठ्यांचें राज्य त्यांच्या जागीं झाल्यावर त्या प्रांताची जास्त भरभराट दिसली पाहिजे होती. तशी ती प्रत्ययास आलेली दिसत नाहीं. कोणत्याहि ठिकाणीं परकीयांचें राज्य यशस्वी होण्यास त्या परकीयांबद्दल प्रथम अनुकूल वातावरण निर्माण करावें लागतें. इंग्रजांनीं गेल्या शतकाच्या आरंभीं असेंच अनुकूल वातावरण हिंदुस्थानांत निर्माण केलें होतें. त्यामुळें त्यांच्या राज्याची घडी चांगली बसून त्यांस भरपूर पीक काढतां आलें. अनुकूल मत निर्माण होण्यास तसेंच शिस्तवार चोख वर्तन डोळ्यांत तेल घालून राखावें लागतें. तशीच त्याबद्दल चळवळसुद्धां करावी लागते. शिवाजीच्या कालीं असें चळवळीचें काम रामदासासारख्यांनीं केलें. त्यामुळें शिवछत्र-

पतीच्या विभूतिमत्त्वाचा डांगोरा दिगंतीं ऐकूं गेला व त्यास साहाय्यक मिळूं शकले. राज्यहिताची व संवर्धनाची ही बाजू पेशव्यांच्या डोक्यांत शिरली नाहीं. रामदासासारखे चळवळये प्रेरक प्रांतोप्रांतीं पुढें जाते व त्याबरोबरच पेशवे शिवाजीची करडी शिस्त ठेवून वागते, तर यवनाक्रांत हिंदुस्थान सहजच मोकळें होतें. मराठे पंजाबांत गेले तेव्हां तेथील शीखांची मदत त्यांस अनुकूल करून घेतां आली असती. पण हे त्याऐवजीं तेथील मुसलमानांचीच मदत घेतांना आढळतात. तीच हकीकत राजपूत, जाट, बुंदेले यांशीं वागतांना घडली. बिजेसिंग, सुरजमल, सभासिंग वगैरे पराक्रमी हिंदुधर्माभिमानी वीरांचें शौर्य मराठ्यांशीं लढून विफल झालें. त्याचा कोणासच उपयोग झाला नाहीं. जयापा, मल्हारराव, प्रभृति आपल्या सरदारांस कोणावर नेऊन सोडावयाचें याची योजना नानासाहेबाच्या मनांत आली पाहिजे होती. ती येती तर हिंदूंचीं तीर्थें व यज्ञभूमि बळकावून बसलेला वजीर सलामत राहून, राजपूत कटून लढून मेले नसते. सारांश, हिंदुपदपातशाहीस पोषक अशी नीति मराठ्यांस सातत्यानें राखतां आली नाहीं, तशा कार्यास प्रेरक अशा चळवळींचा मार्ग त्यांनीं अवलंबिला नाहीं व अठराव्या शतकांतील अराजकी कालास योग्य असें संयुक्तसत्तेचें धोरण त्यांनीं स्वीकारलें नाहीं, म्हणून त्यांस अपयश आलें.

या संयुक्तसत्तेच्या शेवटच्या मुद्द्याचा जास्त खुलासा केला पाहिजे. आमच्या मतें मोठ्या पुरुषांसहि काळाच्या पुढें जाणें बहुतेक अशक्य असतें. अठराव्या शतकांतील वातावरणांत एकछत्री राज्य स्थापणें शिवाजीसारख्यांनाहि शक्य झालें नसतें. ज्या युगांत एकच अद्वितीय लोकोत्तर विभूति यशस्वी होतांना दिसते त्या काळांत बहुधा दुय्यम प्रतीचे अनेक स्वतंत्र वृत्तीचे पुरुष नसतात. तशी स्थिति असते तेव्हां सर्वांच्या हिताची गोष्ट एकच, ती म्हणजे आपसांत एकोप्यानें, दुसऱ्यांवर सत्ता गाजवण्याचा विचार न धरतां राहून सर्वांनीं कांहीं बाबींपुरतें एक होणें. उदाहरणार्थ राज्यरक्षण, व्यापार, उद्योगधंदे, धर्म इत्यादि गोष्टी. मध्ययुगीन यूरोपांत हंससंघ, ‘पवित्र रोमन साम्राज्य’ वगैरेसारखीं संयुक्तसत्तात्मक राज्यें होतीं. अशी एकी हिंदुस्थानांत असती तर इंग्रजांना कलकत्त्याहून मद्रासेस किंवा मुंबईस जातांना वाटेंतील प्रत्येक संस्थानिकानें प्रतिबंध केला असता; किंवा मराठ्यांनीं साष्टीवर हल्ला चढविला असतां मद्रास, कलकत्ता वगैरे ठिकाणीं सुद्धां इंग्रजांवर तिकडील सत्ताधीशांच्या स्वाऱ्या झाल्या असत्या. बिस्मार्कनें अशाच अनेक संस्थानांचें एक जर्मन साम्राज्य बनविलें. नानासाहेबास तसें कांहीं करतां आलें नसतें असें नाहीं, पण तितकी कल्पकता असेल तेव्हां!

नानासाहेबाच्या स्वतःच्या अनेक कृत्यांच्या नीतीचा विचार करतांना सुद्धां, त्याचें वर्तन बऱ्याच प्रसंगीं योग्य म्हणतां येणार नाहीं. रामराजाला ताराबाईच्या सासुरवासांत कुजत ठेवणें याखेरीज त्यास त्या प्रकरणीं दुसरा मार्ग नव्हता असें कोण म्हणेल? दमाजीला तहाची बोलाचाली चालू असतां पकडणें हें चांगलें कसें ठरेल? जास्त पैशाच्या लोभानें ईश्वरसिंगाची एकदां पत्करलेली बाजू सोडणें व त्याच्या प्रतिस्पर्ध्यांचा

पुरस्कार करणें कसें शोभेल? राजघातकी गाजिउद्दिनाचा पक्ष मराठ्यांनीं धरणें कसें नीतीचें ठरेल? दादोबा प्रतिनिधीस सावनूरकरावर पाठवून तोंडघशीं पाडणें हें सभ्यपणाचें काम काय? बाबूजी नाईक व तुळाजी आंग्रे यांशीं झालेलें त्याचें वर्तन खुनशीपणाचें नाहीं काय? व्यक्तिविषयक दृष्ट्याहि, परप्रांतांतून 'खुबसुरत पोरी' 'श्रीमंत स्वामींची फर्मास' म्हणून पाठविण्यास सांगणें हें राज्यपदावरील सुखासीन व अपराक्रमी पुरुषास शोभलें असतें, पेशव्यास तें खास शोभत नाहीं. ब्राह्मणांनीं मुदलीं राज्यपदारूढ व्हावें किंवा नाहीं हा धार्मिक मुद्दा बाजूला ठेवला तरी, शिवशाहीच्या वहिवाटदार ब्राह्मण पुरुषानें याहून वेगळा नीतिमत्तेचा कित्ता घालून द्यावयास पाहिजे होता.

व्यक्तीची योग्यता ठरवितांना अनेक गोष्टींचा विचार अनेक बाजूंनीं करणें योग्य आहे. सबंध पेशव्यांच्या अमदानींत पहिल्या प्रतीची अशी एकहि इमारत उठलेली दिसत नाहीं. मराठ्यांस स्वास्थ्य असें कधींच नव्हतें हें खरें, तरीहि त्यांस कायम भूषण देणाऱ्या अशा चार दोन इमारतीहि बांधतां आल्या नसत्या असें वाटत नाहीं. अहमदाबाद, विजापूर, आग्रा, लखनौ वगैरे कोणत्याहि मुसल्मानी राजधानींत गेलें तर काळाशीं टक्कर देऊन राहिलेल्या अनेक इमारती दृष्टीस पडतात, पुण्यास मात्र तसें कांहींच कां असूं नये? शनवारवाडा जळून गेला यावरूनच त्याचें काम कोणत्या स्वरूपाचें होतें याची कल्पना करतां येते! त्याप्रमाणेंच जुन्या बहुतेक शहरांतून एखाद्या कलेची तरी वाढ झालेली दृष्टीस पडते व त्यासाठीं तें शहर प्रसिद्ध राहातें. पुण्यास असा एकहि धंदा नाहीं. एवढ्या गाजलेल्या मराठशाहीच्या राजधानींत परप्रांतीयांस पाहाण्यासारखें किंवा घेण्यासारखें अनन्यसदृश कांहीं नाहीं. स्वारीवर जाण्याशिवाय 'सुवर्णनदीप्रवाह' आणण्याचे व्यापार, उद्योगधंदे, कलाकौशल्य वगैरे कायम फलदायक व जास्त नीतिमत्तेचे मार्ग आपल्या लोकांस शिकविणें हें पेशव्याचें कर्तव्य नव्हतें काय?

पेशवाई हें ब्राह्मणप्रधान राज्य असल्यामुळें विद्येचा उत्कर्ष या कालांत व्हावा असें कोणी म्हणेल, तर तोहि झालेला दिसत नाहीं. त्या काळीं विद्या ही आधीं ब्राह्मणजातीपुरती आकुंचित. ब्राह्मणांनीं नवें कांहीं संपादन करण्यासारखें आहे ही भावनाच अस्तित्वांत नाहीं अशी स्थिति. बरें, जुन्या संस्कृत विद्येचें तरी पुनरुज्जीवन व प्रसार व्हावा, पण तसेंहि फारसें झालेलें दिसत नाहीं. एकही पहिल्या दर्जाचा विद्वान् या काळांत झालेला दिसत नाहीं. खुद्द पेशव्याकडून मराठी भाषेच्या वाढीस पोषक असेंसुद्धां कांहीं घडलेलें दिसत नाहीं. मोरोपंतादि कवी पुण्याबाहेरच्या वातावरणांत राहूनच मराठीची सेवा करीत होते. त्यांची विचारपूससुद्धां पेशव्यांनीं केलेली दिसत नाहीं. उलटपक्षीं पेशवाईमुळें निरर्थक कर्मकांडाचें निरर्गल स्तोम माजलें, ज्यांच्या गायत्रीजपाचा राष्ट्राच्या संवर्धनास तिलमात्र उपयोग नाहीं अशा भट्टमजकुरांचीं तट्टें फुगलीं, अर्थात् हिंदुस्थानची नव्या काळाकडे प्रगति होण्याऐवजीं अंधश्रद्धा व पुराणाभिमान बोकाळून राष्ट्राची थोडीफार सामाजिक पिछेहाटच झाली असें म्हणण्यास जागा आहे.

पेशव्यांच्या दक्षिणेचा व अहिल्याबाईच्या दानधर्माचा मराठशाहीच्या संवर्धनास कांहीं उपयोग होऊं शकला नाहीं; हा सर्व पैसा, तळीं, घाट, वगैरे उपयोगी कार्यास लागला तो वजा करून, व्यर्थ गेला. राष्ट्रांतील जुने दोष नाहींसे करणें व नवीन गुण आणणें, या सामाजिक प्रगतीच्या दोन अंगांकडे पाहतां, नानासाहेबास एकाहि बाबतींत कांहीं करतां आलेलें दिसत नाहीं. मराठशाहींत शिक्षण काय तें लष्करी व दरबारी कामापुरतें वाढलें असेल तेवढेंच. या गोष्टींत सुद्धां तत्कालीन यूरोपाशीं तुलना करतां ज्ञान व शास्त्र या दोन मुख्य बाबींत आम्हीं मुळींच प्रगति केली नाहीं. मूटभर पोर्तुगीज लोकांनीं मराठशाहीच्या अर्ध्या सैन्याला दोन वर्षें तोंड दिलें, यांतील अर्थ समजून नानासाहेब सुधारणा करता तर, तीनशें लोकांनिशीं क्लाइवनें अर्काटचा वेढा उठविला किंवा पांच हजार फौजेनिशीं वेलस्लीनें शिंद्यांच्या पन्नास हजार लोकांस पळवून लावलें अशा हकीकती हिंदुस्थानच्या इतिहासांत लिहिल्या जात्या ना. राष्ट्रांचे उदय व अस्त नुसत्या तोंडपाटिलकीच्या मुत्सद्देगिरीवर किंवा कागदी घोडे नाचविण्याच्या कुटिल नानाफडणिशी राजनीतीवर अवलंबून नसतात, हें त्या काळीं एकाहि शहाण्यास उमजलें नाहीं.

आमचें हें प्रवचन ऐकून कोणी श्रोते असें विचारतील कीं, काय हो, मग जर आमचे पूर्वज इतके नादान होते तर त्यांनीं साम्राज्याचा जो एवढा डोलारा उभारिला तो काय नुसत्या जादूनें? त्याचें उत्तर असें कीं, आमच्यांत कांहीं गुण निश्चित होते. ते म्हणजे शौर्य, हिंमत, डोक्याची तरतरी व उद्योग. पण केवळ याच गुणांवर राज्य कायम टिकूं शकत नाहीं. शास्त्रज्ञानाशिवाय कोरडी डोक्याची तरतरी कितीशी पुरी पडेल? जर एखाद्या उद्योगी व शूर माणसानें आपणास दुसऱ्या गांवास जावयास कोणत्या रस्त्यानें गेलें पाहिजे याचें ज्ञान करून घेतलें नाहीं, तर नुसत्या चालण्याच्या उद्योगानें व हिंमतीनें तो त्या गांवास पोहोंचेल काय? कीं गांव दूर राहून तो एखाद्या रानांत शिरेल? आमचें म्हणणें इतकेंच कीं, पेशव्यांस नवीन कांहीं कल्पना काढण्याचें श्रेय नाहीं. सर्व डोक्याचें काम शिवाजीनें आंखून ठेवलें होतें त्याच्या जोरावर पेशव्यांनीं कांहीं दिवस चालविलें एवढीच त्यांची बहादुरी. भालाईत शिलेदार गोळा करून राज्य संपादितां येतें हा मार्ग दाखविण्याचें श्रेय शिवाजीस. पेशव्यांनीं शिवाजीच्या चौपट असे शिलेदार जमविले असले तरी त्यांत नवीन कल्पना किंवा हिंमत नाहीं. जें एक अजस्र यंत्र शिवाजीनें चालू करून दिलें त्याचा अंतस्थ जोरच एवढा कीं, तें कांहीं काळ मूळच्या वेगावरच चालावें. त्यांत नवीन वेग उत्पन्न होण्यास जो कोळसा वेळोवेळीं पुरविला पाहिजे होता, तोहि पुरविणें पुढें कोणास झालें नाहीं. शिवाजीच्या राज्यापेक्षां पेशवाईवर जास्त संकटें होतीं असें नाहीं. पण अशाहि काळांत अनेक नवीन गोष्टींचा उपक्रम करण्यास शिवाजीस फुरसत झाली. नाहीं तर राजव्यवहारकोश करून व भूषण कवीस आश्रय देऊन शिवाजीचें राज्य वाढत होतें अशांतला भाग नाहीं, पण आपल्या इष्ट हेतूस पोषक अशा सद्यःफलदायी नसणाऱ्या गोष्टी करण्यां-

तहि त्याचा हातखंडा होता. भूषण कवीच्या काव्यानें कदाचित् एखादा छत्रसाल आपल्यासारख्या कामांत पडतो व भाषा हेंहि राष्ट्रसंवर्धनाचें एक अंग आहे हें शिवाजी समजत होता; पेशव्यास तें उमजलें नाहीं. तें उमजतें तर पेशवाईतील ब्राह्मणभोजनांच्या खर्चांत एखादा तरी ताजमहाल उठविण्याची वासना त्यांस होती. अजूनहि आमच्यांत तिळातांदुळांचा संहार करणारीं मीमांसामहाविद्यालयेंच स्थापन होत आहेत, टांचण्या व सुया यांसारखे नित्योपयोगी पदार्थ करणारे कारखाने निघूं शकत नाहींत, त्याअर्थीं देशाचें नष्टचर्य संपलें नाहीं हेंच खरें. अशा लोकांचा उदय होणें कठीण आहे!

मराठ्यांच्या भराऱ्यांमुळें राष्ट्रावर झालेल्या एका नैतिक दुष्परिणामाचा विचार करून आतां हें विवेचन संपवूं. जॉन मोर्लेचें असें मत होतें कीं, एकोणिसाव्या शतकांत 'दुष्ट संदेशांचा' (evil epistles) प्रसार डार्विन व बिस्मार्क या दोन 'प्रेषित' पुरुषांनीं केला. डार्विनच्या उत्क्रांतिवादानें असें ठरविलें कीं, प्राण्याची उत्क्रांति ही केवळ आकस्मिक अज्ञात कारणांवर (accident, chance or luck) अवलंबून असते, त्याचा व्यक्तीच्या प्रयत्नांशीं किंवा नैतिक गुणांशीं संबंध नाहीं. उदाहरणार्थ, आपली मनुष्यजात ही वानरजातीपासून उत्क्रांति कां पावली व सध्यां अस्तित्वांत असलेल्या वानर जातींची तशी उत्क्रांति न होतां त्या त्याच स्थितींत कां कायम राहिल्या, या गोष्टीस कारण नाहीं. या मोठ्या सिद्धांताचा उपयोग सर्वसाधारण गोष्टींत करूं लागलें म्हणजे अर्थातच नीतिमत्तेचा पायाच ढांसळून पडतो. व्यक्तींच्या किंवा राष्ट्रांच्या प्रयत्नांवर व सद्गुणांवर जर त्यांची उन्नति अवलंबून नसेल, तर कोणासच उद्योग करण्याची व इंद्रियदमनाची जरूर राहणार नाहीं, कारण उद्योग करूनहि उन्नति होते असें थोडेंच आहे! बिस्मार्कनें राजकीय क्षेत्रांत असें ठरविलें कीं, कुटिल नीति, खोटे कागद करणें व पाशवी सामर्थ्य यांवरच राष्ट्राचा उदय होऊं शकतो; अर्थात् नीतिमान्, उद्योगी, चिमुकल्या व (युद्धदृष्ट्या) दुर्बल राष्ट्रांची धडगत नाहीं. याप्रमाणें जर्मनीचा उदय झाला हें स्पष्टच होतें. हिंदुस्थानच्या निराशाप्रधान व दैववादी लोकांवर मराठ्यांच्या अप्रतिहत स्वाऱ्यांनीं असाच परिणाम झाला. आपण काय अपराध केला किंवा अमार्गानें गेलों म्हणून ही मराठ्यांची टोळधाड आपल्यावर आली असें त्यांनीं समजावयाचें? एखाद्या कारागिरानें किंवा शेतकऱ्यानें आपल्या उद्योगाचें फल क्षणार्धांत नष्ट होतांना पाहून काय मानावयाचें? आपल्या उद्योगाचें फल आपल्यालाच उपभोगावयास सांपडेल असा विश्वास नाहीं तर उद्योग कोण करणार? पाशवी शक्तीशिवाय असा कोणता गुण त्यांस मराठ्यांच्या अंगीं दिसत होता? अर्थात् सगळीकडे निराशा, दैववाद, मायावाद, अंधश्रद्धा यांचेंच साम्राज्य पसरलें व या स्थितींत आपलें सुव्यवस्थित राज्य स्थापणें इंग्रजांस सोपें झालें. अशा वातावरणाचा राष्ट्रावर असा परिणाम होतो कीं, 'तुरूत दान, महापुण्य' ही दृष्टि बोकाळते. दीर्घकाळ सतत उद्योग, राष्ट्राचा भावी उदय होण्यासाठीं, आज दृश्य फायदा नसतांना करणें, हें कोणासच सुचत नाहीं.

आज खिशांत पैसा आहे. खुशाल खावेंप्यावें, सिनेमाला जावें, कोणाला ठाऊक आपला जीव मारून पैसा देशकार्याकडे लावून तरी स्वराज्य मिळतें आहेसें! सर्व दैवाधीन! कांहीं उद्योग करणें तोहि सद्यःफलदायी करावा. परसांत मेथीची भाजी पेरावी, पंधरा दिवसांत होते. अक्रोडाचें झाड लावून चाळीस वर्षें वाट कोणी पहावी? आणि मध्येंच झाड कीड लागून मेलें तर, वाऱ्यानें मोडलें तर, कोणी लाकूड तोडून नेलें तर, बांझच निपजलें तर, कडू निघालें तर, आपण जगलों तर, जमीन आपल्या ताब्यांत राहिली तर, अशा किती तरी 'तरी' मध्यें राहतात. शंभर वर्षें वांचूं या विचारानें वागावें कोणी? त्यापेक्षा दहाव्या वर्षी लग्न, सत्राव्या वर्षी मूल, तिसाव्या वर्षी नातवंड, चाळिसाव्या वर्षी अक्रोडाला फळें येण्यापूर्वींच पूर्वजांच्या मागें जावें. अशा विचारसरणीनें कोणत्याहि राष्ट्राचा उदय होत नसतो एवढें मात्र खरें. अशा राष्ट्रानें नेहमीं मेथीची भाजीच खात रहावें, त्याच्या वांट्यास अक्रोड कधीं येणें नाहीं.

नानासाहेबाच्या चरित्रांतील बहुतेक बाबींचें विवेचन येथवर केलें. त्यावरून असें दिसून आलें कीं, त्या पुरुषाच्या आंगीं पहिल्या प्रतीचा असा गुण नव्हता. मराठशाहींत शिवाजीच्या खालोखाल त्याचा अनुक्रम लागतो किंवा न लागतो हा प्रश्न गौण आहे. ज्या वर्गांत भास्कराचार्यांसारखा एखादा बृहस्पति असतो, त्या वर्गांत दुसऱ्या कोणा तरी मुलाचा दुसरा नंबर लागतच असतो. पण त्यावरून त्यांस पहिल्या व दुसऱ्या नंबरचे विद्यार्थी ठरविणें योग्य नाहीं. हजारों शाळांतून एखादा भास्कराचार्य असतो, बाकी पहिले व दुसरे नंबर कोणाचे तरी लावतातच. वास्तविक शिवाजी व नानासाहेब हे वेगळ्या जातींचेच पुरुष समजावयाचे. हजारों तारकांची बेरीज करून एक तमोनाशक चंद्र तयार होत नाहीं किंवा हजारों परप्रकाशित चंद्रांचा गोळा करून एक सूर्य होत नाहीं. नानासाहेब हा असा एक चंद्र होता. पण त्याचे सर्व गुण त्यास मिळालेल्या पदावर अवलंबून होते. तसें पद न मिळतें तर हैदर, रणजितसिंग किंवा क्लाइव यांप्रमाणें शिपाईगिरीची नोकरी पत्करून उदय करून घेण्यासारखा तो पुरुष नव्हता. त्याचा—'सरदारीनें काम करावें, जातीनिशीं वायां जाऊं नये' हा युद्धशास्त्रदृष्ट्या फार उपयुक्त नियम होता. पण जातीनिशीं काम न करणारा कोणीहि माणूस काळोखांतून उजेडांत येत नाहीं हें तेवढेंच खरें आहे. आपल्या कार्यास अनुकूल वातावरण नसूनहि तें निर्माण करणें, समाजाच्या पुढें दृष्टि पोहोंचणें, जगाचें विस्तृत ज्ञान असणें, त्या ज्ञानाचा उपयोग करून घेण्याची तयारी ठेवणें, वगैरे महापुरुषास आवश्यक गुणांपैकीं एकहि त्याजवळ नव्हता. हिंदुस्थानच्या राजकीय पटाचेंहि त्यास आकलन झालें नाहीं. आधीं कोठलें काम हातीं घ्यावें, मग कोठलें घ्यावें, हेंहि त्यास कळलें नाहीं. इंग्रज प्रभृतींची पारख त्यास होऊं शकली नाहीं. हिंदुपदपादशाहीस पोषक काय याचा विचार त्यास शिवला नाहीं. राष्ट्राच्या उन्नतीस आवश्यक काय हें त्यानें पाहिलें नाहीं. अशा सर्व गोष्टींचा विचार करतां त्याच्याबद्दल वर प्रदर्शित केलेलें मत फारसें चुकलें नसावें असें वाटतें.

आमचें पुराण संपलें. यांतील सर्वच मतें कोणास पसंत पडावीं अशी आमची अपेक्षा नाहीं. आपण जर भरमसाट आपल्या पूर्वजांस मूर्ख ठरवीत गेलों तर त्यांचा इतिहास वाचील कोण अशी सकारण शंका पुष्कळांस येते. आमचें त्यावर म्हणणें असें कीं, दोष झांकून लिहिलेल्या इतिहासाच्या वाचनाचा उपयोग नाहीं. आम्ही इतिहास ही करमणूक समजत नसून उपयुक्त व आवश्यक असें एक शास्त्र समजतों. नाटकें, कादंबऱ्या, काव्यें वगैरे करमणुकीचे दुसरे मार्ग मोकळे आहेत. तेव्हां केवळ करमणुकी-साठीं व वडिलांच्या कीर्तीवर मिशांस पीळ देणाऱ्यांकरितां इतिहास नाहीं. असे वाचक गळले तरी त्यापासून राष्ट्राचें कोणतें अहित होणार आहे? आमच्या या लेखनानें वाचकांच्या विचारांना चलन देण्याचें कार्य घडलें तरी पुष्कळ असें आम्हीं समजूं व तसें झाल्यास त्याबद्दल त्यांनीं ग्रंथकार सरदेसाई यांचे आभार मानावे; कारण त्यांच्या इच्छेखेरीज आमच्या हातून कांहीं लिहिलें जाण्याचा मुळींच संभव नव्हता.

रियासतकार श्री. गो. स. सरदेसाई यांच्या 'नानासाहेब पेशवे' या ग्रंथाची प्रस्तावना

लेखनकाल : २५ मे १९२५

# —शय्येवरून

प्रगति साप्ताहिक बंद होऊन आठ वर्षें झालीं! मला हा काळ युगासारखा भासत आहे. माझ्या—आणि ज्याच्या प्रगतीची आकांक्षा हृदयाशीं बाळगून मी लेखनास हात घातला त्या जगाच्या—आयुष्यांत अनेक घडामोडी मध्यंतरींच्या काळांत होऊन गेल्या. त्यांचा परिणाम माझी—आणि त्या माझ्या जगाचीहि—पाठ अंथरुणास लागण्यांत झाला आहे. मला माझ्या आयुष्यांत मी व जग असा भेदच करतां आला नाहीं. जगाचें कल्याण तेंच माझें अशा समजावर माझें आचरण उभारलेलें आहे. जगाच्या हिताचें तें आचरतांना माझें काय झालें याचा विचार मी कधींच मनांत आणला नाहीं. पण त्याचा परिणाम मात्र जग सुधारण्यांत झालेला अनुभवास येण्याऐवजी माझी कार्यशक्ति नष्ट होण्यांत झाला आहे. मला काय बाधलें याचा आढावा घेऊं लागलें कीं, जें सर्व जगाला बाधलें आणि बाधत आहे तेंच माझ्या जीवनाच्या नाशास कारणीभूत झालें असें कळून येतें. बालपणीं बोअर युद्धाची हकीकत वडिलांनीं मांडीवर बसवून वाचवून घेतली तेव्हांपासून, आतां वाचण्याची बिलकुल इच्छा राहिलेली नसूनहि कानावर शेजारचा रेडिओ बातम्या हाणीत आहे तेथपर्यंतच्या काळाचा जागतिक चित्रपट माझ्या डोळ्यांसमोर आहे. त्यावरून माझें आयुष्य समकाल पडताळून पहातां जगाच्या ऱ्हासाशीं समांतर असाच माझ्या आयुष्याचा ऱ्हास प्रत्ययास येतो. ज्यांत कोणतेंहि ध्येय शिल्लक राहिलेलें नाहीं तें आयुष्य मानवी कसें? केवळ द्विपाद बडबड्या प्राण्यांचें शरीरधर्मप्रवण जीवन याला काय जीवन म्हणावयाचें? पण आज जगांतील मनुष्यसमूहांसमोर कोणतें ध्येय उभें आहे? दुसऱ्याचें स्वातंत्र्य हरण करणारा स्वतः स्वतंत्रतेचा उपासक राहूं शकेल का? दुसऱ्यावर अंमल गाजवूं इच्छिणारा स्वतः समतावादी उरेल का? परस्वहरणतत्पर असा कोणीहि स्वतः नीतिमान् राहील का? व्यक्तींच्या जगांतील हाच न्याय मनुष्यसमूहांला लावून पाहिला तर आजच्या जगाचें दृश्य कसें दिसत आहे? त्यासमोर कोणतें ध्येय उरलें आहे? ध्येय सरलें कीं द्विपाद पशु माणूस म्हणून ताठ उभा राहावयाला त्याच्या पृष्ठभागांत हाडच कोठें उरलें? अर्थात् त्याची—त्या जगाची—पाठ अंथरुणाला लागणें अपरिहार्यच झालें!

मला काय काय बाधलें? काळा आदमी झालों हें बाधलें, हिंदुस्थानांत जन्मलों हें बाधलें, हिंदु जन्मलों हें बाधलें, महाराष्ट्रांत जन्मलों हें बाधलें, ब्राह्मण जन्मणें हेंहि

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. अनुक्रम २६९२९ वि: क्रमांक नों: दि:



बाधलें, फार काय! कऱ्हाडा जन्मलों तेंहि बाधल्यावांचून राहिलें नाहीं! निःस्पृहपणा, सत्यवादित्व, न्यायावर विश्वासून उठवळ न बनणें, स्वतःची जाहिरात करण्यास न शिकणें; मूर्खाला पंडित म्हणण्यास, धनवानाला शहाणा म्हणण्यास, अधिकाऱ्याला सलाम करण्यास न शिकणें; गरिबींत जन्मणें आणि रहाणें; अधिकाराच्या जोरावर काम करणें अन्यायाचें मानणें; झकपक् पोषाक, चष्की न करणें; चार अक्षरें लिहितां येत असूनहि प्रत्येक मासिकास वा वर्तमानपत्रास फोटोसहित लेख न पुरविणें; प्रत्येक सभा, संमेलन, परिषद, कॉन्फरन्स, कँग्रेस यांना हजर राहून आपलें महत्त्व न वाढविणें; संदेश-आशीर्वाद न पाठविणें; ज्यांच्या सहवासांत बसण्यानें कोणताहि (?) लाभ होण्यासारखा नाहीं त्यांच्यांत बसत जाऊन आपला एक पारिपार्श्वक गट निर्माण न करणें; या अशा सर्वच गोष्टी मला बाधल्या! पण याच गोष्टी जगालाहि बाधत नाहींत का? वर्णभेद, वंशभेद, श्रीमंतगरीब भेद,...हेच सर्व जगाला बाधत आलेले कायमचे शत्रू नाहींत काय?

आणि हेच शत्रू गाडून टाकण्यासाठीं 'प्रगति' काढलेली होती. ती बंद झाली, तिच्या पुनरुज्जीवनाची आशाही खुंटली, ही गोष्ट सद्यःकालाची सूचक आहे. ज्या समाजाची प्रगति खुंटली आहे त्याला असल्या गोष्टींची काय जरुरी आहे? त्या समाजाच्या गरजा भविष्यावर चालणारीं आणि भविष्यावांचून न चालणारीं, चिमटे-चमत्कारांची चमक दाखविणारीं व लाकडी ढलपे बोलके करणारीं, तो-तीचा तारणहार गुंफणारीं व झरोक्यांतून तिरंदाजी करणारीं, गवाक्षांतून कटाक्ष फेकणारीं व रमण्यांत मोडखुर्दा वांटणारीं, थोडें गोड देऊन बहुत कडू करणारीं व वैतागवनांतून विषारी वाफारे सोडणारीं वृत्तपत्रें पुरवीतच आहेत! या अधोगामी समाजाचा बास्तिलगड खणून काढून त्याची माती क्रांतिसागरांत वाहून जाईपर्यंत त्याच्या प्रगतीची आशा नाहीं हेंच खरें!!!

पण हें समाजाचें झालें! व्यक्तींचा जीवनक्रम हा यावज्जीव ओढावाच लागतो. 'प्रगति' पत्र बंद पडलें तरी 'प्रगति'काराचें कर्तव्य चालूच रहातें. समाजानें झिडकारलें तरी प्रेमानें कवटाळणाऱ्या व्यक्ती थोड्याच नाहींशा होतात? प्रगतीच्या शवावरही पुष्पहार घालू पाहणारे चहाते उरतातच. अशा चहात्यांपैकींच एकाच्या जलसिंचनामुळें तात्पुरती संजीवित होऊन 'प्रगति' पुन्हा बोलू पहात आहे. जिवंत आवाज पुन्हा ऐकू येण्याचा संभव नाहीं तेव्हां ग्रामोफोनच्या तबकडीवरच श्रोत्यांना समाधान मानणें भाग आहे.

'प्रगति' विद्वत्ताप्रचुर असली तरी तरुणांसाठीं काढलेली होती. विश्राममंडळांच्या सभासदांकडून प्रगति घडून येते असा मला कधींच विश्वास वाटत नव्हता. त्यावेळीं यूथलीगची चळवळ नुकतीच सुरू झाली होती. माझे स्नेही श्री. उपेंद्र देसाई व मेहेर-अली यांनीं त्याच वेळीं इंग्रजींत 'व्हँगार्ड' साप्ताहिक सुरू केलें होतें. त्याच्याच हातांत हात घालून 'प्रगति' चालविण्याचा माझा विचार होता. पण पुढें तें पत्र बंद पडलें. तरुण वर्गांत यानंतर अनेक मतमतांतरें मॉस्कोच्या अनुकरणानें व आदेशानें पसरलीं. आणि

त्यांच्या स्वतंत्र चळवळीचा कॉंग्रेसच्या विश्रामधामाच्या कोंदट ब्लॅकहोलमध्यें कोंडमारा झाला. या गोष्टीचे दुष्परिणाम राष्ट्र सध्यां भोगीत आहे.

तरुणांत वृद्ध आणि वृद्धांत तरुण अशी दुहेरी भूमिका मी स्वीकारली होती, पण ती दुटप्पीपणाची नव्हती. माझी परिस्थिति व तयारीच तशी होती. पण या गोष्टीचे परिणाम चांगले झाले नाहींत. तरुणांचें प्रेम आणि वृद्धांचें कौतुक मला थोडेंफार लाभलें तरी दोहोंचाहि विश्वास मला संपादन करतां आला नाहीं. त्यामुळें राष्ट्राच्या प्रगतीचा गाडा रेटण्यासाठीं आवश्यक असें धुरंधर पुढारीपण मला मिळूं शकलें नाहीं. तरुणांना मी पुरेसा क्रांतिवादी वाटलों नाहीं, तर वृद्धांना मी फाजील क्रांतिकारक भासलों. तरुणांच्या डोक्यांत याचवेळीं रशियन व्होडका चढली होती. तिचे पहिले दुष्परिणाम मला बाधले. वृद्धांचा स्वार्थी नाकर्तेपणा मला बाधला. आपल्याला तर होत नाहीं, आणि दुसऱ्यांकडून झालेलें पहावत नाहीं, अशी त्यांची वागणूक होती. उद्धट तरुणांनीं यांतून मार्ग काढून वृद्धांची पगडी उडवून दिली, आणि स्वतःकडे धुरा ओढण्याचा प्रयत्न केला. यश तरुणांच्याच बाजूला यावयाचें हा त्रिकालाबाधित सिद्धांत असल्यानें त्यांच्याकडे पुढारीपण झुकलें तरी सार्वत्रिक व पद्धतशीर क्रांतीला, म्हणजेच प्रगतीला, जरूर तितकें बल त्यांना मिळूं शकलेलें नाहीं. याचाच परिणाम सध्यांच्या दुहींत व बेबंदशाहींत अनुभवास येत आहे. त्यामुळें राष्ट्र बदलत असलें तरी तें अचूक प्रगतीच्याच मार्गावर आहे कीं नाहीं याचें अनुमान करणेंहि कठीण होऊन बसलें आहे. उद्धटपणा माझ्या वांट्याला आलेला नसल्यानें मी सहाजिकच या प्रवाहाच्या बाहेर फेकला गेलों. वृद्धांत जास्त अक्कल आणि कमी स्वार्थ असतीं तर त्यांनीं माझा उपयोग करून घेतला असता. पण त्यांची स्वार्थी महत्त्वाकांक्षा, सत्तेची चटक, त्यांना तसें करावयाची बुद्धि कशी देईल ? आपल्या कोतेपणाचीं फळें ते सध्यां भोगीत आहेत.

गत गोष्टींची आठवण व वैयक्तिक निवेदन येथेंच पुरे. पण सध्यां राष्ट्राचा आशातंतु, समाजाचा आधार, असा जो जवान विद्यार्थीवर्ग तो काय करीत आहे ? तो 'ब्रम्हचारी' बोलपट एकदां दोनदां, नव्हे पंधरादां, पंचवीसदां पाहाण्यांत बेहोष दंग होऊन गेला आहे. किन्नरकंठी किशोरीचीं 'यमुनाजळिं खेळूं खेळ' व 'फिरवाना ऽ ऽ ऽ जरा डोळा' असलीं गाणीं आळविण्यांत आयुष्यांतील 'बहुमोल अशी ही वेळ' दवडीत आहे. 'कशाला उद्यांची बात ? बघ सरुनि चालली रात' असलें स्वतःच्या जीविताच्या तत्त्वज्ञानाचें यथातथ्य वर्णन करणारें पद्य तारवटलेल्या डोळ्यांनीं ऐकत आहे ! तंग चड्डी नेसून पोहण्याच्या तयारींत असलेली तरुणी व अठरापगड शेटजींसमोर नाच करणारी वेश्या, रोमांचभरित होऊन पाहण्यांत तो गंगास्नानाचें पुण्य मानीत आहे. पडद्यावरील तुषारस्नानानें स्वतःचें मार्जन झालें असें समजत आहे. आश्रमांतील कुलगुरूच्या 'कष्ट करा, कष्ट करा' या आदेशांतून ध्वनिकाव्य शोधून काढून त्याचें विडंबन करण्यांत अघमर्षण केल्याचा आनंद उपभोगीत आहे. विषयचिंतन हेंच ज्याचें

गायत्रीपुरश्चरण, रंगढंग-चष्कीचैन हीच ज्याची जीवनसंध्या, 'लाडे लाडे' बोल हेंच ज्याचें उपस्थान, आणि पोरींभोंवती सतत 'गरगरां गरगरां' फिरणें याच ज्याच्या प्रदक्षिणा, असा हा 'सुशिक्षित' तरुणवर्ग समाजाचा अधःपात पूर्णपणें सूचित करीत आहे.

तरुणांचें हें चित्र एकांगी आहे असें कोणी समजूं नये. अनेक अध्यापक–प्राध्यापकांकडून माहिती काढली तरीहि तिचें सत्यत्व पटूं शकेल. ज्याचा अभिमान गुरूला वाटेल असा खरा विद्या–अर्थी हल्लीं वर्षानुवर्षांत नजरेस येत नाहीं असें नामांकित उच्च प्राध्यापक बोलतांना ऐकूं येतात. पण तेहि विद्यालयाच्या चौकटींत बसलेले असल्यानें त्यांना सत्यस्थिति उघडपणें बोलण्याचें धैर्य होत नाहीं. आजच्या घटकेस महाराष्ट्रांत अनेक—बहुतेक विषयांत नामांकित म्हणण्यासारखे पंडित कोणी नाहींत. पदव्यांचा सुळसुळाट आणि मूलग्राही ज्ञानाचा सुकसुकाट अशी याबाबत विद्यमान स्थिति आहे. तोंडदेखलें बोलतांना सभेंत परस्पर एकमेकांची विद्वान् म्हणून स्तुति करतांना आढळतात, तेच खासगी संभाषणांत त्यांच्या विद्वत्तेची टवाळी करतांना दिसून येतात! यावरून खरा प्रकार निदर्शनास येतो. ही स्थिति प्राप्त होण्याचें कारण, सुलभ देशभक्तीचें आणि वावदूक मुत्सद्देगिरीचें महाराष्ट्रांत फुटलेलें पेव. महाराष्ट्राचें राजकारण व समाजकारण शब्दपंडितांच्या, साहित्यिकांच्या व तोंडपाटलांच्या ताब्यांत गेलें त्याचाच हा विपरीत परिणाम होय.

पेशवाई कोसळल्यानंतर आरंभींचीं पन्नास वर्षें, राष्ट्राच्या पुनर्घटनेची दिशा महाराष्ट्रांत योग्य तीच होती. जेत्यांचें ज्ञान आत्मसात् केल्याशिवाय स्वातंत्र्याच्या तात्त्विक भूमिकेवरून त्यांच्याशीं समानतेच्या लंब्याचौड्या बाता करणें व्यवहारदृष्ट्या निरुपयोगीच नव्हे तर समाजबाधक आहे अशी त्या पिढीची खात्री पटली होती. नुसत्या स्वाभिमानावर उभारलेलें राजकारण पोकळ आणि बिनबुडाचें असतें हें त्या पिढीला कळून चुकलें होतें. पण त्यानंतर इंग्रजी शिकलेल्या नूतन पदवीधरांची जी पिढी पुढें आली ती पेशवाईची भीतिप्रद आठवण विसरलेली होती. मिल्-मेकॉले आणि स्पेन्सर-जॉन्सन् यांचे ग्रंथ पढलेल्या या पिढीला इंग्रजांचें वैशिष्ट्य कशांत आहे या गोष्टीचें विस्मरण झालें. इंग्लिश विश्वविद्यालयांतून जे ग्रंथ शिकविले जातात तेच येथें पढणारे जे अस्मादिक, ते त्या गौरकायांपेक्षां कोणत्याही बाबतींत कमी प्रतीचे वा कमकुवत नाहींत असें त्यांना वाटूं लागलें. अर्थात् त्यांनीं असा आक्रोश सुरू केला कीं, या देशास कांहींएक झालेलें नाहीं, त्याची नाडी साफ चालत असून शरीरप्रकृतीस म्हणण्यासारखा कांहींएक विकार नाहीं, आमच्या परक्या प्रभूंनीं आमची तशी खोटीच समजूत करून दिली आहे! सभा-सम्मेलनें, लेख–व्याख्यानें यांचा हलकल्लोळ उडवून दिला म्हणजे इंग्रज पळून जातील असें त्यांच्या बुद्धीला वाटत होतें कीं काय नकळे! तोफा-विमानें व मोटार-आगगाड्या राहोत, पण साध्या सुयाटाचण्या वा चाकूचमचे सुद्धां ज्यांना करतां येत नाहींत त्यांनीं स्वराज्याच्या बाता झोकणें किती शहाणपणाचें आहे याबद्दलचा त्या पिढीचा अविचार

तिची तर्कशून्यता स्पष्ट दाखवितो. ज्या समाजाचें आधुनिक औद्योगीकरण झालेलें नाहीं त्याला आजच्या जगांत आपलें असलेलें स्वातंत्र्यही टिकवितां येणार नाहीं, मग ज्यांचें स्वातंत्र्य आधींच नष्ट झालेलें आहे त्यांनीं आधीं आर्थिक, औद्योगिक, व सामाजिक पुनर्घटना घडवून आणल्याशिवाय स्वातंत्र्याची व स्वराज्याची वार्ताच कशाला!

हिंदुस्थानांतील इतर प्रांतांपेक्षां वर सांगितलेल्या पढतमूर्खपणाची बाधा महाराष्ट्राला अधिक झाली. कारण पेशवाईपासून महाराष्ट्रांत ब्राह्मणांचें जें अवास्तव प्राबल्य झालें होतें, तें इंग्रजी राजवटींत प्रथम इंग्रजी शिकल्यामुळें तसेंच टिकलें होतें. स्वराज्य असतांना औद्योगीकरण व आधुनीकरण करण्याचें योग्य वेळीं न सुचल्यामुळें ज्यांचें राज्य गेलें होतें, त्यांना स्वराज्याचें ओझें डोक्यावरून उतरल्यानंतर तरी तें कसें सुचावें? ते वडिलांची कीर्ति सांगणारे पढतमूर्खच राहिले होते. लेखनकलेच्या व छापखान्याच्या वाढीचा दुरुपयोग त्यांनीं हा पढतमूर्खपणा वाढविण्यांतच केला. काल्पनिक इतिहासाचें बंड महाराष्ट्रांत फार मोठ्या प्रमाणावर फैलावलें. शुद्ध करमणूक व खोटें समाधान एवढाच असल्या लेखनाचा उद्देश असता तर तिचा फारसा दुष्परिणाम झाला नसता, पण स्वराज्यनाशामुळें ज्यांच्या शहाणपणाचा व मुत्सद्देगिरीचा भ्रम पार उतरलेला होता त्यांना पुनः या खोट्या इतिहासानें झपाटलें. ब्राह्मणांच्या खालोखाल या भुताचा झपाटा मराठ्यांस बाधला. कारण वडिलांच्या कीर्तीवर मिशीला पीळ भरण्यांत तेही मागें नव्हते. महाराष्ट्राप्रमाणें ज्या प्रांतांत ब्राह्मण-क्षत्रियादींचें प्राबल्य नव्हतें त्यांना हें भूत फारसें नडलेलें नाहीं. परकी इंग्रजांचें वैशिष्ट्य त्यांच्या धंदेउद्योगांत व व्यापारवसाहतींत आहे, हें वाणियांच्या आगेबुद्धीनें ओळखलें म्हणूनच गुजरात पुढें सरसावली. आपल्या प्रभूंच्या अनुकरणानें गुजराथी बनिये प्रथम हिंदुस्थानचे दुय्यम आर्थिक मालक बनले आणि नंतर त्यांनीं मराठ्यांच्या 'जन्मजात' राजकारणाकडे दृष्टि वळविली. त्याबरोबर गर्वानें फुगलेल्या पश्चात्‌बुद्धीच्या महाराष्ट्रीय ब्राह्मणांचें राजकारण पत्त्यांच्या बंगल्यासारखें एकदम कोलमडून पडलें! तावत्कालपर्यंत आपल्या तोंडपाटिलकीची व लेखनबहादुरीची वास्तविक योग्यता किती हें त्यांच्या लक्षांतच उतरलें नव्हतें! तरीपण अजूनही एखाद्या कादंबरीकाराच्या काल्पनिक वर्णनांतून शनिवारवाड्याचें रसभरित वर्णन उतरून घेऊन "पेशव्यांचे इमले" सजवण्याच्या खटाटोपांत अजून येथील 'पुढारी' दंग आहेत आणि त्यांना 'इतिहासलेखक' म्हणून प्रशस्तिपत्रें वा पारितोषिकें देण्याच्या उद्योगांत इतर 'पंडित' भूषण मानीत आहेत! यांपैकीं कोणाच्या बुद्धीची तारीफ करावी याचाच तेवढा निर्णय उरला! शास्त्रीबुवांच्या स्वाभिमानाच्या शिकवणीला हीं असलीं मधुर फळें आलीं!

शाळा, कॉलेजें, मासिकें, वर्तमानपत्रें, चित्रशाळा, किताबखाने, असले पोट भरण्याचे उद्योग सुरू करून पुनः त्यांना देशसेवा म्हणण्याचा जो प्रकार महाराष्ट्रांत रूढ झाला त्याचा दुष्परिणाम महाराष्ट्राला चांगलाच बाधला. प्रिन्सिपॉल गोळ्यांसारख्या देशभक्तीचा माज न चढलेल्या जागरुकाला ब्राह्मणांच्या या विद्येचें व सुलभ देशसेवेचें

खरें स्वरूप व त्यांचे भावी बाधक परिणाम स्पष्ट दिसले होते. तरीही महाराष्ट्र त्यांच्या इशाऱ्यानें जागा झाला नाहीं! उलट त्यांच्यावर टीकेचा भडिमार झाला! आजही महाराष्ट्राचे प्रो. वा. गो. काळयांप्रमाणें जे खरे अभिमानी हितकर्ते आहेत ते गोळयांच्याच परंपरेंतील आहेत. पण त्यांना देशभक्त म्हणतांना आजहीं कोणी आढळणार नाहींत! देशभक्ति म्हणजे तोंडपाटिलकी, व्याख्यानबाजी, लेखनकामाठी, अशीच समजूत प्रायः या भागांत रूढ आहे. शेतकऱ्याला पिळून फुकटची व्याख्यानबाजी करणारा जमीनदार, कुळांना पिळून हवेल्या बांधणारा सावकार, अशिलांना नाडून दौरा काढणारा वकील, परदेशी माल विकून थोडीशी वर्गणी देणारा दुकानदार, हे सर्वच महाराष्ट्रांत देशभक्त म्हणून एका काळीं गाजूं शकले. या सर्वांची तळी उचलून धरून टिमकी वाजविणारे वर्तमानपत्रकार वा लेखक हे स्वयंभू पुढारी बनले. या सुखवस्तु अकार्यकृत् साहित्यिक 'पुढाऱ्यां'च्या हातांत महाराष्ट्राचें राजकारण गेलें त्याचाच आरंभीं सांगितलेला प्रकार हा दुष्परिणाम होय.

आज महाराष्ट्राचे कान कोणाच्या हातांत आहेत? कोणाचें कोणत्या विषयांतील कोणत्या तऱ्हेचें लिखाण वाचलें जात आहे? संपादक कोण आहेत, लेखक कोण आहेत, प्रकाशक कोण आहेत? 'लोकशिक्षणा'चे श्री. जांभेकर यांच्या कार्यपद्धतीबद्दल मतभेद असेल, पण त्यांचें मुख्य विधान खोटें आहे काय? महाराष्ट्रांत उच्च लिखाणाची चहा उरलेली नाहीं हें विधान असत्य म्हणतां येईल काय? 'विविधज्ञानविस्तार' कां बंद पडला? 'प्रगति' बंद पडली तर तिचें पुनरुज्जीवन शक्य होत नाहीं, पण मोतिरामशेट रांगणेकर हे 'तुतारी', 'वसुंधरा', 'चित्रा', 'आशा' लागोपाठ अनेक मी मी म्हणणाऱ्या मालकांना लाथ देऊन चालू करूं शकतात, यशस्वी करूं शकतात, स्वतः नामांकित होऊं शकतात! खेरीज अशांनाच जग टरकतांना दिसतें, त्यांनाच मोठमोठे वंदन करतांना दिसतात! ज्या प्रोफेसरांची रेवडी हे संपादक उडवितात त्यांकडूनच अशा संपादकांना विद्यालयांतील समारंभाचें आमंत्रण येत असतें! इतिहासाच्या प्रोफेसरांना इतिहास-मंडळांतील कार्यक्रमास हजर राहण्यास वेळ मिळत नाहीं, पण ते अनंत काणेकरांच्या व्याख्यानासाठीं दोन तास मोडूं शकतात! या प्रकरणांतील इंगित काय असावें? इंगित असें कीं 'खोटें नाणें खऱ्या नाण्याला बाजारांतून घालवून लावतें' हा अर्थशास्त्रांतील चलनी नाण्याबद्दलचा सिद्धान्त इतर क्षेत्रांतहि खरा ठरत आहे!

एखाद्या समाजांतील लोक विशिष्ट कार्यासाठीं किती द्रव्य खर्चूं शकतात याला मर्यादा असते. समाजाचा सांस्कृतिक दर्जा व अभिरुचि यांबरोबर त्याची आर्थिक परि-स्थिति या खर्चाची मर्यादा मुख्यतः ठरविते. महाराष्ट्रांतील आजचा समाज वर्षाकांठीं जें द्रव्य, ग्रंथ व नियतकालिकें विकत घेण्यासाठीं खर्च करतांना दिसतो त्याचा बहुतेक भाग समाजाचें स्वतःच्या फायद्यासाठीं अनहित करणाऱ्या लोकांकडून उचलिला जात आहे. अर्थात् हें अनहित करणारे लोक अनेक समाजहितसाधक कार्यांचीं पत्रकें कपाळावर

चिकटवूनच आपला कार्यभाग साधीत असतात. कोणी आपणाला विशिष्ट थोरांची परंपरा चालू ठेवणारे संबोधितात, कोणी संस्कृतिसंरक्षक म्हणवितात, कोणी शुद्ध राजकीय वा आर्थिक मताचें नांव घेतात, कोणी समाजसुधारक होतात तर दुसरे इतर साहित्य (कसलें ?) सेवक, मनोविनोदक, कलाशिक्षणशास्त्रप्रचारक बनतात. पण बहुतेकांचा निष्कर्ष एकच. ते पोटाला मिळवितात, घरदार करतात, बंगलेवाड्या उठवितात, जमीनजुमले वा दागदागिने खरीदतात, किमान मोटारी उडवून जिवाची तात्पुरती मुंबई (?) करतात! (मात्र बहुतेक आयुष्य मुंबईंत जाऊनहि आम्हांला अजून या वाक्प्रचाराचा अर्थ कळूं शकलेला नाहीं!)

मग काय या लोकांनीं पोटाला बिब्बा घालून काम करावयाचें? तसें कांहीं नाहीं. आमची तक्रार त्यांच्या द्रव्यार्जनाबद्दल नसून आपलीं कामें करण्याच्या नालायकीबद्दल आहे. ज्यांना पंधरावीस वर्षें संपादकवर्गांत राहून एकहि नामांकित वाटण्याजोगा राजकीय लेख लिहितां येत नाहीं त्यांना त्या जागांवर बसण्याचा अधिकार काय? तर एवढाच कीं ते विशिष्ट कंपूंत किंवा गटांत किंवा सार्वजनिक संस्थेंत मूग गिळून राहण्याची कार्यैकनिष्ठा दाखवितात. या कंपूंत प्रवेश मूळच्या निकाम्यांशीं समरस होणारांचाच असतो. समरस होतां येत नसलें तरी किमान् तसें बाह्यतः भासवण्याचें ढोंग पाहिजे! राजनीतिशास्त्राचें प्राथमिक पुस्तकहि समजण्याची ज्यांच्या मेंदूची कुवत नाहीं असे राजकारणी संपादक महाराष्ट्रभर पसरलेले आहेत! या शास्त्रांतील शब्दांचीं फुलें ते मुक्तहस्तानें उधळीत असतात, पण अर्थज्ञान भोपळ्याएवढें! 'राजकारण' या शब्दाचा बटवडा महाराष्ट्रांत फार मोठ्या प्रमाणावर अभिमानपुरःसर चालतो, पण त्या विषयाचें शास्त्रज्ञान इतकें कमी इतर कोणत्याहि प्रांतांत नसेल! आणि या संपादकांचें, पुढाऱ्यांचें, खरें अंतरंगहि स्पष्ट दिसण्यास अडचण पडत नाहीं. त्यांच्या भाषणांत वा लेखांत रामदासांचें 'राजकारण' येईल, महाभारतांतील राजधर्मपर्वांतर्गत श्लोकांची खैरात होईल, कालिदास-भवभूति येतील, पण प्लेटो व ॲरिस्टॉटल, सिजविक वा लास्की यांचीं नांवें सहसा येणार नाहींत! खरेंच! त्यांचा राजनीतीशीं काय संबंध? असलाच तर तो महाभारताशीं समन्वय दाखवण्यापुरता! याच लोकांनीं महाराष्ट्राची वाट लावली आहे.

हे शब्द अनेकांस कडू लागतील, पण वस्तुस्थितीच अशी आहे. यांच्या राजकीय ज्ञानाचे वाभाडे काढणें कठीण नाहीं. त्याला 'राजाचें इंग्रजी' ग्रंथाचे लेखक फाउलरबंधु यांच्यासारखें ग्लाडस्टन, मोर्ले यांच्या इंग्रजीच्या चुका शोधून काढण्यास लेखसंग्रह घेऊन बसलें कीं पुरे! जी राजनीतिशास्त्राच्या ज्ञानाची गत तीच अर्थशास्त्राची, समाजशास्त्राची व इतर ज्ञानाची! जर ह्या पंडितांचें डोकें गिरणींत शिरलें तर दुसऱ्याच दिवशीं यांचे हात तुटलेले दिसतील, विमानांत घुसलें तर यांच्या विमानांचा चुराडा झालेला दिसून येईल, आगगाडींत गेलें तर टक्कर झाल्याचें ऐकूं येईल! पण सामाजिक शास्त्रांत तसें थोडेंच भय आहे? देशाचें राजकारण वा समाजकारण नासूनहि हे पुनः राष्ट्रदीप, स्वातंत्र्यवीर, धर्मवीर, लोकनायक, देशबंधु, किमान् देशभक्त वा समाजसेवक ठरतातच!

डोकें ढिलें व ज्ञान तकलुपी असल्यानें या समाजधुरीणांची विचारसरणी वा आचारपद्धति मोठी विचित्र बनते. कोणत्याहि विषयांत यांची गति चालतांना दिसते ! पण मूलग्राही ज्ञान एकाचेंहि असावयाचें नाहीं. शब्दपांडित्य व वावदूकपणा भरपूर, पण निश्चितपणा एकाहि गोष्टींत नसावयाचा. वेदांत्याप्रमाणें यांना एकांत अनेक व अनेकांत एक दिसत असतें ! म्हणजे असें कीं बदमाषांत साधु व मूर्खांत शहाणा यांना दिसतो तसाच साधूचा भोंदू व शहाण्याचा गाढवहि यांना दिसू शकतो. इतिहासाच्या क्षेत्रांत हे शिरले तर ह्यांना विशिष्ट नको असलेल्या महात्म्याची हे अशी करून छाननी करतील कीं तो अखेर बदमाषच ठरावयाचा ! उलटमूर्खाच्या मूर्खपणाची मांडणी ते अशा सफाईनें करतील कीं, तो महान् मुत्सद्दी हटकून ठरावा ! 'महाराष्ट्रसारस्वत'कार भावे यांनीं मागें मराठ्यांचें राज्य रावबाजीनें घालविलेलें नसून तें प्रतापसिंहाच्या देशद्रोहामुळें गेलें असें सिद्ध करून दाखविलें होतेंच ! चरित्रें लिहितांना शहाण्याच्या शहाणपणाला ते इतकीं इतर कारणें साहाय्यभूत झालेलीं दाखवितील कीं तो शहाणा होता म्हणण्यापेक्षां केवळ शहाणा ठरला एवढेंच मानण्याकडे कल जावा. उलट बदमाषाच्या बदमाष बनण्याला इतक्या गोष्टी कारणीभूत झाल्या असें म्हणतील कीं त्याच्या बदमाषीला संक्षेप मिळत मिळत तो फक्त दुर्दैवी सज्जन ठरावा ! वाचकाच्या मनावर असा ठसा उठावयाचा कीं शहाणा आणि मूर्ख, सज्जन आणि शठ, हे जवळजवळ एकसारखे असतात ! व्यक्ती सोडून घडामोडी घेतल्या तर पानिपतच्या युद्धाबद्दल हे म्हणतील कीं त्यापासून मराठ्यांची कांहीं फारशी हानि झाली नाहीं किंवा त्याचे परिणाम चिरंतन नव्हते ! इतिहास सोडून नीतीच्या क्षेत्रांत उतरलें तर हे म्हणतील कीं चांगलें व वाईट हीं पहाणाराप्रमाणें, कालानुसार, विशिष्ट प्रसंगाप्रमाणें तशीं ठरतात. ज्याला त्याला आत्मस्वातंत्र्य दिलें पाहिजे. मनःपूतं समाचरेत्। परिणाम—प्रत्येकजण आपलें मन पूत झालेलें आहेच व आपणाला वाटेल तें निवडण्याचें स्वातंत्र्य आहेच, असें समजून वागत चालला ! एक बायको असून दुसरी केली तरी योग्य, कारण नसतां बायकोला सोडचिठी दिली तरी योग्य, व्यभिचार केला तरी तोहि सकारण, ग्रॅज्युएट बाईनें एखाद्या मॅट्रिक उनाडाशीं लग्न केलें तरी नीतिधैर्यच, आपल्या लहरीखातर अनेकांचीं आयुष्यें कोणी नासलीं तरी तोहि पराक्रमच ! आमचे नीतिशास्त्रज्ञ या सर्वांचें वकीलपत्र घेण्यास व अभिनंदन करण्यास तयार ! ज्यांचीं आयुष्यें खराब झालीं त्यांचीं मनें कमकुवत, त्यांना कोणत्याहि गोष्टीबाबत कांहींहि वाटण्याचें कारण नाहीं ! स्वातंत्र्यामुळें सुप्त शक्ती कार्यप्रवृत्त झाल्या पण कार्याकार्यविवेक जाग्यावर न उरल्यामुळें त्या प्रवृत्ती समाजविध्वंसक ठरल्या. प्रत्येक व्यक्तीचें विचारस्वातंत्र्य जारी झाल्यानें समाजाचें असें कांहीं कार्यमान राहिलें नाहीं. अर्थात् दुराचाऱ्यांना पुष्कळशा पळवाटा खुल्या झाल्या. त्याचाच परिणाम सामाजिक बेबंदशाहींत दिसून येतो. खेरीज आर्थिक पुनर्घटनेवांचून सामाजिक व नैतिक घणनांस आधीं हात घातला गेल्यामुळें तर ही स्थिति फारच चेकाळली आहे.

याच निर्नायकीचें प्रतिबिंब वाङ्मयांत दिसल्यावांचून कसें राहील? ज्यांच्या डोक्याची कुवत आर्थिक, सामाजिक, नैतिक वा राजकीय प्रश्न समजण्याची नाहीं, किंवा ज्यांचा तितका अभ्यास नाहीं किंवा ज्यांना त्यांतील पौर्वापौर्व व परस्परसंघर्ष यांची सरणी लावतां येत नाहीं असे भाई, कवी, कादंबरीकार, लघुकथालेखक, लघुनिबंध-लेखक या अज्ञात, अगम्य प्रदेशांत पदक्षेप करते झाले! अर्थात् प्रमेयांना सिन्द्धातांचें, तर्कांना सत्याचें, अनुमानांना इतिहासाचें स्वरूप प्राप्त होणें अपरिहार्य झालें. इतक्याहि मूर्खपणाच्या जोडीला खरें इतिहासज्ञान असतें तर त्यांच्या मर्कटलीलांना कांहीं पायबंद बसता. पण त्याच्या अभ्यासाचें तर या सर्वांनाच वावडें! इतिहास माणसाला शहाणपणा शिकवितो हें बेकनचें वचन या सर्वांनाच नामंजूर—त्यांच्या पितामहश्री मार्क्सनें इतिहासाचें सार आधींच तयार करून ठेवलेलें असल्यानें या नवोद्भटांना मूळ इतिहासाचें प्रयोजनच उरलेलें नाहीं. दुसरे जे इतिहासवाचक वा अभ्यासक उरले त्यांच्या इतिहासाची व्याप्ति पूर्वजबढाईपुरती. या इष्ट हेतुसिद्धीसाठीं ते उत्सवमंडळें स्थापतील, फंडदेणग्या जमा करतील; त्याच्या खर्चांतून आपलीं इतिहासदुष्ट चोपडीं प्रकाशित करतील आणि एवंच खऱ्या इतिहासाभ्यासकांचें आयुष्य खर्चीं घालून केलेलें कार्य नाहींसें करण्याची कोशीस करतील! स्वतः चांगलें कार्य करण्याऐवजीं खोटें कार्य नाहींसें करण्यांतच कार्यकर्त्यांची शक्ति, भक्ति, संपत्ति खर्चीं घालण्याची आपत्ति यामुळें ओढवत आहे!

कुंपणानें शेत खावें त्याप्रमाणें सध्यांच्या देशभक्तांनीं व समाजसेवकांनीं समाज खाऊन टाकला आहे. समाज पुढें लोटून प्रगति घडवून आणण्याऐवजीं स्वतःला पुढें लोटून पुढारी बनण्यांत ते कृतकार्य झाले आहेत. तण माजून पीक बुडावें त्याप्रमाणें क्षुद्र, झोंड, दुष्ट, लोभी, यांच्या सुळसुळाटानें समाजहितसाधक कार्य बुडून जात आहे. लोंढ्यानें शेत वहावावें त्याप्रमाणें जगांतील वेगवेगळया देशांत निरनिराळ्या कारणांसाठीं उत्पन्न झालेल्या लाटांच्या पुरांनीं हा देश वाहून जात अहे. येथील समाजरचनाच अशी बनत चालली आहे कीं, ज्यांनीं शरीरदृष्ट्या, मनोदृष्ट्या, बुद्धिदृष्ट्या वा शीलदृष्ट्या प्रजासंवर्धन करावें त्यांवरच अविवाहित राहण्याची, लग्नें लांबविण्याची, संततिनियमन करण्याची किंवा मुलें मरतांना पहाण्याची पाळी यावी. जीं मुलें वाढण्यासारखीं, त्यांना खायला मिळूं नये आणि ज्यांना पचवण्याची ताकद नाहीं त्यांच्या येथें समृद्धि व्हावी. ज्यांना बुद्धि नाहीं, शिकण्याची इच्छा नाहीं, ग्रहण करण्याची कुवत नाहीं, त्यांच्या शिक्षणावर पाण्यासारखा पैसा खर्च व्हावा आणि ज्यांची बुद्धि तरतरीत आणि शिकण्याची इच्छा अदम्य, त्यांना दहापांच रुपयांसाठीं शिक्षण सोडणें भाग व्हावें. आमचे सुशिक्षित सधन नागरिक मूर्ख पोरांसाठीं बंगले बांधून ठेवतील, तीन पिढ्या पुरण्याइतकें द्रव्य मागें ठेवतील, पण शेजारचा गरीब बृहस्पति उपाशी मरतांना उघड्या डोळ्यांनीं पहातील—आणि वर म्हणतील कीं त्यांच्यांतच कांहीं दोष असले पाहिजेत, एरवीं तो उपासावर कसा येईल! मद्रासकडील लोक गणित व आंकडेशास्त्र

यांत प्रवीण व तज्ञ असतात पण त्यांच्यांतहि रामानुजन् ओळखून काढणारा एतद्देशीय कोणी निघाला नाहीं, त्याला व्यापारी कंपनींतील एक इंग्रज उपयोगीं पडला ! इकडेहि अशीं उदाहरणें सांपडतील. शिल्पकार करमरकरांना कलेक्टर ऑट्टो रॉथफील्डनीं ओळखिलें, जवळच्या ब्राह्मणांपैकीं कोणी ओळखूं शकलें नाहीं ! आमच्या समाजांत आज कोणत्याहि विषयांत विशेष गति असलेलीं कोणी मुलें असलीं तर तीं बहुधा ओळखल्या-शिवाय सुकून जाण्याचाच संभव फार ! बरें, तो माहीत झाला तरी त्याचें चीज होईल ही आशा नको ! तो एक टीकेचा, थट्टेचा विषय व्हावयाचा ! ठराविक चाकोरींतून निश्चित मार्गानें तो स्वार्थतत्पर राहून वर आला तरच ठीक, नाहींतर तो फुकटच जावयाचा ! साहस, नवीन भरारी, अकल्पनीय मार्ग, हीं आमच्या कारकुनी हिशेबी स्वभावाला मानवत नाहींत. अशा कारकुनी वृत्तीच्या कोत्या बुद्धीच्या माणसांच्या हातांत राजकारण आणि समाजकारण गेल्यानेंच महाराष्ट्राचा घात झाला आहे.

वर जें विवेचन केलें त्यावरून असें दिसतें कीं या देशांत कोलंबस अथवा मॅगेलन्, शॅकल्टन अथवा अमंडसेन, ऐन्स्टैन् अथवा जेम्स जीन्स, नेपोलियन अथवा शिवाजी, यांसारखे पुरुष उदयास येण्याची शक्यता उरलेली नाहीं. हा देश कारकुनी वृत्तीच्या लोकांनीं उपनगरें वसवण्याचा पराक्रम करण्याइतपतच कार्यक्षम आहे. आपल्या समाजांत विडंबनानें विद्वत्तेची आणि विनोदानें विक्रमाची जागा पटकावली आहे. येन केन प्रकारानें, जुगारीनें, सावकारीनें, ठेकेदारीनें, मिरासदारीनें, परदेशी वस्तूंचा प्रचार करून, अनेक संस्थांचे विश्वस्त होऊन, नटींची बडवेगिरी करून, द्रव्य मिळवणारांच्या हातांत समाजाचें यंत्र गेलें आहे. वैश्यांनीं व शूद्रांनीं ब्रह्मतेज व क्षात्रतेज लुप्त करून टाकलें आहे. शिक्षणासारख्या शुद्ध बौद्धिक क्षेत्रांतहि या गोष्टीचें प्रत्यंतर येतें. आपल्या विषयांत सतत परिश्रम करणाऱ्या प्राध्यापकांपेक्षां संस्थेसाठीं द्रव्य मिळविण्यांत हुषार अशा उचापती गृहस्थांच्या हातीं संस्थांचीं सूत्रें गेलीं आहेत. हे सूत्रधार स्वतःस इष्ट त्या तऱ्हेनें संस्था हाकीत असतात. ऑलिवर ट्विस्ट्‌मधील अनाथालयाच्या चालकांप्रमाणें ते स्वतःच्या मजेंत चूर असतात आणि त्यांच्या संस्थांतील मुलें ज्ञानासाठीं आक्रोश करीत असलीं तरी त्यांच्या वाट्यास नियमित घोकीव ग्रंथांच्या पेजेचे चमचा दोन चमचे आले म्हणजे फार झालें ! खऱ्या विद्वान् माणसाला दीर्घ परिश्रम करूनहि मान्यता मिळणें किती मुष्किलीचें आहे याचा एक मासला कै. माधवराव पटवर्धनांच्या हृदयद्रावक उदाहरणावरून स्पष्ट झाला आहे ! आधींच विद्वान् असलेल्या माणसानें पांच वर्षें परिश्रम करून सुस्पष्ट गुणांचा ग्रंथ तयार करावा, त्याच्या मान्यतेसाठीं लहान मुलाप्रमाणें परिक्षेस बसण्यांत कमीपणा मानूं नये, तरी त्यांना मान्यता मिळतांना विश्वविद्यालयास आंचके बसतात ! माधवराव मनानें खंबीर, वृत्तीनें झुंजार, तरीहि त्यांचें हृदय पोखरलें गेलें व त्यानें त्यांच्या आयुष्याचीं बरींच वर्षें कमी केलीं याबद्दल शंका वाटण्याचें कारण नाहीं. विशिष्ट रोगांची उत्पत्ति मनाच्या अस्वस्थतेनें होते हें एक वैद्यकीय सत्य आहे.

सद्गुणावर विसंबून कार्य करण्याऐवजीं सत्तेच्या जोरावर तें घडवून आणण्याची प्रवृत्ति निर्माण झाली म्हणजे समाजाच्या स्वास्थ्यास ओहोट लागला असें समजावें. तीच परिस्थिति आज विद्यमान आहे. कोणत्याहि क्षेत्रांत वर बसणारीं माणसें तीं विशिष्ट-स्थानापन्न आहेत म्हणून त्यांना महत्त्व प्राप्त झालेलें आहे, तीं सुयोग्य आहेत म्हणून नव्हे. या माणसांना त्यांचें स्थान शेअरबाजारासारख्या उलाढाली करून प्राप्त झालेलें असतें, निढळाच्या घामाचा उद्योग करून नव्हे. सट्टे करून श्रीमंत झालेल्या माणसालाहि लोक श्रीमंतच म्हणतात व समाजांतील त्याच्या महत्त्वास त्या त्या मार्गांमुळें मुळींच बट्टा लागतांना दिसत नाहीं. निवडणूक नामक लोकशाहीचा जो विशेष आहे त्याचें खरें स्वरूप काय असतें हें आतां पोरांनाहि कळावयास लागलें आहे. कोणताहि खटाटोप न करतां किती माणसें नुसत्या नामकरणानें निवडून येतील? मेकॉले अनेक वर्षें एडिन्बरोचा रेक्टर होता, पण त्याची निवडणूक आपोआप होत असे. अशीं पुष्कळ वर्षें लोटल्यानंतर त्याला प्रत्यक्ष न ओळखणारी नवी पिढी पुढें आली. तेव्हां त्याच्या चहात्यांनीं एक वर्षीं त्यांस कळविलें कीं यंदा आपणांस थोडी हालचाल केली पाहिजे, नाहींतर पूर्वीसारखें निवडून येण्याची शक्यता संशयांत आहे. त्यानें सांगितलें कीं पूर्वीप्रमाणेंच आलों तरच ती खरी निवडणूक, नाहींतर मला लोभ नाहीं! असें सांगण्याची किती बड्या धेंडांची तयारी आपणास दिसते? एखाद्या खंद्या शिपायाप्रमाणें किंवा गुळाच्या ढेपेला डसलेल्या डोंगळ्याप्रमाणें ते जागांना चिकटून राहतील, तसेच मरतील, पण मेकॉलेचा विचार त्यांच्या चित्तांत डोकावणार नाहीं! अशी वृत्ति ज्या समाजांतील लोकांत नांदत आहे तेथें खऱ्या लोकशाहीची बूज काय? ही स्थिति राजकीय, सामाजिक, साहित्यिक, शैक्षणिक, सर्वच क्षेत्रांत सारखी विद्यमान आहे.

प्राध्यापक राधाकृष्णन् यांनीं नुकतेंच जगाच्या आजाराचें निदान केलें त्यांत तीन गोष्टींचें थैमान त्यांना आढळलें. शास्त्रज्ञान, मनःशक्ति आणि नागडा लोभ यांचा घनघोर संग्राम त्यांना सर्वत्र दिसून आला. संपत्तीचा लोभ, सुखाचा लोभ, सत्तेचा लोभ, कीर्तीचा लोभ, यांनींच अचाट शास्त्रज्ञान व जबरदस्त मनःशक्ति यांचा दुरुपयोग घडवून आणून जगांत अस्वस्थता निर्माण केली आहे. आपल्या देशांतील बेबंदशाहीचीं कारणेंहि वेगळीं नाहींत. फक्त आपला देश परतंत्र असल्यानें त्यांत देशद्रोही बूटपुशांची भर पडली आहे. समाजव्यवस्थेचा व राज्यव्यवस्थेचा आद्य हेतूच सज्जनांना संरक्षण देणें व त्यांचाच उत्कर्ष होऊन तेच व्यवस्थापक होतील अशी घटना घडवून आणणें हा आहे. तो ज्या समाजांत व राज्यांत साधत नाहीं तें राज्य बिघडलें असें समजावें. मोठा लोभ तर राहोच, पण तनुनिर्वाहापुरताहि 'प्रपंच' न केला तरी आपल्या समाजांत अनर्थ घडावयाचा चुकत नाहीं असा आमचा अनुभव आहे. तो जर अपवादरूप नसून सार्वत्रिक असला तर त्या समाजाला भविष्याची आशा नाहीं असें म्हटलें पाहिजे.

समाजहितसाधक पुरुष वर आणण्याऐवजीं त्यांना ठेंचून जमिनींत गाडण्याकडेच

आज समाजसत्तेचा दुरुपयोग होतांना दिसतो. आजची नवी पिढी या दुरुपयोगाच्या तंत्रांतच तरबेज होत आहे असें दिसतें! विनोदाचें रूपांतर हलकट टवाळींत, टीकेचें रूपांतर अन्याय्य विडंबनांत, सत्यान्वेषणाचें रूपांतर असत्यपूर्ण बदनामींत, मोठ्या प्रमाणावर होतांना दिसत आहे. या टवाळीला भिऊन, विडंबनानें हृदयविदारण होऊन, बदनामीला बिचकून जाऊन, अनेकांनीं आपलीं कार्यक्षेत्रें सोडलीं आहेत. धर्मयुद्धाची शक्यता नाहीं म्हणून समरांगणाला पाठ दाखवून भागूबाईचा शिक्का सहन करीत निघून जाण्याची पाळी भल्याभल्यांवर आली आहे. साहित्यिकांनीं, लेखकांनीं, टीकाकारांनीं असले धंदे चालवून उदरंभरण करावें, समाजाला अनिष्ट वळण लावावें, निर्मळ नव्या पिढीचीं मतें गढूळ करावीं, याहून वाईट स्थिति कोणती? अमेरिकेंतील बदमाषांच्या कृतीचें हें अनुकरण झालें! वैमानिक लिंडबर्गसारख्यांवर तेथें देशत्यागाची पाळी आली त्याप्रमाणेंच या देशांतहि सज्जनांवर आली तर त्याहून देशाची अधिक अपकीर्ति कोणती? या लाजिरवाण्या अप्रिय विषयाचें कीर्तन एवढेंच पुरे.

वर एवढें जें संकीर्तन केलें तें अत्यंत दुःखित मनानें, मोठ्या कष्टानें केलें. कोणत्याहि संस्थेवर माझा दांत नाहीं. ज्यांच्या डोक्याला एखादी टोपी बसली असें वाटेल त्यांनींहि ती गोष्ट वैयक्तिक दृष्ट्या घेऊं नये असें मी नम्रपणानें विनवितों. माझे शब्द क्वचित् कडक वाटतील पण माझें मन मी बालकाप्रमाणें स्वच्छ ठेवलें आहे. ज्यांच्यावर माझी टीका असते त्यांचेहि गुण माझ्या दृष्टिआड नाहींत. अशांतील बरेच माझे चांगले परिचित आहेत, त्यांत अनेक स्नेहीहि आहेत. ज्यांच्या स्नेहभावाच्या ओलाव्यावर मी कष्टमय जीवनयात्रा चालविली त्यांच्याबद्दल मला आदर कसा नसेल? कांहीं ठिकाणीं तर कृतज्ञताबुद्धीहि जिवंत आहे. ज्याच्याबद्दल माहिती अत्यल्प, विपरीत आयुष्यक्रमामुळें गैरसमजांना भरपूर अवकाश, निःस्पृह स्पष्टवक्तेपणामुळें अनेकांचा ज्यावर राग, त्याबद्दल अन्याय न झाला तर तें आश्चर्य! पण अशा रागवलेल्यांनींहि मनांत आणावें कीं या माणसानें काय साधलें आहे? कोणत्या लोभानें प्रेरित होऊन हा माणूस असा वागतो म्हणावा? अन्नाला मोताद होईपर्यंत ताणण्यांत याचा काय हेतु असूं शकेल? संपत्तिसत्ता राहो, कीर्तीचा व मानमान्यतेचा हव्यास तरी त्यानें कधीं दाखविलेला दिसतो काय? आपलें साधुत्व तरी त्यानें कधीं मिरविलें काय? मग समाजकल्याणाबद्दलची आस्था, जग बरें चालावें ही शुभेच्छा, यांव्यतिरिक्त आयुष्यांत प्रवर्तक असें काय उरलें? तीहि गोष्ट मान्य नसली तर अर्थातच बोलणें खुंटलें.

माझी खात्री आहे कीं निर्मळ मनाचा आहे त्याला माझें विवेचन पटेल. रागलोभमदमत्सरादिकांनीं पिडलेल्यांसमोर मी निर्बल आहें. पण महाराष्ट्रसमाजाची घसरट त्यांनाहि अमान्य करणें जड जाईल. डॉ. केतकरांसारख्यांच्या स्मारकाबद्दल एखादी कमिटी नेमली गेली तरी ती जातमृत होतांना दिसते. त्यांचें लिखाण मौलिक असलें तरी तें छापतां येत नाहीं. आणि ज्यांच्यांत कांहीं असलेंच तर भाषेच्या विलासाखेरीज

अन्य कांहीं नाहीं त्यांच्या लेखसंग्रहांचे वा समग्र लिखाणाचे संभार नित्य बाहेर पडत आहेत ! लघुकथागुच्छांचा व काव्यांचा तर नुसता पाऊस पडत आहे ! विनोदी लिखाणाच्या माऱ्यापुढें तर उभें राहणेंहि शक्य नाहीं ! ज्यांची बुद्धि ढिली, मन दूषित, वृत्ति कुत्सित, ध्येयवत्ता शून्य, चारित्र्य संशयित, आचरण लोभमोहमदान्वित, त्यांच्या लिखाणांत काय सांपडण्यासारखें आहे ? त्यांकडून कोणता संदेश मिळण्यासारखा आहे ? कार्यप्रवृत्ति कशी होण्याजोगी आहे ? ते लेखकसंपादक ग्रंथकर्ते म्हणून ज्ञात होतील, सभासंमेलन-परिषदांतून मिरवूं शकतील, क्वचित् द्रव्यदारागृह-समन्वित होऊं शकतील, पण त्यांच्या भाषाविलासाचा उपयोग समाज सुधारण्याकडे होऊं शकणार नाहीं, समाजाची संघटना करण्याकडे होणार नाहीं, अशिवाचा नाश करण्यांत होणार नाहीं, राष्ट्र तारण्यासाठीं होणार नाहीं, जगांत शांति, सुख, समाधान आनंद पसरविण्यांत त्याला यश प्राप्त होणार नाहीं. असें कांहीं आपल्या हातून व्हावें, एतदर्थ मी लेखणी शिणविली; तिचा त्या कार्याच्या सिध्यर्थ कांहीं उपयोग होतो कीं काय तें वाचकांनीं पहावें.

'शेजवलकरांचे लेख : भाग १ 'ची प्रस्तावना

ता. ६ जानेवारी १९४०

# विभावरी-वाङ्मयाच्या निमित्तानें

दरेक पिढीच्या कल्पना, आवडीनिवडी व ध्येयें वेगवेगळीं असतात. प्रत्येक नवी पिढी मागील पिढीची बहुधा टीकाकारच असते. व्यक्तीच्या आयुष्यांत ज्याप्रमाणें वयोमानाप्रमाणें निरनिराळ्या जातींच्या माणसांवर प्रेम बसतें, तसेंच समाजाचेंही असावें कीं काय, अशीही शंका येते. बालपणीं आईपासून क्षणभरही परतें सरण्यास राजी नसलेलें मूल किंचित् मोठें झालें कीं, सवंगड्यांत स्वतःस विसरून जातें. मग आईनें हांक मारली तरी तीहि त्याला ऐकूं येत नाहीं. तारुण्यांत प्रवेश झाला, कीं प्रेम विरुद्ध लिंगाच्या व्यक्तीकडे ओढलें जातें. मग तरुण माणसाला आईबाप, एका संस्कृत भाणांत म्हटल्याप्रमाणें, डोकेदुखीस कारण होतात. हा काळ दरेक व्यक्तीच्या मनोरचनेप्रमाणें कमीजास्त वर्षें लांबतो. बहुतेकांच्या बाबतींत लवकरच विवाह होऊन हा काळ संपतो, तर कित्येक भ्रमरवृत्तीच्या माणसांचें आयुष्य याच वृत्तींत बुचकुळ्या व गचके खात संपतें. बालविवाह रूढ होते तेव्हां हा काळ पुष्कळसा, लागण्यापूर्वींच संपत असे. त्यावर विचार करण्यास फुरसतच उरत नसे. पण अलीकडे जसजसें विवाहाचें वयोमान वाढत चाललें, व स्त्रियाही अविवाहित राहिल्या तरी हरकत नाहीं, अशी भावना समाजाच्या विचारी थरांत रुजली, तेव्हां या काळाची मर्यादा सबंध तारुण्य व्यापण्याइतकी वाढली. अर्थात् यांतून नवे मानसिक, वैचारिक व सामाजिक प्रश्न सुरू व्हावे, हें साहजिकच होय.

आपला समाज शतकामागें पाश्चात्य संस्कृतीच्या कक्षेंत आला. तेव्हांपासून त्याचें संक्रमण हळुहळू सुरू आहे. हें संक्रमण विचाराच्या पायावर, योग्य मार्गानें, योग्य वेगानें, व योग्य व्यक्तींच्या नेतृत्वाखालीं चालू रहातें, तर आज आपणास जे सामाजिक प्रश्न भेडसावीत आहेत, बेचैन करीत आहेत व नेत्यांची मति कुंठित करून अनिष्ट दिशेनें वाहात आहेत, ते वेगळ्याच प्रकारें, मनाची शांति न ढळवितां, सामाजिक खळबळ न निर्माण होतां, इष्ट व हितकर तऱ्हेनें सुटले असते. पण पारतंत्र्य येऊनच आपलें दुर्दैव संपलें नव्हतें. ज्या कारणांमुळें तें आलें, तीं समजून घेऊन योग्य दिशेनें पुढें पाऊल टाकण्याचा मार्ग समाजांत रुळला नाहीं, चालू झाला नाहीं, व समाजाच्या सर्वसंमत ध्येयांत समाविष्ट झाला नाहीं. याचा अर्थ तीं कारणें समजणारे, त्यांवर उपाय काय तो जाणणारे व योग्य मार्गावर पहिलीं पावलें टाकणारे पुरुष आपल्या समाजांत निर्माण झाले

नाहींत, असा नव्हे. तसे पुरुष आपल्या सुदैवानें कालचक्रानेंच आपोआप निर्माण केले होते. ब्रिटिश अमदानीच्या १३० वर्षांपैकीं पूर्वार्धांत याच मार्गानें समाज जाऊं पहात होता. बाळशास्त्री जांभेकर, भाऊ महाजन, मोरभट दांडेकर, लोकहितवादी, दादोबा पांडुरंग, ज्योतिबा फुले, विष्णुबुवा ब्रह्मचारी, विष्णुशास्त्री पंडित, नाना शंकरशेट, भाऊ दाजी लाड, परमानंद व त्यांच्या मागोमाग येणारे भांडारकर, रानडे, तेलंग व भागवत या सर्व मंडळींचा मिळून होणारा मार्ग महाराष्ट्रसमाजाची गाडी योग्य रुळावरून पुढें सरकवीत होता. पण महाराष्ट्राच्या इतिहासांत दीडशें वर्षांपूर्वीं घडला होता, तसाच चमत्कार पुनः होऊन, गाडी भलत्याच रुळावर विरुद्ध दिशेनें चालू केली गेली. या गोष्टीचे दुष्परिणाम आजतागायत आपण भोगीत आहोंत व पुढेंही आणखी किती दिवस भोगावे लागतील तें न कळे!

आपलें इस्लामपूर्व स्वराज्य होतें तेव्हां अखेरीस धार्मिक कर्मकांडाचा व तज्जन्य स्पृश्यास्पृश्यतेचा कळस झाला होता. ते दुष्परिणाम जाणून त्याविरुद्ध लाटही तेव्हांच उद्भवली होती. महानुभाव, लिंगायत, नाथपंथ व वारकरीपंथ यांनीं वेगवेगळ्या दिशांनीं धार्मिक व सामाजिक सुधारणेस आरंभ केला होता. पण त्यांचा परिणाम खोलवर जाऊन समाजाची पुनर्घटना होण्यापूर्वीच अल्लाउद्दीन येऊन ठेपला व त्यानें आंतून पोखरलेल्या आपल्या स्वराज्याचे क्षणांत तीन तेरा केले. या महापुरांतून पुनः वर डोकें काढण्यास समाजास पुरीं तीनशें वर्षें लागलीं. इस्लाम हा तोंवर हिंदी समाजाचा एक कायम व अविभाज्य घटक बनून गेला होता. असें होण्याचें कारण, या काळांत हिंदु समाज कासवा-प्रमाणें आपले हातपाय आंखडून स्वरक्षण करूं पहात होता, हें होय. जर बाटलेले लोक ताबडतोब परत हिंदुधर्मांत घेण्याची शिताफी समाजनेत्यांनीं दाखविली असती, तर समाजाची पुनर्घटना सर्वच दृष्टींनीं योग्य पायावर होऊन तो एकसंधि राहिला असता. ही संधि अखिल हिंदुस्थाननें दवडिली व त्यामुळें समाजाच्या पोटांत एक कायम शल्य येऊन बसलें. अर्थात् याबद्दल मुख्यतः उच्च वर्गांनाच जबाबदार धरलें पाहिजे. जेव्हां शिवकालांत नवीन संक्रमण सुरू झालें, तेव्हां परकी समाजाचें पंचमस्तंभी पाचेरूं समाजाच्या हृदयांत खोलवर जाऊन बसलें होतें. तें गृहीत धरूनच पुढील पाऊल टाकणें भाग होतें. परधर्मांना सरळ तोंड देऊन आपलें दार्ढ्य हिंदु समाजाला राखतां येईनासें झालें, याचा फायदा घेऊन खिस्ती लोकांनींही महाराष्ट्राच्या पश्चिम किनाऱ्यावर प्रवेश करून आपलें पाऊल रोंवलें होतें, व हा एक नवीनच शत्रु समाजसंक्रमण करण्यांत निर्माण झाला होता. शिवाजीनें इस्लामी संस्कृति आत्मसात् करून घेऊन व तिची हिंदु संस्कृतीशीं गांठ घालून आपला मार्ग आंखला होता. त्याच्या पावलावर पाऊल पुढें पडतें, तर हिंदुस्थानांत व महाराष्ट्रांत एक नवीन संमिश्र समाज निर्माण झाला असता. पण शिवाजीनें निर्माण केलेली ही नवीन संधि पेशव्यांनीं गमावली. पुनः मुसलमानपूर्व गाडलेल्या कर्मकांडाचें मोठ्या प्रमाणावर पुनरुज्जीवन करण्यांत आलें व

हिंदु समाजाचा समंध मूळ पदावर येऊन बसला. नवीन पाश्चात्य संस्कृतीचें संकट पुढें उभें ठाकलें, तेव्हां त्याला तोंड देण्यास पेशवे समर्थ ठरले नाहींत व त्यामुळेंच आपलें स्वराज्य लोपलें. यानंतर आपोआपच मार्ग बदलणें भाग होतें, व त्याप्रमाणें तो वर सांगितल्याप्रमाणें बदलण्यासाठीं चिखलांत विटाही टाकण्यांत आल्या होत्या. पण पुनः मागल्याची पुनरावृत्ति झाली. पेशवाई गेल्यामुळें ज्यांना विशेष दुःख वाटत होतें व हा केवळ चकवाचकवीचा प्रकार झाला असें ज्यांचें त्या घडामोडीबद्दल विवेचन होतें, त्यांनीं उलट मुसंडी मारली. मूलभूत प्रश्नांना वावदूकपणानें बगल देऊन त्यांनीं गनिमी काव्याची लढाई समाजक्षेत्रांत सुरू केली. नवीन सुधारणेचें केंद्र महाराष्ट्रांत मुंबईहून पुण्यास हालविण्यांत आलें. येणेंकरून त्या सुधारणा मागील वाटेस पडून पुनः जुन्या कर्मकांडाचें नवीन स्वरूपांत पुनरुज्जीवन करण्यांत आलें. काळाप्रमाणें आपल्या मार्गाला नवीन टोपी घालून दाखविण्याची सफाई या प्रकारांत होती, तरी तो मार्ग अयोग्य होता, हें आतां इतिहासानेंच सिद्ध केलें आहे.

जगांत सर्वस्वीं वाईट किंवा सर्वस्वीं चांगलें असें थोडेंच कांहीं असतें! लोकमान्यांनीं राजकीय सुधारणेसाठीं एकी निर्माण व्हावी म्हणून सामाजिक सुधारणा तहकूब ठेवण्याचें जें धोरण स्वीकारलें, त्याचा अल्पस्वल्प राजकीय फायदा त्यांना झाला असला, तरी तो मार्ग एकंदरींत चुकीचाच होता, यांत कसलीही शंका नाहीं. ब्रिटिश अमदानींतील पूर्वार्धांत जो मार्ग मुंबईस सुरू झाला होता, व पुण्यालाही येत होता, तोच सर्वोदयाचा मार्ग समाजहिताचा होता. त्यांत कोणत्याही प्रश्नाला बगल दिलेली नव्हती, वा तो तहकूब करण्यांत आला नव्हता. आतां जी नवीन माहिती पुढें येत आहे ती पहातां, बाळशास्त्री जांभेकर या काळाचे प्रतिनिधि म्हणतां येतील. पाश्चात्य शास्त्रज्ञान, धार्मिक व सामाजिक सुधारणा करूनही पुनः स्वसंस्कृतिसंरक्षण, आर्थिक व राजकीय चळवळ, अशा सर्व प्रश्नांचा पाया जांभेकर घालू पहात होते, हें 'दर्पण', 'दिग्दर्शन' व 'प्रभाकर' या नियतकालिकांवरून सिद्ध आहे. त्यांना मुंबईकर टिळकांप्रमाणेंच महापुरुष मानीत होते, हेंही त्यांच्या प्रसिद्ध होणाऱ्या चरित्रसाधनांवरून स्पष्ट झालें आहे. फक्त ते केवळ आरंभकर्ते ठरल्यामुळें व त्यांच्या पाठीमागें त्यांना टिळकांप्रमाणें कोणी कणखर शिष्य न उरल्यामुळें, ज्याप्रमाणें विष्णुशास्त्र्यांचा पंथ त्यांच्या अकाल मरणानंतरही महाराष्ट्रांत फैलावला, व आतां पूर्ण बद्धमूल झाला आहे, तसा बाळशास्त्र्यांचा मुंबई पंथ झाला नाहीं. महात्मा गांधींचा मार्ग हा बाळशास्त्र्यांच्या दडपिल्या गेलेल्या पंथाचा, पुढील काळास योग्य असा, पुनरवतार म्हणतां येईल. रानडे–गोखल्यांचा प्रागतिक पंथ, भांडारकर–तेलंगांचा ज्ञानपंथ, फुले–भागवतांचा समाजसुधारणापंथ हे एका अर्थानें बाळशास्त्र्यांनीं लावलेल्या बीजांचे वाढलेले वृक्ष होत. पण या कोणांतच बाळशास्त्र्यांची धडक नव्हती. ते सज्जन पण दुबळे होते. जर ते कार्यास वाहून घेतलेले निष्ठावान् कार्यकर्ते झाले असते, तर पुणेरी पंथास महाराष्ट्रांत स्थानच उरलें नसतें.

बाळशास्त्र्यांचें 'दर्पण' त्या आरंभींच्या काळांतही कोणा धेंडाच्या अब्रूनुकसानीमुळें बंद झालें, व मिशनऱ्यांशीं श्रीपत शेषाद्रि प्रकरणांत खेळलेल्या वादामुळें बाळशास्त्री मोठा पगार असूनही कर्जबाजारी झाले हें लक्षांत आणलें, म्हणजे त्यांची धमक लोकमान्यांच्या जातीचीच होती, हें आपोआप मनास पटतें. त्यांच्या शिष्यांत केवळ ब्राह्मणांचाच समावेश नसून, सर्व जातींचें व धर्मांचेंही गुरुत्व त्यांनीं पत्करिलें होतें, हा त्यांचा पुणेरी पंथाहून असलेला विशेष मानतां येईल. गुजराती, पार्शी हेही त्यांना गुरुस्थानीं मानीत, हें लक्षांत ठेवण्यासारखें आहे. म्हणजे त्यांचा सर्वसुधारणापंथ पुढें वाढता, तर तो मराठ्यां-पुरता व हिंदूपुरता संकुचित न रहातां, गांधीपंथाप्रमाणें सर्वसंग्राहक झाला असता, यांत शंका उरत नाहीं. रानड्यांनीं या पथावर पाऊल टाकलें होतें, पण त्यांच्यांत धडक व विशेषतः त्याग नव्हता. एका त्यागाच्या अभावामुळें सर्वज्ञ असूनही रानडे फुकट गेले. खऱ्या आध्यात्मिक त्यागमार्गापेक्षां, आधिभौतिक शहाण्या सुखवादाचा त्यांचा मार्ग होता, असें आम्हांस वाटतें. या शहाण्या सुखवादाचेंच आजच्या भाषेंतील नांव सदाशिवपेठी संस्कृति होय. मध्यंतरीं चिपळूणकर, आगरकर व टिळक यांच्या वैयक्तिक कणखर पराक्रमामुळें, त्यांचा मार्ग शहाण्या सुखवादाचा नव्हता असा भास झाला असला, तरी एकंदरींत महाराष्ट्र पांढरपेशा समाज हा टिळकांच्यापेक्षां रानड्यांचाच अनुयायी झाला आहे, ही गोष्ट लोकमान्यांच्या मृत्यूनंतर पूर्णपणें प्रत्ययास आली. वैयक्तिक स्पर्धेमुळें टिळक-गोखल्यांचा संघर्ष जहाल-मवाळवादाच्या रूपानें महाराष्ट्रांत गाजला असला, तरी अखेर या दोन मार्गांत मूलभूत भेद नव्हता, ही गोष्ट केळकरांच्या एका पिढीच्या दोन्ही पक्षांच्या समन्वयी पुढारीपणानें सिद्ध केली आहे. हा पंथ महाराष्ट्रांत बद्धमूल झाल्यामुळें, स्वराज्याच्या चळवळीच्या आघाडीस असलेला महाराष्ट्र, वखत आला तेव्हां मागें पडून, बाजूस फेकला गेला, व स्वातंत्र्याच्या दोऱ्या त्याच्या हातीं न रहातां त्या दुसऱ्यांच्याच हातीं गेल्या, हें आपण अनुभवीत आहोंच.

या गोष्टीचे दुष्परिणाम महाराष्ट्रांतील प्रत्येक चळवळींत, संस्थेंत व लाटेंत निदर्शनास येतात. गेल्या पिढींतील मराठी वाङ्मय या गोष्टीचें प्रतिबिंब आहे. समाजोपकारक अशी कोणतीही गोष्ट न साधतां, नसता गर्व, फुकटा अभिमान, क्षुद्र द्वेष, यांची अपरंपार वाढ तरुण पिढींत या वाङ्मयानें केली आहे. परस्परप्रशंसामंडळें व विशिष्ट व्यक्तींच्या प्रभावळींचे गट यांचाच प्रायः सध्यांचा महाराष्ट्रसमाज बनला आहे. महाराष्ट्रांतील लेखकाला सरळ पहातांच येत नाहींसें झालें आहे. कोणत्याही गोष्टीचें यथातथ्य वर्णन न करतां, स्वतःचा मालमसाला भरून खोटें, वाकडें व मर्मभेदक असें लिहिण्याची खोड त्याला जडली आहे. त्याला सामाजिक टीका कळेनाशी झाली असून, त्यांत तो वैयक्तिक टोमणे पहावयास शिकला आहे. सार्वत्रिक टीका म्हणजे कोणाही व्यक्तीवर टीका नसते, हें साहित्यसम्राटांनाही कळेनासें झालें आहे. आजच्या वर्तमानपत्रांतून व नियतकालिकांतून ज्यांचीं नांवें नित्य कानांवर पडतात, त्यांवरून समाजांतील गुणी

व्यक्तींचें मोजमाप कोणी करूं म्हणेल, तर तो हमखास फसल्याशिवाय रहाणार नाहीं. यामुळें ज्यांना समाजांत मिरविण्याची हौस, त्यांना आपलें नांव लोकांपुढें ठेवण्यासाठीं चहाचिवडा, हिमदुग्धपान, रसपान, वनभोजनें, झुणकाभाकर भोजनें, उद्यानोपहार व श्रीखंडपुरीच्या मेजवान्या,—या रेशनिंगमुळें शक्य होत नाहींत तरी—यांची योजना मधूनमधून करावी लागत आहे. एरवीं एखादा आइनस्टाईनही या समाजांत अज्ञात रहाण्याचा बळकट संभव निर्माण झाला आहे. मुखलेपाशिवाय कोणताच मृदंग, मधुरच काय पण कसलाही ध्वनि काढण्यास राजी नाहीं. समाजांतील तथाकथित सुशिक्षित, विद्वान्, प्राध्यापक, साहित्यशौंड काळ्या बाजाराच्या पिळणुकीनें इतके भुक्कड बनले आहेत कीं, एखाद्या उपाहाराच्या लालचेनें, किंवा थिएटरांत रिकाम्या राहिलेल्या जागेचा फुकट पास मिळविण्यासाठीं, प्रतिस्पर्ध्यांशीं, शत्रूंशीं वा कोणत्याही समाजलुटारूशीं संगनमत करून, वाटेल तो अभिप्राय देण्यास सिद्ध होत आहेत. सत्याची बाजू आपणहून घेण्यास कोणीही सद्‌गृहस्थ पुढें येणें शक्य नाहीं. तूं माझें अमुक केलेंस तरच मी तुझें अमुक करीन, असा शुद्ध देवघेवीचा व्यवहार या सदाशिवपेठी संस्कृतींत रूढ झाला आहे. एखाद्या खून झालेल्या इसमाच्या नातेवाईकांनाही, तो खून प्रत्यक्ष पहाणारांपैकींसुद्धां कोणी साक्षीदार हवा असेल, तर त्याची आधीं भरपूर मूठ भरण्याची तयारी त्यांना ठेवावी लागेल. सामाजिक व वैयक्तिक गुणांचा इतका ऱ्हास मागें कधींच झालेला दिसला नाहीं. ज्या राष्ट्रांत नूतन स्वराज्यारंभीं असा देखावा दिसत आहे, तेथें पुढें कोणता प्रकार अपेक्षिणार !

शिष्ट पुढारीच असे बनले, तेव्हां सामान्य जनांची मनोरचना काय विचारावयाची आहे ? त्यांत ध्येयवादाला कोठें स्थान मिळणार ? ध्येयवाद नाहीं, तर स्वार्थत्याग कोण करणार ? व स्वार्थत्याग नाहीं, तर समाजहिताचें कोणतें काम महाराष्ट्रासारख्या दरिद्री समाजांत तडीस जाणार ? आजच्या इतका केवलसुखवादी तरुण समाज महाराष्ट्रांत गेल्या चाळीस वर्षांत तरी केव्हांच नव्हता. अशा तरुण पिढीच्या मनांत कोणते विचार घोळणें शक्य आहे ? रिकाम्या मनांत सैतानानें ठाणें द्यावें हें किती साहजिक आहे ? तरुण पिढी शृंगारप्रिय असावयाचीच असें म्हटलें, तरी चाळीस वर्षांपूर्वीची 'करमणूक', 'मासिक मनोरंजन' वाचणारी पिढी कोणत्या विचारांची होती ? व आजची पिढी कोणत्या विचारानें भरली आहे ? मनाचें कोणतें बंधन, व जनाची कोणती लाज, आज उरली आहे ? ज्याप्रमाणें राजकारणांत तीस वर्षें गांधींच्या सत्य-अहिंसेचा रोज भडिमार होऊन, त्यांतून काळाबाजार—अगदीं पहिल्या प्रतीच्या अर्थशास्त्रज्ञांची व कायदेपंडितांची उत्तम मदत घेऊन संघटित केलेला अभेद्य काळाबाजार—हें जगाच्या इतिहासांत अश्रुतपूर्व असें रत्न बाहेर पडलें, त्याप्रमाणें समाजांत साम्यवादाचा उपदेश तीस वर्षें होऊन, त्यांतून 'बंधनाच्या पलीकडे' एवढें एकच आचारसूत्र प्रस्थापित झालें, असें दिसत आहे. म्हणजे कोणी कोणाला कांहीं सांगूं शकत नाहीं व कोणी कोणाचें ऐकतही

नाहीं. या समाजाचें नियंत्रण फक्त एखादा हिटलर, मुसोलिनी, तोजो किंवा स्टॅलिनच करूं शकणार, पण त्याची उत्पत्ति गांधीवादी भारतवर्षांत कशी संभवणार ? एवंच, या समाजाला कोणत्याही प्रकारें आळा घालणारा कोणीही उरला नाहीं, असा सर्व समाजेतिहासाचा अर्थ निघतो !

अशी स्थिति कां निर्माण व्हावी ? तीस वर्षांपूर्वी अशी स्थिति कां नव्हती ? याचीं कारणें दोन जातीचीं आहेत. पहिलीं, जागतिक कारणें. दोन महायुद्धांनीं जगाच्या रचनेंत, व रचनेपेक्षांही आर्थिक स्थितींत, कल्पनेबाहेर परिणाम घडवून आणला आहे. युद्ध म्हणजेच मूलतः समाजविघटन. दोन हजार वर्षांपूर्वी महाभारतकारानें अर्जुनाच्या मुखानें युद्धाचे दुष्परिणाम वर्णिले, तेव्हां त्यानें कुलक्षय झाल्यामुळें सनातन कुलधर्म नष्ट होतात, त्यामुळें सर्व कुल अधार्मिक होतें, त्याचाच परिणाम कुलस्त्रिया दूषित होतात, त्यापासून वर्णसंकर निर्माण होतो व संकर हा नरकाप्रत नेतो, अशी मीमांसा केली आहे व ती कमीजास्त प्रमाणांत भरतखंडांत मान्य धरली गेली आहे. अर्थात् हें म्हणूनही अर्जुनाला युद्ध करावेंच लागलें व त्याचा परिणाम अखेर कलियुग निर्माण होण्यांत झाला. अलीकडील महायुद्धांचे परिणामही त्याच स्वरूपाचे आहेत. आर्थिक संकटांमुळें व घडामोडींमुळें कुटुंबसंस्था खिळखिळी झाली आहे. प्रत्येक व्यक्तीवर जो सदाचरणाचा दाब या संस्थेमुळें येत असे तो नष्टप्राय झाला आहे. व्यक्तीवर गुप्त पोलिसाप्रमाणें रात्रंदिवस नजर ठेवणारे नातेवाईक नसल्यामुळें, तिची कृति एखाद्या उनाड पोराप्रमाणें केवळ स्वैर, अथवा कोणत्या तरी गटांत ती ओढली गेली असल्यास त्या गटाच्या अर्थशून्य घोषवाक्याप्रमाणें चालणार, गांधींच्या सत्याग्रहांतून सत्य कोठल्या कोठें उडून जाऊन आग्रह—स्वतःच्या स्वार्थासाठीं हठाग्रह—एवढाच उरलेला दिसत आहे; व अहिंसेचा अर्थ, ज्यांनीं समाजाला लुटलें व लुटीत आहेत, त्यांना वाक्ताडनही करतां कामा नये किंवा त्यांची संपत्ति सरकारनेंही जप्त करूं नये, एवढाच होत आहे. त्याप्रमाणेंच इतरही पक्षांच्या घोषवाक्यांचे तत्सदृशच अर्थ आचरणांत येतांना दिसत आहेत. साम्यवाद्यांच्या उपदेशांतून समाजोपयोगी उत्पादन वाढणें होत नसून, मजुरी मात्र महिनोमाल वाढत चालली आहे. व्यक्ति शास्त्रीय बुद्धीनें पूत होण्याऐवजीं लैंगिक स्वातंत्र्याच्या आंबिल ओढ्यांत वहावत चालली आहे. यावर उपाय म्हणून गांधीवादी सांगतात कीं, समाजाचें नैतिक पुनरुत्थान झालें पाहिजे ! पण ते असा विचार करीत नाहींत कीं, गेल्या एक पिढीच्या एतद्विषयक उपदेशानें काय झालें ? समाज वरच्या पायरीवर चढणें राहो, पण तो खालींच कां घसरलेला दिसत आहे ? त्यांत त्यांच्या तंत्राचा व मंत्राचा कांहीं भाग आहे कीं नाहीं ? जर स्वातंत्र्य त्यांच्या मंत्रानें व तंत्रानें आलें म्हणावयाचें तर समाजाचा नैतिक अधःपात तेवढा दुसऱ्या कोणाच्या उपदेशानें झाला ? अहिंसेचा तिळमात्र उपदेश न करतांही, हिंसक परकें सरकार जितकी अहिंसा समाजांत रूढ ठेवूं शकत होतें, तितकीही अहिंसा गांधीवादी म्हणविणाऱ्या सरकारास कां राखतां येत नाहीं ?

अतिबहुजनसमाजाची आजच्या इतकी सर्व बाजूंनीं हलाखीची स्थिति गेल्या साठ वर्षांत कधीं झाली होती? या उलट कांहीं व्यक्तींची संपत्ति कोणतेही श्रम न करतां भूमिति-श्रेढीनें पूर्वी कधीं इतकी वाढत होती? इंग्रज सरकारनें ऐन लढाईच्या भरांत जे दर व्यापाऱ्यांना ठरवून दिले नव्हते, ते आजचें स्वराज्य-सरकार कसें ठरवून देत आहे? सगळ्या जुन्या नोकरांचें खरें उत्पन्न सरकारी हिशेबानेंच रुपयाचे चार आणे झालें असतां, मुद्दाम वाढलेले दर तसेच थोपवून धरण्याचा प्रयत्न कां चालू दिला जात आहे? याचा स्पष्ट अर्थ, सर्व नोकरांस फसविण्याचा कट आजचे अधिकारी करीत आहेत असाच धरावयाचा काय? कोणताही नवीन कर बसवीत नाहीं असें सोंग करून, आपल्याच नोकरांची प्राप्ति अशी परस्पर चतुर्थांश करण्याचा प्रयत्न, योग्य म्हणतां येईल काय? नवीननवीन खातीं कारण नसतां काढून, व त्यांत भरमसाट पगाराच्या नव्यानव्या जागा निर्माण करण्याचा तडाखा एकीकडे सुरू असतां, दुसरीकडे सर्व जुन्या नोकरांना, जणूं ते परक्या सरकारनें नेमले होते म्हणून कीं काय, चतुर्थांश मजुरीवर राबण्यास लावणें, हें कशाचें लक्षण समजावयाचें? देशांत प्रजेची कल्पनेबाहेर हलाखी असतांना, जेथें जेथें परक्यांशीं संबंध येईल, तेथें तेथें घराच्या खिडक्या सजविण्याचा प्रयत्न काय दाखवितो? 'राजा कालस्य कारणम्' हें जर खरें, तर आजच्या विपरीत परिस्थितीचा दोष कोणाच्या माथीं मारला पाहिजे, हें काय सांगावयास पाहिजे?

गांधीवाद यशस्वी झाला असें गांधीशिष्यसुद्धां म्हणत नाहींत. मग स्वराज्य कशामुळें आलें? काय तें आकाशांतून पडलें? या प्रश्नाचें उत्तर देतांना आपण दुसरी एक गोष्ट लक्षांत घेतली, म्हणजे आपल्या प्रश्नाचें उत्तर काढण्यास आपणास मदत होईल. हिंदुस्थानचें स्वातंत्र्य कॉंग्रेसच्या प्रयत्नांनीं आलें, तसेंच पाकिस्तान नामक स्वतंत्र राष्ट्र मुस्लीम लीगनेंही घडविलें. पण लीगनें कधीं सत्य-अहिंसेचा उपदेश केलेला ऐकिवांत नाहीं. त्यांनीं सत्याग्रहाचें अमोघ अस्त्र निर्माण केल्याचेंही माहीत नाहीं. असहकाराऐवजीं त्यांनीं परक्या सरकारशीं सहकारच केला. कॉंग्रेसच्या व त्यांच्या पुढाऱ्यांच्या देशभक्तीचे डंके सर्वत्र वाजले, तसे ते निदान त्या प्रमाणांत मुसलमान पुढाऱ्यांचे कधींही वाजले नव्हते, हें ऐतिहासिक सत्य आहे. पण इतकें असूनही त्यांना तीस कोटी हिंदूंच्या नाकावर टिच्चून, व महात्माजींच्या सत्य, अहिंसा, शत्रुप्रेम, सत्याग्रह आदि मंत्रतंत्रांस न जुमानतां, आपलें म्हणणें, तें उघड उघड खोटें दिसत असतांही, खरें करून दाखवितां आलें! याचा अर्थ असा कीं, विसाव्या शतकांतील तंत्रांत स्वराज्य हें लढल्यावांचून तर येऊं शकतेंच, पण खेरीज देशभक्ति न आचरतांही येऊं शकते, असें हडसून खडसून सिद्ध झालें. महायुद्धानंतर निर्माण झालेलीं नवीं छोटीं राज्यें हेंच दाखवितात. मग तें हिंदुस्थानच्या बाबतींत मात्र केवळ गांधीवादानें आलें, असें तर्कदृष्ट्या कसें म्हणतां येईल? लीगवाल्यांप्रमाणेंच केवळ राजकारणी डाव खेळून व राजवाड्यांतील कारस्थानें करून स्वराज्य मिळूं, असें

१०२६४

नाहीं. या समाजाचें नियंत्रण फक्त एखादा हिटलर, मुसोलिनी, तोजो किंवा स्टॅलिनच करूं शकणार, पण त्याची उत्पत्ति गांधीवादी भारतवर्षांत कशी संभवणार ? एवंच, या समाजाला कोणत्याही प्रकारें आळा घालणारा कोणीही उरला नाहीं, असा सर्व समाजेतिहासाचा अर्थ निघतो !

अशी स्थिति कां निर्माण व्हावी ? तीस वर्षांपूर्वी अशी स्थिति कां नव्हती ? याचीं कारणें दोन जातीचीं आहेत. पहिलीं, जागतिक कारणें. दोन महायुद्धांनीं जगाच्या रचनेंत, व रचनेपेक्षांही आर्थिक स्थितींत, कल्पनेबाहेर परिणाम घडवून आणला आहे. युद्ध म्हणजेच मूलतः समाजविघटन. दोन हजार वर्षांपूर्वी महाभारतकारानें अर्जुनाच्या मुखानें युद्धाचे दुष्परिणाम वर्णिले, तेव्हां त्यानें कुलक्षय झाल्यामुळें सनातन कुलधर्म नष्ट होतात, त्यामुळें सर्व कुल अधार्मिक होतें, त्याचाच परिणाम कुलस्त्रिया दूषित होतात, त्यापासून वर्णसंकर निर्माण होतो व संकर हा नरकाप्रत नेतो, अशी मीमांसा केली आहे व ती कमीजास्त प्रमाणांत भरतखंडांत मान्य धरली गेली आहे. अर्थात् हें म्हणूनही अर्जुनाला युद्ध करावेंच लागलें व त्याचा परिणाम अखेर कलियुग निर्माण होण्यांत झाला. अलीकडील महायुद्धांचे परिणामही त्याच स्वरूपाचे आहेत. आर्थिक संकटांमुळें व घडामोडींमुळें कुटुंबसंस्था खिळखिळी झाली आहे. प्रत्येक व्यक्तीवर जो सदाचरणाचा दाब या संस्थेमुळें येत असे तो नष्टप्राय झाला आहे. व्यक्तीवर गुप्त पोलिसाप्रमाणें रात्रंदिवस नजर ठेवणारे नातेवाईक नसल्यामुळें, तिची कृति एखाद्या उनाड पोराप्रमाणें केवळ स्वैर, अथवा कोणत्या तरी गटांत ती ओढली गेली असल्यास त्या गटाच्या अर्थशून्य घोषवाक्याप्रमाणें चालणार, गांधींच्या सत्याग्रहांतून सत्य कोठल्या कोठें उडून जाऊन आग्रह—स्वतःच्या स्वार्थासाठीं हठाग्रह—एवढाच उरलेला दिसत आहे; व अहिंसेचा अर्थ, ज्यांनीं समाजाला लुटलें व लुटीत आहेत, त्यांना वाक्ताडनही करतां कामा नये किंवा त्यांची संपत्ति सरकारनेंही जप्त करूं नये, एवढाच होत आहे. त्याप्रमाणेंच इतरही पक्षांच्या घोषवाक्यांचे तत्सदृशच अर्थ आचरणांत येतांना दिसत आहेत. साम्यवाद्यांच्या उपदेशांतून समाजोपयोगी उत्पादन वाढणें होत नसून, मजुरी मात्र महिनोमाल वाढत चालली आहे. व्यक्ति शास्त्रीय बुद्धीनें पूत होण्याऐवजीं लैंगिक स्वातंत्र्याच्या आंबिल ओढ्यांत वहावत चालली आहे. यावर उपाय म्हणून गांधीवादी सांगतात कीं, समाजाचें नैतिक पुनरुत्थान झालें पाहिजे ! पण ते असा विचार करीत नाहींत कीं, गेल्या एक पिढीच्या एतद्विषयक उपदेशानें काय झालें ? समाज वरच्या पायरीवर चढणें राहो, पण तो खालींच कां घसरलेला दिसत आहे ? त्यांत त्यांच्या तंत्राचा व मंत्राचा कांहीं भाग आहे कीं नाहीं ? जर स्वातंत्र्य त्यांच्या मंत्रानें व तंत्रानें आलें म्हणावयाचें तर समाजाचा नैतिक अधःपात तेवढा दुसऱ्या कोणाच्या उपदेशानें झाला ? अहिंसेचा तिळमात्र उपदेश न करतांही, हिंसक परकें सरकार जितकी अहिंसा समाजांत रूढ ठेवूं शकत होतें, तितकीही अहिंसा गांधीवादी म्हणविणाऱ्या सरकारास कां राखतां येत नाहीं ?

अतिबहुजनसमाजाची आजच्या इतकी सर्व बाजूंनीं हलाखीची स्थिति गेल्या साठ वर्षांत कधीं झाली होती? या उलट कांहीं व्यक्तींची संपत्ति कोणतेही श्रम न करतां भूमिति-श्रेढीनें पूर्वीं कधीं इतकी वाढत होती? इंग्रज सरकारनें ऐन लढाईच्या भरांत जे दर व्यापाऱ्यांना ठरवून दिले नव्हते, ते आजचें स्वराज्य-सरकार कसें ठरवून देत आहे? सगळ्या जुन्या नोकरांचें खरें उत्पन्न सरकारी हिशेबानेंच रुपयाचे चार आणे झालें असतां, मुद्दाम वाढलेले दर तसेच थोपवून धरण्याचा प्रयत्न कां चालू दिला जात आहे? याचा स्पष्ट अर्थ, सर्व नोकरांस फसविण्याचा कट आजचे अधिकारी करीत आहेत असाच धरावयाचा काय? कोणताही नवीन कर बसवीत नाहीं असें सोंग करून, आपल्याच नोकरांची प्राप्ति अशी परस्पर चतुर्थांश करण्याचा प्रयत्न, योग्य म्हणतां येईल काय? नवीननवीन खातीं कारण नसतां काढून, व त्यांत भरमसाट पगाराच्या नव्यानव्या जागा निर्माण करण्याचा तडाखा एकीकडे सुरू असतां, दुसरीकडे सर्व जुन्या नोकरांना, जणूं ते परक्या सरकारनें नेमले होते म्हणून कीं काय, चतुर्थांश मजुरीवर राबण्यास लावणें, हें कशाचें लक्षण समजावयाचें? देशांत प्रजेची कल्पनेबाहेर हलाखी असतांना, जेथें जेथें परक्यांशीं संबंध येईल, तेथें तेथें घराच्या खिडक्या सजविण्याचा प्रयत्न काय दाखवितो? 'राजा कालस्य कारणम्' हें जर खरें, तर आजच्या विपरीत परिस्थितीचा दोष कोणाच्या माथीं मारला पाहिजे, हें काय सांगावयास पाहिजे?

गांधीवाद यशस्वी झाला असें गांधीशिष्यसुद्धां म्हणत नाहींत. मग स्वराज्य कशामुळें आलें? काय तें आकाशांतून पडलें? या प्रश्नाचें उत्तर देतांना आपण दुसरी एक गोष्ट लक्षांत घेतली, म्हणजे आपल्या प्रश्नाचें उत्तर काढण्यास आपणास मदत होईल. हिंदुस्थानचें स्वातंत्र्य कॉंग्रेसच्या प्रयत्नांनीं आलें, तसेंच पाकिस्तान नामक स्वतंत्र राष्ट्र मुस्लीम लीगनेंही घडविलें. पण लीगनें कधीं सत्य-अहिंसेचा उपदेश केलेला ऐकिवांत नाहीं. त्यांनीं सत्याग्रहाचें अमोघ अस्त्र निर्माण केल्याचेंही माहीत नाहीं. असहकाराऐवजीं त्यांनीं परक्या सरकारशीं सहकारच केला. कॉंग्रेसच्या व त्यांच्या पुढाऱ्यांच्या देशभक्तीचे डंके सर्वत्र वाजले, तसे ते निदान त्या प्रमाणांत मुसलमान पुढाऱ्यांचे कधींही वाजले नव्हते, हें ऐतिहासिक सत्य आहे. पण इतकें असूनही त्यांना तीस कोटी हिंदूंच्या नाकावर टिच्चून, व महात्माजींच्या सत्य, अहिंसा, शत्रुप्रेम, सत्याग्रह आदि मंत्रतंत्रांस न जुमानतां, आपलें म्हणणें, तें उघड उघड खोटें दिसत असतांही, खरें करून दाखवितां आलें! याचा अर्थ असा कीं, विसाव्या शतकांतील तंत्रांत स्वराज्य हें लढल्यावांचून तर येऊं शकतेंच, पण खेरीज देशभक्ति न आचरतांही येऊं शकते, असें हडसून खडसून सिद्ध झालें. महायुद्धानंतर निर्माण झालेलीं नवीं छोटीं राज्यें हेंच दाखवितात. मग तें हिंदुस्थानच्या बाबतींत मात्र केवळ गांधीवादानें आलें, असें तर्कदृष्ट्या कसें म्हणतां येईल? लीगवाल्यांप्रमाणेंच केवळ राजकारणी डाव खेळून व राजवाड्यांतील कारस्थानें करून स्वराज्य मिळूं, असें

मराठी ग्रंथ संग्रहालय १०२८४

हिंदुस्थानांतील प्रागतिक पक्ष पूर्वी कल्पित होताच. मात्र कॉंग्रेसला तें मिळविण्यास तीस वर्षें आटोकाट प्रयत्न करून लाखों लोकांचीं आयुष्यें बरबाद होऊन, वर हिंदु लोकांना मनोदृष्ट्या आजवर केव्हांही धक्का बसला नव्हता तेवढा नामुष्कीचा धक्का घेऊन व पाकिस्तानची भलतीच किंमत देऊन, आपलें स्वातंत्र्य पदरांत पाडून घ्यावें लागलें ! यांत राजकारणाचा तर लवलेश कोठें दिसत नाहींच, पण आपल्याच तंत्रामुळें निर्माण झालेला एक प्रकारचा अकल्पनीय दुबळा अगतिकपणा दिसतो.

वरील विवेचनावरून सुबुद्ध वाचकांच्या लक्षांत यावयास हरकत नाहीं कीं, स्वराज्याच्या आगमनाचें खरें कारण, या वरवर दिसणाऱ्या चळवळीखळबळींत न शोधतां, अन्यत्र शोधिलें पाहिजे. मागें इतिहासांत अशी घटना कोठें दिसते काय, तें पाहूं जातां इंग्लंडचेंच उदाहरण डोळ्यांसमोर येतें. रोमन लोकांचें राज्य ब्रिटनवर अनेक शतकें चालू होतें. त्यांनीं तेथें आपले लष्करी रस्ते, भिंती, तट, किल्ले व आरमार बांधिलीं होतीं. त्यांच्या सुंदर गृहांतील जमिनी रंगीत कौलांच्या असून, त्यांची त्यांनीं विशिष्ट रचना करून सुंदर चित्रें व देखावे निर्माण केले होते. त्यांवरून त्यांची सांस्कृतिक उच्चता आजही प्रत्ययास येते. असें असूनही, ते एक दिवस उठून आपल्या जहाजांत बसून ब्रिटन सोडूं लागले, तेव्हां मेंढ्यांचीं कातडीं पेहेरणाऱ्या व शरिरास रंग फासून भूषविणाऱ्या रानटी ब्रिटिश लोकांस परम आश्चर्य वाटलें ! त्यांना या गोष्टीचा उलगडा बिलकूल होईना ! खरी स्थिति अशी होती कीं, रोम शहरावरच रांगड्यांनीं आक्रमण केल्यामुळें, मध्यवर्ति सरकारला आपल्या दूरच्या सैनिकांस घरच्या रक्षणासच परत बोलाविणें भाग झालें होतें. अगदीं तशीच स्थिति आज इंग्रजांची झाली, म्हणून त्यांनीं आपल्या उपजत शहाणपणानें, बंदुकीची गोळी न वाजवितां हिंदुस्थान सोडण्याचा निर्णय भलेपणा जोडून घेतला. म्हणजे हिंदुस्थानांतून ब्रिटिशांचें बहिर्गमन हें त्यांच्यावरील आपत्तीमुळें घडलें, आमच्या पराक्रमानें घडलें नाहीं, हें आपोआपच स्पष्ट होतें. व ऐतिहासिक कार्यकारणभाव पहातां ज्यांनीं इंग्लंडला असें करणें भाग पाडलें, त्यांकडे हिंदुस्थानच्या स्वातंत्र्याचें श्रेय आपोआपच जातें. हिटलर, मुसोलिनी व तोजो यांनाच हें श्रेय देणें योग्य आहे. त्यांनीं इंग्लंडचा नाविक दरारा व वरचष्मा नाहींसा केला, त्यांचे अनेक प्रदेश बोल बोल म्हणतां घेऊन दाखविले व खुद्द इंग्लंडची वैमानिक हल्ल्यानें इतकी धूळधाण केली कीं, ॲटम बॉम्बच्या आकस्मिक शोधानें इंग्लंडची व दोस्तांची अब्रू वांचविली, तरी पुढें करावयाच्या गोष्टीबद्दल त्यांना कसलीही शंका उरूं दिली नाहीं. आगामी तिसऱ्या महायुद्धांत आपल्याला साम्राज्य राखणेंच काय, पण स्वदेश राखणेंही महाकठीण होणार आहे, हें इंग्रजांना त्यांच्या दूरदृष्टीमुळें स्पष्ट दिसत असल्यामुळेंच, त्यांनीं हिंदुस्थान सोडण्याचा निर्णय घेतला. त्यांत आपला स्वार्थ साधण्याच्या जेवढ्या हिकमती त्यांना करतां आल्या, व जेवढे कायम पेंच अभेद्य भिंतीप्रमाणें उभे करून ठेवतां आले, तेवढे त्यांनीं ठेविले आहेतच.

विशेषतः हिंदुस्थानच्या मुक्ततेचें श्रेय, जपानी लोकांच्या साहसाला दिलें पाहिजे ! व हें कबूल केलें म्हणजे, या कार्यांत ज्यांनीं सक्रिय भाग घेतला त्यांच्याकडेही त्या श्रेयाचा भाग खात्रीनेंच दिला पाहिजे. वेडा देशभक्त ठरला गेलेल्या सुभाषचंद्रांनीं या कार्यांत भाग घेण्याचा जो शहाणपणा दाखविला, तसा शहाणपणा हिंदुस्थानांतील अन्य कोणत्याही ख्यातनाम देशभक्तानें दाखविला नाहीं, असेंच पुढील इतिहासकार म्हणतील. सुभाषांना कॅांग्रेसचें साहाय्य होतें तर मग पाकिस्तान आलेंच नसतें.

मग कार्यकारणभावाची एवढी गफलत हिंदुस्थानांत कशी घडली ? ज्याला खरें श्रेय दिलें पाहिजे त्याच्यावर वेडेपणाचा शिक्का बसून, ज्यांनीं खराखुरा कोणताच पराक्रम केला नाहीं, त्यांच्या हातांत अधिकारसूत्रें कशीं आलीं ? या प्रश्नाचें उत्तर वाटतें इतकें अकल्पनीय नाहीं. जगाच्या इतिहासांत आजवर अनेकदां असेंच घडलें आहे. पराक्रम करणारा व त्या पराक्रमाचें फळ भोगणारा हे बहुधा नेहमींच निरनिराळे असतात. आजवर इतिहासांत युद्धांनीं बऱ्याच मूलभूत घडामोडी घडून येत. तेव्हांही खरे पराक्रमी ते पुष्कळदां लढाईत मरून जात व त्यामुळें मागें राहिलेल्या अंगचोरांचे पदरांत विजयाचें श्रेय पडे. या मागच्या काळांत, अशा रीतीनें युद्धांत मरणारे वीर तरी ठरत व तशी त्यांची इतिहासांत नोंद होई. पण आजच्या विसाव्या शतकांतील कागदी घोडे नाचविणाऱ्या राजकारणांत त्यांच्या कपाळीं 'चुकलेले देशभक्त' असें म्हणवून घेणेंच येतें, असें दिसतें. मागेंही भूमिगत राहून व अकल्पनीय हालअपेष्टा सोसून जे स्वातंत्र्याची मुहूर्तमेढ रोवीत, पुढें प्रत्यक्ष युद्धास तोंड लागलें म्हणजे जे तरवारी उपसून प्राणपणानें लढत, त्या मॅझिनी, गॅरिबॉल्डी, अशांच्या हातीं अखेर राज्य येत नसेच. तें एखाद्या कॅव्हूरच्याच हातीं वाटाघाटीच्या रूपें पडल्यासारखें दिसे ! व त्याचा खरा फायदा भोगणारे मानकरी 'राजे' वेगळेच असत. सामान्य लोकांनीं नुसतें स्वराज्य आलें म्हणून आनंद मानावा, व त्यांच्या पदरीं सुखापेक्षां दुःखच पडावें, हा प्रकार जगाच्या इतिहासांत बहुधा नेहमींच घडला आहे. इतालीच्या लोकांना ऑस्ट्रियाच्या संस्कृतिसंपन्न व सौम्य साम्राज्याचें जितकें सुख लागलें होतें, तेवढें स्वतंत्र इतालींत लोकांना खासच लागलें नाहीं. त्यावर लष्कराचा अजस्र खर्च बसला. संरक्षक जकातींमुळें सर्व वस्तूंच्या किंमती वाढल्या. व दूरच्या एखाद्या अधिकाऱ्याऐवजीं निकटच्या दहा अधिकाऱ्यांच्या लाथा त्यांना खाव्या लागल्या. जवळजवळ तोच प्रकार आज हिंदुस्थानांत घडतांना दिसत आहे. आजच्या इतका लुच्च्या लोकांचा बोलबाला पूर्वीं कधींच झाला नसावा. राजकारणाचें प्राथमिक पुस्तकही न वाचलेले राज्यघटना घडविण्यास इतक्या प्रमाणांत यापूर्वीं कधींच बसले नसावे. समाजाला केवळ लुटणाऱ्या लोकांचें राजकारणावर एवढें दडपण पूर्वीं कधींच नव्हतें. लोकांच्या स्वाभिमानाला धक्का मिळण्याइतकी व त्यांना केवळ दीनवाणे करून सोडण्यासारखी अशी परिस्थिति पूर्वीं कोणीच अनुभवली नव्हती. हा सर्व बनाव हेंच दाखवितो कीं, पूर्वीं ध्येयवादाचें उच्च व्याख्यान उच्च स्वरानें झोडणारे

व लोकांना आपल्या पाठीमागें धावविणारे हे आतां खरे राजे नसून, दुसरेच कोणी अधिकार बळकावून बसले आहेत. मागें दिलेल्या वचनांना, दाखविलेल्या आशांना, मूर्तस्वरूप देणारे कोणी अधिकारावर आलेले नाहींत व क्वचित् एकादे नामतः आले असले, तर त्यांच्या हातीं मिरविण्याखेरीज इतर अधिकार सोंपविलेला नाहीं. ध्येयवादी देशभक्तांच्या व त्यागी पुरुषांच्या शब्दाला आतां कोणी विचारीत नाहीं. मग त्यांच्या हातून लोकांचें कांहीं बरें होईल ही आशा कोठून उरणार ?

या सर्वांचें मूळ शोधूं लागलें कीं, देशभक्तीचें वास्तविक स्वरूप कळून येतें. देशभक्त म्हणून जे चळवळ्ये झाले, त्यागी झाले, तुरुंगांत जाऊन आले, ते स्वतःच्या बळावर व अक्कलेमुळें तसें करीत नव्हते, तर ते दुसऱ्या कोणा धूर्तांकडून दूरदृष्टीनें तसे नाचविले जात होते. त्यांना अन्नपाणी पुरविण्याचा या धूर्त राजकीय व्यापाऱ्यांनीं मक्ता घेतला होता. आपल्या या धंद्यांत घातलेल्या भांडवलाचें भरपूर चक्रवाढ व्याज आपल्याच पदरांत पडेल असें गणित ते करून बसले होते. आणि तें त्याप्रमाणेंच घडून आलें. आपल्या घरा-दारांची व आयुष्यांची राखरांगोळी करून बसलेले, देहदंड सोसणारे देशभक्त मागें जसे चळवळीसाठीं पैसा मागून जगत, तेंच दीनवाणें जीवन आज आपल्या नूतन स्वराज्याचा पाठपुरावा करण्याच्या कार्यासाठीं पै पैसा घेऊन जगतांना दिसत आहेत. खऱ्या राजकीय घडामोडींत त्यांना कोणीही विचारीत नाहीं, वा त्यांच्या शब्दाला किंमत उरलेली नाहीं. आतां हे लोक स्वतःच पस्तावल्यासारखे झाले आहेत. आपले डोळे उघडले असें उघड म्हणण्याचें धैर्य त्यांना नसलें, तरी खासगी रीत्या ते तसेच उद्गार काढतांना ऐकूं येत आहेत. अर्थात् अशांच्या हातून लोकांचें कोणतें हित होण्याची शक्यता आहे असें म्हणावें ?

पण आजच्या हिंदुस्थानचे नैतिक नेते तेच समजले जातात. असे ते कां, केव्हांपासून समजले जाऊं लागले ? तर ज्या वेळीं बुद्धिमान् व विचारी वर्गाच्या हातून समाजनेतृत्व होईनासें झालें, राजकारणाच्या नाड्या त्यांच्या हातून निसटल्या, त्यामुळें व तेव्हांपासून ही आपत्ति कोसळली. 'यः क्रियावान् स पण्डितः' हें सुभाषितरूप असलेलें वाक्य वैचारिक क्षेत्राच्याही डोक्यावर जाऊन बसलें. क्रियावान् पंडिताला त्या त्या विषयाचें ज्ञान, पुस्तकी पंडितापेक्षां किंवा विवादपटूपेक्षां जास्त होईल, ही गोष्ट खरीच आहे. पण याचा अर्थ पंडेचा अभाव असलेला कर्ता हा पंडित समजला जावा असा उफराटा होतां कामा नये. पंडितानेंही आपलें ज्ञान व्यवहारांत उतरवण्याचा, व त्या रूपानें त्या ज्ञानाची सत्यता पडताळून पहाण्याचा, नेहमीं प्रयत्न ठेवावा, या उद्देशानें प्रेरक म्हणून वरील काव्यपंक्ति वापरली जावी, हें योग्य आहे. पण शुद्ध धोंडोपंतांनींच ती वापरण्याचा उपक्रम सुरू केल्यामुळें समाजाची अपरंपार हानि होत आहे. ही हानि टाळण्याचे मार्ग वर सांगितलेलेच आहेत. म्हणजे खऱ्या पंडितानें आपल्या ज्ञानाच्या राशीवर कृपणाप्रमाणें स्वस्थ बसून न राहतां, तें ज्ञान सतत उपयोगांत आणण्याचा

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें, स्थळप्रत.
अनुक्रम २६.१२८ वि: पि०५ ६
क्रमांक ...१२...३..... नों: दि: ......
३।२।६०



हव्यास धरून, समाजसेवक बनावें हा आहे. याच हेतूनें चातुर्वर्ण्यात ब्राह्मणाला अध्ययनाबरोबर अध्यापन, यजनाबरोबर याजन व प्रतिग्रहाबरोबर दान हेंही जोडीनेंच सांगितलें आहे. पण आमच्या आधुनिक ब्राह्मणांनीं यांपैकीं पहिल्या तिहींवरच आपली शक्ति केंद्रित केली व दुसऱ्या तीन बाबी आळसामुळें, सुखासीनतेमुळें व स्वार्थामुळें सोडून दिल्या. यामुळें समाजनेतृत्वही, त्यांनीं सोडलेल्या कार्यांच्या कर्त्यांकडे साहजिकच गेलें. अखिल भारताचा प्रश्न थोडा बाजूस ठेवून केवळ महाराष्ट्राच्या इतिहासाकडे नजर फेकली, तरी या गोष्टीची सत्यता मनास पटते. फार जुना इतिहास सोडून पेशवाईपासूनच आरंभ केला, तरी ब्राह्मणांच्या याच दुर्गुणामुळें आपलें स्वराज्य गडगडलें, हें इतिहासकारास पदोपदीं प्रत्ययास येतें. ब्राह्मण पेशव्यांनीं स्वतःचा वैचारिक दर्जा वाढविण्याचा प्रयत्नही थोडाच केला व जो होता तोही सर्व मराठ्यांत उतरवून सर्व समाज एका पातळीवर आणून ठेवण्याचा प्रयत्न तर जवळजवळ मुळींच केला नाहीं. पाश्चात्यांचें युद्धकौशल्य पटून त्यांची युद्धपद्धति, फ्रेंचांचे परात्पर शिष्य जे गारदी त्यांना नोकरीस ठेवून पेशव्यांनीं उचलून त्या पद्धतीचें महत्त्व व अपेक्षा तर कबूल केली. पण ती पद्धति ते स्वतः कधींच शिकले नाहींत. मग पॅरिसच्या फ्रेंच लष्करी विद्यालयाप्रमाणें या शिक्षणाची शाळा काढण्याचें त्यांना कसें सुचणार ? कांहीं थोडे मराठे व ब्राह्मण पुढच्या काळांत या गारद्यांच्या अनुकरणानें स्वतः गारद्यांचे नायक बनलेले दिसतात. पण त्यांचें ज्ञान कॉर्नवॉलिस व वेलस्ली यांना कसें पुरें पडणार ? एवंच स्वतः ब्राह्मण असूनही पेशव्यांनीं व तत्कालीन ब्राह्मणांनीं इष्ट विद्येचें अध्ययन व अध्यापन सोडलें, म्हणून ते काळाच्या ओघांत वाहून गेले. तीच गोष्ट स्वराज्य गेल्यानंतरही पुनः घडली. अगदीं आरंभीं कोंकणांतील ज्या ब्राह्मणांस पुण्याच्या राज्यकर्त्या ब्राह्मणांच्या अहंकाराची बाधा कधीं झालेली नव्हती, त्यांनीं मुंबईस सरळ मनास स्वच्छपणें दिसूं शकणारी परिस्थिति ओळखली व इंग्रजांचें शास्त्रीय ज्ञान व राजकारणज्ञान, तसेंच अर्थकारण व व्यापारज्ञान हीं फैलावण्याचा उपक्रम केला. बाळशास्त्री जांभेकर व त्यांचे सहकारी भाऊ महाजन यांचीं चरित्रें या दृष्टींनीं उद्बोधक आहेत. त्यांनीं शास्त्रीय शिक्षणावर व राजकीय शिक्षणावर जितका भर दिला होता, तितका वाङ्मयावर दिला नव्हता, हें स्पष्ट आहे. पेशव्यांस राज्यकर्ते असूनही पुण्यास छापखाना काढणें स्वराज्यांत सुचलें नव्हतें; तोही उपक्रम मुंबईसच प्रथम झाला. दुसऱ्याचें पाहून आधींच त्याचें अनुकरण, ही गोष्ट हिंदुस्थानांत गेल्या हजार वर्षांत सहसा घडलीच नाहीं. तो दुसरा या देशावर स्वारी करून राज्य करूं लागला, म्हणजे मग आमचे लोक त्याच्या गुणाची चौकशी करूं लागतात. राजपुतांनीं परदेशांत तोफा, दारुगोळा व बंदुका यांची जी वाढ झाली होती ती माहीत करून घेतली असती, तर केवळ बारा हजार सैन्यानिशीं बाबरानें हिंदुस्थानचें राज्य बळकावलें, अशी गोष्ट इतिहासांत लिहिली जाती ना. पुढें शिवाजी महाराजांनीं मुसलमानांचे सर्व गुण आत्मसात् करून, त्यांचा कांटा हिंदुस्थानच्या

राजकारणांतून कायमचा काढण्याचें धोरण अवलंबिलें, तेव्हां पाश्चात्य आधींच पश्चिम किनाऱ्यावर बद्धमूल झाले होते. त्यांचें अनुकरण करून त्यांनीं आरमार सजविलें व नौकानयनाचा नवीन उपक्रम आरंभिला. पण पेशवाईंत तो वाढविणें राहोच, पण बुडविण्याचाच मार्ग अवलंबिला गेला ! पाश्चात्य युद्धपद्धतीबद्दल वर लिहिलेंच आहे. एवंच दुसऱ्याच्या घरांत काय शोध चालले आहेत त्याची आधींच बित्तंबातमी काढून घेऊन ते शोध आत्मसात् करण्याचा व वाढविण्याचा प्रयत्न हिंदुस्थानवासीयांनीं आधुनिक काळांत कधींच केला नाहीं. अव्वल इंग्रजींत निदान अनुकरणाचा मार्ग आचरून पाश्चात्यांच्या जवळजवळ जाऊन पोंचण्याचा यत्न सुरू झाला होता, तोही प्रयत्न एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धांत त्याविरुद्ध उपक्रम करून, होता कीं नव्हता असा करून टाकण्यांत आला. जांभेकर शास्त्रीय लेख लिहीत होते, तर धाकटे शास्त्रीबुवा वाङ्मयाचे फवारेच सोडूं लागले होते ! त्या फवाऱ्यांचा जोर एवढा कीं, त्या फवाऱ्यांत आजतागायत महाराष्ट्र बुडून गेला आहे व त्यामुळें सर्व क्षेत्रांत महाराष्ट्राचा विचका झाला आहे. जांभेकरांनीं श्रीपत शेषाद्रि नामक बारा वर्षांच्या खिस्ती कळपांत ओढून घातलेल्या मुलाला प्रायश्चित्त देऊन परत घेवविलें, त्यासाठीं चळवळ केली, कोर्ट लढविलें, शास्त्रीपंडितांच्या सभा करविल्या, ब्राह्मणांस दक्षिणाही दिली, पण हातीं घेतलेलें कार्य त्या पौराणिक काळांतही तडीला नेऊन दाखवून एका नवीन विचारसरणीची मुहूर्तमेढ रोविली. हें करतांना ते कर्जबाजारीही झाले होते. पण पन्नास वर्षांनंतर पहावें, तर पांच हौद मिशनच्या समारंभांत चहा पिण्याच्या पापाबद्दल मोठी चळवळ होते, व अखेर नाकदुऱ्या काढून कसाबसा त्या प्रकरणावर पडदा टाकण्यांत येतो. म्हणजे पुढील पन्नास वर्षांत आमची परागति झाल्याचा तो पुरावा आहे. मुंबईस नाना शंकरशेट यांसारखे धर्मनिष्ठसुद्धां मुलींची शाळा काढतात, तर पुण्यास पन्नास वर्षांनंतर तशीच शाळा निघतांच, ' तरुणीशिक्षण नाटिका ' लिहिल्या जातात. थोडक्यांत सांगावयाचें, म्हणजे महाराष्ट्र साहित्यिक, अशास्त्रीय, प्रतिगामी झाला, व त्याचीं सूत्रें वावदूक, अकार्यक्षम् व भंपक लोकांच्या हातांत गेलीं. याचेच पडसाद महाराष्ट्रांतील गेल्या तीस वर्षांच्या वाङ्मयांत ऐकूं न आले तर नवल ! आजचा सुशिक्षित समजला जाणारा महाराष्ट्र कोणतेंही समाजहिताचें कार्य करण्यास जो असमर्थ झालेला दिसत आहे, तो या गेल्या पाऊणशें वर्षांतील घटनेचाच दुष्परिणाम आहे, हें काय सांगावयास पाहिजे ?

इंग्लंडच्या इतिहासांत लोक प्रॉटेस्टंट झाल्यापासून व बायबलाचा इंग्रजी भाषेंतूनच अभ्यास करूं लागल्यापासून एक नवीन पंथ सुरू झाला. हा प्युरिटन पंथ विशिष्ट सामाजिक ध्येयांवर व वर्तनावर उभारलेला होता. ईश्वरावर श्रद्धा, पण त्याचबरोबर धार्मिक सोहळ्यांचा अभाव; उच्च वैयक्तिक नीतिमत्ता, पण त्याबरोबरच कलाकुसरीचा तिरस्कार; व्यक्तिस्वातंत्र्याची वाढ व त्याच्या जोडीस सामुदायिक ध्येयांचा अभाव;

कायद्याचा करारीपणा, पण त्याबरोबरच भूतदयेचा लोप; उद्योगाची वृद्धि, पण सामुदायिक प्रयत्नांचा अविश्वास; अर्थार्जन व त्याच्या जोडीस कंजूषपणा; अशा तऱ्हेच्या द्वंद्वांचा प्रादुर्भाव त्या समाजांत झाला होता. या गुणांच्या जोरावर १७ व्या शतकांतच त्यांनीं राजसत्तेस पायबंद घालून आपल्या राष्ट्राच्या आधुनिक उन्नतीचा बळकट पाया घातला. त्यांपैकीं ज्यांचें राजा परत आल्याबरोबर धर्माबद्दल पटलें नाहीं, ते तर मताच्या व देवपूजेच्या स्वातंत्र्यासाठीं महासागर ओलांडून अमेरिकेस गेले व अमेरिकेच्या भरभराटीचा पाया या नीतिमान्, उद्योगी व भांडवल साठविणाऱ्या लोकांनींच घातला. यांच्याच मुलांनातवांनीं पुढें पॅसिफिक महासागरापर्यंत वसाहती रेटीत नेऊन आजचें संयुक्त अमेरिकन राष्ट्र निर्माण केलें व ते आज जगाचे कर्तुमकर्तुमन्यथा कर्तुम् शास्ते बनले आहेत. यांच्या गुणाचें वैशिष्ट्य दाखविण्यासाठीं त्यांना आजही गुंथरसारखा विवेचक लेखक अमेरिकन 'ब्राह्मण' असेंच संबोधितो. यांच्याच इंग्लंडांतील जरा कमी तिखट बांधवांनीं इंग्लंडच्या साम्राज्याची भरभराट केली होती. पेशवाईत कोकणांतून जे ब्राह्मण देशावर येऊन राज्ययंत्र आपल्या ताब्यांत घेते झाले, तेही कांहीं बाबतींत या प्युरिटनांसारखे होते. कोणतेंही काम करण्याची तयारी, त्यासाठीं अविश्रांत उद्योग, मानापमानाच्या कल्पना जवळ नसणें, त्यामुळें अगदीं हलक्या हुद्द्यापासून आरंभ करून त्या वेलाच्या आधारावर पुढें सरकण्याची तयारी ठेवणें, उपजत बुद्धिमत्ता व चाणाक्षपणा, निर्व्यसनीपणा व मितव्ययीपणा, या गुणांच्या आधारावर ते चढले तसे चढूं शकले. यांपैकीं कांहीं गुणांच्या अभावामुळें देशावरील ब्राह्मण व मराठेही मागें पडले. पण यांच्यांतील प्रधान दोष म्हणजे सामुदायिक कल्पनेचा अभाव. मराठ्यांत व देशस्थ ब्राह्मणांत सामुदायिक भावना अनेक शतकांच्या वाढीमुळें बरीच होती. पण ते सुस्त, सुखासीन, गतानुगतिक, कांहींसे व्यसनी व उधळठकही झाले होते. पुढें यांच्या संसर्गानें उत्तर पेशवाईत हे दुर्गुण कोकणस्थांनींही उचलिले आणि राज्याच्या अखेरीस छत्रपति किंवा पेशवे, शिंदे किंवा होळकर, प्रतिनिधी किंवा भोसले यांत फारसा फरक राहिलेला नव्हता. सगळे सारखेच आळशी, निर्बुद्ध, सुखासीन, व्यसनी झाले होते. पण या बाबतींत ते सारखे झाले, व म्हणून राज्य गेलें, तरी कांहीं गुणावगुणांची छाप कोंकणस्थांनीं अखिल महाराष्ट्रावर कायमचीच बसविली. किंकेड आणि पारसनीस यांनीं आपल्या इतिहासांत पेशवाईच्या काळाला 'चित्पावन' असें नांव दिलें आहे. वस्तुतः १८ व्या शतकाच्या आरंभापासून तों आजतागायत अडीचशें वर्षें त्यांच्याच दृष्टीची छाप महाराष्ट्रावर पडलेली दिसून येते. बाळाजी विश्वनाथ पेशवा झाल्यापासून जी भरती सुरू झाली, ती नाना फडणीसाच्या अंतापर्यंत वाढून पुढें पाऊणशें वर्षें ओहोटीचा काळ होता. तर अखेरच्या पाऊणशें वर्षांत त्यांची भरती-ओहोटी पुनः एकदां झाली, असें इतिहास पहातां दिसतें.

एकदां राज्यकर्ते झाल्यामुळें व अखिल हिंदुस्थानच्या राजकारणाच्या नाड्या हातांत ठेवण्याचा प्रयत्न त्यांनीं केलेला असल्यामुळें एतत्संबंधीय अभिमान त्यांच्यांत मुरून

गेला आहे. तो अव्वल इंग्रजींत सर्व दृष्टींनीं खालावल्यानंतर थोडा जिरला होता. पण त्याचें पुनरुज्जीवन त्यांनीं गेल्या पाऊणशें वर्षांत इतिहाससंशोधनाच्या पायावर करण्याचा प्रयत्न केला आहे. असें करतांना अभिमानामुळें वस्तुतः खऱ्या इतिहासास छेदच मिळाला आहे. अटकेपार गेल्याची बढाई आधुनिक काळांत फक्त मराठ्यांना, व नंतर त्यांच्याच पराक्रमाचे आयते वारस झालेल्या शिखांना, मारतां येते. अर्थात् तसें करण्यानें महाराष्ट्राचा राष्ट्र म्हणून कायम फायदा कितीसा झाला हा विवाद्य प्रश्न आहे, पण त्या अभिमानाच्या कायम धाग्यामुळें आधुनिक महाराष्ट्राचें बरेंचसें नुकसान झालें आहे, हें निर्विवाद होय. वस्तुतः मराठ्यांचें अटकेपार जाणें ही त्यापूर्वीं शंभर वर्षें सुरू झालेल्या मराठ्यांच्या उठावाच्या भरतीची सीमा होती. ती भरती ज्या कारणांमुळें शिवाजीच्या कारकीर्दींत अफजलखानाच्या वधापासून सुरू झाली होती तीं कारणें व तो पाया शाहूच्या प्रत्यागमनानंतर बहुतेक ढासळला होता. त्यामुळेंच मराठ्यांचें साम्राज्य तर कोसळलेंच, पण स्वातंत्र्यही शिल्लक राहिलें नाहीं. ज्या ध्येयांच्या पार्श्वभूमीवर मराठ्यांचें स्वतंत्र राज्य व नंतर साम्राज्य उभें राहूं शकलें होतें, तीं ध्येयें पेशव्यांना अनवगत होतीं; व म्हणूनच मूळ संस्थापकांनीं विशिष्ट हेतूनें काढलेली संस्था त्यांनीं तो हेतु सोडून दुसऱ्याच हेतूसाठीं व बऱ्याच वेळां केवळ स्वार्थासाठीं चालू ठेविली होती. ही स्वार्थाची परंपरा अव्वल इंग्रजींतील ब्राह्मणांच्यासुद्धां वर्तनांत दिसते. सामुदायिक कल्पनेपेक्षां वैयक्तिक सुधारणेची प्युरिटन कल्पना महाराष्ट्रांतील ब्राह्मणांत जास्त रुजली. त्यामुळें पहिल्या पिढींतील बाळशास्त्री जांभेकरांसारख्या अपवादात्मक व्यक्तींनीं दाखविलेली समाजसुधारणेची दिशा सुटून रानडे, भांडारकर, टिळक, चिपळूणकर, आगरकर यांची वैयक्तिक भरभराटीची व समाज हा व्यक्तींचाच बनलेला असल्यामुळें त्या रूपानें व अर्थानें समाजाची भरभराट साधण्याची परंपरा सुरू झाली. या सर्व मंडळींत वैयक्तिक नीतिमत्ता बऱ्याच उच्च दर्जाची होती. उद्योग, स्वाभिमान, विद्वत्ता वगैरे प्राथमिक आवश्यक गुणांचीही वाण नव्हती. पण सामुदायिक भावना इंग्रज माणसांप्रमाणें अल्पच होती. त्यामुळें यांच्या सुधारणांच्या प्रयत्नांची मर्यादा अखेर त्यांचीं स्वतःचीं कुटुंबें, त्यांचे इष्टमित्र, त्यांच्या आधारावर व आश्रयानें पुढें येऊं म्हणणारी मंडळी व अखेर हे सर्व पांढरपेशा जातींतील असल्यामुळें त्या जाती, येथवरच पसरली. पण या जातींची ऐन संख्या देशाच्या लोकसंख्येंत शेंकडा पांच सातांवर नसल्यामुळें नव्वद टक्के देश या सुधारणेला आणि संस्कृतीला पारखाच राहिला. या वृत्तीचा तात्त्विक परिपोष पहिल्या इंग्रजी सुशिक्षितांच्या विशिष्ट इंग्रजी शिक्षणानें झाला. बेन्थॅम, मिल्ल, ब्राईट प्रभृति इंग्रजांच्या उपयुक्ततावादानें भारावलेले नवे विश्वविद्यालयांतील स्नातक आपोआपच विलायतेंतील राजकारणांतील प्रागतिक पक्षाचे अनुयायी बनले. राष्ट्राच्या व राज्याच्या कल्पनेपेक्षां वैयक्तिक सुधारणेची इच्छा त्यांच्यांत प्रधान होती. या मताला विरोधक असा चिपळूणकर-टिळकांचा पक्ष भासतो; पण तो फक्त मराठ्यांच्या ऐतिहासिक

अभिमानापुरताच सत्य होता. त्याचा परक्या राजवटींतील राजकारणांत उपयोगापेक्षां दुरुपयोगच जास्त होण्याचा संभव होता, आणि त्याप्रमाणें तो झाला हें महाराष्ट्राच्या गेल्या पाऊणशें वर्षांच्या इतिहासानें सिद्ध केलें आहे. टिळक गेल्यानंतर राजकारणांत अग्रेसर असलेल्या महाराष्ट्राला अखिल भारतीय लोकशाहीच्या राजकारणांत कां टिकाव धरतां आला नाहीं, व त्याच्या राष्ट्रीय अभिमानाचें विकृत स्वरूप अखेर महात्मा गांधींच्या खुनाच्या रूपानें कसें बाहेर पडलें, तो इतिहास ताजाच आहे, तेव्हां त्याचें विशेष उद्घाटन नलगे.

राजकारण म्हणजे वस्तुतः सर्वांत महत्त्वाचें व केंद्रित समाजकारणच होय. राजकारणांत ज्या वृत्तीमुळें व ज्या दुरभिमानामुळें राजकारणाचा विचका उडाला, त्याच कारणांमुळें समाजही खिळखिळा होऊन गेला. परस्परांबद्दल अप्रेम, अनादर, अविश्वास, मत्सर, स्पर्धा, तुच्छता, शत्रुत्व अशा अनेक चढत्या श्रेणीच्या दुर्गुणांनीं समाज व्याप्त झाल्यावर त्याची कार्यक्षमता कोठून जाग्यावर उरणार! विशेषतः महाराष्ट्रांतील मध्यम वर्गाला, म्हणजेच बहुशः ब्राह्मणवर्गाला, इंग्रजी राजवटींत इंग्रजी वाङ्मयाच्या अध्ययनामुळें जी साहित्याची उसनी चटक लागली, तिचे दुष्परिणाम वर सांगितलेल्या रूपानेंच समाजांत दृग्गोचर झाले आहेत. ज्या सांस्कृतिक पायावर, ज्या आर्थिक घटनेमुळें, ज्या राष्ट्रीय वाढीमुळें, इंग्रजी वाङ्मय जन्मलें, वाढलें व पसरलें, त्या कारणांचा प्रायः अभाव ज्या समाजांत आहे, तेथें त्या वाङ्मयाचा परिणाम दुसरा काय दिसणार? इंग्रजी वाङ्मयाचें शिक्षण हें वाघिणीचें दूध, असें धाकटे शास्त्रीबुवा प्रतिपादन करते झाले. पण वाघिणीचें दूध हें विशिष्ट प्रकृतीच्या माणसांनाच मानवणें व पचणें शक्य असतें. संस्कृतीची ती ती पार्श्वभूमि असल्याशिवाय तें तें वाङ्मय समाजाचें योग्य प्रतिबिंब असें म्हणतां येणार नाहीं. हीच स्थिति बहुधा पाश्चात्य वाङ्मयाच्या अनुकरणानें हिंदुस्थानांत निर्माण झाली आहे. सर वॉल्टर स्कॉटच्या स्वराष्ट्राच्या उत्कट, रोमरोमांत भिनलेल्या अभिमानानें ज्या कादंबऱ्या निर्माण झाल्या, त्यांचें अनुकरण बंगाल्यांत बंकिमचंद्र प्रभृतींनीं व महाराष्ट्रांत हरिभाऊ आपटे सारख्यांनीं केलें. महाराष्ट्रांत मराठ्यांच्या इतिहासाचा धागा असल्यामुळें हरिभाऊंचा 'उषःकाल' मराठ्यांना प्रलोभक ठरला, तरी त्यांतील ऐतिहासिक वर्णनें बहुधा काल्पनिकच वटलीं. कारण तशी पार्श्वभूमि युरोपीय संस्कृतींतच शक्य होती. आपल्याकडे कोठून संभवणार? पण हा महत्त्वाचा मुद्दाही बहुतेक टीकाकारांच्या नजरेंतून निसटला आहे. बंकिमचंद्रांची 'दुर्गेशनंदिनी' तर बंगाली लोकांच्या इतिहासांत सांप्रतकालांत वीररसाचा अभाव असल्यामुळें, केवळ कादंबरीच ठरली. मात्र आपल्या भाषेच्या विलासानें त्यांनीं त्या परिस्थितींतही आपल्या वैशिष्ट्यांचा ठसा वाचकांच्या मनावर उठविला. त्यांच्या आनंदमठांतील 'वन्दे मातरम्' गीत पुढें राष्ट्रगीतही झालें. पण तेणेंकरून बंगालची फाळणी होऊन त्यांतून पाकिस्तान निर्माण होणें टळूं शकलें नाहीं. अर्थात् जर आपल्याला स्कॉटचें 'आयव्हॅनो'

आनंददायक वाटतें, तर 'उषःकाल' व दुर्गेश नंदिनी' हीं त्यापेक्षां जास्त आनंददायक वाटावीं, हें ओघानेंच आलें. पण साहित्याचा समाजशिक्षणाकडे जो नकळत उपयोग होत असतो तो मात्र येथें त्या अर्थानें प्रकट होणें शक्य नव्हतें. जी गोष्ट ऐतिहासिक नवल-कथांची, तीच सामाजिक व राजकीय कादंबऱ्यांची मराठींत झाली आहे. यूरोपीय समाजांत ज्या गोष्टी सहज दिसतात, त्या आपल्याकडे क्वचितच एखाद्या अनुकरणी व्यक्तींतच दिसणार. किंबहुना तसें तें आपल्या समाजांत दिसावें हा हेतु ज्यांच्या मनांत प्रधान, तेच अशा कथा लिहिण्यास प्रवृत्त होत असतात. ज्याप्रमाणें अलीकडे आपल्याकडे बिलकुल नसलेल्या दृश्यांचीं चित्रें अमेरिकन चित्रपटांत पाहून त्यावर आनंद मानणारे व इकडे त्यांचें अनुकरण उठविणारे झाले आहेत, त्याप्रमाणें समाजचित्रांचाही प्रकार समजावा. असल्या उसन्या उधारीनें निर्माण झालेलें साहित्य व कला समाजाला उपयोगी होणें तर राहोच, पण विकृति निर्माण न करतील तरच आश्चर्य.

आणि आपला समाज याच विकृतींत हल्लीं बुडालेला आहे. जेथें इतिहास म्हणून लिहिल्या जाणाऱ्या पुस्तकांतही सत्याचा अपलाप जाणूनबुजून, राजीखुषीनें व अक्कल-हुशारीनें करण्यांत येत आहे, तेथें काव्य-कादंबऱ्या, कथा-गोष्टी, टीका-निबंध, मानसशास्त्र या विषयांची काय गोष्ट बोलावी! इंग्लंड–अमेरिकेची डाक जर बंद झाली, तर आमच्या साहित्यिकांचें व कलावंतांचें खरें स्वरूप ताबडतोब चव्हाट्यावर येईल. तिकडील बिस्किटांचे पुडे चघळूनच आपल्याकडील कारागीर स्वतःचीं गणलीं जाणारीं रत्नें प्रसवीत असतात. ज्या समाजांत अगदीं जवळच्या नातेवाइकांखेरीज स्त्रीपुरुष एकांत करण्याला कधीं एकत्र येऊं शकत नाहींत, त्यांतील व्यक्तींना इंग्लंड–अमेरिकेंतील प्रेमभावनांची व तज्जन्य विकृतींची बाधा कोठून होणार? पण आपल्याकडील लेखक तेच अकल्पनीय भाव इकडे वाङ्मयांत उजाळीत असतात. शिक्षणाचा विशिष्ट दर्जा असल्याशिवाय, वाचनाची कांहीं एक मर्यादेपर्यंत वाढ झाली असल्याविना, समाज-अनुभवांत अमुक अमुक एक गोष्टींचा समावेश नसेल तर, कांहीं गोष्टी व्यक्तीच्या कल्पनेंतही, स्वप्नांतही येणें शक्य नसतें. पण आपल्याकडे त्या त्या भावांचें चित्रलेखन जारीनें सुरू असतें व त्याला समाज—अर्थात् साहित्यिकांचा समाज; म्हणजेच बराचसा आजच्या ब्राह्मणांचा व ब्राह्मणाळलेल्या लोकांचा समाज—टाळ्या पिटीत असतो. वा शाब्बास! क्या बात है, अशा वृत्तीनें वंदन करीत असतो. अशा काल्पनिक सृष्टींत जो समाज मिटक्या मारून राहूं शकतो, तो कोणत्याही बाबतींत कार्यक्षम कोठून उरणार?

आज आमचे राजकीय, सामाजिक व नैतिक नेतेही उद्योग करा, उत्पादन वाढवा, नित्याच्या गरजा भागविण्याची पराकाष्ठा करा, असा उपदेश टाहो फोडून करीत आहेत. त्यासाठीं प्रलोभनें दाखवीत आहेत, बक्षिसें जाहीर करीत आहेत, सरकारी मदतही देत आहेत. पण शेतीचें उत्पन्न वाढण्याऐवजीं घटत तर नाहीं ना, अशी शंका निर्माण झाली आहे. कापड गिरण्यांत जेसें कापड निघत नाहीं अशी मजुरांवर टीका करीत आहेत.

कचेऱ्यांतून बसनें येणाऱ्या मुली कामासाठीं येतच नसतात, अशी टीका ऐकूं येते. पूर्वी पांच ट्रंका एकावर एक ठेऊन वाहणारा मजूर, आतां हातांतील कातडी बॅगचेंही वजन जड मानूं लागला आहे. ऑफिसांतील पट्टेवाला, चालणें तर राहोच पण सायकलही ताणायला राजी नाहीं. त्याला बसचे पैसेच दिले पाहिजेत. काल्पनिक सृष्टींत विहार करून सर्व प्रकारचा नैतिक अधःपात झालेल्यांतच असा प्रकार संभवतो, हें काय सांगावयास पाहिजे ?

गेली सबंध पिढी काल्पनिक सृष्टींत वाढलेली आहे. एक वर्षांत स्वराज्य ह्या गांधींच्या घोषणेपासून या काल्पनिक सृष्टीला आरंभ झाला. जर स्वराज्यासारखी गोष्ट इतक्या झटपट होऊं शकते, तर व्यक्तीच्या आयुष्यांतील अनेक विलोभनीय गोष्टी त्याहून झटपट मिळवाव्या असें वाटणें मनुष्यस्वभावास धरूनच आहे. आणि आश्चर्य असें कीं, ही कल्पनासृष्टि—कारणें कोणतींही असोत—कांहीं व्यक्तींच्या बाबतींत खरी ठरतांना दिसत आहे. एका दिवसांत सहस्राधीश, लक्षाधीश, दशलक्षाधीश असे चढतां चढतां आतां एक दिवसांत कोट्याधीश, असें घडतांना आज प्रत्यक्ष दिसत आहे. किंबहुना, असें वाटावयास लागलें आहे कीं अशा काल्पनिक सृष्टीवर विश्वास ठेवून जो त्या दृष्टीनें कामाला लागेल, तोच जगांतील सर्व क्षेत्रांत आज यशस्वी होत आहे. निढळाचा उद्योग करण्यापेक्षां लफंगेगिरी जास्त फायदेशीर, असें अनुभवास येत आहे. असा प्रकार जी वाढणारी तरुण पिढी पहात आहे, तिच्या मनावर फ्रँकलिनचें उद्योगाचें, मितव्ययाचें व निर्व्यसनीपणाचें तत्त्व कसें कोरलें जाणार ? पूर्वी शाळेंत जाणाऱ्या मुलाला बाप, शिकलास नाहींस तर भीक मागशील, असें म्हणत असे. आजचा अनुभव याच्या अगदीं उलट दिसत आहे. शिकशील तर भीक मागशील, असेंच अनेक पदवीधरांना म्हणण्याची पाळी आली आहे. इंग्रजांच्या राजवटींत त्यांनीं शांततेवर व धिम्या उद्योगावर प्रजेचा विश्वास बसविण्यासारखी परिस्थिति निर्माण केली होती. आज त्याच्याविरुद्ध अनुभव येत आहे. ज्या व्यक्तीची किंवा संस्थेची समाजाला उपद्रव देण्याची जितकी जास्त शक्ति किंवा तयारी, तिलाच अधिकार व फायदा समाजांत प्राप्त होत आहे. पाकिस्तान याच तंत्रामुळें अस्तित्वांत आला. जर तुम्ही समाजाला कसलाही धाक निर्माण करूं शकत नसाल तर तुम्हाला कोणीही पुसणार नाहीं. ऐनजिनसी योग्यतेचा माणूस घरांत बसून उपाशी मरण्याचाच जास्त संभव ! संपाचें शस्त्र पाजळूं शकणाऱ्या मजुरांना वाटेल तशी मजुरी मिळूं शकते, पण तसें कांहींच करूं न शकणाऱ्या कारकुनाला व मास्तराला उपाशी रहाणेंच भाग पडतें. ही प्रथा वाङ्मयांसारख्या क्षेत्रांतही शिरली आहे, लोकांची बेअब्रू बेदिक्कतपणें करूं शकणारा वर्तमानपत्रकार व लेखक आज समाजांत मान्यता पावत आहे, बद्धमूल झाला आहे. संपत्ति त्याचेकडेच ओढली जाते. लेखनांत जास्त बेफाटपणा, अनैतिकपणा व समाजविघातकता जो जितक्या प्रमाणांत जास्त टाशील, तितका तो साहित्यांत यशस्वी झालेला दिसत आहे. 'घटं भिंद्यात्, पटं छिंद्यात्, कुर्यात् वा रासभध्वनिम्'

असें कांहीं तरी करून प्रसिद्ध पुरुष होण्याचा चालू जमाना दिसतो. आपली बाजू खरी असो वा नसो, जर तुम्ही दुसऱ्याचें घर जाळण्याइतके व त्याचा सूक्तासूक्त उपायांनीं उच्छेद करण्याइतके बेडर असाल, तर तुम्हाला एक राजकीय पक्षही स्थापन करणें शक्य आहे. त्यामुळें समाजांतील बहुसंख्यांचा फायदा न झाला, तरी कांहीं व्यक्तींना संपत्ति, अधिकार, प्रतिष्ठा मिळणें सुलभ झालें आहे. मुसोलिनी व हिटलर याच मार्गानें आपलें नांव गाजवून गेले. गेल्या महायुद्धांत ते मेले, तरी त्यांचा पंथ जगांत अजून अनेक ठिकाणीं यशस्वी रीत्या चालू आहे. पाकिस्तान अशा मार्गानेंच आलें.

गेल्या पिढींतील मराठी वाङ्मयाकडे पाहिल्यास त्यांतही याच वृत्तीचा संचार झालेला दिसतो. समाजाच्या, सर्व लोकांच्या हिताची गोष्ट कोणती, हें मनांतही न आणतां, 'मना आलें तें गाऊन,' कोणीकडून तरी आपलें नांव करण्याचा व प्रतिष्ठा वाढविण्याचा तडाखा सुरू आहे. अनीतिमान् माणसाचेंच कौतुक अशा रीतीनें सुरू झालें! वस्त्राआड सर्वच माणसें नग्न असतात. त्याची सर्व लोकांना कल्पनाही असते. पण 'नागकन्या' म्हणून मलपृष्ठावर छापून आंत एका नागड्या कन्यकेचें रसभरित जलविहारवर्णन देऊन आपली कादंबरी खपविण्याचा हा जमाना आहे. लैंगिक विषय इंग्रजी व फ्रेंच वाङ्मयांत कांहीं माणसांनीं अतिशय बेफाटपणें एका पिढीपूर्वींच हाताळले होते. त्यांत थोडा शास्त्रीयतेचाही भाग होता. ओस्कार वाइल्ड व हॅवेलॉक एलिस यांचे ग्रंथ बहुतच प्रसिद्धि व प्रसार पावले. त्यांचाच प्रादुर्भाव मराठी वाङ्मयांत सुमारें तीस वर्षांपासून होऊं लागला. प्रो. र. धों. कर्वे यांनीं 'समाजस्वास्थ्य' सुरू केलें. हडपांनीं 'बहकलेली तरुणी', 'मास्तरीण काकू' वगैरे लिहून वाङ्मयांत आपलें नांव महशूर केलें. त्यांचा पंथ हल्लीं वेलदे, बांदेकर चालवीत आहेत. इतक्या खालच्या पायरीवर न उतरतां मानसशास्त्राचा, कामशास्त्राचा व समाजशास्त्राचा आधार घेऊन त्यांच्या बुरख्यानें असलेच विषय शिष्टपणानें सूचित करण्याचा प्रकारही वाङ्मयांत रूढ झाला व त्यामागें मोठमोठे साहित्यिकही कसे धावले, तो इतिहास आतां विभावरी-वाङ्मयाच्या चर्चेच्या रूपानें सांगावयाचा आहे.

सुमारें दोन तपें झालीं. तीन वाढाळू (adolescent) महाराष्ट्रकन्या माझ्या सहजगत्या दृष्टिखालीं आल्या. त्या वेळीं त्या सामान्यांपेक्षां कांहीं वेगळ्या वाटत असल्या, तरी पुढें त्यांचें आयुष्य काय होईल याबद्दल कोणालाच भविष्य वर्तवितां आलें नसतें. यांपैकीं एक सारस्वत, दुसरी कऱ्हाडे व तिसरी चित्पावन जातीची होती. स्थानदृष्ट्या विचार केला तर पहिली कोंकणांतील म्हणजे मुंबईची, दुसरी बडोद्याची व तिसरी पुण्याची होती. अर्थातच पहिलीवर मुंबईचा अराष्ट्रीय, दुसरीवर गुजरातचा भांडवलशाही व तिसरीवर मराठ्यांचा अस्सल राष्ट्रीय ठसा मुळांतच उमटणें सहज होतें. पण या तीनीही बायांच्या बाबत तो अंदाज चुकला; व त्यांच्या आयुष्यांतील वैयक्तिक घडामोडींमुळें असो, वा भोंवतालच्या परिस्थितीच्या आंचेमुळें असो, त्यांचीं आयुष्यें दुसऱ्याच रुळांवर गेलीं.

पहिलीचा मुंबईत राहिल्यामुळें कॉलेजांत गुजराती विद्यार्थ्यांशीं दाट परिचय झाला, त्यांच्या विचारांशीं सहमत निर्माण झालें व त्या काळच्या नवोदित गुजरातच्या सांस्कृतिक लाटेबरोबर त्याही वहात गेल्या. अर्थात् गांधींबद्दल नितांत आदर निर्माण होणें हा त्याचा परिणाम झाला व वैयक्तिक आयुष्यालाही तशीच कलाटणी मिळून त्या गांधीआश्रमांत दाखल झाल्या. त्यांचें पुढील आयुष्य महाराष्ट्रास त्यांच्या लेखनानें व सेवेनें सुपरिचित झालें आहे. दुसरीचा भांडवलशाही दर्प श्रीमंतींतून गरिबींत गेल्यामुळें उतरला व मग मूळच्या भांडवलशाही वृत्तीचें विपरिवर्तन होऊन कम्यूनिझमच्या रुळावर तिची गाडी चालू झाली. तिचेंही चरित्र महाराष्ट्रास ज्ञात आहे व ग्रंथरूपानें—तिची एक हस्तलिखित साम्यवादी कादंबरी मजकडे वाचावयास आली होती व प्रकाशक भित्रे नसते तर ती छापून प्रसिद्धही व्हावयास हरकत नव्हती—नसलें, तरी लेखरूपानें व त्याहूनही विशिष्ट आयुष्यसरणीनें तिचे विचार महाराष्ट्राच्या परिचयाचे आहेत. तिसरीचें आयुष्य महाराष्ट्रास सुपरिचितच होऊन राहिलें नाहीं, तर तें तिच्या लेखनाच्या टीकेच्या रूपानें साहित्यिकांच्या चर्चेचा आजतागायत विषय होऊन राहिलेलें आहे; इतका कीं आतां पंधरा वर्षें झालीं, तरी अजून तो टोपणनांवाचा बुरखा लेखिकेला सोडवत नाहीं. त्याचा व्यापारी फायदाही मिळू शकतो, असें जाहिरातींतील त्या नांवाच्या उपयोगावरून निदर्शनास येतें.

सन १९३३ सालीं 'कळ्यांचे निःश्वास' प्रथम डॉ. केतकरांच्या 'प्रकाशनपूर्व अवलोका'सहित प्रसिद्ध झालें, तेव्हां त्यांची समजूत विभावरी या सारस्वत ज्ञातीच्या पदवीधर तरुणी आहेत, अशी करून देण्यांत आली होती. पण सारस्वतांशीं दृढपरिचय असणारास ती पटण्यासारखी नव्हती. वस्तुतः सुशिक्षित सारस्वत हे बरेचसे मुंबईकर व म्हणूनच आधुनिक सुधारणेच्या क्षेत्रांत मुळापासून वावरणारे असले, तरी त्यांच्यांत वैचारिक क्रांति फारशी झालीच नव्हती. एकदां पोर्तुगीजांच्या जुलमी अंमलाखालीं पोळून नरम झाल्यामुळें त्यांच्यांत एक प्रकारची सामाजिक निष्क्रियता रूढ झाली होती. त्यामुळें मराठेशाहींत सुद्धां त्यांच्या तल्लख बुद्धीचा राष्ट्रास व्हावा तसा उपयोग झाला नाहीं. नंतर इंग्रजांच्या सावटास आल्यानंतर ते शुद्ध राजनिष्ठ वर्गांत समाविष्ट झाले. त्यांनीं बाह्यतः पाश्चात्य सुधारणेचा स्वीकार केल्यासारखा दिसला, तरी आंतून ते पुराणे सनातनीच राहिले. विशेषतः त्यांच्या स्त्रिया सार्वजनिक रीत्या व्यासपीठावर अशा कधींच पुढें आल्या नाहींत. घरांत त्यांचें देवदेवतार्चन सुद्धां यथापूर्व चालू राहिलें. याउलट मुळांत भिक्षुक व म्हणूनच परंपरेनें कर्मठ असणाऱ्या पुणेरी ब्राह्मणांत भलतीच वैचारिक क्रांति झाली. ते आधुनिक सुधारणेचा मार्ग झपाट्यानें चालू लागले. या प्रकाराला आळा घालण्याचा प्रयत्न सुद्धां मोठ्या प्रमाणावर व जोरदारपणें झाला. पण त्याला न जुमानतां, सामाजिक क्षेत्रांत अखेर टिळकांचा आर्यसंस्कृतिसंरक्षक पंथ पराभव पावून, सुधारकांचाच पक्ष स्थानापन्न झाला. विचारांत व आचारांत आमूलाग्र बदललेले जितके पुणेरी ब्राह्मण आढळतील

तितके मुंबईतील बाह्यतः युरोपीय पोशाख करणारे सारस्वत व प्रभु सहसा दिसणार नाहींत, ही गोष्ट मुंबईशीं मुळापासून दृढपरिचय असणारांस स्वानुभवानें माहीत आहे. एवढा प्रपंच येथें करण्याचें कारण हेंच कीं, 'कळ्यांचे निःश्वास' सोडणारी स्त्री सारस्वत किंवा प्रभु असेल असा सुतराम् संभव नव्हता. त्यांच्यांत प्रौढविवाह, विशेषतः आर्थिक कारणामुळें, सुरू झाले होते, तरी बाळूताई खरे यांनीं 'निःश्वासां'च्या वेष्टनावर लिहिल्याप्रमाणें, 'आईवडिलांच्या संमतीविरुद्ध लग्न करणाऱ्या विजातीय अगर विधर्मीय माणसाशीं विवाह करणाऱ्या, आपल्या शिक्षणखर्चाचा बोजा वडिलांच्या माथीं पडला असतां तो उतरविण्याची जबाबदारी न घेतां लग्नाची इच्छा प्रकट करणाऱ्या, प्रेमाच्या आभासमय मार्गावर अल्लडपणानें पदोपदीं ठेंच खाणाऱ्या' अशा प्रौढ कुमारिका सारस्वतांत क्वचितच दिसल्या असत्या. मनाला एखादी गोष्ट पटली, बोचली किंवा असह्य झाली, तरी ती चव्हाट्यावर न बोलण्याचा संस्कारयुक्त सात्त्विकपणा त्यांच्यांत होता. 'कळ्यांचे निःश्वास' हे शुद्ध वाङ्मयदृष्ट्या शस्त्र धरण्यासारखे नसतील, पण ते लिहून छापून प्रसिद्ध करूं म्हणणारें मन सात्त्विक म्हणणें कठीण पडेल. अमेरिकन कवि वॉल्ट व्हिट्मन् याच्या लेखनांत जो बेफिकीर बेडर गांवढेपणा वाचकांवर आदळतो, तसलाच आघात 'कळ्यांचे निःश्वास' वाचतांना सात्त्विक मनावर होईल, यांत संशय नाहीं. हे निःश्वास सोडणाऱ्या प्रौढ कुमारिकेची भूमिका व्हिट्मन्‌च्या Leaves of Grass' (हा काव्यसंग्रह बोस्टनच्या ब्राह्मणांनीं कोर्टाकडून बंद करविला होता) मधील पहिल्याच पद्यांतील लेखकासारखी भासते. तें पद्य असें :

One's-self I sing, a simple separate person,
Yet utter the word Democratic, the word En–Masse.
Of Physiology from top to toe I sing,
Not Physiognomy alone nor brain alone is worthy for the Muse,
I say, the form complete is worthier far,
The Female equally with the Male I sing.
Of Life immense in passion, pulse, and power,
Cheerful, for freest action, form'd under the laws divine,
The Modern Man I sing.

मात्र या पद्यांतील लेखकाचा खरोखरीच असलेला साधेपणा किंवा अमेरिकन जनतेंत मुरलेला लोकशाही समभाव, दोन हजार वर्षांच्या संस्कारी कर्मठपणांत बुडालेल्या पुण्यांतील ब्राह्मणी संस्कृतींत शक्य नव्हता व त्याप्रमाणें तो निःश्वासांत कोठें दृग्गोचरही होत नाहीं. लेखिकेला आपल्या जीवनांतील उसळणाऱ्या मनःक्षोभांचें, धाडधाड उडणाऱ्या नाड्यांचें, धडधडणाऱ्या हृदयाचें व फुरफुरणाऱ्या रगेल शक्तीचें आविष्करण वेगवेगळ्या प्रौढ कुमारिकांच्या विशिष्ट परिस्थितींतील जीवनांचे बुरखे घेऊन करावयाचें

होतें. तिला अज्ञात, अगम्य, अयोग्य असा विषय कोणताच वाटत नव्हता. तिच्यापुढें पावित्र्यरक्षकाची शृंगापत्ति कधींच उभी ठाकली नसावी. जीवनाचे चट्सारे अनुभव लेखनाचे विषय होण्यास हरकत नाहीं, अशी व्हिट्मन्प्रमाणेंच तिची समजूत असावी. व जीवन हें दणकट शरीर, उफाळणारा आनंद, व अगदीं प्रतिक्षणीं त्या दोहोंच्या संपूर्ण आविष्कारानें ओसंडून जाणाऱ्या धगधगीत जीवनाची लज्जत, यांचें बनलेलें असतें व त्यांत घडणाऱ्या सर्व गोष्टी ईश्वराच्या सृष्टींतीलच भाग असल्यानें त्यांत वावगेपणा कोठेंच शिरत नाहीं, असा तिचा विश्वास असावा. आणि काम हा सृष्टीचा उत्पत्तिकर्ता असल्यानें तेंही ईश्वरी लीलेचें एक आद्य व प्रमुख स्वरूप आहे अशी विचारदृष्ट्या लेखिकेची बालंबाल खात्री अंतःस्फूर्तीनें झालेली असावी. अर्थात् या जीवनाच्या झऱ्याचें वहाणें हा माणसाच्या आयुष्यांतील प्रमुख घडामोडीचा भाग बनावा हें ओघानेंच सिद्ध होतें. पुनः व्हिट्मन्च्या शब्दांत सांगावयाचें तर

Sex contains all, bodies, souls,
Meanings, proofs, purities, delicacies, results, promulgations,
Songs, commands, health, pride, the maternal mystery, the seminal milk,
All hopes, benefactions, bestowals, all the passions, loves, beauties, delights of the earth..

अशा तऱ्हेचा मनांतील भाव असल्याखेरीज 'कळ्यांचे निःश्वास' बाहेर पडलेच नसते, असें वाटतें.

वर सांगितलेलें मत केवळ आमचा तर्क नसून त्याला विभावरी वाङ्मयांतच स्पष्ट आधारही आहेत. त्यांचा गुरु किंवा प्रवर्तक वॉल्ट व्हिट्मन् नसला तर रोमां रोलां असेल. 'हिंदोळ्यावर' या बाईंच्या दुसऱ्या कृतींत त्यांनीं रोमां रोलांच्या कादंबरींतून पुढील सूचक वाक्यें उद्धृत केलेलीं आहेत :

"A vigorous, healthy nature like Annette's must create, perpetually create, create with its whole being, body and spirit. Create or else brood over the creation that is to be. It is a necessity and happiness comes only through satisfying it. Every creative period has its own limited field, and its rising force follows a trajectory that descends again sharply.."

.."War or peace ! That's the game of life. I will have my own share. I challenge God !"

ईश्वराला सुद्धां आव्हान देण्यास निघालेल्या विभावरीबाईंच्या नायिका आहेत. स्वतः ईश्वराच्या सर्जनकार्यांत हाडापिंडाचा भाग घेऊन आपला ठसा सृष्टीवर कायम उठवून

ठेवण्याची अदमनीय इच्छा त्यांच्या नायिकेंत आहे. खरें पाहिलें तर आम्ही वर चर्चिल्याप्रमाणें या जातीचे हिंदी वाङ्मयांत उठणारे सर्वच विचार आमच्या मतें पाश्चात्य संस्कृतींतून केलेली उसनउधारवारी आहे. तिकडील वाङ्मय वाचून इकडील दणकट महत्त्वाकांक्षी मनांना झालेली ती बाधा आहे. 'conquest of happiness' करायला निघालेल्या शिलेदारबाईंचा तो स्वतःच्या मनाचा स्वरूपाविष्कार आहे. त्यांतच त्यांना realisation of self दिसतें. अशी आत्मप्रतीति कोणाला कशांत दिसावी, हा ज्याचा त्याचा प्रश्न आहे. 'हिंदोळ्यावर' वर सांगितलेले झोंके खाल्ल्यानंतर विभावरीबाईंचें स्वप्न विरून गेलें, हें त्यांनींच आपल्या तिसऱ्या कृतींत कबूल केलें आहे. मात्र त्याचें कारण त्यांनीं नायिकेचा वैयक्तिक दुबळेपणा असें दिलें आहे. प्रथम जनाचा किंवा मनाचा कोणताही आडपडदा न मानतां आपलें मन नायिकांच्या रूपानें जगासमोर स्पष्टपणें मांडणाऱ्या विभावरीबाई पुढें रोहिणीचा बुरखा घेऊन 'म्हणून मी बोलणार नाहीं आणि उघडणार नाहीं माझं मन' असें म्हणावयास लागलेल्या दृष्टीस पडतात. प्रथम 'टराविकाच्या पलीकडे जाणाऱ्या, लौकिकाकडे औदासिन्यानें पहाणाऱ्या' वैशाखकडे त्यांचें मन ओढलें, पण अखेर त्यांनीं त्याला 'दुरून 'च नमस्कार करण्याचें ठरविलें. 'आत्मसंरक्षणाची भावना' त्यांच्यांत तीव्रतम असल्यामुळें स्वतःबद्दल 'लाज वाटली, तिरस्कारही आला' तरी त्यांनीं 'आश्चर्यानें, आदरानें आणि प्रेमानें सुद्धां' मागें पहात पहात वैशाखला तसाच स्वतःचें ध्येय गांठण्यास मोकळा सोडून सोडचिठ्ठी दिली. याबद्दल त्यांची त्यांनाच 'चीड आली. ध्येयवादाचा डांगोरा पिटीत असतां पायाखालची जमीन' पोखरली जात आहे, हें कळलें. तरी त्यांनीं 'सुखाचीं स्वप्नें विरण्याचें' भय पत्करून तशी गोष्ट केली खरी. त्यांना अखेरपर्यंत वैशाख इतर सामान्य माणसांपेक्षां कित्ती कित्ती निराळा वाटत होता. पण त्याचा त्याग आपल्या पचनीं पाडून घेण्याचें धैर्य त्यांना झालें नाहीं. आपल्याच मनानें उठविलेलीं प्रेमाचीं 'टोलेजंग मंदिरें–रंगमंदिरें–' स्वतःच्या हातानेंच त्यांनीं मोडून टाकलीं. त्या मंदिरांत त्यांनीं स्थापलेला देव देव नसून माणूस होता, बेफामपणें दौडत चाललेला माणूस होता. त्याचा पाठलाग आपल्या हातून होणें शक्य नाहीं असें त्यांना वाटलें, म्हणून त्यांनीं त्या देवाचें विसर्जन केलें व त्याला मुंबईच्या बॅकबेंत किंवा वरळीच्या खाडींत बुडवून टाकला. व यामुळें अखेर त्यांची वाङ्मयप्रसूति कायमचीच—कीं तात्पुरती?—थांबली.

असा हा एका दणकट फुरफुरणाऱ्या वाङ्मय-शिलेदारबाईंचा जीवनपट झाला! पण तो तसा कां झाला हें त्यांनाही खऱ्या दृष्टीनें कळलें नाहीं, किंवा समाजालाही त्याची मीमांसा करतां आली नाहीं. 'मळलेल्या वाटेनें जाण्यांत आनंद मानणारी साधी स्त्री मी आहें' हें कळून 'टराविकाच्या पलीकडे' जाण्याचा त्यांचा उत्साह कोठल्या कोठें जिरला. याचें खरें कारण ज्या संस्कृतींत त्या वाढलेल्या होत्या ती सदाशिवपेठी

संस्कृतीच त्यांच्या स्वप्नांत आलेल्या पराक्रमाला योग्य भूमी नव्हती. संसार सोडल्या खेरीज मोक्ष मिळत नाहीं हें जितकें अध्यात्मांत खरें, तितकेंच तें, आपण जन्मलेल्या संस्कृतीचा मोह सोडल्याखेरीज नूतन पराक्रम होऊं शकत नाहीं, याबाबतही खरें. तो मोह वर सांगितलेल्या विभावरीबाईंच्या ' वाङ्मय-भगिनी ' कम्युनिस्टबाई यांनीं सोडला. त्यांचें आयुष्य व्यक्तिदृष्ट्या किंवा समाजदृष्ट्या इतरांच्या दृष्टीनें फुकट गेलें असलें, तरी त्यांत त्यांना स्वतःचीं बंधनें तोडण्याचा मोक्ष लाभला, ही गोष्ट खोटी म्हणतां येणार नाहीं. सुखापासून वैराग्य, संपत्तीच्या मोहापासून सुटका व जीं दुःखें आपल्याला बोंचतात तीं दुसऱ्या कोट्यवधि लोकांना आपल्यापेक्षांही तीव्रतेनें पदोपदीं प्रतिदिनीं दुःखी करीत आहेत याची तीव्र जाणीव झाल्यामुळें त्यांच्या हातून तशी कृति घडली. पण याचें एक प्रधान आद्य कारण, त्या वेगळ्या संस्कृतींत वाढलेल्या होत्या हेंच होय. भांडवलशाही संस्कृतींत जन्माला आलेल्या व वाढलेल्या व्यक्तीला तिचें भांडवल अकस्मात् नष्ट झाल्यास तीव्र वैराग्य त्यांतून जन्म पावूं शकतें व त्याला पोषक अशा कांहीं मानसिक गोष्टी घडल्या तर ती व्यक्ति कायमची विरागीही होऊं व राहूं शकते, हें अनुभविक सत्य आहे. रुपये—आणे—पैंचा बारीक हिशेब ठेवणाऱ्या सदाशिवपेठी संस्कृतींत असा त्याग, असें वैराग्य, संभवत नाहीं, हाच या दोन चरित्रांपासून शिकण्याचा धडा आहे.

वैराग्य, त्याग, ध्येयवत्ता, हीं साधलीं तरी जगाचें कल्याण त्यांतून निर्माण होईलच अशी खात्री नाहीं. पराक्रमी, त्यागी माणूस आगींत उडी घेतें व अगदीं आय् ओय् किंवा हूं चूं न करतां जळून जातें. या प्रकारांत एक प्रकारची भव्यता आहे, हें सर्वांनाच कबूल करावें लागेल. केवळ व्यक्तिदृष्ट्या पाहिलें, तर त्या व्यक्तीला दोष ठेवण्यास समाजाला जागाच उरत नाहीं. पण वैयक्तिक दुःखामुळें जन्म पावलेलें वैराग्य आणि दुसऱ्याच्या विचारांतून निर्माण झालेली व स्वतः आप्तवाक्य म्हणून उसनी घेतलेली ध्येयवत्ता हीं मुळांतच कचीं असतात. ज्याचें वाक्य आप्त म्हणून आपण उचलतों तो भावनांनीं आपणाशीं जन्माचा निगडित होण्याचा संभव असला तरच तें वैराग्य व ती ध्येयवत्ता माणसांत कायम टिकतात. विद्यार्थीदशेंत असलेलीं ध्येयें पुढें आयुष्यांत कां टिकत नाहींत, याचें कारण मुख्यतः हेंच आहे. चळवळीच्या ओघांत क्षणभर सर्व सभाजन अगदीं एकमताचे झालेले भासतात, पण अखेर त्यांतून जन्मभर टिकणारी निष्ठा हाताच्या बोटांवर मोजण्याइतक्या माणसांतच कायम होतांना दिसते, याचें तरी कारण हेंच आहे. कांहीं निष्ठावान् माणसें सुहृद्भावानें एका कार्यांत सामील झालीं व त्यांच्यांतील सुहृद्भाव तसाच टिकण्यासारख्या घटना त्यांच्या आयुष्यांत घडून आल्या, तर त्यांचें कार्य पुढें ढकलिलें जातें व त्या कार्याचा ठसा समाजावर उठतो. मग तीं माणसें आपलाच ठसा आपणच जगावर उठविला असें मानतात व त्याचा अभिमानही बाळगतात. खरी स्थिति अशी कीं, तें ठसा उठविणारें ध्येय

महात्माजींसारख्या एखाद्या लोकोत्तर व स्वतंत्र विचार करणाऱ्या माणसाचें असतें व त्यांच्या व्यक्तिमत्तेमुळें तें ध्येय जगांत उतरविण्यास त्यांनीं अनेक सोवती स्वतःच्या गुणानें निर्माण केलेले असतात. समाजांत ध्येयें इतकीं पुष्कळ नाहींत कीं, दरेक व्यक्तीच्या वांट्याला एक स्वतंत्र ध्येय येईल. फक्त वैयक्तिक स्वार्थाचा ठसा दरेक व्यक्तीला जगांतील चलनी नाण्यावर उमटवितां येतो. अचलेप्रमाणें स्वतःची बुद्धि, शक्ति, रूप, भावना, विचार, प्रवृत्ति हीं जगांत कायम टिकविण्यासाठीं, त्यांचा 'हाडामांसाचा गोळा' निर्माण करण्यासाठीं निघालेलीं माणसें उगाच आपल्या मुसमुसणाऱ्या तारुण्याचें व तज्जन्य उचापतींचें समर्थन निष्कारण करूं पहात असतात. त्यापेक्षां आमचे जुनाट बुरसलेल्या विचारांचे समजले जाणारे पूर्वज निश्चितच वरच्या पायरीचे होते. 'लोके व्यवायामिषमद्यसेवा नित्यास्ति जंतोर्नहि तत्र चोदना' हें त्यांना केव्हांच कळून चुकलें होतें. त्या अदमनीय स्वाभाविक प्रवृत्तींचें सफलीकरण त्यांनीं 'प्रजायै गृहमेधिनाम्' पुरुषांचे आदर्श जगापुढें निर्माण करून आणि 'दारानपत्याय, तपोर्थमायुः' असा त्या स्वाभाविक प्रवृत्तीचा संबंध आयुष्याशीं मेळ घालून केलें होतें. त्यासाठीं आम्हाला वॉल्ट व्हिट्मन् किंवा रोमां रोलां कशाला पाहिजे आहे? या सृष्टीच्या संतति टिकविण्याच्या कार्याचें महत्त्व आमच्या पूर्वजांनीं, पितरांना पाणी देणारी संतति नसेल तर त्या व्यक्तीला मोक्षही मिळणार नाहीं, असें सामाजिक बंधन निर्माण करून ठांसून सांगितलें आहे. ध्येयांच्या संबंधानें पहातां असें दिसून येतें कीं, ध्येयें फक्त अशा स्वाभाविक प्रवृत्तींचें दमन करून त्यांचें सामाजिक उदात्तीकरण करणाऱ्या व्यक्तींनाच जगांत प्रचलित करतां येतात; व अशा व्यक्ती गांधींच्या कोटींतील असतात. कारण त्यांना ठाऊक असतें कीं, स्वतःच्या हाडामांसाचा ठसा उठविलेलीं आपलींच अपत्यें हीं स्वतःसारखीं होणें तर दूरच राहो, पण बहुधा हिरालाल गांधींसारखीं मूर्खच निपजण्याचा फार मोठा संभव असतो. तेव्हां अशा त्या सोप्या ठशांचा विचार न करतां आपल्या विचारांचा ठसा उमटविण्याचा प्रयत्न करणें यांतच खरें पौरुष—किंवा स्त्रीत्व—सांठविलेलें आहे.

वैराग्याचा व त्यागाचा उमाळा उत्पन्न झालेलें माणूस—विभावरीबाईच्या रोहिणी-प्रमाणें क्षणिक बुडबुडा निर्माण झालेलें नव्हे—आपल्या आंतल्या आगीमुळें 'विस्तवाशीं खेळ' खेळून, 'आगलावी' असें समाजाकडून व गुरुजनांकडूनही म्हणवून घेऊन आपला मार्ग जगाच्या मताची तिळमात्र परवा न ठेवतां अखेरपर्यंत आचरीत रहातें. तें आपल्या मुलाचा ठसा जगावर उठविणारा हास्यास्पद अभिमानही धरीत नाहीं वा आपल्या सुखलोलुप मनाचें रोहिणीप्रमाणें समर्थनही करूं शकत नाहीं. त्याला माहीत असतें कीं, 'जो लोककल्याण साधावया जाण, घेई करीं प्राण, त्या सौख्य कैचें! बहु कष्ट जीवास, अपमान, उपहास, कारागृहीं वास हे भोग त्याचे॥.' आपल्या आयुष्यानें आपलें ध्येय आपण प्रतिपदीं जगावर उठवीत आहोंत असा आत्मविश्वास मात्र त्यांना

असतो. अर्थात् अशाही महनीय व्यक्तींकडून जगाचें खरें हित होतेंच असें नाहीं. जर त्यांनीं स्वीकारलेलें ध्येय ज्ञानाच्या पक्क्या पायावर उभारलेलें नसेल, तर त्या ध्येयाचा बरावाईट ठसा जगावर उठविण्यांत त्यांना वैयक्तिक यश आलेलें दिसलें, तरी खरें लोककल्याण साधणारें ठरणार नाहीं. पण जग हें अशा अपूर्ण मानवांचेंच ईश्वरानें बनविलेलें आहे. त्यांच्याकडूनच चुकत टेंचाळत पुढें मार्ग निघण्याची आशा असते, आपला वैयक्तिक ठसा उठवूं म्हणणाऱ्या उठवळ लोकांकडून नसते.

या वैयक्तिक जगाची कल्पना सदाशिवपेठी संस्कृतींतच उगम पावते. स्वयंकेंद्रित, स्वार्थी, दुरभिमानी, माणसांचीच ती कल्पना असते. व्यक्तींची बौद्धिक उंची या जगांत, सर्व शक्ति व्यक्तीवरच केंद्रित केल्यामुळें, बरीच वाढूं शकेल. पण तिचें प्रवर्तक कारण स्वार्थ हेंच असल्यामुळें तिचें क्षेत्र आपोआपच संकुचित होत जाईल. साहित्यसम्राट केळकरांच्याप्रमाणें 'सुखाच्या संसाराची' आत्मतुष्टि त्यांतून निर्माण होणें पूर्ण शक्य आहे. पण त्या आत्मतुष्टीचा ठसा फक्त तशा स्वयंकेंद्रित, स्वार्थी जातीच्या माणसांवर उमटूं शकेल व अशांचीच सदाशिवपेठी संस्कृति बनलेली असते. स्वतःशीं स्वार्थानें निगडित झालेले लोकच तींत समाविष्ट होऊं शकतात आणि साहजिकच त्यांची संख्या एका झाडाच्या फळांवर जगूं शकणाऱ्या पाखरांइतकी भरते. सबंध सृष्टींत वावरणाऱ्या जीवसृष्टीचा तींत समावेश होऊं शकणार नाहीं. विभावरीबाईंच्या नायिकांचें, सदाशिव पेठेंतील-किंवा फार तर नारायण पेठेंतील—मास्तरिणी नायिकांचें जग केवढेंसें मोठें असणार? याची जाणीव खुद्द लेखिकेलाही आहे, हें तिच्या लेखनांत दृग्गोचर होतें. पण त्यांतून बाहेर भरारी मारण्याची ध्येयवत्ता त्या संस्कृतींतच नाहीं, त्याला बाई तरी काय करणार? 'यस्मिन्कुले त्वमुत्पन्नः गजस्तत्र न हन्यते' असेंच येथें म्हणावें लागेल.

पण त्या संकुचित जगांत खळबळ उडविण्याचें, त्या साहित्यिकांच्या बालिश समाजाला आपल्या पाठीमागें कांहीं काळ उनाड पोरांप्रमाणें धावडवण्याचें यश बाईंनीं संपादन केलें होतें, ही गोष्ट कांहीं खोटी नाहीं. साहित्य संमेलनांचे, साहित्यपरिषदेचे अध्यक्ष झालेले महाभागही या धावण्यांत मागें नव्हते. लोंढ्यांतून तेही वहातच गेले असें दिसतें. पुढें छापलेलें या लोंढ्याचें वर्णन पाहिलें म्हणजे आतां कोणासही हसूं येईल. काय हा सारा स्त्रीदाक्षिण्याचा परिणाम होता, कीं त्याकडे फ्रॉईडच्या सुशींतून पहाणें योग्य ठरेल, कीं हा सर्व दारुड्यांचा पागलपणा म्हणावा, कळत नाहीं. कीं धंदेवाईक तमासगिरांनीं सुरू केलेली ही हुल्लड होती? प्रो. वामन मल्हार जोशी यांना विभावरीच्या 'पुस्तकांतून निघणारा ध्वनि पसंत नसला' तरी ते त्यांच्या चर्चेंत वेळ मोडून सामील झालेच. त्यांना त्यांच्या नेहमींच्या वृत्तीप्रमाणें 'घामाघूम होण्याबद्दल जें वाक्य आहे तें अश्लीलतेच्या जवळ जातें कीं काय' अशी शंका सुद्धां निर्माण झाली होती. पण तिचीही त्यांनीं सोयीस्कर निवृत्ति करून घेतलेली आढळते. तात्यासाहेब केळकरांना विभावरी-वाङ्मयाबाबत आपलें अन्यांशीं 'तंतोतंत मतैक्य आहे' असें

जाहीर सभेंत सांगावेंसें वाटलें. त्यांना ‘ पुस्तकाची लेखिका महाराष्ट्र वाङ्मयांत अत्यंत उच्च दर्जाची वाटली व तिच्या वाङ्मयकृतीबद्दल तिचें सार्वत्रिक अभिनंदन होणें जरूर आहे ’ ही गोष्टही पटली. एवंच सर्व साहित्यिकांच्या मतें विभावरीच्या कृती मराठी वाङ्मयाला भूषणभूत ठरल्या. त्यांच्या साहित्यिक मतांबद्दल आम्हाला कांहींही म्हणावयाचें नाहीं, तर त्या कृती समाजाला हितकारक ठरल्या किंवा काय हेंच बघण्याचा आमचा मानस आहे.

तीस वर्षांपूर्वीं महाराष्ट्रांत तीन निष्ठा सुरू झाल्या. त्यांतील एक टिळकपक्षाची, म्हणजेच पुणेरी पक्षाची--व हिचेंच पुढें सदाशिवपेठी संस्कृतींत संपूर्ण रूपांतर झालेलें आढळतें—महाराष्ट्रांत अधिकाररूढ झालेली जुनी निष्ठा आद्य होती. तिला मराठ्यांच्या इतिहासाचा आधार होता, आधुनिक सुशिक्षितांचा पाठिंबा होता व पराक्रमी माणसांनीं ती दोन पिढ्या घण मारून पक्की बनली होती. पण लोकमान्य मंडालेहून सहा वर्षांच्या गैरहजेरीनंतर परत आले व आपल्या मागें कशी काय हालहवाल आहे तें पाहूं लागले, तेव्हां त्यांना कळून चुकलें कीं, आपल्या शिष्यवरांनीं राजकीय बाबतींत पुढें काडीचेंही काम केलें नव्हतें. नाटकें लिहून, पोवाडे गावून, शाहिरी फड घडवून, साहित्याचेच आखाडे उघडण्यांत त्यांनीं आपल्या उपकरणांचा दुरुपयोग केला होता. राजकीय दृष्ट्या सर्वत्र सामसूम झालें होतें. १९०७ सालीं काँग्रेसचा ताबा ज्यांनीं जवळ जवळ घेतला होता, त्यांना आतां त्या काँग्रेसच्या प्रवेशद्वाराजवळही जातां येत नव्हतें. मॉर्लेमिंटो सुधारणांच्या रूपानें विभक्तमतदारसंघ अंमलांत येऊन पाकिस्तानचा पाया घातला गेला होता. ही गोष्ट टिळकांना अपेक्षित नव्हती. पुनः मुळापासून काम करण्याचा प्रसंग त्यांच्यावर ओढवला. पण परिस्थिति मात्र मूळचीच राहिलेली नव्हती. महायुद्ध सुरू झालेलें होतें. कायद्याचा जाच जास्तच तीव्र झाला होता. त्यामुळें नवा पवित्रा टाकणें त्यांना भाग होतें. तो त्यांनीं जर्मनीविरुद्ध इंग्रजांना मदत करणें योग्य आहे असें म्हणून व कसाबसा काँग्रेसमध्यें प्रवेश मिळवून टाकला. नंतर आपलें बहुमत लखनौ काँग्रेसमध्यें करून नवीन हक्कांच्या लढ्यासाठीं हिंदु-मुसलमान एकीचा बनाव घडवून आणला. अर्थात् याकरतां त्यांना मवाळ व मुसलमान या दोघांनाही चुचकारून स्वयार्ध मयार्ध करावें लागलें. १९०८ सालीं मनांत असलेल्या जातीचें एकरूप स्वराज्य आतां मागें पडून बहुरूपी संयुक्त स्वराज्य पुढें आलें होतें. ही आपत्ति लोकमान्यांच्या शिष्यांनीं त्यांच्या गैरहजेरींत जो अंगचुकारपणा केला होता त्यामुळें ओढवली होती. त्यांतच या वेळीं दुसरीच एक नवीन व्यक्ति—आणि ही व्यक्ति स्वतःची स्वतंत्र नवीन निष्ठा निर्माण करण्याएवढी मोठी होती—हिंदुस्थानच्या राजकारणांत पुढें आली. पहिलीं दोन वर्षें सर्व राजकारणाचा, समाजकारणाचा व अर्थकारणाचा कानोसा घेऊन तिनें स्वतःचा मार्ग सुरू केला. चंपारण्याच्या लढ्यापासून ही निष्ठा हिंदुस्थानवासियांपुढें ठेविली गेली व तिजकडे कांहीं स्वतंत्र विचार करणारे तरुण आकर्षिलेही जाऊं लागले. आघाडीच्या

तरुणांना या वेळीं लोकमान्य मवाळ वाटूं लागले होते. नेमस्तांच्या सनदशीर मार्गावरच त्यांनीं पाऊल टाकलेलें दिसत होतें. अर्थात् त्या मार्गानें स्वराज्य मिळेल असें ज्यांना वाटत नव्हतें, व हिंसेचा मार्ग सुद्धां शक्य आहे अशी ज्यांची खात्री नव्हती, त्यांना गांधींचा तद्दन नवा मार्ग साहजिकच आकर्षक वाटला. तत्त्वज्ञानाचे विद्यार्थी माझे स्नेही श्री. आप्पा पटवर्धन 'गीतारहस्या'चें आलोडन करूनही याच वेळीं लोकमान्यांचा महाराष्ट्र पंथ सोडून, प्रोफेसरी टाकून तडक साबरमतीच्या आश्रमांत गेले. अशा रीतीनें लोकमान्यांच्या हयातींतच त्यांच्या निष्ठेला आंतूनच घुणा लागत होता. ज्यांची श्रद्धा, हिंसेशिवाय स्वराज्य कधींच मिळत नसतें, अशी होती, ते मात्र या नव्या निष्ठेंत सामील होऊं शकले नाहींत. पण त्यांच्यापुढें लवकरच एक नवीन निष्ठा रशियाच्या मार्गें आली व तिनें लवकरच महाराष्ट्रांत चांगलेंच मूळ धरलें. या तीन निष्ठांच्या संघर्षांच्या फेऱ्यांत तरुण महाराष्ट्र सांपडला. या तीनीही निष्ठांचीं रूपें मराठी वाङ्मयांत उमटलीं आहेत. आम्हीं वर ज्या तीन वाढाळू महाराष्ट्रकन्यकांचा उल्लेख केला आहे, त्यांच्यांत हीं तीन रूपें प्रकट झालेलीं दृष्टीस पडतात. पुरुषांपेक्षां स्त्रियांत तीव्रपणा नेहमींच जास्त असतो; व एखाद्या समाजांतील स्त्रियांत जी निष्ठा रुजली, ती कायमची वाढीस लागली असें खुशाल समजावें. टिळकांच्या महाराष्ट्रपंथापेक्षां या गोष्टीची जाणीव साम्यवाद्यांना व गांधीपंथाला जास्त होती. म्हणून त्यांनीं स्त्रियांचें समानत्व प्रथमच घोषित करून त्यांना आपल्या कार्यांत ओढण्याचा उपक्रम केला. लोकमान्यांच्या पंथांत तसा तो प्रामुख्यानें केला गेलेला नसल्यामुळें त्या संस्कृतींत ज्या बुद्धिमान् मुली जन्माला आल्या, त्यांची कालानुरूप योग्य वाढ होण्यासारखी परिस्थिति त्या संस्कृतींत नव्हती. अशांतीलच एक विभावरीबाई समजल्या पाहिजेत. ज्या गोष्टींना आपोआप सहज वाव मिळत नाहीं त्या गोष्टी मनांतच विकृति निर्माण करतात. या विकृतींच्या अडचणींचें आविष्करणच प्रामुख्यानें 'कळ्यांचे निःश्वास' व 'हिंदोळ्यावर' या बाईंच्या कृतींत आहे. बाई बुद्धिमती असल्यामुळें त्यांना आपली ही परिस्थिति लक्षांत न येणें अशक्य होतें. त्यांनीं बाहेरच्या जगाचा कानोसा घेऊन त्यांतही काय चाललें आहे, त्या जगांत आपणाला वाव आहे कीं नाहीं, हें पाहण्याचा प्रयत्न केला. त्यांत त्यांचा साहजिकच साम्यवादी गटाशीं संबंध आला. त्या निष्ठेचें आकर्षणही त्यांना खूपच वाटलें. पण बाकीच्या सर्वांनाच निरुपयोगी समजणारा, शिव्या देणारा व वैरी समजणारा पंथ, सेवासदनाच्या, अनाथ बालिकाश्रमाच्या व एरंडवणें युनिव्हर्सिटीच्या विहिरींतच पोहायला शिकलेल्या बाईंना झेंपण्यासारखा नव्हता. कम्यूनिस्टांचा पंथ म्हणजे परतीर दिसत नसलेल्या समुद्रांतून पलीकडे जाण्याचा पंथ. एवढी विशाल दूरदृष्टि सदाशिव पेठेंत वाढलेल्या बंदिस्त घरांतल्या बाईला कोठून येणार ? त्यांतही मालवीय व केळकर राहोत, पण गांधींना सुद्धां न मानणाऱ्या लोकांशीं त्याचा संबंध आल्यावर त्या भांबावून गेल्या व त्यांनीं 'तुझीं मतें मला कळत नाहींत. तुझ्या-माझ्यांत सगळाच विरोध आहे' असें म्हणून

स्वप्नांत आलेल्या आपल्या लाडक्या वैशाखचा रोहिणीकडून निरोप घेवविला. यानंतर त्यांची वस्तुतः दुसऱ्या एका निष्ठेकडे नजर वळावयास पाहिजे होती. पण तशी ती वळली नाहीं याबद्दल आश्चर्य मानावयास नको. कारण सदाशिवपेठी संस्कृतींतील गाजलेल्या[1] शहाण्यांची जेथें तशी वळली नाहीं, तेथें विभावरीबाईंना दोष देण्यांत काय मतलब? ही निष्ठा गांधीवादाची होय. विभावरीबाईप्रमाणेंच वैयक्तिक प्रश्न पुढें आलेल्या, दृष्टीपुढें सर्व अंधार दिसूं लागलेल्या दुसऱ्या एका महाराष्ट्रकन्यकेनें, योगायोगामुळें कां होईना, पण गांधीवादाकडे दृष्टि वळविली व त्या पंथाची निष्ठा तावून सुलाखून पाहण्यासाठींच आश्रमांतच प्रवेश केला. त्यांच्याहीपुढें वर सांगितलेल्या तीन निष्ठांचा संघर्ष होता. त्या तीनही निष्ठांबद्दल त्यांना थोडेंथोडें आकर्षणही निर्माण झालेलें त्यांच्या लिखाणांत दिसतें. 'काम आणि कामिनी' या आपल्या कादंबरींत त्यांनींही आपल्या समोरून गेलेल्या, क्षणभर मोह पडलेल्या हृदयांचा इतिहास दिलेला आहे. "त्यांतून त्यांचा 'Abnormal' नायक त्यांनीं बाहेर काढला आहे. "आजकाल आदर्शवादाची टर उडविण्यांत येतें व वास्तववादाचा जोरानें पुरस्कार करण्यांत येतो. माझ्या अल्पमतीला वाटतें कीं, वास्तववाद म्हणजे समाजांतील घाण उपसून उघड्यावर टाकणें नव्हे. दोषी व दुष्ट समाजावरही प्रेम केलें पाहिजे व त्याच्या विचारसरणींतील त्रुटि दूर करण्याचा प्रयत्न करीत असतांना तेथें आदर्शवादाची प्रतिष्ठापना करण्यासाठीं मेहनत घेतली पाहिजे. नाहींतर शीड नसलेलें तारूं कोठेंतरी भटकतें तशी समाजाची स्थिति होईल."

प्रेमाबाईंच्या या निवेदनावरून विभावरीबाईंसमोर आलेले प्रश्न व त्यांच्या समोर आलेले प्रश्न एकाच जातीचे होते हें स्पष्ट दिसतें. दोषी व दुष्ट समाजावरही प्रेम केलें पाहिजे याबाबत दोघींचेंही एकमत आहे. पण विभावरीबाई आदर्श ठरवीत नाहींत. आपल्या वास्तववादी लिखाणाचा दुरुपयोग वासना चेतविण्याकडेच करतांना आढळतात व विचारसरणींतील दोष दूर करून आदर्शवादाची प्रतिष्ठापना करण्यासाठीं आपल्या नायिकांकडून मेहनत घेववीत नाहींत. त्यामुळेंच सदाशिवपेठी संस्कृतीची स्थिति शीड नसलेल्या तारवाप्रमाणें कोठेंतरी भटकणारी झाली आहे. तिला तिच्या हिंसक निष्ठे-

---

१ **टीप** : या शहरांतील शहाणे 'Submit to no models but your own, O city! असें व्हिटमनप्रमाणें म्हणत असतात. 'We are Thin, we are pale, we are sharp' असें हेन्री जेम्सप्रमाणें तेही स्वतःला समजतात. बोस्टनच्या New England–Watch and Ward Society प्रमाणें अश्लील बंद करणारें एक संस्कृतिसंरक्षकमंडळही येथें आहे. 'Boston State house is the hub of the solar system' असें ऑलीवर वेंडेल होम्सप्रमाणें गायकवाडवाड्याबद्दल येथील लोक गृहीत धरून चालतात. 'Only Bostonians can understand Bostonians and thoroughly sympathize with the inconsequences of the Boston mind' असें हेन्री आडाम्सप्रमाणें सदाशिवपेठी लोकांबद्दलही म्हणण्यास हरकत नाहीं.

प्रमाणें स्वराज्य मिळविणें साधलें नाहीं. इतरांच्या अहिंसक प्रयत्नांत भाग घेतां आला नाहीं व आतां महात्माजींचा खून किंवा संघाचा सत्याग्रह अशा विकृतींत तिचा आत्मा धुमसतांना दिसत आहे. तामसीपणाची एवढी झांपड तिच्या डोळ्यावर आली आहे कीं, आपल्या कृत्यांची तिला चांगली याद राहण्यासारखी झळ लागली, तरी तिची दृष्टि निवळलेली दिसत नाहीं. तिच्यांतील दोन वर्षांपूर्वी 'सत्तासंक्रमण' करण्याच्या लंब्याचवड्या बाता सांगणाऱ्या व्यक्ती आतां हातपाय मोडून घेऊन स्वस्थ बसल्या आहेत. अशी त्यांची स्थिति होण्याचें कारण, त्या संस्कृतींत झालेला एका पिढीचा अपप्रचार होय. खोटा इतिहास, खोटा अभिमान, बरेंवाईट अल्पस्वल्प तरी काम करण्याऐवजीं दुसऱ्यांच्या चुका दाखविण्यांत, खोड्या काढण्यांत व हुरेंवडी उडविण्यांतच ज्यांनीं काळ घालविला, त्यांच्या हातांत सत्ता कोठून येईल ? ती कासवाप्रमाणें हळूहळू व नम्रतेनें मार्ग आक्रमिणाऱ्या धिम्या वृत्तीच्या कष्टाळू माणसांच्याच हातांत जाणार, हें विधिलिखित ठरलेलेंच होतें. समाजाच्या प्राथमिक गरजांकडे दुर्लक्ष करून साहित्यिक फवारे उडविण्यांतच ज्यांनीं आयुष्यभर कृतकृत्यता मानली, त्यांच्या साहित्याचे बाराच काय, पंधरा खंडही प्रसिद्ध होतील. आपल्या संसाराचा हिशेब अगदीं पैन् पै चोख ठेवून शिल्लक दाखविण्याचा पराक्रमही त्यांच्याकडून होउ शकेल. आपलीं वैयक्तिक तीन ऋणें फेडल्याचें समाधानही त्यांना लाधेल. पण समाजाचा इतिहास घडविण्याचें, जगाच्या इतिहासाचीं पानें लिहिण्याचें, श्रेय त्यांच्या पदरीं कसें पडेल ?

सर्व गोष्टी झाल्यागेल्यानंतर आतां इतिहासदृष्ट्या सिंहावलोकन करूं लागलें, म्हणजे असें दिसतें कीं, जगांतील त्रिविधतेचा आविष्कार वर चर्चिलेल्या तीन निष्ठांत झालेला आहे. याचा अर्थ त्या अगदीं अलग, एकमेकींशीं कांहींच संबंध नसलेल्या अशा निष्ठा आहेत असें नव्हे. जग हें त्रिविध आहे व त्यांतील सत्त्व, रज, तम हीं सरमिसळच पसरलेलीं असतात. तुलतेनें पाहातां, महात्माजींची निष्ठा ही सात्त्विक, साम्यवादाची निष्ठा ही राजसी व सदाशिवपेठी निष्ठा ही तामसी, असें म्हणावें लागेल. सात्त्विकता ही मी–तूं च्या व्यवहारांत कधींच राहूं शकत नाहीं. तिचें कोंदण अखिल विश्वाएवढें सबंध मानवता पुरून उरण्याइतकें विशाल असावें लागतें. या विशाल दृष्टीखेरीज सात्त्विकता नाहीं व अशा सात्त्विकतेखेरीज अखिल मानवाचे प्रश्न योग्य दृष्टीनें सुटूं शकणार नाहींत. एका जातीचा फायदा तो दुसरीचा तोटा, एका राष्ट्राचा फायदा तो दुसऱ्याचा तोटा, एकाच्या संस्कृतीचा विकास म्हणजे दुसऱ्या संस्कृतीचा संकोच, अशी व्यवस्था ही सुव्यवस्था, कायम व्यवस्था कधींच ठरूं शकणार नाहीं. म्हणूनच महात्माजींची शुद्ध राष्ट्रवादापलीकडे जाणारी व अखिल मानवहिताचा विचार सतत दृष्टीसमोर ठेवणारी निष्ठा, हीच सात्त्विक होय यांत संशय नाहीं. पण ध्येयदृष्ट्या ती परिपूर्ण असली, तरी तिच्या आचरणाच्या वाटेंत खाचखळगे, कांटेकुटे, अडचणींचे डोंगर व प्रलयाचे महासागरही आहेत, हें विसरतां येणार नाहीं. साम्यवाद्यांची निष्ठा हीं मुळांतच जगांतील

सर्व कामकऱ्यांना व शेतकऱ्यांना, म्हणजेच निढळाचा घाम काढून राहूं म्हणणाऱ्यांना, आवाहन करून दिग्विजयाला निघालेली आहे. अर्थात् तेवढ्यापुरती ती गांधीनिष्ठेची बहिणच आहे. पण ती आपल्या बाहेरच्या इतरांना वैरी समजते. या तिच्या दृष्टींत सात्त्विकता नाहीं. वैऱ्यांवरही प्रेम करावयास सांगणाऱ्या गांधीनिष्ठेंत ती आहे. हाच या दोन निष्ठांतील महत्त्वाचा फरक आहे व म्हणूनच आम्ही तिला राजसी म्हटलें आहे. या दोनीही निष्ठा वेगळ्या मार्गानें कां होईना, सर्व जगाचें नियंत्रण करूं असें म्हणून बाहेर पडल्या आहेत व त्यामुळें त्या चर आहेत. पण आमची तिसरी निष्ठा तर डोळ्यांसमोर सर्व अंधारच असल्यामुळें निश्चल, स्थिर, आपल्या वाड्यांतच उभी आहे. आपल्याच बुद्धीच्या भोंवऱ्यांत ती सांपडली असल्यामुळें बाहेर निघण्याचा मार्ग तिला दिसत नाहीं. बाहेरचें जग पुढें जातांना दिसत असलें, तरी त्याचें अनुकरण करणें बुद्धीच्या घमेंडीमुळें तिला अपमानाचें वाटतें. यावर उपाय तिनें आपल्या नजरेवर आलेली विभावरी (म्हणजेच तमस्विनी ऊर्फ तामसी वृत्तीची रात्र) दूर सारली पाहिजे हाच आहे. आपणाला मागें खरें वाटत असलेलें 'स्वप्न विरलेलें' आहे हें समजून, पुनश्च उगाच 'हिंदोळ्यावर' मनाच्या अनिश्चिततेचे झोंके खात न बसतां, व झाल्या गेल्या चुकीच्या गोष्टींबद्दल 'निःश्वास' सोडीत बसण्याचें तहकूब करून, 'तमसो मा ज्योतिर्गमय' हा मंत्र जपीत, उघड्या जगांत येणें, हाच एक मार्ग सदाशिवपेठी संस्कृतींतील लोकांना उरलेला आहे. मॅथ्यू अर्नोल्ड या इंग्रज शिक्षक टीकाकारानें या जातीच्या लोकांना Philistines असें संबोधून त्यांच्यांत खऱ्या सांस्कृतिक गुणांचा अभाव असल्यामुळें अराजक कसें माजतें हें आपल्या 'Culture and Anarchy' या पुस्तकांत मागेंच सांगितलें आहे. अशाच तऱ्हेचें अराजक सध्यां महाराष्ट्रांत माजलें आहे. कोणत्याच गोष्टींत कांहीं चांगलें न पहातां इतरांच्या चांगल्या कार्यावरही टीका करणें, त्याविरुद्ध फूत्कार सोडणें, हे प्रकार आज रूढ आहेत. जो समाज विभावरीच्या वावटळींत वस्त्राचेंही भान न राखतां तिच्या मागें पळत गेला, त्यानेंच 'प्रसाददीक्षें'त आलेल्या महात्माजींच्या पत्रांची आपल्या हीन टीकेनें काय गत केली होती हें मनांत आणलें, म्हणजे त्याला समाजाच्या मूलभूत प्रश्नांचा विचार करण्याची पात्रताच राहिली नाहीं, असें म्हणावेंसें वाटतें. 'कळ्यांच्या निःश्वासां'वर 'प्रसाददीक्षे'चा वात्सल्यपूर्ण तोडगा होता. पण तो करून घेण्याच्या मनःस्थितींत सदाशिवपेठी समाज नव्हता. तो तोडगा लागू पडता तर गेल्या दहा वर्षांतील मराठी वाङ्मय वेगळ्याच मार्गावर चालू झालेलें दृष्टीस पडतें. विभावरीचा मार्ग त्याज्य समजून जिनें अशी दीक्षा घेतली, त्या प्रेमाबाईचें पुढील लिखाण सर्व समाजाचे प्रश्न सोडविण्याच्या रुळांवर कसें चालू झालें लाहे, हें नुकत्याच प्रसिद्ध झालेल्या त्यांच्या 'भ्रांत जीवन' या छोट्या पुस्तकांतील लघुनाटिकांवरूनही निदर्शनास येतें. पण महाराष्ट्र समाजांतील आजच्या सुशिक्षित विभावरी अजून त्या 'भ्रांत' जीवनांतच गढून गेल्या आहेत, उपनगर संस्कृतींतील प्लॉट, बंगला, कार,

रेडिओ, सोफा, इलेक्ट्रिक चूल व अखेरीस स्वतःच्या हाडामासांचा ठसा उमटलेलें मूल, यांच्यांतच हा वर्ग अजून दंग झालेला दिसतो. भोंवतालच्या जगांत आपल्याच लोकांचे खून पडले, जाळपोळ झाली, लूटमार फैलावली, तरीही हा वर्ग जागा होतांना दिसत नाहीं. तेव्हां अखेर आम्हाला रामदासांच्या ब्राह्मणांवरील उद्गारांची आठवण होते :

"हें ब्राह्मणास कळेना । त्याची वृत्तिच वळेना ।
मिथ्या अभिमान गळेना । मूर्खपणाचा ॥
राज्य नेलें म्लेंच्छीं क्षेत्रीं । गुरुत्व गेलें कुपात्रीं ।
आपण अरत्रीं ना परत्रीं । कांहींच नाहीं ॥
आतांचे ब्राह्मणीं काय केलें । अन्न मिळेना ऐसें जालें :
तुम्हां बहुतांचे प्रचितीस आलें । किंवा नाहीं ॥

असा प्रश्न रामदास विचारतात. तसाच आम्हास विचारावासा वाटतो.

हें सर्व अप्रिय लेखन या पुस्तकाच्या प्रवर्तकांनीं मजकडून बळेंबळेंच करवून घेऊन महाराष्ट्रवाचकांस सादर करण्याचें योजिलें आहे. हें सर्व अतिशय दुःखित मनानें केलें आहे असें सांगितलें, तरी शय्येवर पडलेल्या माणसालाही लाथ घालतांना महाराष्ट्रसाहित्यिक मागें सरत नाहींत, असा जुना अनुभव आहे. तरीही आम्ही रामदासांचेंच अनुकरण करून लिहितों :

"आम्हीही तेच ब्राह्मण : दुःखें बोलिलें वचन ।
वडिल गेले ग्रामणी करून । आम्हां भोंवतें ॥
बरें वडिलांस काय म्हणावें । ब्राह्मणांचें अदृष्ट जाणावें ।
प्रसंगें बोलिलें स्वभावें । क्षमा केलें पाहिजे ॥

मकरसंक्रात १९४९

# महाराष्ट्राच्या मानगुटीचा समंध

महाराष्ट्राला एक जबरदस्त भूत—फार मोठा समंध—बाधत आहे. त्याचें नांव इतिहास.

इतिहास माणसाला शहाणा करतो असें बेकन समजत होता. पण आज इतिहास माणसाला पागल बनवितांना दिसत आहे. जगांतील अनेक आपत्ति आणि अनर्थ इतिहासापासून निर्माण होतांना दिसत आहेत.

यहुद्यांना इतिहास नसता तर त्यांची विटंबना—शतकानुशतकें होत असलेला त्यांचा छळ—थांबली असती. हिटलरच्या उदयाचें एक कारण मुळांतच खुडलें गेलें असतें.

पोलंड, झेकोस्लोव्हाकिया, फिनलंड...ही सगळी अनर्थपरंपरा इतिहासामुळेंच उद्‌भवली आहे.

सर्व जगाचा, सर्व राष्ट्रांचा, सर्व लोकांचा इतिहास एकसमयावच्छेदेंकरून भस्मसात् होईल तर जगांतील अनेक आपत्ति मुळांतच नष्ट होतील. युद्धाचीं आद्यकारणें दबून जातील, समाजसुधारकांचा मार्ग, विश्वकुटुंबवाद्यांचा मार्ग, नवयुग सुरू करूं पाहणारांचा मार्ग निष्कंटक खुला होईल. महाराष्ट्राला इतिहास नसता तर गांधींविरुद्ध जी अढी महाराष्ट्रांत दिसली—दिसते—ती मुळांतच धरली नसती. त्यांच्याविरुद्ध जी धुळवड उडाली तशी ती उडूं शकली नसती.

पण कोणीच इतिहास जाळण्यास तयार नाहीं! आणि एकाच राष्ट्रानें तो जाळून त्याचा उपयोगहि नाहीं. निःशस्त्रीकरण हें जसें एका राष्ट्राचें ध्येय होऊं शकणार नाहीं, अहिंसा ही जशी एकाच व्यक्तीनें आचरणांत आणण्यासारखीच नाहीं, तसेंच येथेंहि समजावें.

इतिहास जाळण्यास, दडपण्यास, विकृत करण्यास कोणी तयार नाहीं हें सुद्धां खरें नाहीं. अनेक हुशार डोकेबाज माणसें खरा इतिहास शक्य तेथें जाळून टाकण्यांत—निदान दडपण्यांत, किमान विकृत करण्यांत—गुंतलेलीं-गढलेलीं आहेत. उलटपक्षीं इतिहास बनविण्याचे—आपल्या खोलींत बसून गुपचुप मनासारखा बनविण्याचे—कारखाने आज सुरू आहेत. असे कारखाने सुरू आहेत तोंवर नवयुगाची आशा करणें वेडेपणाचें ठरेल.

मनासारखा इतिहास बनविणारांचे आज अनेक मोठमोठे अड्डे आहेत व ते सर्व जगभर विस्तृत पसरलेले आहेत. आज सर्वच नवीन प्रयोग सोव्हिएट रशियांत प्रचंड

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थ. १८९३.
अनुक्रम २६१२९ वि: ११९६
क्रमांक ११०५३ नों: दि: ३१२६७



प्रमाणावर चालतांना दिसतात; इतिहास तयार करण्याचा प्रचंड कारखानाहि मार्क्स-वाद्यांचाच आहे. सर्व जगाच्या इतिहासाचें सार कोळून एका घोटांत पिऊनच कम्युनिस्ट तयार होत असतो.

श्वेतेतरांना रानटी ठरविण्याचे कारखाने यूरोप-अमेरिकांत पुष्कळच आहेत. कोणत्या तरी दुसऱ्या राष्ट्राला कमी ठरविण्याचे कारखाने प्रत्येक देशांत जारी आहेत. ख्रिस्ती, इस्लामी किंवा हिंदु संस्कृतींचें श्रेष्ठत्व सिद्ध करणारे कारखानेहि बहुतच आहेत.

पण हा फार दूरचा विचार झाला. आज आपल्या महाराष्ट्रांत मराठ्यांचें श्रेष्ठत्व इतिहासानें सिद्ध करूं पाहणाऱ्यांचे अविश्रान्त अविरत प्रयत्न सुरू आहेत.

पण त्यांत थोडा वांधा आहे. म्हणतांना मराठ्यांचा इतिहास म्हटलें तरी कोणी त्याचा अर्थ मराठे क्षत्रियांचा इतिहास असें समजतात; कोणी कुणब्यांनाहि त्यांत गोवतात; कोणी ब्राह्मणांचा, पेशव्यांचा इतिहास म्हणजेच मराठ्यांचा इतिहास असें समजतात; कोणी कायस्थ प्रभूंची कर्तबगारी म्हणजे मराठयांचा इतिहास मानतात; दुसरे कोणी चित्पावन हेच खरे मराठयांचे एकमेव प्रतिनिधि असें गृहीत धरतात तर अन्ये अन्ये सारस्वत, कऱ्हाडे, ऋग्वेदी वा यजुर्वेदी देशस्थ अशांचीच कर्तबगारी प्रामुख्यानें मांडतांना दिसतात. या सर्व प्रयत्नांची एकवाक्यता करणें कठीणच जाईल.

अशानुळें आज मराठींत पांढऱ्यावर काळें करून लिहिलेल्या इतिहासांपैकीं तीन-चतुर्थांश भाग एकांगी, अतिशयोक्तिपूर्ण, विपर्यस्त, खोटा आहे असें म्हणण्यास प्रत्यवाय नाहीं. याच्यामुळेंच अनर्थाचें बीज रुजत घातलें गेलें आहे. नित्याच्या व्यवहारांत याचा पराक्रम दिसतच आहे. आणीबाणीच्या प्रसंगीं त्याचें खरें राष्ट्रघातक स्वरूप स्पष्ट निदर्शनास येईल. अशांपैकीं प्रत्येक लेखक मनांत म्हणत असतो कीं माझ्या जातीचें वर्णन थोडेंसें अतिशयोक्तीनें थोडें खोटें, थोडें दोष लिकवून लिहिलें तर त्यानें एकंदर इतिहासाची काय हानि होणार आहे ? माझ्या जातींतील एखाद्या सामान्य माणसाला महापुरुष बनविलें तर त्यांत बिघडतें कोठें ? माझ्या घराण्यांतील एखाद्या कारकुंड्या पूर्वजाचा मुत्सद्दी तयार झाला तर जग बुडणार आहे थोडेंच !

पण येथें बिरबल–बादशहाच्या गोष्टींतील गवळ्यांच्या गोष्टीची आठवण होते. ठाऊक नसणारांसाठीं ती येथें संक्षेपानें सांगतोंः

एकदां गांवांतील गवळ्यांविरुद्ध फार तक्रारी झाल्यामुळें बादशहाला गवळ्यांचा प्रामाणिकपणा तपासण्याची इच्छा झाली. बिरबलानें तो तपासण्याची युक्ति आपल्या मेंदूतून शोधून काढली. राजवाड्यांत एक मोठा हंडा ठेवून त्यांत दूध सोडणारी एक तोटी वाड्याच्या बाहेरून भिंतींतून भोंक पाडून जोडून देण्यांत आली. या तोटींतून जाण्यासाठीं जें दूध प्रत्येक गवळ्यानें ओतावयाचे तें बाहेरच्या बाजूस असलेल्या तोटीच्या विस्तीर्ण मुखांत ओतावयाचें अशी आज्ञा करण्यांत आली. अशा रीतीनें गवळ्याला हंड्यांत काय पडतें आहे तें दिसूं नये व त्यालाहि ओततांना कोणी पाहूं नये असे दोन

मुद्दे साधण्यांत आले. प्रत्येक गवळ्यानें शेर शेरच दूध बादशहासाठीं ओतावयाचें ठरलें होतें. त्यांपैकीं दरेकानें विचार केला कीं, माझ्या एक शेर दुधाबद्दल पाणीच ओतलें तर बिघडलें कोठें? बाकीच्यांच्या मणावारी दुधांत तें कोठेंच अदृश्य होईल! पण सर्वांनीं हा मुत्सद्देगिरीचा विचार मनांत आणल्यामुळें बादशहाच्या हंड्यांत फक्त यमुनेचें काळेंभोर पाणी तेवढें सांठलें व अशा रीतीनें गवळ्यांची पारख झाली!

पेशवाईतील 'नवकोट-नारायणांच्या' संपत्तीची मोजदाद केली तर आश्चर्य वाटतें कीं, मग पेशवे लाख पन्नास हजारांच्या सुद्धां फिकिरींत कां दिसतात? सर्व सरदार-दरकदारांच्या जहागिरींची बेरीज केली तर ती राज्याच्या अनेकपट क्षेत्रफळाची व वसुलाची भरेल! मुत्सद्द्यांची याद केली तर पृथ्वीचें राजकारण चालवून वर पुष्कळच उरण्याइतकी संख्या भरेल! वीरांनीं कत्तल केलेल्यांची संख्या कोणी मोजील तर हिंदुस्थानच्या लोकसंख्येपेक्षांहि जास्त भरण्याचा संभव फार! हे इतिहासचरित्रकुल-वृत्तांतलेखकू गणिताला हरिभाऊ आपट्यांइतकेच पारखे दिसतात! अर्थात् त्यांचें लेखन कादंबऱ्यांप्रमाणें मनोरंजक, रसाळ, उत्तेजक, लोकप्रिय कां ठरूं नये?

इतिहाससंशोधकांनीं 'नाहीं' म्हणून आक्रोश केला तरी सदाशिवरावभाऊंनीं दिल्लीच्या तख्ताचे राईराईएवढे तुकडे केले असें शिवाजीमंदिर गरजतें. बाळाजी विश्वनाथानें आणलेल्या सनदा स्वराज्याच्या नसून दास्याच्या होत्या हें अजून उमजत नाहीं! बाजीरावानें शाहूची भरदरबारांत खात्री पटवून उत्तरेला प्रयाण केलें असेंच सर्वांनीं समजलें पाहिजे! जंजिरा पेशव्यांच्या विशिष्ट धोरणामुळें जिंकला गेला नाहीं असें म्हणण्याची सोय नाहीं! पानिपतची उत्तरक्रिया कर्कश किंकाळ्या फोडून निदान लांकडी रंगभूमीवर (कीं रणभूमीवर?) करून घेण्याची वीरवृत्ति सर्वत्र फैलावली पाहिजे!

या सर्व प्रयत्नांची उत्तरक्रिया झाल्याशिवाय महाराष्ट्राला बरे दिवस दिसण्याची आशा नको! तोंवर इतिहासाच्या क्षीराऐवजीं दुरभिमानाचें काळें कुट्ट नीरच हातीं येणार! तोंवर हा इतिहासाचा समंध बाधतच रहाणार! नवयुग पाहिजे असेल तर खरा इतिहास जाणून घ्या. तोच बेकनच्या उक्तीप्रमाणें शहाणपणा शिकवील.

'नवयुग', २१ जानेवारी १९४०

# महाराष्ट्राच्या इतिहासाची आबाळ

गेल्या वर्षांत संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीच्या निमित्तानें कांहीं प्रश्न मनांत आले, त्यांतील एक महत्त्वाचा प्रश्न महाराष्ट्रांतील सद्यःकालीन आचरणास मराठ्यांचा विपर्यस्त इतिहास किती कारणीभूत होत आहे याची तीव्र जाणीव हा होय. मी मराठ्यांचा इतिहास अभ्यासिला तो मुख्यतः मराठ्यांच्या सद्यःकालीन स्थितीचा यथार्थ बोध होण्यासाठीं. याचा शोध मी घेऊं लागलों तेव्हां मला आढळून आलें कीं, आजच्या मराठ्यांचें आचरण, त्यांची कोणत्याहि प्रश्नाकडे पाहण्याची रीत, त्यांच्या मनःक्षोभाचीं कारणें, हीं बऱ्याच अंशीं त्यांच्या ऐतिहासिक विकासांत अनुस्यूत आहेत. कोणी म्हणेल कीं, जगांतील सर्व राष्ट्रांतील लोकांचीहि तीच स्थिति असते; तर त्याला एवढेंच उत्तर देतां येईल कीं, इतिहास हा सर्वांवरच परिणाम करून जात असला तरी सर्वच लोकांना त्याची सारखी जाणीव नसते. उदाहरणार्थ, आजच्या मद्राशांना, गुजरात्यांना किंवा गंगायमुनाकांठच्या हिंदवासीयांना त्याची फारशी जाणीव नाहीं, असें त्यांच्या आचरणावरून दिसून येतें. याउलट महाराष्ट्राची स्थिति आहे. याला कारण, महाराष्ट्रानें अगदीं नजीकच्या काळांत भरतखंडाचा इतिहास बनविण्यांत प्रामुख्यानें भाग घेतला होता हें तर आहेच; पण त्याहून जास्त, गेल्या शतकांत स्वतःच्या इतिहासाबद्दल महाराष्ट्रांत झालेली अभूतपूर्व जागृति व कार्य हीं होत,

स्वेतिहासाचें मोठें कार्य केलें व जागृति झाली ही एका अर्थी मोठी अभिमानाची गोष्ट. पण येथेंच सारी मख्खी आहे. कार्य झालें, पण तें योग्य प्रकारानें झालेलें नाहीं. राजवाड्यांनीं हाडाचीं काडें करून नष्ट होणारा इतिहास जुने कागदपत्र वेंचून वांचविला; पण त्यांवर केलेल्या वेळोवेळींच्या भाष्यानें महाराष्ट्रसमाजावर त्यांचा उपकार झाला की अपकार ही अत्यंत वादग्रस्त गोष्ट म्हणावी लागेल. सरदेसायांनीं संपूर्ण महाराष्ट्रेतिहास एका हातानें लिहून दाखविला ही केवढी कर्तबगारीची गोष्ट ! पण तो सत्य आहे असें म्हणणें कठीण आहे. याचा अर्थ त्यांनीं लिहिलेलीं वर्णनें, त्यांतील नांवें किंवा तारखा सर्वस्वीं खोटीं आहेत असा नव्हे; तर एकंदर इतिहासापासून जो ठसा मनावर उमटतो तो खरा नाहीं. असे दुष्परिणाम महाराष्ट्राच्या प्रचंड इतिहासकार्यांत संचरण्याचें कारण, त्याच्या लेखनामागील हेतु होय. देशभक्ति हा स्वतंत्र विचार करतां गुण, पण तोच सत्यनिर्णयाच्या शास्त्रीय कसोटींत शिरला कीं दुर्गुण ठरतो. राजवाडे हे मोठे प्रतिभावान् लेखक.

भाषादृष्ट्या विचार करतां त्यांचें लिखाण मराठीला भूषणभूत. पण हा सत्यनिर्णय करतांना त्यांचें प्रतिपादन भ्रांतिकर, नव्हे सत्यापासून फारच दूर गेलेलें आढळतें. उत्तम इतिहासकाराला कल्पनाशक्ति असावीच लागते, नव्हे तीवांचून यथातथ्य इतिहास कागदावर उतरणारच नाहीं. पण कल्पनेचा उपयोग किती, कोठें, कसा करावयाचा याचें एक शास्त्रच आहे. त्याच्या मर्यादा सोडून केलेला कल्पनाविलास हा उत्तम कादंबरींतहि खपून जाणार नाहीं, मग इतिहासांत तर तो मारक होईल हें काय सांगावयाला पाहिजे ?

माझें पेशवाईबद्दलचें मत माझ्या पहिल्याच एतद्विषयक लिखाणांत, म्हणजे सरदेसायांच्या नानासाहेब पेशव्यांच्या चरित्राला मीं लिहिलेल्या वैमत्यदर्शक प्रदीर्घ प्रस्तावनेंत सुस्पष्ट झालेलें आहे. तीस वर्षांपूर्वी प्रसिद्ध झालेल्या या प्रस्तावनेनें इतिहासाभ्यासक चपापून गेले. कारण, त्यांच्या कल्पनेपेक्षां पेशवाईचें त्यांना अश्रुतपूर्व असें नवेंच स्वरूप दृष्टीस पडलें. त्यावर खरोखरी त्याच वेळीं टीकेचा पाऊस पडावयास पाहिजे होता. पण त्यावर कोणी एक अक्षर लिहिलेलें मला माहीत नाहीं. खरें पाहूं जातां मी कांहीं कधींच कोणाच्या मनांतहि न आलेलें कांहीं लिहिलें होतें, असें नव्हे. खुद्द राजवाड्यांनीं, सरदेसायांनीं व खरेशास्त्र्यांनीं माझ्या लिखाणांतील वेगवेगळे मुद्दे वेगवेगळ्या वेळीं प्रसंगाप्रसंगानें आधींच मांडिले होते. पण त्यांची मांडणी एखाद्या कुशल बॅरिस्टराप्रमाणें मीं केली, एवढेंच फार तर म्हणतां येईल. इतिहासविवेचक हा न्यायाधीशाची भूमिका घेत असल्यामुळें त्याला सर्व साधकबाधक पुरावे व प्रत्येक प्रकरणाच्या अनेक बाजू जागरूकपणें पुढें ठेवाव्या लागतात. त्या मी तशा ठेवल्या होत्या.

सरदेसायांच्या 'मराठी रियासती'चा पूर्वार्ध प्रसिद्ध होतांच आमच्या घरीं आला व तो मीं त्या वेळींच वाचावयास घेतला. त्यांतील अक्षरन्अक्षर माझ्या मनावर ठसून राहिलेलें आहे. त्या वेळच्या त्यांच्या विवेचनांत बाळाजी विश्वनाथाचें व छत्रपति शाहूचें जें स्वरूपाविष्करण केलेलें आहे, तें मला आजहि योग्य वाटतें. पण त्या भागावर राजवाडे प्रभृतींची जी अवास्तव टीका झाली, त्यामुळें सरदेसायांनीं भेदरून द्वितीयावृत्तींत पेशवाईची योग्य चिकित्सा करण्याचा मार्ग सोडून लोकाराधनेचें ध्येय स्वीकारिलें. राजवाड्यांनीं सरदेसायांवर हेत्वारोप करून "ज्याची खावी पोळी त्याची वाजवावी टाळी" अशी अश्लाघ्य टीका केली होती. राजवाड्यांच्या म्हणण्याचा गुपितार्थ असा कीं, श्रीमंत सयाजीराव गायकवाड हे ब्राह्मणांचा व विशेषतः गायकवाडांना बाधलेल्या पेशव्यांचा द्वेष करणारे मालक. त्यांना रुचेल असें विवेचन सरदेसायांनीं केलें. आज पन्नास वर्षांनंतर नवीन कागद प्रसिद्ध होऊनसुद्धां आमच्या मतें सरदेसायांचें त्या पहिल्या आवृत्तींत केलेलें विवेचन खोडलें गेलेलें नाहीं. उलट त्या वेळीं जें कदाचित् कल्पनेनें जुळविलेलें असें म्हणतां आलें असतें, तें आज अस्सल कागदांनीं पुरेपुर खरें ठरविलें आहे.

आज सांगण्याचा मुद्दा असा कीं, महाराष्ट्रांतील ब्राम्हण-मराठ्यांमध्यें जे कायम तट पडले आहेत व ज्याचे सर्वनाशक दुष्परिणाम परवांच्या संयुक्त महाराष्ट्राच्या चळ-

वळींत पदोपदीं स्पष्ट झाले, त्याचें एक बौद्धिक कारण महाराष्ट्रेतिहासाबद्दल निश्चित मतें उघडपणें सांगण्यांत आजवर ब्राह्मणांकडून अक्षम्य टाळाटाळ झालेली आहे, हें होय. संशोधक ब्राह्मण, इतिहासलेखक व विवेचक ब्राह्मण, विषय ब्राह्मणांच्या अभिमानाच्या राज्याचा, संपादक ब्राह्मण, शिक्षक ब्राह्मण, व्याख्याते ब्राम्हण, चळवळी त्यांनींच काढलेल्या आणि या सर्वांचे श्रोते, वाचक व अनुयायी तेहि ब्राह्मण, यांत क्वचित् कोठें अपवादात्मक ब्राह्मणेतर असेल; या सर्व बनावाचा दुष्परिणाम असा कीं, ब्राह्मणांची कर्तबगारी अगदीं गागाभट्ट-रामदासांपासून आरंभ करून तो 'अप्रबुद्ध'-गोळवलकरांपर्यंत अशा तऱ्हेनें फुगविण्यांत, सोज्वळ करण्यांत, चुकीची व म्हणूनच खोटी करून सांगण्यांत, शक्य तेवढी जास्त कोशीस करण्यांत आली आहे. याचा परिणाम मुख्यतः ब्राह्मणांवरच जास्त वाईट तऱ्हेचा झालेला आहे.

पारतंत्र्य होतें तेव्हां स्वतःच्या दोषांचेंहि समर्थन करून परक्यांवर घसरण्यास देशभक्तीची सबब होती. आतां तीहि उरलेली नाहीं. असें दिसतें कीं, इतर भारतवासी लोक आपला नजीकचा दुःखदायक इतिहास विसरून जाऊन नवीन काळांतील स्वार्थावरच आपलें लक्ष केंद्रित करून झपाट्यानें मराठ्यांना मागें टाकीत आहेत. मराठे मात्र स्वपर-भेदाभेद न विसरतां आपलीं अठराव्या शतकांतील भांडणें आजहि हिरीरीनें लढत आहेत! जागतिक व राष्ट्रीय––दोनहि दृष्टिकोनांतून पाहतां, महाराष्ट्रसमाजाची पुच्छप्रगति झालेली प्रत्ययास येत आहे. गेल्या महाराष्ट्र-एकीकरण-चळवळींतील महाराष्ट्राचें धुरीणत्व पाहून लाजेनें माना खालीं घालण्याची पाळी आलेली दिसते. याच वेळीं टिळकांची शताब्दी आलेली पाहून तर ज्ञात्याचें हृदयविदारण व्हावें अशी परिस्थिति आहे.

पण येथें बोल दुसऱ्या कोणाला लावणार? आपलाच दाम खोटा, तेथें "सांगावें तें आपणाला। आपणू करितां बरें॥" म्हणून इतर बहुसंख्य, पण मागासलेल्या मराठ्यांना उपदेश करण्यापूर्वी ब्राह्मणांनाच आवाहन करण्याचें योजिलें आहे. श्री. शि. ल. करंदीकर यांनीं 'केसरी'त ब्राह्मणांच्या स्थितीबद्दल कांही लेख त्यांच्या नेहमींच्या तळमळीनें लिहिले होते. पण त्यांच्या लेखनांत ऐतिहासिक कारणमीमांसा लक्षांत घेतलेली नव्हती. ज्या महाराष्ट्रांत गेल्या शंभर वर्षांत समाजाची सर्वांगीण सुधारणा व्हावी म्हणून वेगवेगळ्या रीतीनीं चळवळ करणारे ख्यातनाम ब्राह्मण पुढारी झाले, त्यांच्या कार्याची निष्पति आज ब्राह्मण, संयुक्त महाराष्ट्र होऊनहि कोठेंच आघाडीला नसावा, किंबहुना तो खड्यासारखा निवडून बाहेर फेकला जावा, अशी परिस्थिति कां निर्माण झाली, याचा विचार कर्तव्य नाहीं काय?

चिपळूणकर, रानडे, राजवाडे प्रभृतींनीं महाराष्ट्रेतिहासाचें जें काल्पनिक रूप सिद्ध केलें त्याला इतिहासाचा आधार नाहीं. राजवाड्यांची गाजलेली पहिल्या खंडाची 'प्रस्तावना' महाराष्ट्रीय ब्राह्मणांना चुकीच्या मार्गावर नेण्यांत यशस्वी झालेली आहे. त्या प्रस्तावनेंतील सूचकता फक्त विवेकी अशा गाढ इतिहासाभ्यासकांस समजूं शकेल व तिचा विपरीत परिणाम त्यांवर होणार नाहीं. पण सामान्य वाचकाला ती निश्चित चुकीच्या

मार्गावर नेणारी आहे. त्या प्रस्तावनेंत राजवाड्यांनीं भटकुलपातशाही किंवा ब्राह्मण-कुल बादशाही अशासारखे जे केवळ काल्पनिक चित्तविलास व भाषाविलास ध्वनिःक्षेपित केले आहेत, त्यामुळें महाराष्ट्रांतील ब्राह्मणांची पिढी चुकीची वाटचाल करून आपलीं ढोपरें मोडून बसली आहे. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या व हिंदु महासभेच्या 'बौद्धिकांनीं' हा अनर्थ फारच फैलावला आहे. जें कधीं झालेंच नाहीं तें झाल्याची पुनःपुन्हा घोषणा करून व त्या घोषणेविरुद्ध कोणी कोठें आवाज काढल्यास तो आपल्या ताशा-मरफ्यांच्या कर्कश आवाजांत बुडवून टाकून खोटा इतिहास प्रस्थापित करण्यांत यश आलेलें आहे. त्यांना अजून दाद नाहीं कीं, महाराष्ट्रांतील बहुसंख्य साक्षर जनतेंत आज काय मतप्रणाली रूढ होत चालली आहे. केळुसकरांनीं आपल्या शिवाजीचरित्रांत चार तपांपूर्वींच तिचा आवाज उठविला होता. प्रो. लठ्ठयांनीं त्याच्यापुढें जाऊन मराठ्यांत सत्यशोधक वृत्तीची इतिहासदृष्ट्या वाढ केली. या वृत्तीचा बाह्य आविष्कार ब्राह्मण शंकराचार्यांच्या पीठाला पळवून लावून क्षात्रजगद्गुरु-पीठ प्रस्थापित करण्यांत झाला. ब्राह्मणांतील महर्षींना प्रतिस्पर्धी म्हणून क्षात्रराजर्षि घोषित करण्यांत आले. लो. टिळकांच्या हयातींतच सातारा जिल्ह्यांतील ब्राह्मणांच्या घरांस अग्नीचा उपद्रव पोंचला होता; पण तरीहि स्वयंमन्य ब्राह्मणांना आत्मपरीक्षण करावेंसें वाटलें नाहीं. त्यानंतर प्रतिवर्षी ब्राह्मणांच्या पायाखालील दगड कोसळत जाऊन त्याखालील वाळूहि ठरेनाशी झाली. परंतु खोट्या इतिहासानें त्यांचें डोकें इतकें फिरलेलें होतें कीं, आपल्या आचरणाचे परिणाम किती मारक होऊं शकतील याचेंहि भान त्यांना राहिलें नाहीं. आतां स्वराज्यांत ब्राह्मण हाच अस्पृष्ट होऊन जणूं काय विद्या, नीति, शास्त्रज्ञान, समाजकल्याण यांची गरजच नाहीं अशा तऱ्हेनें समाजयंत्र व राज्ययंत्र चालू झालेलीं दृष्टोत्पत्तीस येत आहेत. पाकिस्तान दिल्यानंतर तरी मुसलमातांचा जाच गेला म्हणावें, तर येथें शिक्षण व परराष्ट्र खातें यांसारखीं नाक्यांचीं ठिकाणें त्यांच्या ताब्यांत जाऊन पंधरा वर्षें बाजारांत असलेलें इंग्रजी पुस्तक हिंदु गव्हर्नराकडून केवळ पुनर्मुद्रित केलें गेल्याबरोबर त्याविरुद्ध बंड होऊन त्यापुढें आपले महामंत्री साष्टांग नमस्कार घालतांना दिसत आहेत. खिस्ती राजे गेले म्हणून त्यांचा वरचष्मा कमी झाला म्हणावें, तर हरघडी त्या संस्कृतीची वाढ हिंदुस्थानांत ब्राह्मणांपासून सर्व जातींत सारखी होतांना दिसत आहे. धोतर, उपरणें व पागोटें हीं हिंदु संस्कृतीचीं बाह्य चिन्हें हद्दपार होऊन त्यांची जागा स्वराज्यांतहि पॅंट, शॉर्ट, शर्ट, टाय व हॅट यांनीं घेतली आहे. त्यामुळें १९०५ च्या वंगभंग चळवळीपासून निर्माण झालेल्या स्वराज्याच्या व स्वदेशीच्या चळवळीची फलश्रुति हीच काय, असें त्या पिढींतील लोकांस वाटल्यास आश्चर्य नाहीं. पण हें सर्व कां अपरिहार्य झालें आहे, याची कारणमीमांसा मात्र कोणी करीत नाहीं.

महाराष्ट्रापुरतें बोलावयाचें तर याचें कारण ब्राह्मणांचें वर्तन हेंच होय. आपल्याच दुर्गुणामुळें नष्ट झालेली पेशवाई जाऊन दोन पिढ्या गेल्यानंतर जे नवे आंग्लशिक्षित

ब्राह्मण म्युनिसिपालिटीच्या दिव्याजवळ विद्याभ्यास करून पुढें आले, ते पेशवाईचें खरें स्वरूप काय होतें तें पार विसरून गेले होते. अव्वल इंग्रजींतील पिढीला पेशवाईची घाण सुपरिचित होती. त्यामुळेंच त्यांतील कांहींनीं इंग्रज राज्याच्या प्रस्थापनेंत वांटा घेतला होता. 'लोकहितवादीं 'च्या लेखनांत जें महाराष्ट्रेतिहासाचें स्वरूपाविष्करण झालेलें आहे, तें सत्याला जास्त जवळचें होतें. शिवाजीची राज्यस्थापना हा महाराष्ट्रेतिहासांतील क्रांतिकारक उपक्रम होता, अशी त्यांनीं सुयोग्य मीमांसा लावून दाखविली होती. पण शिवाजी ही मराठ्यांतील अपवादात्मक विभूति होती. त्याची राज्यघटनाहि त्या काळाच्या आघाडीला शोभण्यासारखी होती. ती मराठ्यांना झेपूं शकलेली इतिहासावरून दिसत नाहीं. म्हणून शाहूच्या प्रत्यागमनानंतर प्रतिक्रांति होऊन शिवाजीच्या राज्यसंस्थेला अडगळींत पडून राहावें लागलें. रामदासांनीं 'मराठा तितुका मेळवावा' हा मंत्र नवीन राष्ट्रसंघटना करण्यासाठीं दिला होता, तो साफ विसरला गेला, त्यांच्या शिष्यशाखेंत गुरूच्या मंत्राचा फैलाव करणारा एकहि शिष्य निघाला नाहीं. 'उदंड जाहलें पाणी स्नानसंध्या करावया', हाच पेशवाईंत ब्राह्मणांचा धन्यतादर्शक उद्गार ठरला. या स्नानसंध्येची बरीच वाढ पेशवाईंत झाली. पण ज्या कारणीं ही स्नानसंध्या लागावयाची, तें राजकारण पार दृष्टीआड झालें.

पेशवाईंत मराठ्यांच्या तथाकथित साम्राज्याला स्वतःचें नाणेंहि नव्हतें! महाराष्ट्रांतील टांकसाळी मोंगल बादशहांच्या बिरुदावलींसह फारसी भाषेंत अंकित केलेलीं नाणीं पाडीत. शिवशाहीचें नांव केवळ तांब्याच्या शिवराईपुरतेंच उरलें होतें. तरीहि शाहूचें राज्य स्वतंत्र होतें, असें आग्रहानें सांगितलें जातें! सरदेसायांच्या सबंध 'रियासतींत' या विषयाचें नांवहि काढण्यांत आलेलें नाहीं; कारण तसें सांगितलें तर साम्राज्य या अवास्तव नांवास गालबोट लागेल ना! पेशवाईंत मराठे एकदां अटकेपार गेले होते; पण ते स्वतःचें राज्य प्रस्थापित करण्यासाठीं नसून दिल्लीच्या वजिराचे भागीदार म्हणून गेले होते, हें ठसठशीतपणें सांगण्यांत येत नाहीं. नानासाहेब पेशवा हा माळव्याचा मोगली नायब सुभेदार होता, मालक नव्हे. मल्हारराव होळकराला सुभेदार ही पदवी त्याच्या आग्र्याच्या मोगली सुभ्यावरून मिळाली होती. तीच गोष्ट शिंद्यांची. ते अजमेरचे सुभे होते; पण हें सर्व मोगलांचें राज्य होतें. महादजी शिंदे मोगल बादशाहीचा अलिजाबहाद्दर फिदवी व फर्जंद होता. सवाई माधवराव दिल्लीच्या बादशहाचें सर्वाधिकारीपद पावला, पण त्याच बादशहाचे वजीर अयोध्येचे नबाब, बंगालमधील दिवाण इंग्रज किंवा दक्षिणचे सुभेदार निजाम हे त्याचा अधिकार बिलकुल मानीत नव्हते. अशा किती म्हणून पेशवाईबाबत 'विपर्यस्त' गोष्टी सांगाव्या?

या पेशवाईचें तोंड भरून वर्णन करण्याचा परिपाठ चिपळूणकरांपासून सुरू झाला आणि राष्ट्रीयत्वाच्या उदयांत काल्पनिक वर्णनें सत्य समजलीं जाऊं लागलीं. या उभारणींतील पहिला विपर्यस्त प्रकार म्हणजे पेशवाई ही शिवाजीच्या पावलावर पाऊल टाकून चालली होती, असें समजणें होय. बाजीराव व चिमणाजी हे किती स्वतंत्र झाले होते

याचें वर्णन इंग्रजांच्या वकिलानें लिहून ठेविलें आहे. पेशवे स्वतःचें राज्य व सत्ता वाढवीत होते; त्यांना आंग्रे, सावंत, भोसले किंवा गायकवाड यांचें काय झालें याची पर्वा नव्हती. नाना फडणिसाला तर पेशवे हेच आपले स्वामी वाटत होते. छत्रपति ही एक अनिराकरणीय अडगळ. आज जो पेशवाईचा इतिहास म्हणून लिहिला गेला आहे, तो खरा अशा तऱ्हेचा आहे.

आणि म्हणूनच त्याचें ब्राह्मणेतर मराठ्यांना कांहींहि सुवेरसुतक वाटत नाहीं. जोंवर ब्राह्मणासहित सर्व मराठ्यांना मान्य असा एकच इतिहास लिहिला जात नाहीं, तोंवर मराठ्यांचें बौद्धिक आत्मीकरण व एकीकरण अशक्यप्राय आहे. आज नवीन पिढी रानडे, टिळक, गोखले, आगरकर यांना मानते; पण पेशवाईला खास मानीत नाहीं. आणि हें बरोबरच आहे; कारण, यांच्या तोलाचीं माणसें पेशवाईत कोणी झालींच नाहींत. इंग्रज अमदानींत जे मोठे झाले, त्यांचे पूर्वज तितकेच मोठे किंवा शहाणे किंवा ज्ञाते होते असें म्हणणें हें अभिमानास्पद असलें, तरी खरें नाहीं. रामदासांनीं शिवाजीबद्दल प्रशंसोद्गार काढूनहि 'दुसऱ्याचा प्राण घ्यावा। आपला आपण स्वयें द्यावा। विसरवी जीवभावा। तो तमोगुण॥ डोळां युध्यचि पाहावें। रण पडिलें तेथें जावें। ऐसें घेतलें जीवें। तो तमोगुण॥ युध्य देखावें ऐकावें। स्वयें युध्यचि करावें। मारावें कीं मरावें। तो तमोगुण॥

अशा ओव्या 'दासबोधां'त लिहिल्या आहेत. पेशवाईत याच तमोगुणांचा इतका सुळसुळाट झाला कीं, त्यापुढें इतर सद्गुण जवळजवळ लोपले. पेशवाईचें औरस अपत्य पेंढारी होत. त्यांनीं शिवशाहीस कलंक लाविला व ती बुडविली, आणि हिंदुस्थानांतील इतर जातींस मराठशाहीचा हाच साक्षात्कार प्रत्ययास आला तो आजतागायत. याचाच दुष्परिणाम महाराष्ट्रास बाधला, बाधत आहे व बाधेल. इतर प्रांतांतील लोक मराठे म्हणजे जाळपोळ करणारे, अत्याचार करणारे, लुटारू, रानदांडगे असें मानतात. आणि गेल्या दहा वर्षांतील स्वराज्यसंस्थापक सातारा जिल्ह्याचा इतिहास याहून कोठलें वेगळें उदाहरण दाखवितो? आज नित्य जे अमानुष खून त्या भागांत घडत असलेले आपण वाचतों, त्यावरून दिल्लीचे भारतीय शासक तरी दुसरें काय मानणार? मराठ्यांचें स्वातंत्र्य जणूं याच गोष्टीशीं अनुस्यूत आहे, असा भास होतो. हें जर खरें असेल, तर तें संयुक्त महाराष्ट्राच्या प्रश्नाला बाधलें असें कां म्हणूं नये? कांहीं कारणें शहाणे लोक तोंडाबाहेर काढीत नाहींत, म्हणून तीं त्यांच्या वर्तनाला कारणीभूत होत नाहींत असें कोण म्हणेल? महात्माजींच्या अहिंसेचा अर्थ कसाहि असो, पण जोंवर जाळपोळ, लुटालूट व खून या गोष्टींचें उच्चाटन महाराष्ट्रांतून होत नाहीं तोंवर मराठ्यांचें एकीकरण—खरें मनोमन प्रेमाचें एकीकरण—अशक्य आहे. हाच इतिहास-डिंडिमाचा सूचक निनाद आहे. तिकडे दुर्लक्ष करून महाराष्ट्राचें कोणतेंहि कार्य सिद्धीस जाणार नाहीं.

'साधना', ९ फेब्रुवारी १९५७

# शिवाजीचा मार्ग

हिंदुस्थानच्या इतिहासांतील गेलीं बाराशें वर्षें जाचत राहिलेला हिंदु–मुसलमान प्रश्न आजच्या पुढाऱ्यांना सोडवितां आला नाहीं, हें आतां तरी कोणी नाकबूल करूं शकणार नाहीं. हा प्रश्न सोडविण्याचे अनेक प्रयत्न इतिहासांत होऊन गेले तरी तो आजहि शिल्लक राहिला आहे. पहिल्या चारशें वर्षांत मुसलमानांना घालवून देऊन हा प्रश्न सुटेल असें तत्कालीन राजांना वाटत होतें. कारण त्याची व्याप्ति आजच्या वायव्येकडील भागापुरतीच त्यावेळीं होती, व आपण मुसलमानांपेक्षा मागासलेले आहोंत असें हिंदु लोकांना वाटत नव्हतें. तदनंतरच्या चारशें वर्षांत अखिल हिंदुस्थान मुसलमानांनीं तुडविलें व त्यांतील नऊदशांश भागावर त्यांनीं राज्येंहि स्थापलीं. यामुळें कलियुगांत यवनच राजे होणार अशी समजूत या देशांत दृढ झाली, व हिंदुमुसलमानांचा प्रश्न, ते हिंदुस्थानांत राजे म्हणून राहणार असें गृहीत धरूनच सोडविला पाहिजे, असें विचारी लोकांचें मत बनलें. हिंदूंना परमधर्मांबद्दल तुच्छता अशी बहुधा कधीं वाटलेली दिसत नाहीं. फक्त आपल्या धर्मांत व तन्मूलक समाजव्यवस्थेंत इतरांनीं हात घातला नाहीं म्हणजे त्यांचें समाधान असे. यवन, म्लेंच्छ हे शब्द ते आपल्या बोलण्यांत योजीत. तरी ते केवळ परकीपणाचे द्योतक असत. त्यावरून कोठलाहि कमीपणा प्रतीत होत नाहीं. चारशें वर्षांचा झगडा चालल्यानंतर हिंदूंच्या मनावर सहजच मुसलमानांच्या वरचढपणाची छाप बसली, आणि राज्याच्या बाबत आवश्यक असलेल्या गुणांत मुसलमान वरचढ होतेहि.

पहिली गोष्ट म्हणजे त्यांचा धर्म व समाजरचना एकसंधि व निश्चित स्वरूपाची होती. त्यांचें परक्यांबद्दलचें तत्त्वज्ञान धर्माच्या आज्ञांतच समाविष्ट होतें. इतरांना मुसलमान करणें हेंच मुख्य व श्रेष्ठ धार्मिक कर्तव्य, व तेंच व्यक्तींना मोक्षाप्रत नेतें, अशी दृढ भावना मुसलमानी धर्मांत आहे. म्हणजे मुसलमानांचें तत्त्वज्ञान नेहमींच गतिमान असतें. हिंदूंप्रमाणें कूपमंडूकवृत्तिदर्शक नसतें. तत्कालीन मुसलमान राज्यकर्त्यांचा अव्याहत संबंध बाह्य जगाशीं चालू होता. त्यामुळें चीन, जावा, रशिया, इताली, मोरोक्को, अशा दूरच्या देशांतील प्रवासीहि हिंदुस्थानांत येत जात असत. इराण, तुर्कस्थान, अरबस्तान, ईजिप्त व हबसाण यांबाबत तर बोलावयासच नको, कारण ते मुसलमानी वर्चस्वाखालील देश होते. यामुळें विचार, शास्त्रें, कला व वस्तुजात या

सर्वांबाबत मुसलमानी राज्यकर्ते आजतागायत राहूं शकत. दुसरी महत्वाची गोष्ट म्हणजे, मुसलमानांची मनोरचना व आचारसरणी इतिहासावर अधिष्ठित होती. हिंदूंप्रमाणें काल्पनिक आत्मानात्मविवेकाच्या शब्दावडंबरावर व वावदूकपणाच्या मृगजळावर पोसलेली नव्हती. याचा अर्थ, आज ज्या अर्थानें पाश्चात्य इतर जगापुढें आहेत, त्याच अर्थानें मुसलमान त्यावेळच्या जगाच्या आघाडीस होते. लिहिण्याला कागद घेतल्यामुळें त्यांच्यांत ज्ञान लवकर फैलावत असे. बंदुकीच्या दारूचा शोध निघो, नौकानयनाचा व त्याला पोषक अशा भूगोलज्ञानाचा वा ज्योतिषशास्त्राचा शोध असो, किंवा तोफखाना व त्याच्यापुढें टिकाव धरणारी किल्ल्यांची तटबंदी यांचा प्रश्न असो, मुसलमान या सर्व गोष्टी झटपट परक्यापासून उचलीत व त्यांत तरबेज होत. यामुळेंच ते हिंदूंना भारी झाले. मध्य आशियांतील बाबर हा तत्कालीन विद्वानांच्या जगांतील कोणत्याहि समूहांत बहुश्रुत ठरण्यासारखा होता, व युद्धशास्त्र आणि राज्यशास्त्र यांतहि तो सर्वांपुढें होता. यामुळेंच चिरंतन मोगल बादशाहीची स्थापना या देशांत झाली.

या नंतरच्या एका शतकांत मोगल बादशहांनीं सर्व उत्तर हिंदुस्थानांत एक अत्यंत नियमबद्ध अशी राज्यव्यवस्था सुरू केली. वेगवेगळे दूरदूरचे प्रांत एका मध्यवर्ती नियंत्रणाखालीं कसे राखावयाचे हें या पद्धतींत निश्चित केलेलें होतें. राजे मुसलमान असले तरी राज्यकर्ते म्हणून त्यांनीं कसें वागावयाचें तें ठरलेलें होतें. शांततेची राज्यव्यवस्था निर्मून, एक (फारसी) भाषा, एक राज्य, एक कायदा, एक नाणें, एक संमिश्र संकृति यांच्या जोरावर हिंदूंना आपल्या हितसंबंधांशीं संपूर्ण निगडित करण्याची आकांक्षा या बादशहांनीं धरली. त्यांतील एकानें तर संमिश्र नूतन धर्म निर्मून सर्वांना एकरूप करण्याची योजना आंखली होती. अकबराचा हा अभूतपूर्व प्रयत्न बहुधा कडव्या मुसलमान मौलवींच्या व आपल्या भविष्याविषयीं संशयित स्वार्थी सरदारांच्या विरोधामुळें फसला. तरीहि संस्कृतिदृष्ट्या इतका एकीभाव मोंगल दरबारा-भोंवतीं निर्माण झाला होता कीं, जगन्नाथ पंडितासारखे तेलंगे कविवर्य शहाजहानच्या आश्रयाखालीं संस्कृत काव्यें लिहीत व 'यवनी नवनीतकोमलांगी' म्हणून जातीय लगटहि करण्यास मागें पुढें पहात नसत. शहाजहानचा मुलगा दारा हा उपनिषदांच्या तत्त्वज्ञानांत इतका रममाण झाला होता कीं, त्याची बैठक काशीप्रयागास संन्यासीबैरागी-योग्यांच्या समूहांत असे व अल्लोपनिषदासारखें लिखाण त्यावेळीं बाहेर पडलें. सूफी तत्त्वज्ञान या सर्व मागील इतिहासाचा आध्यात्मिक परिपाक होता व त्याचा प्रसार दरबारी व बाहेरीलहि सुशिक्षितांत दूरवर फैलावला होता. मोतीलाल नेहरू व तेजबहादूर सप्रू हे या मिश्र संस्कृतीचे अखेरचे वारस होत.

वडील मुलगा दारा हा बापाचा संकल्पित युवराज असतांनाहि औरंगजेबाच्या ढोंगी कुटिलतेपुढें टिकाव धरूं शकला नाहीं. ही ऐतिहासिक घटना या देशास फारच मारक ठरली. त्यामुळें या अफाट देशाचें एकीकरण एकाच राजवटीखालीं होऊन हा देश बळ-

कट होण्याचा संभव निर्माण झाला होता, तो नष्ट झाला. हिंदुमुसलमान प्रश्न योग्य रीतीनें सुटण्याच्या मार्गावर असतां तो मोका जाऊन एका धर्मयुद्धाची आपत्ति येथील लोकांवर कोसळली. पांचशें वर्षांच्या अनुभवानें येथील मुसलमान राज्यकर्त्यांकडून हा प्रश्न सुटत नाहीं असें झालें, तेव्हां एका हिंदु राजाला तो स्वतःच्या मतीनें सोडविण्याची बुद्धि झाली. हा पुरुष शककर्ता शिवाजी होय.

शिवाजी म्हणजे पांचशें वर्षांच्या हिंदुमुसलमान लढ्याचा अन्वयार्थ समजलेला एकमेव कर्ता पुरुष; मुसलमानी संस्कृतींतील सर्व उत्तम अंगें आत्मसात् केलेला एक पराक्रमी वीर, हिंदुत्वाचा नितान्त अभिमान उचलेला एक धर्मनिष्ठ माणूस; बापाच्या पंधरावीस वर्षांच्या धडपडी पाहून चार राज्यांच्या बंदींत राहून शहाणपणा शिकलेला मुत्सद्दी होता. माणसांची पारख त्यास उपजत होती. 'व्रजन्ति ते मूढधियः पराभवं भवन्ति मायाविषु ये न मायिनः।' हें भारवीचें वचन डोळ्यांसमोर ठेवून त्यानें कधींहि फसवून न घेण्याचा निश्चय केला. हिंदूंचा सर्व इतिहास म्हणजे, काल्पनिक वैयक्तिक ध्येयें आचरणांत आणण्याचा अट्टाहास धरून स्वतःच्या घरांत गुलाम होऊन बसलेल्या, दुबळ्या, फसलेल्या लोकांचा इतिहास हें त्यास कळून चुकलें होतें. चोरावर मोर होऊन हा वज्रलेप इतिहास आपल्या हयातींत त्यानें खरवडून टाकला. परक्या व्यापारी इंग्रजांनीं त्यास त्याच्या हयातींतच अलेक्झांडर, सीझर, सार्तोरिअस, बनविलें होतें. मुसलमान त्यास अदृश्य होणें, पक्ष्याप्रमाणें उडून झांप घालणें असल्या सैतानी सिद्धी साध्य असाव्यात असें मानीत. एवंगुणविशिष्ट पुरुषानें जो मार्ग आंखला होता, तोच हिंदुमुसलमान प्रश्न सोडविण्याचा उत्तम मार्ग असें विचारी पुरुष मानतील. अंतरात्म्याचा निर्णय नाकपुड्यांवर बोटें ठेवून पहाणाऱ्यांना त्याचें काय होय!

शिवाजीनें निश्चित केलेली पहिली गोष्ट म्हणजे, या देशांत हिंदूंचें स्वतःचेंच राज्य पाहिजे. मुसलमान राजवट कितीहि चांगली कल्पिली तरी तींत हा प्रश्न सुटणार नाहीं. राजकीय अंतिम निर्णय घेणारी सत्ताधारी संस्था हिंदूंच्या हातींच राखल्याशिवाय या कठीण प्रश्नाचा कायम निकाल कधींच लागणार नाहीं. शहाजीनें, मुसलमान वजीरांनीं सोडलेलें निजामशाही राज्य, पोरक्या राजपुत्राला स्वतःच्या मांडीवर घेऊन दोन मुसलमान बादशाह्यांचा विरोध सहन करून राखण्याचा प्रयत्न शेंडी तुटो कीं पारंबी तुटो या निश्चयानें केला. पण त्यांत त्याचेच हात पोळले. मुसलमानांच्या कपटी स्वार्थापुढें कोणताहि हिंदु टिकणें शक्य नाहीं हें त्यानें जाणलें व उत्तर वयांत वेगळा मार्ग आंखला व मुलांना त्याचा कानमंत्रहि दिला. त्याच मार्गानें गेल्यामुळें मराठी राजसत्ता स्थापन होऊं शकली. मात्र हें राज्य जवाहरलाल आज नाक मुरडतात त्या अर्थानें धार्मिक नव्हतें. मुसलमानांच्या वैयक्तिक उदयास त्यांत पूर्ण वाव होता. शिवाजी पारलौकिक कल्याणार्थ मुसलमानी साधूंच्या दर्ग्यांना भजे व देणग्याहि देई. त्याचा मुख्य दर्यासारंग मुसलमान होता. त्याचा फारसनवीस मुसलमान पुढें औरंगजेबाचा दिल्ली येथील मुख्य न्यायाधीश झाला.

शिवाजीच्या सैन्यांत पुष्कळ मुसलमान शिपाई होते. त्याच्या खास नोकरांतहि मदारी मेहतर होता. फक्त मुसलमानी धर्माचीं तत्त्वें राजकारणांत घुसडूं देण्यास तो राजी नव्हता. देवळाची मशीद पाडून तेथें पुनः देव स्थापण्यास तो कचरत नव्हता. मुसलमान राज्यपद्धतीचा अंतिम हेतु अखेरीस सर्वांना मुसलमान करण्याचा होता. शिवाजीच्या राज्यपद्धतीनें इस्लामी धर्म सुकत जाऊन आपोआप निरुपद्रवी होणार होता. मात्र तत्कालीन इंग्लंडांत कॅथोलिकांना सर्वत्र मज्जाव होता, तो येथें मुसलमानांना नव्हता.

शिवाजीची दुसरी गोष्ट: हिंदुसंघटण. अर्थात् तें व्यक्तिदृष्ट्या मुसलमानांना अन्याय करणारें व त्यांचें जीवित असह्य करणारें नव्हतें हें वर सांगितलेंच. शिवाजीची शब्दयोजना याबाबत संयमाची, नव्हे विनयाची होती. त्यानें 'मराठियांचें गोमटें' करण्याचा उच्चार केला. महाराष्ट्रधर्म वाढविण्याची उमेद धरली. कारण अखिल हिंदूंचे, आणि हिंदूंचेंच काय, पण हिंदु-मुसलमान, खिस्ती, पारसी, यहुदी या सर्वांचे आपण स्वयंभू पुढारी, असें गांधींप्रमाणें तो मानीत नव्हता. छत्रसालानें बुंदेल्यांची संघटना करावी, शीखांनीं पंजाब्यांची करावी, राजसिंहानें राजपुतांचा पुढाकार घ्यावा, आणि अशा रीतीनें दृढ स्थानिक पायावर हिंदूंची संघटना व्हावी, असें त्यास वाटत होतें. आपलें अखिल भारतीय पुढारीपण सिद्ध करण्याचा त्यास हव्यास नसून, अखिल हिंदूंचें जेथल्या तेथें संघटण होऊन त्यांनीं तेथेंच कमरा बांधाव्या असें त्यास वाटत होतें. अर्थात् त्याच्या सावधगिरीच्या राजकारणाचा इष्ट तोच परिणाम होऊन सर्व हिंदुस्थानांत औरंगजेबविरुद्ध बंड उठलें व त्याचें राज्य खिळखिळें झालें. शिवाजीची राष्ट्रीय दृष्टीहि तत्कालीन युरोपाच्या पुढें होती. मॅझिनीनें जें एकुणिसाव्या शतकांत लिहिलें तें रामदासानें शिवकालांतच उच्चारलें होतें.

हिंदु-मुसलमानांचा प्रश्न सोडविण्याचा आणखी एक मार्ग म्हणजे दोघांचीहि संकुचित दृष्टि, परदेशांशीं दळणवळण वाढवून, जगाच्या उदाहरणानें विशाल करण्याचा.

शिवाजीनें पोर्तुगीज, डच, फ्रेंच, इंग्रज यांपासून बऱ्याच कल्पना उचलिल्या. आरमार सजविणें, पोर्तुगीज इंजिनेरांच्या मदतीनें जंजिरे किल्ले बांधणें, तोफांची व दारू करण्याची युक्ति समजावून घेणें, नकाशांवरून हालचाली करण्यास शिकणें, परदेशच्या व्यापारांत स्वतः भाग घेणें, या सर्व गोष्टी त्यानें आपल्या वीस वर्षांच्या छोट्या अमदानींत केल्या. या सर्व कार्यांत मुसलमानांचें सहकार्य आपोआपच मिळणार होतें. कारण त्यांना मक्केच्या यात्रेस जाण्याची व परक्या इस्लामी राष्ट्रांशीं संबंध ठेवण्याची इच्छा होती. बाटल्यामुळें बहुतेक दर्यावर्दी हिंदू जाती मुसलमान बनलेल्या होत्या व त्यांना परदेशगमनाचें भय वाटत नव्हतें. अर्थात स्वतःला उद्योग म्हणून ते या कामांत पडले तरी त्यामुळें त्यांचा पाश्चात्य संकटाविरुद्ध फळी उभी करण्यास उपयोग होणार होता. समान हिताचें कार्य काढल्याखेरीज दोन घटकांची एकी होत नाहीं, हें तत्त्व ओळखून शिवाजीनें हा मार्ग आरंभिला होता. शिवाजी या एकट्याच राजानें तारवांतून स्वारी,

दीडशें वर्षांच्या मराठी राजवटींत केली, ही गोष्ट याबाबत विसरण्यासारखी नाहीं.

पतितपरावर्तन हा मार्गहि शिवाजीनें अवलंबिला होता. बजाजी निंबाळकर व नेताजी पालकर हे सुंता झालेले व मुसलमानांत दहापांच वर्षें राहिलेले मराठे त्यानें आईच्या सम्मतीनें परत हिंदू करविले. हा मार्ग पेशवाईत मागें पडला. समशेर बहाद्दराला कृष्णसिंग करूं म्हणणारा बाजीराव स्वतःच घराबाहेर पडला ! शिवाजीच्या पद्धतीनें अनेक नाममात्र मुसलमान झालेल्या जातींचें पुनः हिंदूकरण होतें. हिंदुधर्मांत परत येणाऱ्या मुसलमानांना कोणताहि ऐहिक स्वार्थत्याग करावा लागणार नाहीं, हें अशा तऱ्हेनें प्रत्यक्ष उदाहरणानें पटविण्याचा मार्ग अवलंबिल्यामुळें, प्रत्यक्ष प्रचार न करतांहि अनेक मुसलमान आपोआप परत हिंदु होणारच होते.

इतकें सर्व करूनहि शिवाजीनें मुसलमानी धर्म वाढेल किंवा फुशारेल असें कांहींहि न करण्याची काळजी घेतलेली दिसते. स्वतः धार्मिक वृत्तीचा असल्यामुळें—म्हणजे केवळ राजकीय प्रचारार्थ हिंदु म्हणून मिरवीत नसल्यामुळें—शिवाजी पारलौकिक कल्याणार्थ मुसलमान गुरु करण्यास डरत नव्हता. आजच्या थिऑसफिस्टाला शोभण्यासारखी उदार वृत्ति धर्मविषयक बाबतींत तो बाळगीत असे. अर्थात् परक्यांच्या धर्मांचा छळ त्याच्या हातून होणें शक्य नव्हतें. पण यापलीकडे जाऊन गांधींप्रमाणें एखाद्या खिलाफत प्रश्नाचा पुढाकार घेण्याचें कार्य अंगावर ओढवून घेऊन मुसलमानांच्या वेडाला फुंकर घालून वाढविण्याचा अदूरदर्शीपणा त्याच्यांत नव्हता.

सारांश, शिवाजीच्या पद्धतीप्रमाणें व योजनेप्रमाणें मागें सर्व चालतें तर अखिल हिंदुस्थान आपोआपच संघटित होणार होतें. मुसलमानांची संख्या घटणार होती, त्यांची राजकीय दंडेली संपुष्टांत येणार होती, याबद्दल संशय उरत नाहीं. अर्थात् कालांतरानें तो प्रश्न उरतच नव्हता.

शिवाजीच्यामागें संभाजीनें धार्मिक बाबतींत त्याचा बाणा चालविला. राजकीय बाबतींत राजारामकालच्या मराठ्यांनीं त्याचें कार्य मागें पडूं दिलें नाहीं. आणि ताराबाई व्यक्तिशः अधिकारकांक्षी व जहांबाज असली तरी, राजकीय दृष्ट्या तिचा मार्ग शिवाजीची योजना टिकवून धरण्याच्या दृष्टीनें शाहूपेक्षां जास्त उपयुक्त होता. शाहूनें स्वतःला राज्य मिळण्यासाठीं या योजनेच्या मुळावरच घाव घातला व मोंगलांचें स्वामित्व पत्करिलें. या एका घोडचुकीनें मराठ्यांचा एवढा नैतिक अधःपात झाला कीं त्यांच्यांत कायमची राजकीय फूट पडली. शिवाजीनें मारून काढिलेला व्यक्तिस्वार्थ बोकाळला, त्याला असंमत असणारी वंशपरंपरा अधिकाराची चटक मराठ्यांत वाढली, त्यानें आखून दिलेलें अष्टप्रधानमंडळाचें राज्य मोडून पुनश्च मुसलमानी पद्धतीचें एकतंत्री राज्य निर्माण झालें. शिवाजीची राज्यपद्धति, लोक सुशिक्षित नसल्यामुळें लोकशाही नव्हती, तरी ती एकतंत्रीहि खासच नव्हती. किंबहुना त्याचा हेतु ती अनेकांच्या हातांत राहावी असाच होता. शिवाजीचें प्रधानमंडळ म्हणजे एका पक्षाचें, एका म्होरक्याच्या नेतृत्वाखालीं चालणारें

मंडळ नसून तें अनेक आपापल्या कामापुरत्या स्वतंत्र अशा लढाऊ माणसांचें प्रधान-मंडळ होतें. म्हणजे राज्यरक्षण ही मुख्य बाब आहे, ही गोष्ट त्याच्या नजरेसमोर होती. या सर्व गोष्टी मीं इतरत्र चर्चिलेल्या आहेत. आमचें दुर्दैव एवढेंच कीं आमच्यांतील अनेकांना आजहि पेशवाईची चूक कबूल करवत नाहीं व ते पेशव्यांनीं शिवाजीचाच मार्ग पुढें चालविला असें घोकीत असतात. आमचे इतिहासकारहि इतके अनैतिहासिक होतात कीं, ते आजच्या कालावर नजर ठेवून शाहूला महात्मा गांधींचा पूर्वावतार समजतात व त्यानें हिंदु-मुसलमानांच्या एकीचा सौम्य सामोपचारी मार्ग अवलंबिला म्हणून त्यास शाबासकी देतात.

पेशव्यांनीं शिवाजीचा मार्ग सोडून व मागें जाऊन, शहाजीच्याच अनुभवानें निरुपयोगी टरलेला, मुसलमानी बादशाही स्वतः चालवून दाखविण्याचा अशक्य हव्यास धरिला. त्यामुळें मुसलमानी बादशाही तर बुडालीच, पण मराठ्यांचें राज्यहि टिकलें नाहीं. उलट जिवंत व स्वतंत्र ठेवलेल्या मुसलमानांना हातांशीं धरून आपलें राज्य स्थापणें इंग्रजांना शक्य झालें. शाहूच्या मार्गानें हिंदुस्थान दुबळा होऊन त्यांत दुफळी झाली. आज तोच मार्ग गांधींनीं अवलंबिल्यामुळें हिंदुस्थानचीं छकलें झालीं, व यादवीहि आतां कायमचीच पाठीस लागणार आहे. या सर्व अनर्थांचें कारण एकच व तें म्हणजे अनैतिहासिक, आत्मानात्म अविवेकावर उभारलेली राजकीय विचारसरणी. शिवाजीचा ऐतिहासिक मार्ग स्वीकारण्याची बुद्धि हिंदुस्थानला होणार नसेल तर हिंदूंचें रक्षण काळच करणार असेल तर करो !

'रसना', दिवाळी अंक : १९४७

# पेशवाईच्या सावलींत

"पेशवाईचें वर्णन करावयाचें तर तें दंगेधोपे, लढाया, युद्धें, दानधर्म, हव्यकव्य ह्यांच्या दंगलीचा काळ असें थोडक्यांत करतां येईल. भिक्षुक, शास्त्रीपंडित, हरिदास-पुराणिक ह्या सर्वांचे उच्च ग्रह एकादशस्थानीं ह्या काळांत आले होते असें वाटतें. अन्नसंतर्पण, दानें, व्रतेंवैकल्यें, प्रायश्चित्त वगैरे प्रकार सारखे चालू होते. द्रव्याला स्पर्श न करणाऱ्या संन्याशाच्या समोरहि द्रव्याच्या राशी पडत." असें रावसाहेब ना. गो. चापेकर आपल्या 'पेशवाईच्या सावलींत' या नवीन ग्रंथाच्या प्रस्तावनेंत (पृ. ४६) म्हणतात. कोणत्याहि वस्तूची सावली मध्यान्हकाळापेक्षां सकाळ-संध्याकाळीं जास्त लांब पडत असते व त्या वेळींच वस्तूच्या आकाराचा बोध जास्त स्पष्ट होत असतो. पेशवाईच्या बाल्यावस्थेंत दंगेधोपे, लढाया यांचें जास्त प्राबल्य होतें, तर अखेरीस दानधर्म, हव्यकव्य यांना जास्त ऊत आला होता. वस्तुतः एकंदर पेशवाईचा सामान्य सामाजिक परिणाम कोणता झाला याचा आढावा काढला, तर आम्हीं एक तपामागेंच एका प्रस्तावनेंत म्हटलें होतें त्याप्रमाणें निरर्थक कर्मकांडाचें निरर्गल स्तोम माजलें व समाजाची नव्या युगाकडे प्रगति होण्याऐवजीं उलट मुसलमान अमदानींत दडपून गाडल्या गेलेल्या त्याज्य चालींचीं मढीं उकरून काढून पुन्हा जिवंत करण्याकडे आमच्या स्वराज्याचा दुरुपयोग करण्यांत आला.

शिवाजीकालीन समाजांत जुन्या शृंखला तोडून टाकून नवसमाजनिर्मिति करण्याचें जें नवजीवन संचारलें होतें तें पेशवाईत कोठें अंतर्धान पावलें व त्याची जागा हेमाद्रीच्या व्रतखंडानें व काशीनाथोपाध्यायांच्या धर्मसिंधूनें घेतली. यांतून निर्माण झालेल्या हीन समाजावर अव्वल इंग्रजींत लोकहितवादी सरदार गोपाळराव देशमुख यांनीं मुंबईच्या 'प्रभाकर' पत्रांत दोन वर्षे सतत सडेतोड लेख लिहून हॉविट्झरचा मारा केला व त्याला जर्जर करून सोडलें. यापुढील काळांतच 'अजम' जोतिराव फुले, विष्णुबोवा ब्रम्हचारी, विष्णुशास्त्री पंडित यांची त्याच तऱ्हेची कामगिरी झाली. याच ओघानें पुढें समाजगति चालू राहिली असती तर आज महाराष्ट्रांत जी निर्नायक बेबंदशाही माजली आहे ती माजून 'महाराष्ट्र मागें पडला' असा आक्रोश करण्याची आपत्ति ओढवली नसती.

पण काय महाराष्ट्राचें भाग्य तें एक महान् साहित्यिक निर्माण झाला. आज जी

मराठी भाषा लिहिली जाते तिचा निर्माता असें त्याला यथार्थत्वानें म्हणतां येईल. लोकहितवादीप्रभृति उपरिनिर्दिष्ट सरळ बुद्धीच्या, निष्पाप अंतःकरणाच्या, समाजाची दुरवस्था पाहून हृदय कालवून गेल्यानें काय करूं नी काय न करूं असें होऊन गेलेल्या माणसांच्या पांडित्यरहित कार्याची त्यानें इतकी यशस्वी हेटाळणी केली, कीं प्रगतिपथावर चालत आलेल्या एका समाजाची गाडी त्याच्या लेखणीच्या फटकाऱ्यानें थांबविली गेली.

वर सांगितलेला पराक्रम लेखणीनें घडवून आणलेला असल्यानें अर्थातच या विषाची बाधा साक्षर समाजास विशेष झाली. ही बाधा किती तीव्र होती तें समजण्यास एका विवेकी पंडिताच्या ग्रांथिक लिखाणाचा पुरावा उपलब्ध आहे. सन १८९५ सालीं फर्ग्युसन कॉलेजचे प्रिन्सिपाल महादेव शिवराम गोळे यांनीं 'ब्राह्मण आणि त्यांची विद्या' हा ग्रंथ लिहिला. त्याची प्रस्तावना मोठी उद्बोधक व तत्कालीन समाजावर चांगला प्रकाश पाडणारी आहे. ब्राह्मणादि पांढरपेशा साक्षर लोकांची स्थिति व त्यांचें भविष्य या ग्रंथांत चर्चिलें आहे. या लोकांतील 'अज्ञ, अजगरवृत्ति, अजागळ श्ववृत्ति' अशा बहुसंख्य ब्राह्मणांचा वर्ग सोडला तर बाकीच्यांत "कांहीं पेनलोप राणीच्या पाणिग्रहणार्थ जमलेल्या राजपुत्राप्रमाणें घमंडानंदन आहेत. त्यांस या भरतभूमीनें मिजासीनें वागवून, त्यांच्या अप्रयोजक हेतूंचा भंग न करतां मोठ्या खुषींत ठेवलें पाहिजे. त्यांचा अविचार, त्यांची नीच कृत्यें, त्यांचें औद्धत्य, त्यांचा अप्रामाणिकपणा व त्यांचा भेकडपणा यांपैकीं कोणा एकाचेंहि आविष्करण केल्यास ते तत्काल भरतभूमीचे प्रबल शत्रु होण्याचा आव घालतात. कोणास अशी मिजास व प्रसिद्धि नको असते खरी; परंतु ते दुसऱ्याच्या आश्रयानें कृष्णसर्पाप्रमाणें राहिलेले दिसतात व त्यांच्या शेपटावर पाय पडतांच ते फोंफों करीत बाहेर पडून जो पुढें दिसेल त्याचा चावा घेतात." "याप्रमाणें हा अवांतर ब्राह्मणसमाज बहुरूप आहे. तो अहंकाराच्या किल्ल्यांत उपोषित पण सुरक्षित बसलेला आहे. त्यास सावध करण्यास भयंकर तोफखाना सुरू केला पाहिजे." गोळ्यांनीं सांगितलेला तोफखाना लोकहितवादीप्रभृतींनीं त्यांच्या या लिखाणापूर्वी पन्नास वर्षें सुरू करून चांगलाच भडीमार केला होता. पण त्यांचें कार्य त्यानंतर पुन्हा जी 'पेशवाईची सांवली' महाराष्ट्रावर पडली, तेणेंकरूण विफल झालें. इतकें कीं गोळ्यांसारख्या अधिकारप्रसंन्न पंडिताला सुद्धां आपला ग्रंथ प्रसिद्ध करतांना वर सांगितल्याप्रमाणें डर वाटत होती. आपल्या प्रस्तावनेंत ते लिहितात :

"एका विचारी मित्रानें हा ग्रंथ लिहीत असतांच तो वाचून पाहिला; तेव्हां तो म्हणाला, 'अहो, हें सर्व खरें आहे, सगळ्यांच्या अनुभवासहि येईल. परंतु त्यापासून कांहीं फायदा होईल म्हणून तुम्हांस वाटतें काय ? मला वाटतें फायदा व्हायचा लांबच राहिला; परंतु स्वतःवर कडक टीका करून घेण्याचा मात्र हा तुमचा प्रयत्न झाला !' (आमच्या ह्या लेखाचा परिणामहि तसाच होणार !)कदाचित् हें भविष्य खरें ठरेल. कारण मला वाटतें, आधुनिक सुशिक्षितांस ग्रंथांच्या द्वारें अप्रिय परंतु पथ्य सांगण्याचा फारा

वर्षांनीं हा पहिलाच प्रयत्न आहे. निबंधमालाकारांनीं पुष्कळ ब्राह्मण तरुणांच्या विचारांस जी पद्धत कांहीं वर्षांपूर्वी एकदां लावून दिली तीमुळें (ब्राह्मणांत कांहीं दोष आहेत असें परस्थ लोक खुशाल समजोत) स्वतः ब्राह्मण आपणांत कांहीं दोष असतील असें मनांत आणण्यास देखील नाकबूल झाले आहेत. परंतु अशा तरुणांसच त्यांच्या चालू वर्तनामुळें पुढें जी निश्चितपणें विपत्ति येणार तिचें चित्र दाखविण्याच्या हेतूनें हा ग्रंथ लिहिला आहे...कारण ब्राह्मणांचा चालू क्रम पुढेंहि सुरू राहिल्यास मला तरी त्यांची धडगत दिसत नाहीं."

गरीब बापडे प्रिन्सिपॉल गोळे! त्यांचा ग्रंथ लोकहितवादींच्या हितकर लेखांप्रमाणेंच गाडला गेला आणि त्यांची 'सामर्थ्यवान् गोलंदाजी' 'बलाढ्य पुरुषांना त्वरित काम हातीं घेण्यास इषारा' देणारी ठरली नाहीं. ब्राह्मणप्रभृति साक्षर पांढरपेशांची स्थिति त्याच घसरटीच्या मार्गावर आहे आणि अरबी भाषेंतील गोष्टीप्रमाणें विनाशरूपी लोहचुंबकाच्या खडकावर त्यांचें वाहवत चाललेलें तारू सुज्ञ कर्णधाराच्या अभावीं केव्हां जाऊन आपटतें तेवढेंच पाहावयाचें उरलें आहे. कारण? पुन्हा पुन्हा पडत असलेली वर सांगितलेली 'पेशवाईची सावली'! त्यामुळेंच लोकहितवादींनीं नव्वद वर्षांपूर्वी केलेलें कार्य आज पुन्हा करण्याची आवश्यकता भासत आहे.

पेशवाईत वर्तमानपत्रें नव्हतीं; पण ठिकठिकाणची बातमी खेळविण्याचा एक तत्कालीन मार्ग मुसलमानांनीं सुरू केलेला होता. तो म्हणजे जागोजागच्या अखबारनवीसांनीं लिहून पाठविलेलीं बातमीपत्रें वाचण्याचा. हा मार्ग सत्ताधीश व श्रीमंत यांनाच उपलब्ध होता. काबूल, लाहोर, दिल्ली, ग्वालेर, लखनौ, कलकत्ता, मद्रास, मुंबई वगैरे सर्व ठिकाणचीं बातमीपत्रें धंदेवाईक अखबारनवीस फारसीआदि भाषांत लिहून पाठवीत. पुण्यांतील पेशव्यांच्या पारसनवीसांकडे आलेले असले हजारों अखबार आजहि उपलब्ध आहेत. ते वाचून तत्कालीन वार्ता कळण्यास फारच उपयोग होतो. मराठ्यांनीं आपले स्वतंत्र बातमीदारहि बातमी मोडींत लिहून पाठविण्यासाठीं ठिकठिकाणीं ठेवले होते. त्यांचीं बातमीपत्रें अव्वल इंग्रजींतील वर्तमानपत्रांइतकींच मनोरंजक व उद्बोधक आहेत. इंग्रजांचें राज्य सुरू झालें तेव्हां आरंभीं त्यांच्यांतील एल्फिन्स्टनप्रभृति मुत्सद्यांनीं आपल्या जुन्या अखबारवाल्यांचा उपयोग आपल्या कार्याकडे करून घेतला. म्हणून त्यांतील थोडे उतारे येथें देतों :

धोत्रजोडा श्रीशंकराचार्य [रु. १८] (पृष्ठ १६१).

१ देणें शंकराचार्यांच्या मठांत पंचवटिकेमध्यें स्वामींच्या लेकीस खणपैठणी १ (पृष्ठ २१४).

'पेशवाईच्या सावलींत' चापेकरांनीं दिलेल्या वरील उताऱ्यांवरून संन्यासी शंकराचार्य भारी किमतीचे धोतरजोडे पेहरीत व आपल्या गृहस्थाश्रमांतील कुटुंबासह एकत्र राहात हें कळतें. वाईच्या काशीनाथशास्त्री लेल्यांनीं टीका केलेले तीस वर्षां-

पूर्वीचे शंकराचार्य ब्रम्हनाळकरबोवा हे पलंगावर शय्या करीत व पादसंवाहनाला दासी बोलावीत. त्यांची परंपरा अशा रीतीनें पेशवाईपर्यंत जाऊन भिडते. कारण संन्याशाला अयोग्य असा आचार त्या वेळींच सुरू झालेला दिसतो.

धर्मनियंत्या शंकराचार्यांची ही तऱ्हा, मग रंगेल बाजीराव पेशव्यांचें काय विचारावें ? त्यांनीं पुण्यांत शुक्रवार पेठेंतली विख्यात बावनखणी तर बांधलीच, पण स्वारीचे घरगुती पराक्रम त्याहून उल्लेखनीय आहेत. धुळ्याचे रामदास देव यांच्या सत्कार्योत्तेजक सभेनें 'पेशवाईची अखेर' नांवाचें नोंदीरूप बखरीचें पुस्तक छापलें आहे. त्यांत पुढील नोंदी आढळतात :

१ श्रीमंत पुण्याहून फुलगांवास रथांत बसून जात होते. पांडुरंगपंत ढमढेरे यांची स्त्री श्रीमंतांजवळ रथांत होती. (पृष्ठ १०३).

२ बाजीरावसाहेब यांचें पांचवें लग्न पुण्यांत जाहालें. शरीरसंबंध हरिपंत ढमढेरे यांची कन्या. पांडुरंगपंत ढमढेरे यांनीं मोठा समारंभ करून लाखों रुपये खर्च करून श्रीमंतांची मर्जी खूष केली. (पृष्ठ १४४).

३ ढमढेरे यांजकडे सरंजाम विठ्ठलराव वगैरे अंबीकर प्राचीन सरदार याची जप्ती करून तो व आणखी लोकाकडील सरंजाम जप्त करून लावून दिल्हा. (पृष्ठ १५२)

या तीन नोंदींचा समन्वय वाचक करतीलच.

४ कासिबाई पेठी, त्रिंबकराव अमृतेश्वर पेठ्ये यांची स्त्री शके १७१८ पासून नेहमीं श्रीमंतांकडे येतजात होती. मर्जीप्रमाणें वागून श्रीमंताची मर्जी हरवख्त खूष करीत होती...पुढें श्रीमंत त्याजवर (पेठ्यावर) गैरमर्जी होऊन त्यांचा सरंजाम व इनाम गांव सरकारांत घेतले आणि कासिबाई लोभांत सबब दोन हजार रुपये इतलाख सालिना खर्चास द्यावयाचें ठरविलें. पुढें कासिबाई मर्जीप्रमाणें न वागे. सबब कासिबाईस कैद करून त्रिंबकेश्वराच्या किल्ल्यावर पाठविली. (पृष्ठ १६१).

५. श्रीमंतांचें दुर्दैव (?) उभें राहिलें. यामुळें जे आच्यार कधीं कोणीं केले नसतील तसे करूं लागले. माहुलीचे वाड्यांत गंगाबाई राजमाचीकरीण विधवा बायको. तिचे अंगावर आपला मर्दानी पोषाख जवाहीर घालून तिला गादीवर बसऊन आपण खिसमतगार होऊन चवरी वारूं लागले. असे अनेक प्रकारचे वेव्हार होऊं लागले ते कितेक ल्याहावे ? (पृष्ट १८९).

बापडा लेखक पापभीरु. त्याची लेखणी लिहितांना आडली. पण बाजीरावाची समजूत अशी, कीं क्षेत्राच्या पुण्यभूमींत पापें जळून भस्म होतात. फार तर दुसऱ्या दिवशीं कृष्णावेण्या संगमावर चार बुचकळ्या जास्त मारल्या कीं झालें !

एकोणिसाव्या शतकाच्या आरंभीं पुण्याभोंवतीं बाजीरावानें जो विषवृक्ष लावला, तो त्याचें राज्य गेलें तरी मागें पन्नास वर्षें फोंफावतच राहिला. म्हणूनच सरदारकुळांत वाढलेले लोकहितवादी सन १८४८ सालीं लिहितात, "व्यभिचार मात्र अशानें बहुत

वाढला आहे आणि विप्रस्त्रियांनीं इतर जातीपेक्षां ताळ टाकला आहे हें बहुत लोक समजतात. व पूर्वींपासून बाजीराव पेशवे यांचे अंमलांत लोकांमध्यें भ्रष्टाकार होऊन जी अधर्मप्रवृत्ति उत्पन्न झाली, तीस लोकांचे अज्ञानानें उत्तेजन आलें आहे व येणेंकरून ब्राम्हणधर्मास फार लज्या आली आहे." (शतपत्री–पत्र २ रें).

"बापाचें श्राद्ध किंवा कपिलाषष्ठीचा पुण्यकाळ आला तर आनंदानें गरिबांस यांच्यानें दोन पैसे धर्म करवत नाहीं आणि शिमग्यांत दुष्ट स्त्रियांचे पोषणाकरितां उल्हासानें द्रव्य देतात. तेव्हां (कृष्णराव मराठ्यांची क्षमा याचून) साजिंदे आणि भडवे हे यांचे पूर्वजन्मींचे ऋणी असतील असें वाटतें. आमचें हें पुणें शहर मोडलें आहे; तत्रापि आपल्या लग्नाच्या स्त्रिया व सख्या आया यांस पोटास घालायची भ्रांति असली तरी कर्ज काढून कसबिणींच्या हातांत दोन रुपये दिले नाहींत तर त्यांस असें वाटतें, कीं आमची मंडळीं (जांचे सोबतींत फिरतों ती) आम्हांस हंसेल...पुणें द्रव्यानें हलकें आहे खरें; परंतु दुष्कर्मांत येथील लोक द्रव्यमान् शहरांपेक्षां अधिक आहेत. व बहुत लोक आपले सामर्थ्याची पराकाष्ठा करून रांडांचे ताफे बाळगण्याचा खर्च जीवदारभ्य करतात." (पत्र ४)

"(उत्तर) हिंदुस्थान प्रांताची खबर ऐकली आहे, कीं तिकडे देवळांत कसबिणींस येऊं देत नाहींत व जेथें गरती स्त्रिया बसतात तेथें रांडांस बसूं देत नाहींत. परंतु पुण्यांत हा बंद कांहींच नाहीं. कुळीण स्त्रिया आणि कसबिणी एका जागीं मिसळतात." (पत्र ११).

आश्चर्य काय, कीं विष्णुशास्त्री चिपळुणकरांनीं सव्वाशें पानें लोकहितवादींवर लिहूनहि त्यांस बाजीरावानें पुण्याचा रांडवाडा करून सोडला हें कबूल करावें लागलें. कारण शास्त्रीबोवांच्या घरापर्यंत पेशवाईची ही सावली येवून पडली होती.

बाजीरावानें ब्राह्मणभोजनें व बायका यांचा धुमाकूळ महाराष्ट्रांत पसरविला तरी त्यांत मदिरादेवीला स्थान नव्हतें याबद्दल एल्फिन्स्टनसाहेबाला साश्चर्य कौतुक वाटल्याचें त्यानें लिहिलें आहे. पण इंग्रजी अमलांत या व्यसनाची वाढ फार झपाट्यानें झाली. इतकी कीं लोकहितवादींस त्यावर एक खरमरीत लेख लिहावा लागला. पण या व्यसनाच्या ब्राह्मणसमाजांतील वाढीला धार्मिक भोळेपणाची मदत झाली. कोठून कोणास ठाऊक, पुण्यांत शाक्त पंथ निर्माण झाला. या पंथावर 'प्रभाकर'च्या २३ एप्रिल १८४८ च्या अंकांत लोकहितवादींनीं लिहिलें आहे. मजकूर मनोरंजक व त्या वेळच्या वस्तुस्थितीवर प्रकाश पाडणारा आहे म्हणून येथें थोड्या विस्तारानें देतों :

"हिंदुधर्मांत बहुत पंथ आहेत. मला वाटतें, कीं सरासरी शंभर एक असावे. असेच दुसरे धर्मांतहि आहेत; परंतु या पंथांपैकीं एक दुर्घट पंथ तंत्राचा आहे. म्हणजे रुद्र, यामल व योनीनीलतंत्र वगैरे ग्रंथ आहेत, त्यांत शक्तिउपासना करण्याचा मार्ग लिहिला आहे...तो पंथ अलीकडे दक्षिणेंत पुणें इत्यादि ठिकाणीं बहुत चालू

लागला आहे. त्याचें कारण पाहिलें असतां लक्ष्मी प्राप्त व्हावी, पुत्रकामना इत्यादिक वासना तृप्त व्हाव्या म्हणून उपासना करितात असें शाक्त सांगतात. परंतु मला वाटतें, कीं तें कांहीं नाहीं. त्यांची मद्यमांस खाण्याचीं व्यसनेंच प्रमुख आहेत. तीं पुरतीं होण्याकरितां निमित्त करून कितीएक निर्लज्यपणें आपले घरीं दारूचे कारखाने करून मद्य तयार करितात व कितीएक विकत घेतात व ते जरी गुप्तपणानें असें करितात तरी त्यांचे श्रीमुखाची दुर्गंधि जेथें बसतील तेथें प्रगट होऊन हे शाक्त आहेत असें सर्वांस समजतें व कितीएक मस्त होऊन घरीं व रस्त्यांत सांपडतात. या गोष्टी प्रसिद्ध आहेत. परंतु त्यांच्या प्रतिबंधाचा उपाय कोणी लोक समजून करीत नाहींत. या पंथांतील लोकांस वाममार्गी किंवा वामाचारी असें म्हणतात आणि शाक्त हेंहि त्यांचें नांव प्रसिद्ध आहे. प्रथमतः जास मद्यमांस खावें अशी बुद्धि होते तो जे दुसरे वाममार्गी आहेत त्यांचे भजनास लागतो. नंतर ते एक दिवस बहुधा अमावास्या किंवा अंधारी रात्र अशी योजितात आणि त्या दिवशीं त्या उमेदवारास आपले धर्मांत घेण्याचा संस्कार करितात. तो असा, कीं त्या दिवशीं मध्यरात्रीस आठ आसामी वाममार्गी आणि आठ स्त्रिया—एक एक वेगळाले जातीची असावी म्हणजे विधवा ब्राम्हणी, परिटीण, न्हावीण, कळवंतीण, गौळीण, कोष्टीण, सोनारीण, ब्राम्हणी सुवाशीण. एकूण आठ त्या गुरूच्या घरीं मिळोन येतात आणि तेथें स्थंडिल घालून आठ कलश मद्याचे व मांस असे मांडतात. अग्नि पेटवितात आणि त्याजवळ काली म्हणजे देवीची मूर्ति मांडितात. नंतर प्रत्येक पुरुष प्रत्येक स्त्रीचे शेजारीं बसतो आणि पूजा करितात. नंतर प्रतिज्ञा करवितात, कीं मी आजपासून जातिनिषेध मानणार नाहीं व मद्यमांस भक्षीन व स्त्री स्वकीय किंवा परकीय यांचे ठायीं निषेध किंवा व्यभिचार मानणार नाहीं. मला सर्व सारखें आहे. भैणेंकरून भगवती मला मेल्यावर मोक्षास नेवो आणि या जन्मीं सुखसंपदा देवो. नंतर पूजा संपूर्ण झाली म्हणजे तंत्रशास्त्रांतील कांहीं उपदेश करितात...आणि स्त्रियांस ते भैरवी म्हणतात व आपल्यास भैरव म्हणतात व दारूस सिद्ध म्हणतात. अशीं विलक्षण नांवें घेऊन कोणी नग्न होऊन नग्न स्त्रियांची पूजा करितात आणि तिचे ठायीं देवीचें स्थापन करितात. कितीएक व्यभिचार करितात आणि कितीएक महार व मांग यांचे हातचें जेवतात. शिवरात्रीस किंवा एकादशीसदेखील अशीं कर्में करितात आणि त्यांचे आणखी पुष्कळ विधि आहेत!"

उतारा पुष्कळ लांबला, पण त्यावरून हीन समाजांत कोणतीं रोपटीं झपाट्यानें वाढतात तें समजतें. गेल्या शतकाच्या मध्यास ब्रह्मकुलबादशाहीच्या पुण्यनगरीची ही अशी स्थिति होती. या गोष्टी चवाठ्यावर आणणारे लोकहितवादी समाजांत निंदास्पद झाले आणि त्यांवर हल्ला चढविण्याची शिपाईगिरी करणारे धाकटे शास्त्रीबोवा देशभक्तीचा गाभा ठरले! इतिहासाचार्य राजवाडे ब्राह्मणांचें वैशिष्टय सांगतांना त्यांची गोत्रशुद्धि, मद्यमांसाचा वासहि नाहीं असें त्यांचें शुद्ध रक्त ही सांगत. वरील उताऱ्यांवरून या

अभिमानास सत्याचा कितीसा आधार सांपडण्यासारखा आहे हें समजेल. आजहि ब्राह्मणकार्यालयें, कऱ्हाडे ब्राह्मणसमाज, चित्पावन ब्राह्मणसंघ प्रभृति नवनवोत्थित संस्था पाहून ब्राह्मण्याचें पुनरुज्जीवन होत असल्याचा भास कोणास होईल पण त्यांच्या नाकांवर टिच्चून जीं आर्यांच्या पारसीक बांधवांची भाग्यवर्धक (लकी) उपाहारगृहें (रेस्तोरॉं) पसरत आहेत; कुक्कुटांडविक्रेत्यांच्या ज्या पाट्या जागोजाग लटकत आहेत; पोल्ट्री फार्मांचा जो गराडा पुण्याभोंवतीं पडत आहे; ठिकठिकाणीं तारकांचें (ष्टार्स इत्यर्थः) जें चमकणें निनादत आहे; त्यांच्या पार्श्वभागाशीं पार्श्वभाग भिडवून बसण्याची अहमहमिका ब्रह्मकुलोत्पन्न साहित्यिकांत भरसभेंत जी दृष्टोत्पत्तीस येत आहे आणि वर्तमानपत्रांतील व ग्रंथांतील या साहित्यिकांच्या लिखाणांवरून हे तर्रर तर झालेले नाहींत ना असा जो रास्त संशय कोणालाहि सहज येण्यासारखा आहे, तो पाहातां या पुनरुज्जीवनाबद्दल मन आपोआपच साशंक होतें.

वर जो शाक्तमार्ग वर्णिला तो आसाम, बंगाल व उडिसा प्रांतांत फार जारी होता. तंत्रविद्येचें माहात्म्य बंगाल्यांत फार मोठें आढळतें. असा कालिभक्त शाक्त वाटेल तें करूं शकतो अशी भावना तत्कालीन हिंदुस्थानांत सर्वत्र होती. त्याचें एक उदाहरण ऐतिहासिक अखबारांत आढळतें. तें येणेंप्रमाणें :

"१. भोसले याजपासी बंगल्यांतील बैका च्यार नग्न आहेत. त्या सामील होऊन म्हणे पडले (म्हणूं लागल्या), आपण (भोसल्यांनीं) इंग्रजांसी लढाई घ्यावी. त्याचा (इंग्रजाचा) दारूगोला तुम्हावर विद्याचे सामर्थ्यें न चाले ऐसें करितो म्हणोन जवल येऊन राहिल्या आहेत."

(नं. २४६ ता. ४ नोवेंबर १८१८. पेशवे दप्तर नं. ४१)

नागपुरकर भोसल्यांची इंग्रजांच्या दारुगोळ्यावर तोड काय, तर चार नग्न बायका उभ्या करावयाच्या! मग इंग्रजांचें काय चालतें! अशा मंडळीच्या हातीं स्वराज्य असल्यावर तें गेलें कां याचा काथ्याकूट कशाला? ही बातमी बळवंतराव बापूजी अखबारनवीस वेलसाहेबास कळवीत आहे.

अनेक शाक्तपंथी मंत्री आपल्या वैऱ्यावर, प्रतिस्पर्ध्यावर किंवा शत्रूवर जारण-मारण चेटूक करण्यासाठीं त्या काळीं मोठमोठे राजकारणी पुरुष पाळीत असत. पेशवाईत रतनसिंग जाधवराव मालेगांवकर याच्या पदरीं भास्करराव उपाध्ये असत. ते मोठे शाक्त म्हणून नांवाजलेले होते. त्याचे शिष्य उमानंदनाथ व उपेंद्रबाबा तेलंग साताऱ्यांत असत. त्यांचे नातू मल्हार श्रौती पुण्यास प्रसिद्ध होते. बचादेव माहुलीकर हेहि मोठे शाक्त होते. यवतेश्वरचे द्रवीड यंत्रशास्त्री म्हणून पेशव्यांनीं नेमणूक देऊन ठेविले होते.

महादजी शिंदे यांवर अनुपगीर गोसावी हिंमतबहाद्दर यानें अनुष्ठान केलें, त्यामुळें आपण मरणांतिक आजारी पडलों अशी महादजीची समजूत झाली म्हणून

त्यानें गोसाव्यास धरावयास सैन्य पाठविलें. तो पळून अलीबहादूराच्या आश्रयास गेला. त्यामुळें चिडून महादजी युद्धास प्रवृत्त होण्यापर्यंत मजल गेली होती. या प्रकरणांत महादजीसारख्या धुरंधराचीं दोन वर्षें मोडलीं. त्यामुळें त्याचें नाना फडणीस, अलीबहाद्दर यांशीं वांकडें पडलें व मराठी राज्यास उतरती कळा लागली. महादजीनें चौकशी केली तींत नागरीण बायको वृंदावनास प्रयोग करीत होती; तिजला धरून आणली; मारहाण करून चौकशी केली; दांत पाडिले; हातांत पलिते बांधून बोटें जाळलीं. तिनें गुलजार खोजा हिंमतबहाद्दर गोसावी यांचें नांव घेतलें. अलीबहादरनें गोसाव्यास दोन वर्षें नजरकैदेंत ठेवलें होतें. त्यास नंतर सोडून त्याच्या मदतीनें बुंदेलखंड जिंकलें. हा हिंमतबहाद्दर १८०२ सालीं इंग्रजांस मिळाला व त्यानें तो प्रांत इंग्रजांच्या वशांत घातला. (सरदेसाई रियासत उत्तरविभाग २, प्रकरण एकोणिसावें पहा).

अंधःश्रद्धा आली तेथें बोवा आलेच. यांची पैदास पेशवाईच्या अखेरीस व अव्वल इंग्रजींत खूप होती. मोठेमोठे राजेहि यांस नमून असत आणि त्यांची चंगळ होती. ग्वालेरीस दौलतराव शिंद्याजवळ कृष्णाजी नाईक गायकवाड नांवाचा आपला हस्तक त्रिंबकजी डेंगळ्यानें बातमीसाठीं आणि कारस्थानासाठीं ठेविला होता. तो सन १८११ पासून १८१५ पर्यंत पुण्यास बातमीपत्रें लिहून पाठवी. तीं बातमीपत्रें पेशवे दप्तर नं. ४१ च्या अखेरीस छापलीं आहेत. त्यांत शिंद्याच्या दरबारांतील घडामोडी आलेल्या आढळतात. दौलतरावांची दिनचर्या पाहिली तर अर्धा वेळ धार्मिक श्रद्धेच्या गोष्टी करण्यांत मोडलेला आढळतो. दरबारी नोकर, आश्रित, आप्तइष्ट यांच्यांत तिसरा पाद खर्च होई. राहिलेल्या चतुर्थांत राजकारण, राज्यव्यवस्था, फौजफांटा इत्यादींचा अंतर्भाव होई. ऐन तारुण्यांत दौलतराव पुण्यासभोंवतालच्या प्रदेशांत होता; यामुळें बाजीरावाची संगत शिंद्यास बरीच लागलेली दिसते. तरीहि दौलतराव शिंदे आणि यशवंतराव होळकर बाजीरावाहून खूपच हुषार दिसतात. पण बाजीरावानें मूर्खपणानें त्यांशीं राखावें तसें सूत राखिलें नाहीं. स्वतः तो भेकड होता. अस्तु. या बातम्यांतील कांहीं उतारे येथें देऊं :

"अन्ना महाराज संन्यासी जगदेवराव निंबालकर याचे गोटांत आहे. त्याचे खर्चाचे साहिते न जाले. सबब ते रागास येऊन पांचचार कोसावर राहिले. त्याजला आणावयास आबाजी घाटगे याजला पाठविले." (पत्र नं. ३०३)

संन्यास घेऊन पुनः या अण्णाला खर्चाचें साहित्य पाहिजे. हा खासा संन्यास! बरें हवें तर हवें, त्याबद्दल राग तरी नसावा. तोहि भरपूर! धर्मनिष्ठ दौलतराव या बोवांच्या आविर्भावास घाबरून आपला दूत पाठवितो हें आणखी आश्चर्य!

"गंगारूप बालाबाई देशमुख सितोले याणी राधाकृष्णाच्या मूर्ति केल्या. त्यांचें लग्न आरंभिलें. वे. बालंभट याजकडे कृष्णाची मूर्ति दिल्ही. राधेची मूर्ति आपण ठेवली. यासंबंधें बाईस गडगनेर आलिज्याबहादुर याणी केले. वाड्यासभोंवतीं जागा

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत.
अनुक्रम २६२८ विः
क्रमांक ९२०३ नोंः दिः



नीट करून रोशनाईस तारांगणें व आतसबाजी केली. नदीस आगाडीवर डेरा देविला. सौ. बायेजाबाई बालाबाईकडे व चिमणाबाई शहरांत सेनापतीचे मातुश्रीस आणावयास गेल्या. प्रहर दिवस येतां बालाबाईची स्वारी वाद्यघोश करीत मिरवत आली...बायांकडे कलावंतनीचा नाच व स्नानें जालीं. सवा दोन प्रहरां भोज्यन जालें...च्यार घटिका रात्रीं श्रीजीची मूर्ति श्रीमंतपूज्या करून नदीस डेरा दिल्हा, तेथून मिरवत आले. जानवसा पोतनिसाचे गोटांत डेरा दिल्हा. बाईची स्वारी प्रहर रात्रीं वस्त्रेंदागिणे घेऊन आपले वाड्यांत गेली." (पत्र ३०९).

माणसांचीं लग्नें थोडीं झालीं तर मूर्तींचीं लग्नें! गंगारूप बायांस मिरवण्यास तेवढीच सवड! यांत गडगनेराचें भोजन साधतें व वस्त्रेंदागिणेहि पदरीं पडतात!

"केदारजी सिंदे याचे मातुश्रीणे देवास नवस केला होता, आलिज्याबाहादुर यांजला आराम द्यावा, मी दंडवत करीत देवलीं दर्शनास येईन. तिजला लुगडे देऊन दोन घटका रात्रीं नवस पुरा केला. मागावून आपण (दौलतराव) दर्शन करून आले." (नं. २८६).

"दोन घटिका रात्रीं राजश्री त्रिंबकराव दाभाडे याजला बोलाऊन मीर असदअल्ली यांचे येथें ताज्याचे दर्शनास गेले. तीन घटिका परियेंत मरसिये ऐकूण स्वारी वाड्यांत आली. दाभाडे याजला फकिरीचे वस्त्रें बाईकडे मोहरा फकरीच्या दिल्या." (२९६).

"दोन घटिका रात्रीं स्वारी सेनापतीचे येथे ताज्याचे दर्शनास गेली. दोन घटिका मरसीये ऐकून पांचवीचे आमलांत वाड्यांत आले." (२९७)

हिंदूंचे देव थोडे झाले तेव्हां मुसलमानाचे ताजिये! मराठी साम्राज्याच्या सेनापतीच्या घरांतहि ताजिया! मग फकिरीचीं वस्त्रें धारण करणें हें ओघानेंच आलें!

ब्राह्मणभोजनें, दक्षिणा, हव्यकव्य, उत्सव यांबद्दल येवढेंच सांगितलें कीं पुरे, कीं दौलतराव हीं सर्व बाजीरावाजवळ पुण्यास शिकून गेला होता आणि शिष्य गुरूहून फारसा कमी नव्हता.

अव्वल इंग्रजींत देवमामलेदार, अक्कलकोटचे स्वामी, माणिक प्रभु वगैरे साधु झाले ते प्रसिद्ध आहेत. पण नारायणबोवा पिपोडेकर याची हकीकत लोकहितवादी देतात ती अशी :

"सन १८३० सालीं सातार्‍याजवळ पिपोडें येथें एक कुळंब्याचा मुलगा नारायण-बोवा म्हणून प्रसिद्ध झाला होता. त्याचीहि मोठी जत्रा भरूं लागली होती. एक वेळ तर सातारचे महाराज व मालकमसाहेब गव्हरनर हेही त्याचे भेटीस गेले होते. हा बोवा साप धरीत असे ही त्याची मुख्य करामत होती. परंतु पुढें तो मुलगा साप चावूनच मेला!" (ऐतिहासिक गोष्टी, भाग ३, पुरवणी पृ. १३).

हा आधुनिक पांचलेगांवकर महाराजांचा पूर्वावतार दिसतो.

लोकहितवादी १८४८ सालीं 'प्रभाकरां'त लिहितात, "दररोज नवीन संत उत्पन्न होतात व मग पैका जमला म्हणजे त्यांचीं भांडणें लागतात. कितीएक शिष्य त्यांस सोडून

जातात व बावांना शिव्या देतात. बाबांचीं कर्में पाहिलीं तर उच्चार करवत नाहीं. कोणी व्यभिचारी, कोणी लब्राड असे आहेत. सारांश, ते साधु नव्हत. ते द्रव्याच्या लोभाकरितां जेथें पुष्कळ लोक जमतात तेथें कथा, भजन करितात आणि लोक जमत नाहींसे झाले म्हणजे चालते होतात. असे लोकांना ठकवीत फिरतात...साधूनें कसें राहावें येविषयीं तुकारामाचा अभंग असा आहे—

हरिभक्त जे म्हणविती ।
हीनादीना कां मागती ॥
देखुनि सभेचा समुदाय ।
दावी भक्तीचा हो भाव ॥
कथेमध्यें हालवी ढोंग ।
संत नव्हे तो बेसंग ॥
पाहुनि स्त्रियांचा तो मेळा ।
काढी सुस्वर तो गळा ॥
तुका म्हणे नव्हे योग ।
पोटासाठीं केलें ढोंग ॥१॥
जेथें कीर्तन करावें ।
तेथें अन्न न सेवावें ॥
तट्टुबैलांशीं हो दाणा ।
तेथें मागूं नये जाणा ॥
बुका लावूं नये भाळा ।
गळां घालूं नये माळा ॥
तुका म्हणे तेचि संत ।
बाकी सगळे ते हो जंत ॥२॥"

'गंध झोरकीदार, मुद्रा चक्रीदार, शेंड्या घेरेदार' राखणाऱ्या हरिदासांच्या हातून ढोंगाखेरीज काय होणार, असें लोकहितवादी विचारतांना आढळतात. त्यांना अलीकडचे बावा ठाऊक नाहींत! काळ्या रामासमोर अशा थाटांत नाच करून वेश्यांच्या मध्यें घर बांधतां येतें असें मुंबई पाहाणारांस दिसून येईल. खेरीज गौरकाय अमेरिकन आणि युरोपियन शिष्या करणारे विसाव्या शतकांतील बावा नवीनच उद्भवलेले दिसतील.

ज्या बाजीरायीची सावली गेल्या शतकांतील पुण्यावर पडली होती, तिचें पोषाखी वर्णन लोकहितवादी अनुप्रासयुक्त शब्दांत असें करतात—'सोदे उनाड' लोक, 'सेंडी संजाबदार, पागोटें कंगणीदार, जोडा अणीदार, अंगरखा कळीदार, मिशा पीळदार, धोत्रें

चुणीदार, भोंवया कमानदार, गंध सांखळीदार आणि छाति गोलदार' काढून त्या वेळीं मिरवीत. आजहि क्वचित असला नमुना बुधवारांत फिरलें तर आढळतो.

लोकहितवादींचें समाजसुधारणेचें कार्य चिपळूणकरांनीं बोळा फिरवून पुसून टाकलें आणि शास्त्रीबोवांना गुरु मानणारा जो एक मोठा मानभावी पंथ महाराष्ट्रांत बद्धमूल झाला, त्यानें कोणत्याहि सुधारणेची टाकी रुतूं न देण्याचा उपक्रम गेल्या तीन पिढ्या सुरू ठेवला आहे. याचा परिणाम असा झाला आहे, कीं ज्या सुधारणा नूतन सुशिक्षितांनीं क्रमाक्रमानें करीत जावयाच्या, त्या थोपून राहिल्या आणि आतां क्रांतीच्या वेफाट मार्गाखेरीज त्या कधीं होतील कीं नाहीं याची शंका वाटूं लागली आहे. साहसी लोक वैयक्तिक क्रांति करून डॉ. केतकरांप्रमाणें आपलाले प्रश्न मन मानेल तसे सोडवीत आहेत. पण सामुदायिक सुधारणेचा मार्ग खुंटला आहे. कै. इतिहासाचार्य राजवाडे या विचारवंताला आपल्या आयुष्याच्या शेवटींशेवटीं हा सर्व प्रकार उमगला होता. कदाचित् रशियन क्रांतीची व साम्यवादाची विचारसरणी कळून असा फरक झाला असेल! सर्व अंधश्रद्धेची मूलभूत जी देवकल्पना तीविषयीं राजवाडे म्हणतात :

"...जातिरूस्पथ होऊन बसल्यामुळें अन्योन्य बेटीव्यवहार म्हणजे प्रजोत्पादनाच्या कामीं सहकार ह्या निरनिराळ्या गटांत होणें अशक्य झालें. आणि कधींकाळीं ते सर्व गट मिळून एक भरीव सजातीय समाज होणें प्रायः असंभाव्य होऊन बसलें. एकटा देवधर्म घेतला आणि त्या दृष्टीनें ह्या गटांकडे पाहूं गेलें, तर कातकरी पिशाच्चपूजक, यहुदी, मुसलमान व खिस्ती मनुष्याकार एकदेवपूजक होते, पारशी अग्निपूजक ऊर्फ पंचभूतांपैकीं एका भूताचा पूजक होता आणि हिंदु पशुपक्षिमनुष्याकार अनेकदेवपूजक असून शिवाय अग्निआदि पंचभूतें, पिशाच्चें, एकदेव, झाडें व दगड ह्यांचा भक्त होता. इतकेंच नव्हे, तर स्वतःच देव, ईश्वर व ब्रह्महि होता. देव एक आहे हें जितकें खरें, तितकेंच ते कोट्यवधि आहेत हेंहि खरें असल्यामुळें, म्हणजे दोन्ही कल्पना केवळ बागुलबोवा-प्रमाणें असत्य असल्यामुळें, कातकरी, यहुदी, खिस्ती व हिंदु हे सारेच अनेक निराधार व अवास्तव कल्पनांच्या पाठीमागें धांवत होते व आपापल्या कल्पनांचा अनिवार उपभोग घेण्यांत सौख्य मानीत होते. अशा ह्या नाना प्रकारच्या देवकल्पनांनीं पछाडलेल्या गटांचा एक भरीव समरस समाज बनवायला एकच तोडगा होता. तो हा, कीं ह्या सर्वांच्या डोक्यांतील निराधार व अशास्त्र अशी जी देवकल्पना तीच मुद्दलांत उपटून काढली पाहिजे होती. निदान, एकसमाजत्वाप्रीत्यर्थ ह्या देवकल्पनेला व देव-धर्माला गबाळांत गणून इतर राजकीय, वैय्यापारिक व शास्त्रीय व्यवहारांत तिला नितांत गौणत्व दिलें पाहिजे होतें. हें जोंपर्यंत झालें नव्हतें, तोंपर्यंत हे सहाहि गट एकसमाजत्वाला उपकारक होण्याची आशा नव्हती. देवकल्पनेचें असत्य युग पांचचार हजार वर्षें चालून समाप्तीस येण्याच्या रंगांत आहे हें ह्या देवभोळ्या लोकांच्या लक्षांत अद्याप आलें नव्हतें. एकट्या अद्वैतवेदान्त्यानें तेवढें देवकल्पनेला लाथाडलें होतें. परंतु अद्वैतवेदांत्यांची

१०२६४

चिमुकली संख्या देवभोळ्यांच्या प्रचंड संख्येच्या पासंगालाहि पुरण्यासारखी नव्हती." ('महिकावतीची बखर', प्रस्तावना पृष्ठ २७.)

राजवाड्यांनी ही प्रस्तावना १९२४ सालीं—मरणापूर्वी दोन वर्षें—लिहिली. "सरकार नांवाच्या कृत्रिम, उपटसुंभ, चोरट्या व जुलुमी संस्थेसंबंधानें गांवकरी पराकाष्ठेचा उदासीन असे" हें त्यांनीं राष्ट्रीयत्वाच्या कल्पनेचा उगम न होण्याचें कारण दिलें आहे, तें एखाद्या कम्युनिस्टाच्याहि तोंडांत शोभण्यासारखें आहे. राजवाड्यांच्या या परिपक्व विचारसरणीवरून ते साम्यवादाच्या किती जवळ आले होते तें समजतें. पण 'अनिकेत' म्हणजे घराशिवाय राहिलेल्या 'प्रॉलेटारिएट' राजवाड्यांना हें तत्त्व पटलें असलें तरी त्यांच्याकडे ब्राह्मण्याचा आदर्श म्हणून आपल्या कर्मठ नजरेनें पाहाणाऱ्या त्यांच्या स्वार्थी घरबांधू 'चहात्यांना' या विचारांचें काय होय!

एखाद्या समाजाच्या प्रकृतीचें निदान करण्याला एक पूर्ण भौतिक बाह्य गमक आहे. तें संततीचें होय. हिंदूंतील सामान्य जनांचा वंशेतिहास फारसा माहीत नाहीं; पण थोर कुळांचा बराच माहीत आहे. हिंदू संस्थानिकांत निपुत्रीपणाचें प्रमाण केवढें मोठें होतें हें डलहौसीच्या दत्तक वारस नामंजूर करण्याच्या सपाट्यावरून मशहूर झालेलें आहे. अनेक राजवंश व मोठीं सरदारकुळें दत्तकांवरच चाललेलीं दिसतात. असें कां? अनेक स्त्रिया करूनहि संततीचा अभाव काय दाखवितो? शेवटच्या बाजीरावाला औरस पुत्र होऊनहि कां जगले नाहींत? सातारकरांना, झांशीवाल्यांना, नागपूरकरांना, शिंद्यांना दत्तक वंशावरच घराणें राखण्याची पाळी कां यावी? तर वैवाहिक नीतिमत्तेचा अभाव. ज्या बाजीरावानें लागोपाठ तीन दत्तक पुत्र घेतले व तरीहि पेन्शन राहील न राहील याची भीति वाटून पंचाहत्तराव्या वर्षी मरणापूर्वी दोन वर्षें शेवटचें लग्न करून पुन्हा एकदां औरस संततीचा प्रयत्न करून पाहिला, त्याला तीन लेकवळे होते हें पुढील उतारा वाचून समजेल.

"यादी मणीराम लाला याची कन्या, तिचें नांव राधाबाई, तिसी बाजीरावसाहेब यांणीं लग्न कटारेसी येथाविधि लावलें. त्ये बाईस तीन पुत्र झाले आहेत. बाईचे खर्चास बाजीरावसाहेब दरमहा रुपये १०० शंभर, भोजनखर्च, खेरीज शागीर्दपेशा वगैरे जो खर्च लागेल तो परभारें सरकारांतून देत होते..." (पेशवे दप्तर ४१ नं. २५२).

हीच हकीकत इतरांच्याहि बाबतींत आढळेल. डलहौसीच्या हुकमामुळें लोकांची मनःस्थिति कशी झाली होती हें 'ज्ञानप्रकाश'च्या पहिल्या वर्षाच्या सहाव्या अंकांतील पुढील नोंदीवरून कळून येतें:

"तासगांवकर भाऊसाहेब यांची स्त्री गरोदर होती. त्यांस पुत्र जाहला हें मोठें उत्साहाचें वर्तमान आहे. कारण कीं तीन लक्षाचें संस्थान त्यांचें त्यांजकडे कायम आहे तसेंच पुढें राहील." (१९ मार्च १८४९)

पण हा उत्सव अल्पकालीन ठरला व अखेर संस्थान गेलेंच. हिंदूंप्रमाणें मुसल-

मानांना मात्र कधीं वारसाची अडचण पडलेली दिसत नाहीं. उलट प्रत्येक नव्या राजाला भावांची कत्तल करण्याची पाळी आलेली दिसते. दिल्लीच्या बादशाहाच्या मुलांची कत्तल झाली म्हणून वंश बुडाला; मुलें नव्हतीं म्हणून नव्हे. हिंदूंच्या आत्मनाशक समाजरीतीचें हें मोठें उदाहरण आहे.

या विषयाबाबत 'ज्ञानप्रकाश' ता. ३० एप्रिल १८४९ मधील पुढील अभिप्राय पाहा: "दक्षिण व कर्नाटकचे जाहागिरदार व सरदार यांकरितां हें पुस्तक—'थोर लोकांशीं संभाषण'—छापलें, त्यांची अवस्था पाहिली म्हणजे शोक होतो. कंपनीसरकारानें मुलूख घेतल्यापासून या लोकांस खाण्याचा बंदोबस्त करून दिल्हा आहे; परंतु त्यांची बुद्धि प्रगट व्हावी अशी कांहीं तजवीज नाहीं. यामुळें निरुपयोगीपणा आणि नामर्दपणा स्वीकारला आहे. वास्तव ते हल्लीं अविद्वान्, सामर्थ्यहीन, दुराचारी होत्साता दुःखेंकरून आयुष्याचे दिवस मोजतात आणि मजुरी करून पोट भरणाऱ्यापेक्षांहि ते नीचत्वास आले आहेत. परंतु महाराष्ट्रदेशांतील लोक मात्र असे जाहले आहेत असें नाहीं. संपूर्ण हिंदुस्थानांतील मोठे लोक मूर्ख म्हणून डंके वाजत आहेत आणि या लोकांचा आतां क्षय होत चालला. बहुत तरुणपणींच मरतात याचें कारण पापरूपी सुख फार भोगितात आणि त्यांचा त्याजमुळें वंशही राहत नाहीं."

या लेखास नव्वद वर्षे होत आलीं तरी आजहि बहुधा तशीच स्थिति आढळेल.

दोनतीन वर्षांपूर्वी कुरुंदवाड-सांगलीकडे बोकड मारून यज्ञ झाले त्याचा खूप गवगवा आणि वाद झाला. पण हा प्रकार आज महात्माजींच्या अहिंसेच्या प्रचारामुळें झाला असें कोणी समजेल तर ती चूक आहे. वाद, पक्ष, पंथ, हे हिंदुधर्मांत सनातन आहेत. सन १८४९ सालीं 'ज्ञानप्रकाशां'त यज्ञाबद्दल अशीच खळबळ माजलेली दिसून येते. बहुमत पशुयज्ञाविरुद्ध असलेलें तेव्हांहि दिसतें. त्याऐवजीं पिष्टपशु करून काम भागवावें असें सामान्य लोकमत होतें. ज्ञानप्रकाशकारसुद्धां पशुयज्ञाविरुद्ध असून त्यांनीं त्यासाठीं युक्तिवाद, धर्मशास्त्र, समाजहित इत्यादींचा विचार करून टीका केली होती:

"त्रिंबकशास्त्री शाळग्राम हें काळेवावरांत सर्वपृष्ठ व अप्तुर्याम या नांवचे यज्ञ करणार आहेत. यांत नऊ पशु होतील. दोन हजार रुपये सरासरी खर्च होईल. हें कर्म मोठें क्रूर, निष्ठुर, हिंसा आहे.

"बंगाल्यांत कितीएक ठिकाणीं मनुष्यांस मारून देवीचे देवळांत त्यांचीं डोकीं आणून टाकितात, त्याचा पत्ता सरकारास लागत नाहीं. त्याजवरून ब्राह्मण मोठे हिंसक आहेत असें त्याणें (वार्डसाहेबानें) स्थापन केलें आहे. ही मोठी अपकीर्ति आहे.

"ब्राह्मण यज्ञांत खाटकाहून अधिक निष्ठुरपणानें वर्तणुक करितात. लोखंडाच्या खाणी सांपडलेल्या नव्हत्या (आणि म्हणूनच शस्त्रें नव्हतीं) तेव्हां बुकलून पशु मारीत असतील! (पण म्हणून आतां तसें कां करावें?) स्वर्ग नष्ट फळ आहे, त्याजकरितां अनुचित कर्म करणें अयोग्य.'

"तुकाराम इत्यादि ब्राह्मणांखेरीज (=शुद्रादिक) मोक्षास गेले, त्यांणी यज्ञ कोठें केले? तुम्ही म्हणाल कीं ते मोक्षास गेले याजला प्रमाण काय? तर जे यज्ञ करीतात हे (मोक्षास) जातात म्हणून तरी काय प्रमाण?"

कां, आहे कीं नाहीं बिनतोड युक्तिवाद? आतां त्यावरील शास्त्रार्थ पाहा:

श्रुतिस्मृतिर्विरोधे तु श्रुतिरेव बलीयसी।
श्रुतिश्रुतिर्विरोधे तु युक्तिरेव बलीयसी॥

पुरोगामी समाज असाच नेहमीं युक्तीचा आश्रय घेऊन वादाचें मूळ तोडीत असतो. पण पुच्छप्रगति करणारे आजहि शास्त्राचा वाद माजवीत असतात. अशांना तुकाराम सांगतातः

**तोंड धरुनि मेंढा मारा।**
**ब्राम्हण म्हणती यज्ञ करा॥**
**जित्या तुळशीसी तोडा।**
**पुजा निर्जीव दगडा॥**
**चित्र काढुनि पुजती नागा।**
**जित्या सर्पा घेती डांगा॥**
**जग चालले उफराटे।**
**कोण जाणे खरे खोटे॥**

('ज्ञानप्रकाश'–२३ एप्रिल १८४९)

पशुहिंसेबद्दलच एवढा कळवळा होता असें नव्हे, तर मनुष्यास फांशी देऊं नये असें मतहि त्या काळीं प्रतिपादिलें जात असे. रश् नांवाच्या अट्टल गुन्हेगाराबाबत विलायतेंत चळवळ झाली. त्याचे गुन्हे दहा वेळां फांशी देण्यासारखे होते, पण शिक्षेनें जर मन पालटत नाहीं तर ठार तरी कां करा असा युक्तिवाद केला जात होता. त्यावर मुंबईच्या 'कुरीयर' पत्रांत तशीच टीका आली व 'ज्ञानप्रकाश'नेंहि तेंच मत लेख लिहून प्रतिपादलें (१४ मे १८४९):

"फासी देण्याची शिक्षा रद्द करावी...हा उपक्रम चांगला आहे. त्याची कारणें... आज हजारों वर्षें फासी व मरणान्त शिक्षा देत आले...परंतु कोणी गुन्हे सोडले नाहींत... शासन होण्याचें कारण लोक सुधारावे व जो गुन्हा करतो तो सुधारावा. पण मरणान्त शिक्षेनें...सुधारत आले असें दिसत नाहीं. शासनाचा अर्धा हेतु गुन्हेगाराची स्वता सुधारणा, ती अगदींच होत नाहीं. (हेतु साधत नाहीं.) फासी देणें हा यथाशास्त्र खून आहे. तो खून सरकारचे विद्यमानें केला म्हणजे दोष नाहीं असें नाहीं...(फांसीचा हेतु साधत नाहीं) मग दुसरी एकादी शिक्षा जेणेंकरून लोकांस भय व स्वतः सुधारणा अशी

शिक्षा कां होऊं नये ? जे दृढांतःकर्णी आहेत त्यांस फासी देण्याचें मोठें भय वाटत नाहीं; मग त्यास फासी देऊन तरी उपयोग काय ?...यावरून शिक्षा रद्द करावी हें ठीक आहे...प्राचीन काळचे आणि मूर्ख न्यायाची बाकी एवढी शिक्षा राहिली आहे."

मुंबईच्या एका फांशीची हकीकत :

"प्रातःकाळीं सात वाजतां तमासगीर लोक दुष्कृत्य पहाण्यास जमूं लागले. आठ वाजतां फांशी देण्याची लांकडे उभी केली आणि त्यावर फास ठेवला. इतक्यांत त्या माणसास वरती नाझरानें आणीला तेव्हा त्याने ती लांकडे पाहून थरकाप झ्याला आणि लोक जमलेले असा समारंभ पाहून चरकला. क्षणभर गेल्यावर त्याचे डोळे वांधले आणि मांगानें फास गळ्यास लाउन गाठ कानाखालीं दिल्ही. आणि निसटते फळीवर उभा केला. तेव्हां तो थरथर कापत होता. आणि केव्हा फळी लोटतील हे ऐकण्याकरिता कान सर्वांकडे करून उभा होता. इतक्यांत मर्णाचे आणि जिवाचे मध्यें फळी होती ती ओढून घेताच सरकफास वर चढून मनुष्य लोंबू लागला; परंतु प्राण लवकर जाईना. फासाची दोरी वाईट होती. त्याजमुळें फास नीट बसला नाही. आणि क्षणभर मेल्यासारखा होऊन पुन्हा असडे द्यावयास लागे. पुन्हा हातपाय झाडी, पुनरपी थंड होऊन पुन्हा हात व दंड पिळीं असे ११ मिनिटे करीत होता. नंतर प्राण गेला."

('ज्ञानप्रकाश' ६ आगष्ट १८४९).

या हलगर्जीपणाबद्दल मांगाची नोकरी गेली व हा सर्व प्रकार वर्तमानपत्रांच्या चर्चेचा विषय झाला. 'कुरिअर' पत्रानें सुचविलें कीं वॉरंट लिहिण्याची रीति तरी बदला—"तु अमुक तुझ्यावर खुनाचा गुन्हा अमुक कोडतात शाबुद जाहाला सबब तुला शिक्षा ठरविली आहे कीं अमुक दिवशीं अमुक वेळेस तुझे मानेस दोरी लाऊन **मरेतोंपर्यंत तुला टांगावा**' यातील मरेतोपर्यंत पासून टांगावा या जाड्या शब्दांऐवजीं 'तुला क्लेश अकरा मिनिटें सुमारें होऊन तुझा दम कोंडून हाल होऊन हसडे देतदेत तुझा प्राण जावा' अशी बदली पाहिजे." याप्रमाणें 'कोरियर' पत्रांत उपहास केला आहे.

"मुलतानचा सुभेदार मूळराज यास दोन इंग्रजांस मारल्याबद्दल फासी देणार अशी गप्प उठली. परंतु अशा मोटे मोहऱ्यास फाशी देणें केवळ अश्लाघ्य कर्म आणि देणार नाहींत असे आम्हांस हजार वाटेनें वाटते. जर असे न करितील तर इंग्रजाची नेकी बुडाली असेंच समजावें. आजपर्यंत असा प्रकार कोठें नाही. स्वदेशरक्षणार्थ मूळराज परकी लोकासी लढला आणि हा गुण तर इंग्रज फार वर्णन करितात. स्वदेशाभिमानी मनुष्यास पेत्रीअट म्हणतात. त्याची गणना मोटे महात्म्यामध्यें आहे आणि इंग्रज आपण असे देशाभिमानी आहेत असा अभिमान बाळगितात आणि त्याच गुणाचा दोष करून मुलरायास मारणे ही गोष्ट फार अनुचित होय.

**मातंगःखरविक्रयो समतुला कर्पूरकार्पासयो**
**योग्यायोग्यविचारिणो न हि भवन् देशाय तस्मै नमः ॥**

अर्थ--हत्ती आणि गाढव, कापूर आणि कापूस, एका मापानें तोलणारा योग्यायोग्य विचार करणारा नव्हे. अशाच्या देशाला नमस्कार असो." ('ज्ञानप्रकाश'--१६ एप्रिल १८४९).

"मुळराय यास फाशीची सजा दिली होती, ती रद्द होऊन काळ्यापाण्यावर पाठवावे असे गौर्नर जनरालसाहेब याणी ठरविले. त्यास हवा नीट जाहाली (पावसाळा थांबला) म्हणजे पाठविणार." (२७ आगष्ट १९४९).

"मूळराजास काळेपाण्याची शिक्षा ठरविली तेव्हा त्याणें बहुत तक्रार केली व जीव गेला असता तर वेहत्तर म्हणून सांगितलें. परंतु उपयोग काय?" (१० सपटंबर १८४९).

मूळराजाच्या या बातम्यांवरून फाशीबद्दल एकंदर लोकमत व अंदमानला जाण्याची नाखुषी हीं स्पष्ट कळतात. अजूनहि हे महत्त्वाचे व जिव्हाळ्याचे प्रश्न अखिल हिंदुस्थानास हालवून सोडीत आहेत आणि सुटण्याच्या मार्गावर आलेसे वाटत नाहींत. मग त्या काळीं मूळराजासारख्या राजकैद्याच्या नाखुषीस कोण पुसणार?

'किर्लोस्कर', जून १९३८

# आचार्य बाळ गंगाधर शास्त्री जांभेकर

सुमारें बत्तीस वर्षें झालीं. तो काळ सातारा जिल्ह्यांतील सत्यशोधक चळवळीचा व ब्राह्मणांच्या घरांची होळी करण्याचा होता. तेव्हां एकदां या विषयावर खासगी चर्चा चालू असतां एक विद्वान् व विचारी म्हणून प्रसिद्ध असलेले इतिहाससंशोधक म्हणाले कीं, "हे ब्राह्मणेतर चळवळ्ये आम्हां ब्राह्मणांचा असा उच्छेद करणार असले, तर आम्हींहि मुसलमानांना मिळून त्यांच्याकडून परस्पर हा कांटा काढून टाकूं! मुसलमानांत बुद्धिज्ञानाचाच अभाव आहे, तेवढा ब्राह्मणांनीं पुरविला म्हणजे ते अल्पसंख्याक असूनहि सत्यशोधकांना पुरून उरतील!" अर्थात् हे उद्गार खासगी संभाषणांतील कांहींशा बेजबाबदार वृत्तीनें रागाच्या भरांत काढलेले होते. पण ते या स्वरूपांत उपरिनिर्दिष्ट गुणांच्या व्यक्तीकडून काढले गेले होते, एवढीच बाब आपणांस लक्षांत ठेवावयाची आहे. तदनंतर कांहीं वर्षांनीं दुसऱ्या एका इतिहास-कारांशीं शिवकालासंबंधानें वादविवाद चालू असतां तेहि असें म्हणाले कीं, "जर औरंगजेबाच्या वेळीं सर्व हिंदुस्थान त्याच्या इच्छेप्रमाणें मुसलमानी धर्म स्वीकारून एकमनाचें व एकमार्गी झालें असतें, तर आपल्या राष्ट्राची झपाट्यानें प्रगति होऊन व तें बलिष्ठ होऊन पाश्चात्त्यांच्या लोभाला बळी पडलें नसतें!" त्यांच्या मनांत त्या वेळीं आपल्या पारतंत्र्याची, फुटीची व विस्कळितपणाची चीड मुख्यत्वेंकरून होती. वृत्तीनें सुधारक, विश्वकुटुंबवादी असल्यामुळें त्यांच्या तोंडून असे उद्गार बाहेर पडले असावे.

या आठवणी सांगण्याचें प्रयोजन असें कीं, ऐतिहासिक घटनेचा विवेक किती दुष्कर आहे, ही गोष्ट वाचकांसमोर यावी. इतिहासांत मुरलेल्या माणसांची ही स्थिति, तर सामान्य जनांची गोष्ट काय बोलावी? त्यांच्यांत प्रचलित होणारीं मतें, पुष्कळ वेळीं अशाच धाडशी विधानांचा ठसा मनावर उमटल्यामुळें, निर्माण झालेलीं असावयाचीं. समाजांत उघड बोललीं, मांडलीं, प्रतिपादित केलीं जाणारीं मतें वेगळीं, व समाजांतील गटांच्या अंतर्मनांत वावरत असलेलीं, धुडगुस घालणारीं, सत्य व खात्रीलायक वाटणारीं व भावनांचा विषय होऊन ऐन महत्त्वाच्या घटनांच्या वेळीं स्फोटरूपानें प्रगट होणारीं मतें वेगळीं, हेंहि आपण सतत लक्षांत वागविलें पाहिजे.

आज महाराष्ट्रांत जीं धार्मिक, सामाजिक, राजकीय, नैतिक व आतां त्यांच्या जोडीला आर्थिक मतें प्रचलित आहेत व ज्यांमुळें महाराष्ट्रसमाज विस्कळित, बेकीपूर्ण,

हेव्यादाव्यांनीं भरलेला, मतामतांच्या गलबल्यानें पोखरलेला व परिणामीं कोणतेंहि कार्य करण्यास असमर्थ असा बनलेला दिसत आहे, तीं मतें पाश्चात्त्य संस्कृतीशीं आलेल्या आपल्या संबंधाचा परिपाक आहे. या मतांचे प्रवर्तक व पक्षसंस्थापक हे प्रायः कमीजास्त प्रमाणांत पाश्चात्त्यांच्या मतांचें अनुकरण करणारे आहेत. एका संस्कृतीचा दुसऱ्या दूरच्या संस्कृतीशीं संबंध आला असतां तिनें स्वसंस्कृति व समाज टिकविण्यासाठीं कसें धोरण स्वीकारावयाचें, हा जीवन-मरणाचा प्रश्न असतो. जर त्या वेळीं योग्य ज्ञाते नेते नसले, तर त्या समाजाचें गाडें खडकाळास लागतें व त्या संस्कृतीचें भवितव्य संशयास्पद होतें. जाणूनबुजून आपण होऊन परक्यांच्या चांगल्या गोष्टी आपणांला हव्या त्या प्रमाणांत व तऱ्हेनें उचलणें वेगळें व परक्यांच्या आक्रमणामुळें त्या आपणांवर लादल्या जाणें वेगळें. आपला समाज आपली संस्कृति टरविण्यासाठीं नेहमीं स्वतंत्र ठेवणें, हें समाजांतील शहाण्या लोकांचें व नेत्यांचें काम असतें. त्यासाठीं चौफेर नजर जागरूकपणें ठेवावी लागते. हिंदुस्थानांतल्या चांगल्या गोष्टी बगदादच्या खलिफांनीं इकडून ब्राह्मण नेऊन व त्यांच्याकडून ग्रंथांचीं भाषांतरें वा रूपांतरें करवून स्वीकारल्या, तशाच पाश्चात्त्यांतील ग्रीक ऊर्फ युनानी गोष्टीहि त्यांनीं स्वीकारल्या. हिंदी दशमानपद्धति व युनानी वैद्यक आणि राजकीय तत्त्वज्ञान, तसेंच शिस्तीची व कवायतीची युद्धपद्धति स्वीकारल्यामुळें इस्लाम जगज्जेता झाला आणि पूर्वींच्या रोमन, यहुदी, मिसरी, इराणी व हिंदी-चिनी संस्कृतींवरहि कांहीं काळ कुरघोडी करूं शकला. पण या संस्कृतीचा व तत्प्रवर्तक लोकांचा हिंदुस्थानाशीं संबंध येऊन आतां बाराशेंवर वर्षें लोटलीं तरी, तिच्याशीं कसें वागावयाचें व तिच्यावर तोडगा काय, हें अजून हिंदवासीयांना उमगलेलें दिसत नाहीं. त्यांपैकीं निदान हिंदी मुसलमानांना ओळखून, त्यांच्याशीं कसें वागावयाचें हें ठरवून, उपाय-योजना करणारा एकमेव भारतीय पुरुष शिवाजी हा झाला. पण त्याचा मार्ग हिंदुस्थानांत रुजून फैलावणें दूरच राहिलें, पण त्याच्यामागून आलेल्या मराठ्यांनींहि तो अनुसरला नाहीं. तो अनुसरला जाता तर हिंदुस्थान बलिष्ठ होण्यास, आरंभीं उल्लेखिलेल्या इतिहासकारांचा मार्ग—म्हणजे त्यासाठीं सर्व हिंदी लोकांनीं आधीं मुसलमान होणें, हा—मनांतहि येण्याचें कारण उरलें नसतें. आज विसाव्या शतकांतहि मुसलमानांचा अन्याय्य अनुनय महात्मा गांधींनाहि करावासा वाटला याचेंहि कारण हेंच आहे—त्यामुळेंच गांधीतत्त्वांचें पालन करूं म्हणणाऱ्या काँग्रेस-सरकारला आजहि काश्मीरप्रश्न सोडवितां येत नाहीं, इतकी चुकलेल्या ऐतिहासिक सरणीची कठीण समस्या होऊन बसते !

कोणतीहि परकी गोष्ट—शुद्ध शास्त्रीय स्वरूपाची सुद्धां—आपल्या संस्कृतींत घेण्या-पूर्वीं त्याचा आपल्या समाजावर काय परिणाम होणार आहे, हें वस्तुतः समाजधुरंधरांनीं पाहिलें पाहिजे. पण हल्लींच्या मनूंत तरी ते तसें करतांना दिसत नाहींत. नवीन आलेली पहिली युक्ति, पहिलें यंत्रताबडतोब स्वीकारून त्याची मागणी ताबडतोब परदेशांत नोंदविली जाते असा तडाखा सुरू आहे. आपल्या समाजाची ऐपत, आपल्या समाजाचा

वकूब, या नव्या गोष्टी विकत घेण्याइतका आहे किंवा काय, तो नसला तर आधीं तो आणण्याची व्यवस्था करणें, या गोष्टी घडतच नाहींत असें दिसतें. या नव्या सुखसोयींसाठीं आपला देश परक्यांकडे गहाण पडतो, आपलें स्वावलंबित्व नष्ट होतें व त्याचे सामाजिक व राजकीय परिणाम समाजाला भेगा जाण्यांत होतात, हें राजकीय मुत्सद्दी वा अर्थशास्त्रज्ञ लक्षांत घेतांना दिसत नाहींत. एवढे यांत्रिक सुधारणेचे द्वेष्टे महात्मा गांधी, पण त्यांचीहि देशभक्तीची व जग सुधारण्याची सर्व चळवळ आधुनिक पद्धतीनें, सर्व आधुनिक सुखसोयी अवलंबून चालविण्यांत आली. त्याचा स्पष्ट दुष्परिणाम म्हणजे आजचे हिंदुस्थानांतील दरिद्रनारायण देशी व परदेशी भांडवलवाल्यांचे गुलाम होण्यांत झाला आहे. महत्त्वाकांक्षी पुरुषांना 'याचि देहीं याचि डोळां' सर्व इष्ट गोष्टी आपल्या हातून पूर्ण झालेल्या पाहावयाची अदमनीय इच्छा असते. त्यामुळें त्यांना, सबुरी किंवा दहा अंक मोजून पाहाणें हा एक गुण असतो, हें पटतच नाहीं. जर कॉंग्रेसच्या नेत्यांना आपल्या हातीं सत्ता घेण्याची घिसाडघाई लागली नसती, तर हिंदी स्वातंत्र्याचा लढा आणखी दहा वर्षें लढून पाकिस्तानचें हीण त्यांत भस्म करतां आलें असतें. पण मग याच नेत्यांच्या हातीं सत्ता आली असती असें सांगतां येणार नाहीं! हिंदुस्थान हा देश अनेक योग्य गोष्टी त्या त्या वेळीं न करीत गेल्यामुळें सांप्रतच्या स्थितीस येऊन पोहोंचला आहे.

किनाऱ्यावरून येणाऱ्या अरब दर्यावर्दींकडून नूतन इस्लामी संस्कृतीचें ज्ञान करून घेणें राहो, पण उत्तरेंत तुर्की मुसलमानांनीं बादशाही स्थापन केल्यानंतरहि त्या संस्कृतीचा कानोसा सिंघण व हेमाद्रि यांना घ्यावासा वाटला नाहीं, म्हणून महाराष्ट्र चौदाव्या शतकाच्या आरंभीं परतंत्र झाला. ज्या गोष्टी आम्ही स्वबुद्धीनें घेतल्या नाहींत त्या परक्या राज्यकर्त्यांनीं आम्हांवर लादून आम्हांस शिकविल्या. या शाळेंत महाराष्ट्राचीं तीन शतकें गेल्यावर शिवाजी जन्मला. त्यानें सर्व गोष्टींचा अंदाज बांधून या देशांत बद्धमूल झालेलें इस्लामी संकट कोणत्या युक्तीनें नाहींसें करावें त्याचा आराखडा ठरवून नवीन हिंदु संस्कृतीचा पायाहि घातला. आपल्या कामांत त्यानें पश्चिम किनाऱ्यावर नव्यानें येऊन बसलेल्या यूरोपीय संस्कृतीचीहि मदत घेतली व एका वर्धिष्णु स्वतंत्र राज्याची प्राणप्रतिष्ठा केली. पण १८ व्या शतकांत शाहू व पेशवे या अनभिज्ञ लोकांनीं मराठी राज्याचें आत्मिक व नैतिक स्वरूप न ओळखून सभोंवतालच्या मुसलमानांप्रमाणेंच एक नवें तसलेंच राज्य पुढें चालविलें. नवीन पाश्चात्त्य संकटांचा या लोकांनीं यथातथ्य विचार केलाच नाहीं व कोणतेंहि नवीन परकी संकट त्या संस्कृतींतील इष्ट भाग आत्मसात् केल्याखेरीज टाळतां येत नाहीं, हा संस्कृतीचा सिद्धांत न ओळखून तसेंच रेटारेटीनें राज्य पुढें चालविण्याची उमेद धरली. त्यामुळें ते अंतीं पराभूत होऊन इंग्रजांचें राज्य या देशांत झालें. ज्या गोष्टी १८ व्या शतकांत शिकून घेतल्या नव्हत्या त्या आतां तरी घ्याव्या असा समय येऊन ठेपला.

या काळाच्या आरंभीं महाराष्ट्राच्या सुदैवानें मागील राजवटीचा घातक दुरभिमान ज्याला मुळींच शिवला नव्हता, असा एक पुरुष पुढें आला. पाश्चात्य संकट राजकीय व लष्करी उपायांनीं आतां उखडून टाकतां येणार नाहीं, याबद्दल विचारी माणसांची खात्री पटली होती. प्रथम आपणांस पाश्चात्य संस्कृति तिच्या शास्त्रीय अंगोपांगांसहित जाणून घेतली पाहिजे, हें या पिढीस उमगलें होतें. कोंकणांतील व विशेषतः मुंबईतील बहुसंख्य लोकांस मराठी राज्याच्या वा पेशवाईच्या अभिमानानें कधींच फारसें झपाटलें नव्हतें. येथून जे लोक देशावर जाऊन सर्व हिंदुस्थानभर पसरले, त्यांची गोष्ट अर्थातच वेगळी. पण ते खऱ्या अर्थानें कोंकणी राहिलेच नव्हते. कोणत्याहि कारणांमुळें असो, कोंकणांतील कोणत्याहि जातीचा सामान्य माणूससुद्धां इतर महाराष्ट्रांतील माणसां-पेक्षां जास्त सुबुद्ध असतो. याउलट तेच लोक जसजसे मूळ प्रदेशाहून दूरदूर गेले, त्या त्या प्रमाणांत क्रमाक्रमानें बथथड होत गेले, असें इतिहासावरून दिसतें. हा क्रम आजतागायत सुरू आहे...पण तो आपला मुख्य विषय नव्हे. या विषयाचा प्रपंच येथें करण्याचें कारण एवढेंच कीं, त्यामुळें महाराष्ट्रांत वेगवेगळ्या वैचारिक निष्ठा निर्माण झाल्या आहेत. आर्थिक स्वास्थ्यामुळें वा राजकीय प्रतिष्ठेमुळें ज्यांची बुद्धि मलिन झाली नाहीं, असे लोक फक्त कोंकणांत शिल्लक राहिले होते आणि त्यांतूनच नवीन कालाचें यथार्थ आकलन होणारा पुरुष निर्माण व्हावा हें क्रमप्राप्तच म्हटलें पाहिजे.

आचार्य बाळ गंगाधर शास्त्री जांभेकर हे ते पुरुष होत. या पुरुषाच्या मोठेपणाची जाणीव केवळ साफ बुजालेली होती असें न म्हटलें, तरी ती यथार्थपणें सर्वांच्या डोळ्यांसमोर राहिली नव्हती, ही गोष्ट खरीच आहे. गेल्या चार पिढ्यांतील जाणकार लोकांत बाळशास्त्र्यांचें महत्त्व समजणारे शहाणे पुरुष मधूनमधून होतच राहिले तरी, खंडनमंडनपूर्वक त्यांच्या चरित्राचें असाधारण महत्त्व वाचकांस साकल्यानें पटवून देणारा लेखक निर्माण झाला नव्हता. तो जांभेकरकुळांतच निघावा, ही कौतुकाची तशीच चिंतनीय गोष्ट समजावी लागेल. पण हें व्हावयाला चरित्रनायकाच्या मृत्यूनंतर पुरें एक शतक जावें लागलें. ज्याप्रमाणें विष्णुशास्त्री चिपळूणकरांचें चरित्र त्यांच्याच धाकट्या बंधूंनीं मृत्यूनंतर एक तपानें प्रसिद्ध करून आपल्या कुळाचें नांव इतिहासांत दाखल केलें, तशी गोष्ट बाळशास्त्र्यांच्या बाबतींत न झाल्यामुळें त्या पुरुषाचा मोठेपणा महा-राष्ट्राला अज्ञात राहिला. हेंच काय, तर त्यामुळें ज्याचें चरित्र पुढील तरुण माणसांनीं गिरवावें, अशा एका आदर्श पुरुषाच्या कित्त्यास पुढील पिढ्या मुकल्यानें महाराष्ट्राचें फार नुकसान झालें, असें आम्हांस वाटतें. ज्याप्रमाणें रामचंद्रपंत अमात्यांचें चरित्र व त्याहून त्यांची राजनीति अज्ञात राहिल्यामुळें सबंध पेशवाई शिवाजीच्या खऱ्या राजनीतीस व मराठी राज्याच्या पायाभूत तत्त्वज्ञानास व इतिहासास पारखी झाली व त्याचा दुष्परिणाम राष्ट्राची गाडी वक्री होऊन पुनः शिवपूर्वकालीन राजकारणांत घोटाळत राहण्यांत झाला, तोच परिणाम गेल्या शतकांतील महाराष्ट्रावर प्रस्तुत अज्ञानाचा झाला आहे.

कारण, त्यामुळें विष्णुशास्त्र्यांचा स्वयंमन्यतेचा, खोट्या देशाभिमानाचा, वाङ्मयैक-ज्ञानाचा, वावदूकतेचा, अज्ञानमूलक प्रतिपक्षटवाळीचा व शास्त्रज्ञानविरहित लेखन-कामाठीवर शिवाजी बनण्याचा चुकीचा आदर्श महाराष्ट्रासमोर ठेवला जाण्यास सवड मिळाली, कीं ज्याचे दुष्परिणाम आजतागायत महाराष्ट्राला बाधले आहेत व पुढें बहुतकाळ बाधतील. आपल्या देशाची व समाजाची स्थिति त्याकाळीं अभिमानाच्या गोष्टी बोलण्याची नसून मागें पडलेल्या गोष्टी भरून काढण्याची होती. शास्त्रांचें व जगाबद्दलचें अज्ञान हे आपल्या राष्ट्राचे दोन प्रमुख दोष काळानें वाढत आले होते. ते नाहींसे करण्यासाठीं प्रथम शिक्षणप्रणाली सुधारणें, जगांतील प्रमुख भाषांचें ज्ञान करून घेऊन परकीय समाजाची खरी स्थिति मुळांतूनच समजून घेणें, व नंतर आपल्या आळींत, आपल्या वाड्यांत बसून जगाची चर्चा व कुत्सित टवाळी करण्याचा व इतरांस तुच्छ लेखण्याचा, आत्मसंतुष्टतेचा व खोट्या समाधानाचा मार्ग सोडून परदेशांत जाऊन तेथल्या चांगल्या गोष्टी शिकून त्या यां देशांत आणणें, हा मार्ग त्या काळीं चोखाळण्याचा होता. तो मार्ग स्वतःच्या चरित्रानें बाळशास्त्री यांनीं जसा दाखवून दिला, तसा विष्णुशास्त्र्यांच्या चरित्रादर्शानें मिळण्यासारखा नव्हता ही गोष्ट, महाराष्ट्रांत बद्धमूल झालेली व सबंध ब्राह्मणजातीला पछाडून तिला चुकीच्या मार्गावर नेणारी दुरभिमानी पंथनिष्ठा आजहि कबूल करण्यास राजी नसली, तरी खरी आहे, हें इतिहासानें सिद्ध केलें आहे.

बाळशास्त्र्यांचें चरित्र तरी किती अद्‌भुत? कोंकणांत जन्मून बालपण तेथें गेलेला एक मुलगा मुंबईस येतो काय, इंग्रजी शाळेंत दाखल होतो काय, आणि चार वर्षांत इंग्रजी भाषा आत्मसात् करून व शास्त्रीय विषयांचें शाळेंत शिकविलें जात नसलेलें शास्त्रज्ञानहि संपादन करून बाहेर पडतो काय आणि सतराव्या वर्षीं मराठी, संस्कृत, इंग्रजी याच काय, पण शिवाय गुजराती, बंगाली व फारसी याहि भाषांत प्रवेश करून घेतो काय; तसेंच अंकगणित, बीजगणित, भूमिति या विषयांत प्रावीण्य संपादितो काय! सर्वच एकपाठीपणाचा प्रकार दिसतो. यामुळें त्यांची नेमणूकहि तावडतोब डेप्युटी नेटिव्ह सेक्रेटरी म्हणून दरमहा पन्नास रुपयांवर झाली व नंतर दोन वर्षांनीं म्हणजे एकोणिसाव्या वर्षीं त्यांस शंभर रुपयांवर पूर्णांशानें नेटिव्ह सेक्रेटरी नेमण्यांत आलें. त्या काळीं एवढें वेतन पोक्त वयाच्या एतद्देशीय माणसालाहि क्वचितच मिळत असे. ज्या बॉंबे नेटिव्ह एज्युकेशन सोसायटी या संस्थेचे ते चिटणीस झाले, तिच्या कारभारीमंडळांत मुंबईतील तत्कालीन अत्युच्च यूरोपियन अधिकारी, सर्वश्रेष्ठ आणि धनाढ्य पारशी, आणि हिंदु व मुसलमान सद्‌गृहस्थ यांचा समावेश असे. अर्थात् समाजांतील सर्व क्षेत्रांतील नेत्यांशीं बाळशास्त्र्यांचा कार्यकारित्वाच्या दृष्टीनें आरंभापासूनच संबंध आला. बहुतेक जाडे विद्वान् पुस्तकांतील किडे, आपला विषय तेवढा जाणणारे व आपल्या विशिष्ट कामापलीकडे जगाशीं संबंध न येणारे असतात. याउलट, बाळशास्त्र्यांच्या

आयुष्याचा आरंभच समाजाचा मूलभूत व आद्य प्रश्न जो शिक्षण, त्याच्या प्रवर्तक संस्थेपासून झाला. भाषाज्ञानांत त्यांचें प्रावीण्य जाणून मुंबईच्या रॉयल एशिॲटिक सोसायटीच्या पौरस्त्य-भाषांतर समितीचे नेटिव्ह सेक्रेटरी म्हणूनहि त्यांची याच वेळीं निवड करण्यांत आली. यामुळें त्यांचा समाजधुरीणांशीं व शिष्टांशींच नव्हे, तर विद्वान् संशोधकांशींहि घनिष्ठ संबंध आला. अति लहान वयांत भराभर मोठेपणास चढलेले न्यायमूर्ति तेलंग यांच्याशीं तुलतांहि बाळशास्त्री कमी ठरणार नाहींत व चिपळूणकरांसारखा एकांगी विद्वान् तर त्यांशीं तुलतांहि येणार नाहीं असें म्हटलें तर त्यांत अतिशयोक्तीचा दोष वाटण्याचें कारण नाहीं. कारण बाळशास्त्र्यांचा काळ युनिव्हर्सिटीस्थापनेच्या पूर्वीचा, जेव्हां शालोपयोगी पुस्तकेंहि उपलब्ध नव्हतीं तेव्हांचा, आगगाड्या, तारायंत्र व फोटोग्राफी हिंदुस्थानांत येण्यापूर्वीचा होता, हें लक्षांत ठेविलें पाहिजे.

तेलंगांप्रमाणें बाळशास्त्री प्रामुख्यानें केवळ विद्वान् नव्हते. समाजसेवेची वृत्ति आरंभापासूनच त्यांच्या अंगीं होती. आपल्या निर्वाहासाठीं नोकरी करून व शालोपयोगी पुस्तकें, कीं जीं त्या वेळीं अत्यावश्यक होतीं, तीं तयार करूनच ते स्वस्थ बसले नाहींत, तर त्यांनीं नवीन काळ ओळखून वयाच्या २० व्या वर्षींच मराठींतील पहिलें वर्तमानपत्र ‘ दर्पण ’ सुरू करण्याचा उपक्रम केला. पहिले चार महिने पाक्षिक व नंतर साप्ताहिक असें हें इंग्रजी-मराठी वर्तमानपत्र होतें. त्याची वर्गणी सालीना २४ रुपये व ग्राहकांची संख्या पहिल्या सालअखेर सुमारें तीनशें होती. पानाचे दोन स्तंभ करून एका बाजूस मूळ इंग्रजी व दुसऱ्या बाजूस त्याचेंच मराठी रूपांतर दिलेलें असे. बाळशास्त्र्यांचें या वेळचें इंग्रजी पाहिलें तर, तें आजच्या एम्. ए. च्या तोडीचें वाटतें. विष्णुशास्त्री चिपळूणकरांनीं यानंतर चाळीस वर्षांनीं ‘ निबंधमाला ’ काढली. पण त्यांच्याजवळ स्वतःचेंच पैशांचें भांडवल होतें, तें कोंकणच्या भटाजवळ कोठून असणार ? पण मुंबईच्या अठरापगडजातींतहि आत्मीयता उत्पन्न करण्याइतकी मृदु वाणी व सौजन्य यांचें भांडवल त्यांच्याजवळ होतें. त्यामुळें बाळशास्त्र्यांचें कोठलेंच कार्य अडून राहिलें नाहीं. तसेंच त्यांच्या कोणत्याहि कृत्यांत जातीयता शिरूं शकली नाहीं. त्यांचे सहकारी हिंदु, मुसलमान, पार्शी, खिस्ती, महाराष्ट्रीय, गुजराती, कानडी सर्वच तऱ्हेचे राहिले. आठ वर्षें चाललेल्या ‘ दर्पणा ’चे व्यवस्थापक रघुनाथ हरिश्चंद्रजी हे मुंबईकर सद्गृहस्थ होते. या उद्योगापासून त्यांना आर्थिक लाभ बहुधा झाला नसावा. कारण, अखेरीस पुरेसा लोकाश्रय नाहीं म्हणून ‘ दर्पण ’ बंद पडलें असें दिसतें. यावरून त्या काळच्या समाजांत वाचनाभिरुचि किती कमी होती व सामान्य माणसास जड अशी वर्गणी देण्याची ऐपत असणारे मुंबईतहि किती थोडे लोक होते, याचा अंदाज होतो.

त्या काळीं शिकलेले लोक सरकारला जितके हवे तितके उपलब्ध नव्हते. म्हणून एकाच माणसावर अनेक कामें करण्याचा प्रसंग येई. बाळशास्त्री वर्तमानपत्र एक वर्ष चालवितात तोंच सरकारनें त्यांची नेमणूक अक्कलकोटच्या बालमहाराजांचे

शिक्षक म्हणून केली व बाळशास्त्र्यांनीं ती पत्करली. त्या काळीं आगगाडी नव्हती. त्यामुळें या प्रवासास सुद्धां महिनाभर वेळ लागत असे. ते प्रथम साताऱ्यास जाऊन तेथून अक्कलकोटास गेले. हें गुरुत्व त्यांनीं वीस महिने केलें. या नोकरीमुळें त्यांचा संस्थानी वातावरण व राजकारण यांशीं प्रत्यक्ष परिचय झाला व जुन्या मराठेशाहीचे दोष त्यांना प्रत्यक्ष अनुभवानें कळून चुकले. बहुधा हे जाणून घेण्यासाठींच त्यांनीं ही जागा पत्करलेली असावी. बाळशास्त्री विष्णुशास्त्र्यांप्रमाणें बश्ये, एकलकोंडे नसून प्रवासानें ज्ञान मिळविण्याचीहि त्यांस हौस होती, हें त्यांच्या चरित्रावरून समजतें. ज्यांना कोंकणस्थांच्या मायभूमींत, रत्नागिरीस राहाणेंहि असह्य झालें व फणसाचा गरा खाण्याचीहि भीति वाटत असे, त्या विष्णुशास्त्र्यांहून बाळशास्त्री अगदींच वेगळे होते. समाजांतील सर्व तऱ्हांच्या घडामोडींत प्रत्यक्ष शिरून ज्ञान मिळविण्याचा व तद्द्वारें लोकसेवा करण्याचा त्यांचा प्रयत्न होता. सर्वांशीं मिसळण्यामुळें बाळशास्त्र्यांना संपूर्ण महाराष्ट्रसमाजाचें जसें ज्ञान झालें व त्याच्या गरजांची खरी जाणीव आली होती, तशी विष्णुशास्त्र्यांना यानंतर चाळीस वर्षांनींहि येणें अशक्य झालें. याचें कारण हा दोघांतील फरकच होय. म्हणूनच वर आम्ही धाकट्या शास्त्रीबुवांस एकांगी म्हटलें आहे. शास्त्रज्ञान, भाषाज्ञान व लोकज्ञान, अशीं तिन्ही अंगें बाळशास्त्र्यांनीं शक्य तितकी आत्मसात् केलीं व आपल्या ज्ञानाचा व गुणांचा उपयोग समाजाच्या सर्वांगीण प्रगतीस व्हावा, असा हव्यास धरला. भांडारकर, रानडे, तेलंग यांच्याप्रमाणें द्रव्याचें अधिष्ठान आयुष्यांत आद्य न मानून समाजसेवेचें अधिष्ठान त्यांनीं मुख्य मानिलें. त्यामुळें त्या काळच्या मानानें चांगलेंच वेतन मिळविणारे बाळशास्त्री पदरास खार लावून घेण्याच्या आपल्या स्वभावामुळें कफल्लकच राहिले! म्हणजे त्यांची समाजसेवा व देशसेवा हिशेबी माणसाप्रमाणें कृपण नव्हती. लक्ष्मणराव चिपळूणकरांनीं लिहिलें आहे तसा तेलंगांप्रमाणें दोन लाख रुपये भांडवल झाल्यानंतर देशसेवेस वाहून घेण्याचा इरादा त्यांनीं धरला नाहीं किंवा अतोनात द्रव्यसंचय करणाऱ्या व 'खाऱ्या पाण्याचा समुद्र' म्हणून तत्कालीं लोकप्रसिद्ध झालेल्या रावबहादुरांचें अनुकरण त्यांच्या पूर्वींच्या काळांतहि त्यांनीं केलें नाहीं, हें व्यक्तिमाहात्म्याचा विचार करतांना अवश्य लक्षांत ठेवलें पाहिजे.

अक्कलकोटहून बाळशास्त्री मुंबईस परत आले. कारण, त्यांची विलायतेहून येऊं घातलेल्या एल्फिन्स्टन् प्रोफेसरांचे ॲसिस्टण्ट म्हणून नेमणूक झाली. ते नोव्हेंबर १८३४ मध्यें या आपल्या जागीं रुजू झाले. पुढें ऑर्लेब्रार व हार्कनेस् हे प्रोफेसर आले, पण त्यांना योग्य असे शिष्यच मिळेनात! कारण, पूर्वतयारी झालेले विद्यार्थीच मुंबईत फारसे नव्हते व जे अत्यल्प होते ते द्रव्यार्जनाकडे झुकत होते. या अकल्पित गोष्टीचा फायदा बाळशास्त्र्यांनीं स्वतः करून घेतला. ते स्वतः ऑर्लेब्रार यांचे शिष्य होऊन पाश्चात्त्य गणित व ज्योतिष यांत आपल्या गुरूप्रमाणेंच प्रवीण झाले. त्यांचें वेतनहि त्यामुळें दीडशेंचें तीनशें, पंचविसाव्या वर्षींच झालें. नंतर त्यांनीं उच्च शास्त्राध्ययन

करण्यास समर्थ असे विद्यार्थी तयार करण्यासाठीं एक स्वतंत्र 'ज्यूनिअर कॉलेज स्कूल' सुरू केलें व या संस्थेचे प्रमुख बाळशास्त्री नेमले. पुढें १८४० सालीं सर्व शिक्षण 'एल्फिन्स्टन् नेटिव्ह एज्युकेशन इन्स्टिट्यूशन' या संस्थेंत केंद्रित केलें गेलें व सरकारनें 'बोर्ड ऑफ एज्युकेशन' नव्यानेंच निर्माण करून त्याच्याकडे सर्व व्यवस्था सोंपविली. बाळशास्त्री हे विद्यालयांत वाङ्मय व विज्ञान या दोन्ही बाजूंचे विषय शिकवीत व इंग्रज शिक्षकांपेक्षां कोणत्याहि गोष्टींत ते मागें दिसले नाहींत. पुढें १८४२ सालीं प्रोफेसर ऑर्लेबार आजारी पडून विलायतेस रजेवर गेले, तेव्हां त्यांच्या जागीं दरमहा ४५० रुपयांवर ॲक्टिंग प्रोफेसर म्हणून बाळशास्त्र्यांचीच नेमणूक झाली व अशा रीतीनें अखिल हिंदुस्थानांत ते पहिले एतद्देशीय प्रोफेसर ठरले. या वेळच्या त्यांच्या शिष्यांतच दादाभाई नौरोजी, केरूनाना छत्रे वगैरे पुढें नामांकित झालेले व त्यांच्याचप्रमाणें गणिताचे प्रोफेसर नेमलेले शिष्य होते. दादाभाईंना सत्तर वर्षांनंतरहि आपल्या गुरूचें आदरपूर्वक स्मरण होतें. बाळशास्त्र्यांत शिकविण्याची हातोटी विशेषच होती. ज्ञान व बुद्धि असलेल्या सर्वच शिक्षकांत ती नसते. पण याहून विशेष म्हणजे त्यांचें सौजन्य व त्यांची विद्यार्थ्यांबद्दलची आपुलकी. 'विद्या विनयेन शोभते' असें आपण म्हणतों, पण नामांकित विद्वान् देशभक्त व कर्ते पुरुष क्वचितच या वचनाची साक्ष पटवितात. बाळशास्त्री हे त्यांत अपवादादाखल होते.

हें सर्व सरकारी काम सुरू असतांना 'दर्पण' साप्ताहिकांत लिहिण्याचें व ग्रंथलेखनाचें त्यांचें कार्य चालूच होतें. चुरचुरीत लेख न लिहितां ज्ञानपर व बोधपर लेख लिहिणाऱ्या बाळशास्त्र्यांचें लिखाण लोकप्रिय झालेलें दिसत नाहीं. पैशाच्या दृष्टीनें खर्चाची तोंडमिळवणी तरी होत होती कीं नाहीं याची शंका. त्यांनीं स्वतः कधीं याबद्दल चकार शब्द काढला नाहीं. पण त्यांच्या मृत्यूनंतर लिहिलेल्या लेखांत 'ज्ञानोदया'नें तसें स्पष्ट म्हटलें आहे. तरीहि त्यांनीं वाचकांचा अखेर निरोप घेतांना दिलेल्या मदतीबद्दल त्यांचे आभार मानून, आपल्या लेखनानें आपण एकहि मित्र गमाविला नाहीं, असें समाधानानें म्हटलें आहे व केलेल्या कार्याचा धाकट्या शास्त्रीबुवांप्रमाणें आत्मश्लाघापर शब्दांत गर्व न दाखवितां, पत्राचा हेतु जो अशा तऱ्हेच्या लिखाणाबद्दल लोकाभिरुचि उत्पन्न करणें व धर्म आणि राजकारण यांबद्दलच्या समजुती सुधारणें व प्रगत करणें, या किती सिद्धीस गेल्या तें सांगण्याचें काम लोकांवरच सोपविलें आहे. कार्याबद्दल निरभिमान हें जर लोकसेवावृत्तीचें खरें गमक मानिलें तर, बाळशास्त्र्यांच्या लोकसेवेमागील वृत्ति, विनय व सौजन्य यांचें दुसरें कोणतें उदाहरण पाहिजे ? इंग्रजी राज्याबद्दल आपण कोणती वृत्ति धारण केली पाहिजे व त्याचा फायदा कोणत्या रीतीनें करून घेतला पाहिजे यांचें कथन त्यांनीं कायावाचामनें-लेखनें केलें. 'दर्पण' बंद झाल्यानंतर त्यांनीं वर्तमानपत्री धंदा त्यांचे सहायक मित्र भाऊ महाजन यांकडे सोपवून स्वतः 'दिग्दर्शन' नामक मासिक सुरू केलें. त्यांतहि टीकात्मक लिखाणापेक्षां ज्ञानप्रसाराचाच हव्यास त्यांनीं धरला.

'दिग्दर्शना'च्या प्रस्तावनेंतच त्यांनीं आपल्या जुन्या विद्या व शास्त्रें व आधुनिक पाश्चात्त्य ज्ञान यांतील फरक सांगितला आहे. 'आपल्या जुन्या ज्ञानाचा मुख्य हेतु परमार्थसाधन हा होता, तर पाश्चात्त्यांच्या ज्ञानाचा हेतु इहलोकींची सोय हा आहे. विद्या ही श्रीमंतांस भूषण, गरीबांस पोटाचें साधन, तरुणांस उत्तम उद्योग, वृद्धांस विश्रांति आणि सर्वांस मोक्षप्राप्तीचा उपाय होय' असें ते सांगतात. चित्रें, नकाशे, आकृति घालून विषय सुबोध करण्याचा प्रकारहि त्यांनीं आपल्या लेखनांत अवलंबिला होता. एवंच, पाश्चात्त्य ज्ञानांत आधुनिक महाराष्ट्राचा प्रवेश करून देण्याची पायाभूत कामगिरी त्यांनीं केली. अर्थात्, त्यांस आधुनिक महाराष्ट्राचे जनक व पश्चिम भारतांतील नवयुग प्रवर्तक असें जें ग्रंथलेखकांनीं संबोधिलें आहें, तें सार्थ नव्हे असें कोण म्हणेल?

याच वेळीं बाळशास्त्री ह्यांना मुंबईचे जे. पी. नेमून सरकारनें त्यांचा गौरव केला. त्या वेळीं हा एकच बहुमानाचा प्रकार या देशांत रूढ होता. हा बहुधा समाजांतील श्रीमंत पुढारी यांनाच देण्यांत येत असे. एतद्देशीयांत जातवारीनें पाहातां, पारशी हे त्यांत बहुसंख्य; व मुसलमान हिंदूंहून लोकसंख्येनें किती तरी कमी असतां त्यांचेहि प्रतिनिधी जवळ जवळ हिंदूंइतके नेमण्यांत येत. अगदीं प्रथम १८३४ सालीं सरकारनें जे. पी. नेमले त्यांत तेरांतील नऊ पारशी व दोनच हिंदु—जगन्नाथ शंकरशेट व धाकजी दादाजी—दोन मुसलमानांबरोबर नेमले होते. नंतर १८४० सालीं नवे दहाजण नेमले त्यांतहि पांच पारशी, दोन मुसलमान व तीन हिंदु—बाळशास्त्री, श्रीमंत विनायकरावशास्त्री पटवर्धन व मनमोहनदास देवीदास हे होते. पहिल्या नेमणुकींत गुजराती हिंदु श्रीमंत नव्हता. म्हणजे इतकें त्यांचें महत्त्व मुंबई शहरांत कमी होतें. या सर्व गृहस्थांमध्यें बाळशास्त्र्यांखेरीज इतर थोर कुळ, द्रव्यभत्ता वा जातीचें पुढारीपण या तत्त्वांवर नेमलेले होते. बाळशास्त्री मात्र केवळ वैयक्तिक गुणांवर नेमलेले पहिले पुरुष समजले पाहिजेत. सर्व क्षेत्रांतील बाळशास्त्र्यांची लोकसेवा हेंच त्यांचें सामाजिक अधिष्ठान होतें. बाळशास्त्र्यांनीं १७ व्या वर्षी केलेल्या अर्जांत सहा भाषा ज्ञात असल्याचें म्हटलें आहे. त्यांची संख्याहि पुढें वाढतां वाढतां अखेरीस दुप्पट झाली. लातिन, ग्रीक व फ्रेंच या पाश्चात्त्य भाषा व कानडी, हिंदुस्तानी व अरबी याहि भाषा त्यांनीं परिचित करून घेतल्या होत्या. मुंबईची रॉयल एशिॲटिक सोसायटी त्या काळीं युरोपीयांचीच संस्था होती. तरीहि तिच्या संशोधनकार्यांत बाळशास्त्र्यांनीं भाग घेतला व कांहीं ताम्रपट उतरून प्रसिद्ध केले. एतद्देशीयांत हेच असलें काम करणारे पहिले असून भाऊ दाजी, मंडलिक, भांडारकर, तेलंग हे नंतरचे होत. तसेंच जिऑग्रफिकल सोसायटीची जी शाखा मुंबईस होती तिचे ते सदस्य व कारभारीमंडळाचे पदाधिकारी होते व तिच्या शोधक शाखेंत त्यांनीं भाग घेतला होता. प्रवास करून प्राचीन स्थळें पाहाणें व तेथील शिलालेख व ताम्रपट आदि गोळा

करणें या गोष्टी त्यांनीं केल्या. त्यांची शेवटची नोकरी नवीन स्थापन केलेल्या अध्यापकवर्गाचे डिरेक्टर म्हणून झाली होती व अशा रीतीनें मुंबई इलाख्यांतील पहिला मराठी, गुजराती व कानडी अध्यापक वर्ग योग्य रीतीनें निर्माण करण्याचें कठिण श्रेयहि त्यांनीं मिळविलें. यांतील मुलांसाठीं एक विद्यार्थिवसतीगृहहि त्यांनीं चालू केलें होतें व तेथील शिस्त ते जातीनें पाहात असत. पण दुर्दैवानें हें काम त्यांनीं फक्त एकच वर्ष केलें. प्रोफेसरीचें काम करीत असतांना दक्षिण विभागांतील शाळांच्या परीक्षकाचें व तपासनिसाचें काम त्यांनीं चार वर्षें केलें होतें. त्या काळीं आगगाडी झाली नसल्यामुळें हा लांबचा प्रवास बैलगाडी, टांगे, मेणे यांतून व कित्येक वेळां पायींच होत असे. मुंबई शहरांतील प्राथमिक शाळांच्या तपासणीपासून अत्युच्च एल्फिन्स्टन् प्रोफेसराच्या जागेपर्यंतचीं सर्व शैक्षणिक कामें बाळशास्त्रांनीं स्वतः केलीं असल्यामुळें व या गोष्टींत त्यांस प्रेम व उत्साह वाटत असल्यामुळें शिक्षणशास्त्रांतील ते तज्ज्ञ बनले असल्यास नवल नाहीं. अर्थात्, अशा गुरूबद्दल दादाभाईप्रभृति अनेक शिष्यांनीं त्यांची शिक्षणपद्धति आठवून पुढें चांगले उद्गार अनेक वर्षांपर्यंत काढले, यांत आश्चर्य कसलें ?

शास्त्रीबुवांचें ग्रंथकर्तृत्व त्यांच्या सबंध हयातभर चालूच होतें. अर्थात् या ग्रंथकर्तृत्वाचें स्वरूप त्या काळीं भाषांतर-रूपांतररूप असणें अपरिहार्य होतें. दादोबांच्या पूर्वींच बालव्याकरणापासून सुरुवात करून नीतिकथा, सारसंग्रह, भूगोलविद्या, इंग्लंड देशाची बखर, भूगोल शास्त्र (गणित-भाग), इंग्रजी व्याकरण, एल्फिन्स्टनच्या मुसलमानी रियासतीचें संक्षिप्त रूपांतर, हिंदुस्थानांतील इंग्लिशांच्या राज्याचा इतिहास, शून्यलब्धिगणित, मूलपरिणति-गणित, समीकरणाविषयींचीं टिपणें, ज्ञानेश्वरी, पुनर्विवाह प्रकरण व मानसशक्तीविषयींचे शोध वगैरे अनेक विविध विषयांवर त्यांनीं सुबोध लेखन करून महाराष्ट्रांतील शिक्षणप्रणालीचा पाया घालण्यांत मुख्य भाग घेतला. ज्योतिषविषयक व गणितविषयक परिभाषा त्यांनीं एतद्देशीय प्रतिशब्द तयार करून नव्यानेंच रचिली. शून्यलब्धि ही अशीच संज्ञा होय.

इंग्रजांच्या शेजारीं उभें राहाण्यास शास्त्रमत्तेनें आपली पायरी चढेपर्यंत त्यांच्याशीं आपले संबंध सलोख्याचे व गोडीचेच ठेवले पाहिजेत, असें बाळशास्त्र्यांचें स्पष्ट मत दिसतें. अभिमानानें भांडण उकरून काढण्याची व प्राचीन अभिमानावर तत्कालीन इंग्रजांस 'तागडीतुक्ये' म्हणून हिणविण्याची पुणेरी वृत्ति त्यांच्यांत नव्हती. मग याला कोणी स्वाभिमानाचा व देशभक्तीचा अभाव म्हणेल तर म्हणो ! त्या काळास अनुरूप असे ते राजकारणी व समाजसुधारक पुरुषहि होते. पहिल्या वर्षींच्या 'दर्पणां'त रेव्हरेंड विल्सनसारख्या मिशनरी माणसाचे इंग्रजी लेखहि संपादून प्रकाशित करणारे बाळशास्त्री, मिशनऱ्यांच्या अज्ञधर्मपरिवर्तनास विरोध करण्यास मागें सरले नाहींत. श्रीपत शेषाद्रि या लहानग्या मुलाच्या सुटणुकीसाठीं व शुद्धीसाठीं त्यांनीं पदरमोड करून कोर्टदरबार करविले व त्यास सोडवून व पूर्वांगप्रायश्चित्त देऊन पूर्णशुद्धीसाठीं काशीस रवाना केलें.

या त्यांच्या उपक्रमामुळें अखिल ब्रह्मवृंद खळबळून गेला होता. कांहीं सुजाण शास्त्री व जगन्नाथ शंकरशेट आणि बिवलकर दिवाणजी यांसारखे कांहीं पुढारी त्यांस अनुकूल होते, तरी बहुसंख्य ब्रह्मवृंदाकडून त्यांच्यावर वाळीं घालण्यांत आली. सनातनी ब्राह्मणांनीं बाळशास्त्री व त्यांचे सहायक यांस 'सरकारचाकरशास्त्री' असा टोमणा मारणारा किताबहि दिला! जणूं इंग्रज सरकारची खिस्ती माणसाला हिंदु करून घेण्यांत फूस होती! केवळ ब्राह्मणच नव्हत, तर 'परभू, शेणवी व सोनार' हेहि या शुद्धीमुळें ब्राह्मणांची निर्भर्त्सना करीत होते व त्यांचे पुढारी धाकजी दादाजी होते. या खळबळींत शास्त्र्यांचे परभूतट व शास्त्रीतट असे दोन भेद पडले होते. मुख्य कार्य सिद्धीस गेल्यावर बाळशास्त्री हठाग्रही नव्हते याचें निदर्शक त्यांचें पुढील वर्तन झालें; म्हणजे त्यांनीं पूर्ण शुद्ध न झालेल्या खिस्ती माणसाशीं आपला संसर्ग घडला या दोषाबद्दल 'विष्णवे नमः' म्हटलें, म्हणजे प्रायश्चित्त घेतलें. शुद्धीप्रमाणें पुनर्विवाहविषयक वादाचाहि बाळशास्त्र्यांनीं पुरस्कार केलेला दिसतो. पण प्रत्यक्ष पुनर्विवाह झालेला नसल्यामुळें तो केवळ धार्मिक वादच त्या काळीं होता.

बाळशास्त्री ता. १७ मे १८४६ रोजीं प्रवासांत सुरू झालेल्या व वेळींच योग्य उपचार न झाल्यामुळें वाढलेल्या विषमज्वरास बळी पडले. त्यांच्या मृत्यूनंतर जे लहान-मोठ्यांचे उद्‌गार बाहेर पडले त्यांवरून या पुरुषाचें तत्कालीन स्थान उत्तम दिसून येतें. सर अर्स्किन् पेरी या मुख्य जज्जानें, 'बाळशास्त्र्यांच्या मृत्यूमुळें पश्चिम हिंदुस्थानची हानि झाली आहे, तशी हानि युरोपीय वा हिंदी दुसऱ्या कोणत्याहि माणसाच्या मृत्यूनें झाली नसती', असे उद्गार काढले. पार्शी, गुजराती व इंग्रजी तसेच खिस्ती मिशनरी वर्तमानपत्रांनींहि अशाच तऱ्हेचे उद्गार काढून आपला शोक व्यक्त केला होता. अकस्मात् मृत्यूनें व बाळशास्त्र्यांच्या वदान्यतेमुळें उघड्या पडलेल्या त्यांच्या बायकोस व मुलांस याच इंग्रज गृहस्थाच्या सूचनेवरून पेन्शन देण्यांत आलें, इतकी त्यांची गोष्ट विशिष्ट समजण्यांत आली. अशा पुरुषाला जर पुढील महाराष्ट्र विसरला असला व समाजेतिहासांतील योग्य स्थान त्यांना न देतां त्या गोष्टीचा अवस्त्वारोप इतर पुरुषांवर करीत असला, तर तो गाजरपारखीच झाला असें म्हटलें पाहिजे!

अशा या अद्वितीय पुरुषाचें संपूर्ण कर्तृत्व लोकांसमोर हडसूनखडसून मांडण्यासाठीं अनेक वर्षें अपूर्व मेहनत घेऊन व त्यांच्या चरित्राचीं साधनें तळघरांतून शोधून काढून विचारी जनतेपुढें प्रस्तुत ग्रंथांत मूळ स्वरूपांत ठेवण्यांत आली आहेत. असें करतांना जें इतिहाससंशोधन करावें लागलें, तें सर्व करून उदाहणपद्धतीनें वाचकांच्या संशयनिवृत्तीसाठीं पुनरुक्तिदोष स्वीकारूनसुद्धां त्या त्या जागीं सिद्ध करून दाखविण्यांत आलें आहे. या ग्रंथाचें स्वरूप हें केवळ बाळशास्त्री असें न राहातां 'बाळशास्त्री व त्यांचा काळ' या स्वरूपाचें झालें आहे. म्हणजे या ग्रंथाला अव्वल इंग्रजींतील 'महाराष्ट्राच्या इतिहासाचीं साधनें' असें नामाभिधान अयोग्य ठरणार नाहीं. ग्रंथाची रूपरेषा एखाद्या विषयावरील

प्रबंध व त्याचीं आधारभूत साधनें अशी आहे. गेल्या शंभरांवर वर्षांत बाळशास्त्र्यां-संबंधानें ज्या ज्या कोणी लहानमोठे उद्गार काढले व लेखनाविष्ट केले, त्या सर्वांची सटीक छाननी स्वतंत्र उपोद्घात लिहून सोदाहरण करण्यांत आली आहे. मराठी वाङ्मये-तिहासाचा एक उभा छेद या उपोद्घातांत दृष्टीस पडतो व त्यावरून महाराष्ट्रांतील विद्वानांची, साहित्यिकांची व लेखकांची एक तऱ्हेची परीक्षा आपोआपच होऊन जाते. यांत गत आणि हयात असे सर्वच लेखक आले असून त्यांत लहान-मोठा, मित्र-अमित्र, असा कोणताच भेद करण्यांत आलेला नाहीं. मृत लेखकांच्या लेखनाचे वाभाडे अशा तऱ्हेनें काढावे किंवा काय असा विचार कोणास सुचेल; पण इतिहासदृष्टीनें पाहातां त्यांत कांहीं गैर वाटूं नये. अशा गोष्टी नित्य व प्रत्येकानें करण्याच्या नसतात. तसें झाल्यास तें वाङ्मयदूषण ठरेल. पण सर्वांचा राग ओढवून घेऊन इतिहाससंशोधन व भाषाशुद्धि यांबाबत मराठी लेखकांची हजेरी एकदां कोणी तरी कोणत्या तरी प्रसंगानें कोठें तरी घ्यावयास पाहिजे होती. ती एकवार या ग्रंथांत घेतली गेल्यानें ग्रंथकाराविषयीं कांहींहि मत झालें, तरी त्यामुळें महाराष्ट्रवाङ्मयाचें हितच साधेल, यांत आम्हांस शंका वाटत नाहीं.

प्रस्तुत शताब्दीग्रंथ गेलीं पांच वर्षें छापला जात असल्यामुळें त्यांतील लहानमोठे भाग व विशेषतः हा विद्वज्जनपरीक्षक उपोद्घात बऱ्याच व्यक्तींच्या अवलोकनांत येऊन त्यांचा राग ग्रंथलेखकास थोडाबहुत बाधला असल्याचें आमच्या कानावर आलें आहे व पंतप्रधान खेर यांच्या पुरस्कारांत त्याचा उल्लेख नापसंतीदर्शक शब्दांत व्यक्त झाला आहे. म्हणून या विषयाचें येथें थोडें सविस्तर विवरण अस्थानीं ठरणार नाहीं. ज्या तऱ्हेची बाळशास्त्रीविषयक लिखाणाची छाननी उपोद्घातांत करण्यांत आली आहे, तशी ती करण्याचें आमच्या स्वतःच्या मनांत कधीं आलें असतें, असें आम्हांला खास वाटत नाहीं. प्रस्तुत ग्रंथाचे लेखक श्री. ग. गं. जांभेकर यांनीं जर आम्हांस याबाबत पूर्वीं पुसलें असतें, तर आम्ही त्यांस असें लिहिण्यास उत्तेजन दिलें असतें असेंहि नाहीं. आधीं बिलकुल सुगावा लागूं न देतां छापील लेख ग्रंथकारांनीं आम्हांपुढें ठेवला! यांत त्यांचा हेतु आमच्यापुरता व्यक्तिविषयक असावा, कारण आम्हांसहि त्यांनीं या छाननींत वगळलेलें नव्हतें! आमच्या लेखांत आमचा हेतु लिहितांना काय होता, याचें संपूर्ण ज्ञान आम्हांस असल्यानें व्यक्तिशः आमच्यापुरता अन्याय जांभेकरांच्या छाननींत झाला आहे, असें आमचें मत आहे. विशेषतः खासगी संभाषणांत आधीं सर्व बातमी काढून घेऊन नंतर त्या माहितीचा उपयोग आम्हांविरुद्ध पुराव्यांत करून घेणें यास काय म्हणावें हें आम्हांस कळत नाहीं. प्रत्येक वर्तमानपत्राचा दरेक अंक विद्वानांकडूनहि पाहिला जातो, असें गृहीत धरण्यांत जांभेकराची भूल होत आहे. माझ्यावर टीका करीत असलेले 'विविधवृत्ता'चे अंकहि मी सर्व पाहिलेले नाहींत. 'दर्पणा'चे अंक रेकॉर्डमध्यें जाऊन मी शोधले नाहींत; कारण, मराठी वर्तमानपत्रांचा इतिहास लिहिण्यास मी निघालों नव्हतों. यदृच्छया अवलोकनांत आलेल्या वर्तमानपत्रापुरतांच मी बोलत होतों. अस्तु. श्री. जांभेकरांची

लिहिण्याची, बोलण्याची व वागण्याची रीत त्यांच्या व्यक्तित्वाचें संपूर्ण दर्शन घडविते व प्रस्तुत ग्रंथानें जसें बाळशास्त्र्यांचें तसेंच ग्रंथकाराचेंहि स्वरूप डोळ्यांसमोर उभें राहाण्यास अडचण पडणार नाहीं हें स्पष्ट आहे.

असें असलें तरी, या उपोद्घातासारखी छाननी अनेक विषयांत यापूर्वीच होणें जरूर होतें कीं, जेणेंकरून अनेक घर करून बसलेले लोकभ्रम उद्ध्वस्त होऊन आमचें समाजजीवन निर्मल होतें व आरोग्याच्या मार्गास लागतें. ज्याप्रमाणें रोग शरिरांत निर्माण झालेलीं विषें बाहेर टाकण्यासाठीं निर्माण होतात, त्याचप्रमाणें वाङ्मयीन टीकेचें प्रयोजन समजलें पाहिजे. पण ती अर्थातच सरळ मनांच्या माणसांकडून झाली पाहिजे आणि सरळपणा ही कल्पनागम्य सरळ रेषेप्रमाणें साहित्यिकांत दुर्मिळ वस्तु आहे. असा सरळपणा बाळशास्त्र्यांच्या काळीं होता, पण तो लोकप्रिय किंवा फायदेशीर नव्हता. म्हणून त्याला लोकछंदानुवर्तित्वाचें रूप देऊन तो यशस्वी व फायदेशीर करण्यांत आला. यांत वावदूकपणानें सत्याची असत्याशीं अशी भेसळ करण्यांत आली कीं, त्यांत सत्य कोठें पार लोपून गेलें! विष्णुशास्त्री चिपळूणकर हे या नवीन तंत्रज्ञांचे मुकुटमणि होत. हिंदुस्थानांतील ब्राह्मणजातींत गेल्या दोन हजारांवर वर्षांत असे लोक बरेच होऊन, त्या त्या वेळीं त्यांनीं सत्य नाहींसें करण्यांत यशहि मिळविलें, असें इतिहासावरून दिसतें. एरवीं अशोकासारख्या राजाचें व बुद्धाला दशावतारांत घेऊनहि त्याच्या धर्माचें नांव हिंदुस्थानांतून कसें नायनपेट करण्यांत आलें, याचा बोध होत नाहीं. न जाणो, कोणी अशोकाचे शिलालेख वाचून बदलेल, म्हणून ते वाचण्याची कलाहि हिंदुस्थानांतून हांकून लावण्यांत आली! इतकी कीं, गेल्या शतकांत इंग्रजांनीं पुनः शोधून काढीपर्यंत तिच्या अस्तित्वाचा थांगहि या भरत-भूमींतील अहंमन्य व सर्वज्ञ ब्राह्मणांत उरला नव्हता! ज्यांनीं असे पराक्रम केले, त्यांनीं गरीब व सालस बाळशास्त्र्यांचें नांव दडपून टाकण्यांत यश मिळविलें, यांत अपूर्व तें काय? सबंध ब्राह्मणजातीच्या या देशांतील इतिहासाचाच तो एक चालत आलेला भाग आहे.

जर चिपळुणकरांच्या लिखाणाची जांभेकरांप्रमाणें छाननी करण्यांत आली असती, तर त्याच्या दुष्परिणामांपासून महाराष्ट्र बचावला असता व त्याचें खरें स्वरूप लोकांसमोर येऊन या नूतन साहित्यपंथाचें बूड स्थिरावलें नसतें. 'श्रीवर्धनकर कुळकर्ण्यांचा पणतू शहाजहानच्या तक्तावर बसला' या ऐतिहासिक थापेपासून या नूतन साहित्यिक बंडाची सुरवात करण्यांत आली. चाळीस हजार लोक जमवून वसईस चार हजार परक्या पोर्तुगीजांचा पराभव करणें वा तितक्याच मोठ्या फौजांनीं इंग्रजांच्या तेवढ्याच लहान फौजेचा स्वतःच्या दारांत पराभव घडविणें या नांव घेण्यासारख्या ऐतिहासिक गोष्टी ठरविण्यांत आल्या! 'राजनीति म्हणजे दुसऱ्याचें पागोटें घेण्याची विद्या' अशी व्याख्या सांगण्यांत आली व 'या देशास कांहीं एक झालेलें नाहीं' असें निदान करण्यांत आलें! 'हल्लीं जी आमच्या राष्ट्रास विपत्तीची स्थिति प्राप्त झाली आहे, ती आमच्या अंगच्या कांहीं अनिवार्य दोषांमुळें आली नसून, ती यदृच्छया कोणत्याहि राष्ट्रास येण्यासारखी आहे...

...आमचें दैव फिरल्यामुळें हल्लींच्या अवस्थेंत आम्ही येऊन पडलों आहों......कालगति विचित्र आहे. त्या वैचित्र्यांतीलच आमची प्रस्तुतची स्थिति आहे' असें दीर्घ इतिहासाध्ययनांतून सार निघालें! पण हें सांगावयास शास्त्रीबोवा नको होते. हिंदुस्थानांतील अज्ञांतील अज्ञ याच समजुतीवर आपली निष्ठा ठेवून आजवर जगत आला आहे.

रानडे-महाजनीप्रभृति ज्या अनेक लोकांस विष्णुशास्त्र्यांची विचारसरणी पटत नव्हती, त्यांनीं वरील विचारमुक्तावलीची परीक्षा न करून दाखविल्यामुळेंच ती खोटी प्रणाली खरी ठरली व तिचे परिणाम महाराष्ट्रास भोगावे लागत आहेत. आणि म्हणूनच प्रस्तुत ग्रंथांत श्री. जांभेकरांनीं केलेलें उद्घाटन आम्हांस अनिष्ट वाटत नाहीं. कारण, महाराष्ट्रसाहित्यिकांचा जो परिचय आम्हांस आहे, त्यावरून पुरें माप प्रत्येकाच्या पदरांत घातल्याशिवाय ते कोणतीहि गोष्ट कबूल करतील, वावदूकपणा करून पुनः फांटे फोडणार नाहींत, असा विश्वास आम्हांस नाहीं. उलट, इतकें करूनहि त्यांच्या अहंगंडाचे चाळे बंद पडतील किंवा काय, याचीच शंका आहे. हल्लीं महाराष्ट्रांत विद्वान् हा शब्द इतका स्वस्त झाला आहे कीं, आतां अविद्वान् म्हणण्यास कोण उरला, असें म्हणण्याची पाळी आली आहे! इतिहासांत नांव दाखल होण्यास कोणते गुण अवश्य मानावे याचा विवेक इतिहासकारास करावा लागतो. पुष्कळ वर्षांपूर्वी एक इतिहाससंशोधक म्हणाल्याचें स्मरतें कीं, "काय, तुम्ही 'शिवाजी' 'शिवाजी' सारखें चालविलें आहे! शिवाजीचें राज्य तें केवढें आणि त्याचें स्तोम एवढें! पेशवे नानासाहेब यांच्या राज्याचा विस्तार सिंधुनदापर्यंत पसरला, तरी तुम्ही शिवाजीच्या चतुर्थांश वेळहि त्यांच्या गुणसंकीर्तनाला देत नाहीं!"

बाळशास्त्र्यांना त्यांचें योग्य स्थान प्राप्त करून देऊन त्यांची स्मृति जागृत करावी व ती कायम राहावी म्हणून कांहीं स्मारकयोजनाहि सिद्ध व्हावी, असा प्रस्तुत ग्रंथ लिहिण्यांत 'लोकशिक्षण'कार जांभेकरांचा हेतु आहे. तो सारखा डोक्यांत संचार करीत असल्यामुळें आपल्या हेतूच्या सिद्ध्यर्थ आलेली कोणतीहि संधि ग्रंथकार हातची जाऊं देत नाहींत. त्यामुळें या इष्ट गोष्टीचें वेगवेगळ्या प्रसंगांनीं बरेंच चर्वितचर्वण प्रस्तुत ग्रंथांत झालें आहे व तो एक ग्रंथदोष गणला जाईल. ग्रंथकार बहुभाष आहेत. विशेषणांची खैरात करण्याचा त्यांचा स्वभाव आहे. सूत्रमय लेखनपद्धति त्यांस मंजूर नाहीं. इंग्रजी-मराठी दोनहि बाजू देण्याच्या हव्यासामुळें एक प्रकारची द्विरुक्ति सर्व ग्रंथभर पसरली आहे. या वाङ्मयदोषाचा संशोधनकार्यप्रचारास उपयोग होण्यासारखा आहे. पण पुष्कळ वेळीं खरी व इष्ट गोष्टहि कंटाळा येण्याइतक्या पद्धतीनें सांगण्यानें ऐकणाराच्या मनावर विपरीत परिणाम होण्याचा संभवहि थोडा नसतो व व्यवहारांत या गोष्टीचे अनिष्ट परिणाम होतात, हें विसरून चालणार नाहीं. तशी कांहींशी भीति आम्हांस वाटते.

या ग्रंथाच्या तीन खंडांपैकीं पहिल्यांत पंतप्रधान खेर व ना. जयकर यांचे इंग्रजी पुरस्कार, ग्रंथकर्त्यांचें आत्मनिवेदन व सुदीर्घ उपोद्घात असून खेरीज बाळशास्त्र्यांचीं इंग्रजी-मराठी छोटीं चरित्रें आहेत. दुसऱ्यांत बाळशास्त्र्यांच्या लेखनांतील इंग्रजी-मराठी

मराठा ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम २६१२८ वि: १-१-६
क्रमांक १२०३ नों: दि: ...



वेंचे व त्यांच्या दोन्हीहि भाषांतील सूच्या आहेत. ग्रंथाचें स्वरूप लक्षांत येण्यासाठीं त्यांच्या मुखपृष्ठांचे ब्लॉकसुद्धां यांत छापले आहेत. मराठी नियतकालिकांचा आरंभ कसा झाला व आरंभीं गद्यरचना कशी असे, याचें स्वरूप यांवरून कळतें. तिसऱ्या खंडांत, बाळशास्त्रीविषयक सर्व उल्लेख, त्यांच्या चरित्रांतील घडामोडींवर प्रकाश टाकणारा अस्सल पत्रव्यवहार, त्यांचे शिष्य नागपुरचे भवाळकर यांनीं लिहिलेल्या आत्मचरित्रांतील बाळशास्त्री व त्यांचे सहकारी भाऊ महाजन यांबद्दलचे सटीप उतारे, तसेंच शास्त्रीबोवांच्या गणितज्योतिषविषयक लेखनाचे मूळ नमुने वगैरे बहुमोल साधनांचा संग्रह आहे. हा अव्वल इंग्रजींतील इतिहासाचा भाग होय. त्या काळाची कल्पना येण्यासाठीं व निःशंकता निर्माण करण्यासाठीं मूळांचे ब्लॉक्स, कांहीं थोर सद्गृहस्थांचीं दुर्मिळ छायाचित्रें वगैरे देण्यांत आलीं आहेत. एखाद्या गोष्टीचा छडा कसा लावावा, संशोधकीय बारकावा कसा घ्यावा इत्यादि गोष्टींचे धडे विद्यार्थ्यांस जांभेकरांच्या लेखनावरून मिळूं शकतील. याच दृष्टीनें या ग्रंथाचें महत्त्व विशेष आहे. स्वतः विशेष संशोधन न केलेल्या व मुख्यतः पदामुळें विद्वान् या संज्ञेस पात्र झालेल्या लोकांचेहि स्मृतिग्रंथ प्रसिद्ध होण्याचा प्रस्तुत काळ आहे. पण दुसऱ्यांच्या लेखांनीं स्वतांची स्मृति चिरजीवी करण्याची अपेक्षा प्रस्तुत ग्रंथकारांनीं ठेवलेली नाहीं. त्यांच्या या ग्रंथानेंच त्यांनीं आपलें स्मारक स्थापन केलें आहे. जेथें ग्रंथकाराचें स्मारक होतें तेथें वर्ण्य व्यक्तीचें स्मारक झाल्यावांचून कसें राहील? या ग्रंथानें बाळशास्त्री जांभेकरहि आद्य अष्टपैलु विद्वान्, गणितज्योतिषज्ञ, पुराणेतिहाससंशोधक, फर्डे इंग्रजी लेखक, सर्वांगीण शिक्षणतज्ज्ञ, हिंदुस्थानांतील पहिले प्रोफेसर, मराठी वर्तमानपत्र-व-मासिक-कार, इतिहासलेखक, व्याकरणकार, समाजसुधारक, शुद्धिकार्यकर्ते, धर्मनिर्णयकर्ते, राजकारणी व राजदरबारी पुरुष व पश्चिम हिंदुस्थानांतील पहिल्या आधुनिक पिढीचे गुरु म्हणून निःसंदेह ज्ञात होतात व होत राहातील. त्यांचें दृश्य व उद्घोषक स्मारक जर याउपरहि महाराष्ट्रानें करण्याचें नाकारलें, तर तो त्याचा, साठ वर्षांपूर्वीच शास्त्रीबोवांच्या एका सहाध्यायानें म्हटल्याप्रमाणें कालिमा ठरेल! ज्याचें स्मारक झालें पाहिजे असें तत्कालीन गुजराती, पारशी पत्रांनीं सुचविलें होतें तें कां होऊं शकलें नाहीं, याचा विचार समाजेतिहासदृष्ट्या चिंतनीय आहे व तेणेंकरून इतिहासविकृतीचें उत्तम आविष्करण होऊं शकेल. ज्याप्रमाणें शिवाजीचें स्मारक न करतां एखाद्या पेशव्याचें केलें म्हणून ऐतिहासिक महाराष्ट्राचा जनक कोण, हें दडून राहूं शकत नाहीं, त्याप्रमाणेंच आधुनिक महाराष्ट्राचा जनक कोण, हेंहि यापुढें छपणार नाहीं.

अशा या अपूर्व ग्रंथाचें चीज मराठी भाषिक करोत व ग्रंथकर्त्यांच्या इच्छेप्रमाणें बाळशास्त्र्यांचें योग्य स्मारक विश्वविद्यालयांत त्यांच्या नांवानें गणितपीठ स्थापून होवो, अशी इच्छा प्रदर्शित करून हें परीक्षण पुरें करितों.

ग. ग. जांभेकर यांच्या ‘आचार्य बाळशास्त्री जांभेकर’ ग्रंथाचें परीक्षण : ‘नवभारत’, मे १९५१

# लोकहितवादी

काळाएवढा न्यायाधीश दुसरा नाहीं. कोणत्याहि गोष्टीचे परिणाम साकल्यानें कळावयास मध्यें काळ लोटावा लागतो. कोणत्याहि वस्तूच्या आकाराचें यथार्थज्ञान होण्यास तीपासून कांहीं अंतरावर उभें राहून ती पाहावी लागते, तद्वत् कोणत्याहि कृत्याच्या बरेवाईटपणाचा निर्णय कालदृष्ट्या दूर जाऊन करावा लागतो. इतिहासाचें महत्त्व याच गोष्टींत सांठविलेलें आहे. खातांना पदार्थ किती गोड लागला यापेक्षां पोटांत गेल्यानंतर त्याचा परिणाम कसा झाला या गोष्टीचें महत्त्व अर्थातच अधिक आहे. याच न्यायानें धाकट्या शास्त्रीबुवांचे लोकहितवादींवरील लेख तत्कालीन महाराष्ट्रानें म्हणजेच त्या काळाच्या ब्राह्मण जातीनें—म्हणजे त्यांतील वाचनाभिरुचि असलेल्या अत्यल्प साक्षर वर्गानें आणि तेहि पुण्यामुंबईभोंवतींच्या अल्प क्षेत्रांत—मिटक्या मारीत वाचले असतील. कारण त्याला कारणेंहि तशींच स्वार्थसाधनरूप होतीं. पण ते लेख 'निबंधमाले'च्या ग्रंथरूपांत महाराष्ट्राच्या पोटांत कोंबल्याचा परिणाम किती समाजविघातक झाला याचा निवाडा करण्याची वेळ आता खचित आली आहे. शास्त्रीबुवांचे अनुयायी शिष्य समजले गेलेले लोकमान्य जाऊनही आतां एक पिढी लोटली. तेव्हां अशा कर्तबगार शिष्याच्या गुरुभक्तीचे राष्ट्रावर झालेले परिणाम जोखून पाहण्यासहि आतां हरकत नसावी. नेमक्या अशा समयींच लोकहितवादींच्या 'शतपत्री'चें—शिळाप्रेसवर छापलेल्या ग्रंथाचें—पुनर्मुद्रण पाऊणशें वर्षांनंतर घडून यावें हा योगायोगच म्हटला पाहिजे.

कारण लोकहितवादींनीं लोकहितकारी संस्था स्थापण्यांत पुढाकार घेतला असला तरी चिपळूणकरांप्रमाणें त्यांची स्वस्थापित देवळांत पूजाअर्चा, पुराणकीर्तन, उत्सवछबिना इत्यादि प्रकारांनीं बोळवण करण्याचा प्रघात रूढ केला गेलेला नाहीं. देवापुढील खारका गोळा करण्याच्या लोभानें प्रेरित होऊन कां होईना, पण पूजानंदादीप चालू ठेवून क्षेत्रमाहात्म्य वाढविणारे बडवे त्यांनीं सुरू केलेल्या क्षेत्रांत ताम्रपट घेऊन बसलेले दिसत नाहींत. उलट, त्यांच्यावर लाखोली वाहण्याची संधि दुसऱ्यांच्या स्तवनप्रसंगींहि चुकविण्यांत आलेली नाहीं. अशाहि स्थितींत त्यांच्या बुडवलेल्या वह्या असल्या पुरांनीं वाहून न जातां, कमलपत्रांप्रमाणें न भिजतां, कालोदधीवर तरंगत राहिल्या असल्या तर हा लोकहितवादींतर्फे मिळालेला इतिहासाचा फैसला म्हटला पाहिजे.

लोकहितवादी मोठे होते का ? विद्वान् होते का ? दूरवर दृष्टि पोहोचणारे द्रष्टे होते

का ?––कीं ज्यामुळें त्यांची आठवण काढावी, स्मृति जागृत ठेवावी, त्यांच्या विचारांशीं परिचय करून घ्यावा, असें कोणाला वाटावें ? या प्रश्नांचीं उत्तरें एकदम 'होय' अशीं देऊं लागलें तर चिपळूणकरांच्या दुष्ट लेखांनीं महाराष्ट्रांत उत्पन्न झालेले वावदूक 'मोठा कोणाला म्हणावें, विद्वत्तेचें निश्चित गमक कोणतें, द्रष्टयाचीं लक्षणें काय', असल्या 'मूलभूत' शंका काढून वितंडवाद माजवितील व मुख्य मुद्दयाला बगल देतील. तेव्हां तशा भानगडींत न पडतां एवढेंच सांगतां येण्यासारखें आहे कीं ते निश्चितपणें धाकट्या शास्त्रीबुवांपेक्षां थोर होते, आणि विद्वानहि होते, आणि द्रष्टे तर होतेच होते.

लोकहितवादींना मोठे कां म्हणावयाचें ? कारण त्यांच्या जीवनाची बैठक मानव्याच्या विस्तीर्ण पायावर उभारलेली होती. त्यांच्या टीकेचा मारा भट, कारकून व अर्थशून्य घोक्ये पंडित यांवर झालेला दिसत असला तरी टीकेचे मुद्दे अखिल मानवजातीस लागू पडण्यासारखे होते. लोकहितवादींचा युरोपीय समकालीन कार्ल मार्क्स ज्या हेतूनें मानवी समाजाच्या प्रश्नांचा अभ्यास करीत होता त्याच हेतूनें प्रेरित होऊन लोकहितवादींनीं लेखणी हातांत धरली होती. त्यांची देशभक्ति मानवभक्तीचा एक लक्ष्य भाग या रीतीची होती. 'सर्व देशाची काळजी प्रत्येकजणानें करावी.' (पृ. ३०) असें त्यांस वाटत होतें. तसेंच 'स्वदेशाचें हित इच्छावें आणि परदेशाची हानि इच्छावी असें नाहीं.' हेंहि ते सांगतच होते. (३१); 'या जमिनीवर जे आपण आहोंत, ते सर्व एकमेकांचे बंधु आहोंत ...याजकरितां कोणी सुखी व द्रव्यवान् असतील, त्यांणी बहुत लोक उपाशी मरतात व दरिद्री आहेत, त्यांचें रक्षण होण्याचा प्रयत्न करावा.' (८६); 'मेल्यावर आपण एकमेकांस उपयोगी पडणार नाहीं. तेव्हां या जन्मांत ही संधि लोकांवर उपकार करण्याची आहे ती सोडूं नये व आयुष्याचा व्यय दुसऱ्यांचे हिताकरितां करावा. दुसऱ्यास सुखप्राप्ति करणें हें स्वतः आपणांस लहान सौख्य नाहीं,' (८७) असा उपदेश ते आपल्या स्वदेश-प्रीतीवरील पत्रांतच करतांना आढळतील. 'वैराग्य हें मूर्खपण आणि ईश्वरानें जें दिलें व ज्याकरितां मनुष्यदेह केला, त्यास टाकून जनावराप्रमाणें रानांत फिरणें आहे." (१९६); 'मन हेंच मोटें शास्त्र आहे व लिहिलेलीं शास्त्रें सर्व त्याचे खालीं आहेत.' (२०९); 'शास्त्रांतील कायदे जरूर वरचेवर फिरले पाहिजेत.' (२१२); 'जुनेंनवें होत आलेंच आहे. हजारों शास्त्रांचे नियम ऋषींनीं फिरविले आहेत...नवे ग्रंथ केले तर आपण ऋषि होऊं. कायदे करणें हें तर राष्ट्राचें काम आहे; प्रत्येक काळीं जे जे शहाणे लोक असणील, त्यांणीं शास्त्र करावें हें उचित आहे.' (३८९); 'मनूचें वचन असो, याज्ञवल्क्याचें असो, कोणाचेंहि असो, ब्रह्मदेवाचें कां असेना, बुद्धिरेव बलीयसी असें आहे. शास्त्रास एकीकडे ठेवा, आपली बुद्धि चालवा, घातक वचनावर हरताळ लावा.' (३८५); 'अज्ञान आहेत त्यांस शहाणे करणें, रोगी आहेत त्यांस औषध-पाणी करणें, दरिद्री व पीडित आहेत त्यांस सुख देणें, हीच नीति व हेंच पुण्य.' (१७७); 'चार ब्राह्मण लावून अभिषेक करावा त्यापेक्षां चार मजूरदार लावून रस्ता नीट

करावा हें चांगलें.' (१७९), 'स्त्रीपुरुषाचे अधिकार धर्मसंबंधीं कामांत व संसारांत सारखे असावे. आचारापेक्षां नीति प्रमुख असावी. मनुष्यमात्रास तुच्छ लेखूं नये. जातिअभिमान नसावा. सर्वांशीं सारखें दयापूर्वक वर्तावें. जास जो पाहिजे तो रोजगार त्यानें करावा. गुणेंकरून जातिभेद मानावा, कुलेंकरून मानूं नये. सरकाराहून प्रजेचे अधिकार अधिक असावे. जें जें रयतेच्या हिताचे तें सरकारशीं भांडून घेत जावें.' (३१३); 'गरीब हा श्रीमंताचे जुलमानें होतो, कांहीं जन्मतः कोणी गरीब नसतो.' (४४१); 'भिकारी आणि श्रीमंत यांचे शरिरामध्यें किंवा बुद्धीमध्यें फरक नसतो. इतकेंच कीं कालेंकरून एकानें दुसऱ्याचें हरण करून फार माल जमविला असतो व दुसऱ्याचा तो हरण जहाला म्हणून तो भिकारी असतो. ईश्वरानें पृथ्वीवर पदार्थ निर्माण केले, हे सर्वांस सारखे पोचावे हा त्याचा हेतु होय. परंतु पन्नास लोकांस लुटून एक श्रीमंत होतो.' (४२५) वगैरे अनेक उताऱ्यांवरून लोकहितवादींच्या मनाची विस्तीर्ण बैठक ध्यानांत येईल.

वरील उताऱ्यांत प्रकट झालेल्या विचारसरणीवरून लोकहितवादी हे आंतरराष्ट्रीय मनोवृत्तीचे होते, स्वदेशाबद्दल त्यांना अभिमान होता तरी प्रांताभिमानाचें अनिष्ट वारें त्यांना लागलेलें नव्हतें, त्यांची दृष्टि भट्टमहाशयांच्या अनावश्यक कर्मकांडावर खिळून राहिलेली होती तरी ते निरीश्वरवादी नव्हते, ईश्वरवादी असूनहि ते परलोक मानणारे नव्हते, सामाजिक गोष्टींचा अंतर्भाव ते धर्मात करण्यास तयार असून एतद्विषयक त्यांची दृष्टि पूर्ण आधिभौतिक स्वरूपाची होती, गरीब-श्रीमंतांबद्दलचे त्यांचे सिद्धान्त साम्यवादाला शोभण्यासारखे होते वगैरे गोष्टी वाचकांच्या सहजच ध्यानांत येतील. जगावरील कोणत्याहि समाजाच्या मानगुटीस त्या काळीं पुरोहितवर्ग बसलेला होता. अशा वेळीं त्यांचा बीमोड करण्यासाठीं त्यांनीं जें ब्राह्मणजातीवर शस्त्र धरलें तें जातीवर असें नसून त्या वर्गाच्या समाजपिळणुकीस कारणीभूत होणाऱ्या अनिष्ट कर्मकांडावर होतें, हें लक्ष्यांत येईल. पण त्यांच्या टीकेचा रोख मुळींच मनांत न आणतां स्वज्ञातीवर उठलेला हा एक मूर्ख, अज्ञानी, भ्रमिष्ट आहे अशी टीका केली गेली. पेशवाईत उत्पन्न झालेलीं अनिष्ट खुळें त्याकाळीं समाजांत प्रत्यक्ष विद्यमान होतीं. त्यांनीं बाजीरावशाहींत सुरू झालेली समाजाची घसरट कडेलोटास पोचविली होती. ऐतखाउ सरदार, इनामदार, वतनदार; अर्थशून्य व सद्यःकाळास निरुपयोगी अशी संस्कृत विद्या पढून त्यावर द्रव्य उकळून समाजनाश करणारे पंडित; सामान्य जनता, गोरगरीब, बायाबापड्या, व अज्ञ शूद्रादि वर्ग यांच्यावर चरणारा भिक्षुकवर्ग; तुटपुंज्या कारकुनी शिक्षणावर परकी अंमलाखालील अंमलदार बनून स्वबांधवांची पिळणूक करणारा गृहस्थवर्ग इत्यादिकांच्या जाचांत भरडला जाणारा दुबळा, खुळा लोकसमूह पाहून लोकहितवादींचें मन तिळतिळ तुटत होतें. त्यांची सरळ बुद्धि, निष्पाप अंतःकरण, समाजाची दुरवस्था पाहून हृदय कालवून गेल्यानें काय करूं नी काय न करूं अशी क्षुब्ध झालेली त्यांची मनोवृत्ति या सर्वांचा संघटित परिणाम

त्यांच्या लिखाणांत सर्वत्र दिसून येतो. आणि म्हणूनच तें कार्ल मार्क्सच्या साम्यवादाच्या आदिम जाहिरनाम्याप्रमाणें उत्क्षोभक, क्रांतिकारक व आक्रमक ठरलें आहे.

असल्या अव्वल दर्जाच्या प्रभावी लिखाणाचा प्रकाश समाजाच्या अज्ञानांधकारावर पडून समाजसुधारणेस योग्य तऱ्हेनें आरंभ झाला असता तर आज महाराष्ट्र ज्या हीन-दीन अवस्थेस येऊन पोचला आहे त्या अवस्थेस येण्याचें कारण पडलें नसतें. पण महाराष्ट्रसमाजाच्या दुर्दैवानें एक महान् साहित्यक निर्माण झाला. यानें स्वतःलाच 'मराठी भाषेचा शिवाजी' म्हणवून घेतलें आहे. ग्रीसच्या इतिहासांतील सूज्ञ (Sophist) वावदुकांप्रमाणें अल्प व एकांगी ज्ञानाच्या तुटपुंज्या भांडवलावर यानें मोठा घाऊक व्यापार केला. लोकहितवादींच्या लिखाणामुळें ज्यांच्या पोटावरच पाय येत होता असे सर्व—मुख्यतः ब्राह्मण—लोक या त्यांच्या ईश्वरप्रेषित वकीलाचें स्वागत करण्यास सहजच सिद्ध होते. आणि हेच लोक त्या काळीं महाराष्ट्रसमाजांत प्रमुख होते. त्यांच्या साहाय्यानें मोठी आरडाओरड निर्माण करून या पंडितानें प्रगतिपथावर चालूं लागलेल्या महाराष्ट्र समाजाची गाडी बैल बुजवून थांबविण्याचें अपश्रेय संपादिलें, त्याचा परिणाम म्हणजे ब्राह्मणादि पांढरपेशा साक्षरवर्ग प्रि. गोळयांच्या भाषेंत 'अज्ञ, अजगरवृत्ति, अजागळ, श्ववृत्ति' राहिला हा होय.

लोकहितवादींचें म्हणणें रास्त होतें, पुरोगामी होतें, समाजहितकारक होतें ही गोष्ट आतां बहुधा सर्वमान्य होत आहे. अजूनहि हठानें जे अशी गोष्ट कबूल करण्यास लाजतात त्यांचेंहि वर्तन लोकहितवादींच्या उपदेशानुसार सध्यां होऊं लागलें आहे. या म्हणण्याप्रमाणें महाराष्ट्रसमाजाची सुधारणा होत राहिली असती तर अनेक समाजविध्वंसक अनिष्टापत्तींच्या तडाख्यांतून महाराष्ट्रसमाज सुटला असता. जपानांतील वतनदारवर्गाप्रमाणें त्या काळच्या ब्राम्हणांनीं राष्ट्रकल्याणार्थ आपलें स्वार्थसाधू स्वामित्व सुखानें सोडिलें असतें तर निदान शिवप्रभूंचा जयघोष करणाऱ्या महाराष्ट्रांत तरी ब्राम्हणब्राम्हणेतर-वाद निर्माण होण्यास कांहींच कारण उरलें नसतें. कोल्हापूरच्या वेदोक्त प्रकरणाचें मूळच खंडिलें गेलें असतें. स्त्रीशिक्षण, विधवाविवाह, विधवावपन असल्या क्षुल्लक प्रकरणांत समाजाची शक्ति अपव्ययीं पडून जो सुधारकदुर्धारक-वाद निष्कारण माजला त्याला स्थानच उरलें नसतें. आधिभौतिक मताच्या पायावर राष्ट्राची आर्थिक पुनर्घटना,—कामकरी व फुकटखाऊ जमीनदार, पिळला जाणारा गरीब व छळणारा सावकार, खोट्या धर्मकल्पनेमुळें खितपत पडलेला दीन व त्याचा गैरफायदा घेऊन त्याला लुबाडणारा धर्ममार्तंडवर्ग, इत्यादि भेद लक्ष्यांत घेऊन —१९ व्या शतकास शोभण्यासारखी होती तर हिंदुमुसलमान, भांडवलदारमजूर, असले लढे निर्माण होऊन राष्ट्र खिळखिळें होण्यास अवसरच सांपडला नसता. सुधारणेचें कार्य केसरीसंस्थेंतूनच होत राहून आगरकरांस 'सुधारक' काढण्याचा खटाटोप करावा लागला नसता. गोखल्यांना 'भारतसेवकसमाजा'चें कार्य केसरी–मराठा–संस्थेंतून चालवितां आलें असतें. सेवासदन व अनाथबालिकाश्रम यांतूनच हिंदुमहिला संघाचें कार्य होत राहिलें

असतें. राजकारणांतील जोडाजोडी बंद पडून कॉंग्रेसची सुरत झाली नसती. अस्पृश्योद्धार, वन्यजनसुधारणा, ग्रामीण-कृषकसुधारणा इत्यादि प्रश्न महात्मा गांधींसाठीं मागें राहून त्यांच्या चळवळीला जें अधिष्ठान उरलें तें जाग्यावरच शिल्लक राहिलें नसतें.

लोकहितवादी जसे मोठे होते तसेच द्रष्टेहि होते, याचा पुरावा हाच कीं त्यांनीं उपदेशिलेला मार्ग महाराष्ट्रानें मध्यंतरीं दोन पिढ्या सोडून दिला होता तरी अखेरीस त्याला त्याच उपदेशाचा अवलंब करणें भाग झालें. 'तरुणी-शिक्षण-नाटिका' लिहून ज्या स्त्रीशिक्षणाची पुण्यांत रेवडी उडविण्यांत आली त्याच पुण्यांत स्त्रीशिक्षणाचा आज सर्वांत जास्त प्रचार झालेला दिसतो. संमतिवयाच्या कायद्यावर रणें माजलेल्या याच पुण्यनगरींत आतां सुशिक्षित प्रौढ कुमारिकांच्या व विधवांच्या विवाहाचा प्रश्न सोडविण्यासाठीं अन्यांना 'लपंडाव' पडद्यावर आणावा लागत आहे. ज्या दयानंदांची गाढवावरून मिरवणूक काढून थट्टा करण्यांत आली त्यांच्याच आर्यसमाजाचा पाठिंबा आतां इरसाल पुणेरी हिंदुस्वातंत्र्यवीरांना घ्यावा लागत आहे. ज्या ज्योतिबा फुल्यांची क्षुद्र कुचाळी करण्यांत आली त्यांचेंच नांव लोकमान्य टिळकांच्या पुतळ्याहूनहि उंच रेमार्केटावर झळकत आहे. ज्या पुण्यांत राष्ट्रीय सभेचा मंडप विटाळेल म्हणून सामाजिक परिषदेला बंदी करण्यांत आली त्याच पुण्यांत अस्पृश्योद्धाराचीं लाडूभोजनें मातंगांच्या वस्तींत उठत आहेत. या चमत्कारांची यादी किती म्हणून वाढवावी?

लोकहितवादींच्या कार्याचा विपर्यास करून महाराष्ट्रसमाजाच्या प्रगतीची गाडी ज्यानें दुसऱ्या रुळावर नेऊन उलटी फिरविली त्या चिपळूणकरांच्या विपरीत करणीचे दुष्परिणाम लोकमान्यांच्या कार्याला सर्वांत जास्त बाधले. त्यांनाहि समाजाच्या गाडीची दिशा बदलतां आली नाहीं किंवा मूळ रुळावर आणणें साधलें नाहीं. शतकानुशतक चालत आलेल्या हिंदुसमाजाच्या पंकिल गर्तेतच या जहांबाज वीराला आपल्या शक्तीचे प्रयोग करीत राहावें लागलें. राजकारणावर एखादा ग्रंथ लिहिण्याची इच्छा राजकारणांत जन्म घालूनहि त्यांना झाली नाहीं तर शेकडों टीकांच्या माऱ्यांनीं खिळखिळ्या झालेल्या भगवद्गीतेवरच त्यांना हल्ला चढवावासा वाटला. मिल-स्पेन्सर पढलेल्या या पंडिताला गणपत्युत्सव काढून पुन्हा मूर्तिपूजेचें पुनरुज्जीवन करतांना आपण कांहीं चूक करीत आहों असें वाटलें नाहीं.

लोकहितवादींनीं शास्त्रवचन सदसद्विवेकबुद्धीच्या विरुद्ध येईल तेथें गुंडाळून ठेवा असें ठणठणीत सांगितलें तर लोकमान्यांना त्यानंतर दोन पिढ्या जाऊनहि शास्त्रवचनांच्या तारेवर बुद्धीची करामत करावीशी वाटली. या कसरतींत बुद्धीचा चमत्कार भरपूर दिसला तरी त्या चमत्कारांचे परिणाम समाजाला विघातकच झाले यांत आतां वावदूकांखेरीज इतरांना शंका वाटेल असें म्हणवत नाहीं.

लोकहितवादींच्या विद्वत्तेची शास्त्रीबुवांनीं रेवडी उडविली, त्या लोकहितवादींजवळ शुद्ध विद्वत्ता चिपळूणकरांहूनहि जास्त होती हें त्यांच्या लिखाणाचें अवलोकन केल्यास सहज

ध्यानांत येण्यासारखें आहे. पण विद्वत्ता असूनहि पांडित्याची अक्कल त्यांच्यांत नव्हती. आप्तवाक्य ज्यांस मान्य असेल त्यांच्यापुढें "विद्वान या दृष्टीनें लोकहितवादींस जें महत्त्व देतां येईल तें विष्णुशास्त्र्यांस नाहीं. शास्त्रीबुवांचें महत्त्व नव्या प्रकारच्या भावनेचा प्रचारक आणि अर्वाचीन पुण्याचा निर्माणकर्ता या दृष्टीनें आहे." हीं डॉ. केतकरांचीं वाक्यें (श्री. श्री. के. क्षीरसागर : 'व्यक्ति व वाङ्मय'—परिशिष्ट) ठेवतां येण्यासारखीं आहेत. शास्त्रीबुवांच्या लिखाणामुळें मूलग्रंथ अभ्यासिणाऱ्या विद्वत्तेचा महाराष्ट्रांत संकोच झाला. वर्तमानपत्री ज्ञानावर वाटेल तें टारगें पोरगें कोणत्याहि मुद्यावर मत देण्याइतकें धीट झालें. याच प्रवृत्तीचा आजच्या महाराष्ट्रांत कहर झालेला दिसून येत आहे. प्लेटोनें आपल्या लिखाणांत म्हटलें आहे त्याप्रमाणें "असे हे धाडसी लोक, लोकांचे मोठाले जमाव जमले असतांना बहुजन समाजाचींच मतें शिकवीत असतात व त्यांनाच ज्ञान म्हणून गौरवानें संबोधित असतात." याच्याचपुढें प्लेटोनें "लोकांचा अधिकार वाजवीपेक्षां अधिक मान्य केला म्हणजे ते सांगतील त्याप्रमाणें करणें भागच पडतें" असें लिहिलें आहे त्याच तऱ्हेचा दुष्परिणाम त्याच कारणामुळें महाराष्ट्रांत आज दृग्गोचर होत आहे. पोटभरू भटाभिक्षुकांवर विद्वत्तेचा व सुज्ञतेचा अवस्त्वारोप करून त्यांच्या मतांना मान तुकविण्याची जी अनिष्ट परंपरा शास्त्रीबुवांच्या लिखाणामुळें महाराष्ट्रांत सुरू झाली तीमुळें सुबुद्ध लोकांची विचारपूर्वक आरंभिलेली सुधारणा मागें पडली. अनिष्ट रूढी ज्यांना बाधतात त्यांना आपले प्रश्न समाजाकडून न्याय्य रीतीनें सोडविले जातील अशी आशा त्यामुळें उरली नाहीं. अर्थातच ते व्यक्तिशः बेफाट बंडखोर बनले. ज्या वन्यजातींना व अस्पृश्यांना आपल्याला पाणी मिळण्याचीहि आशा उरली नाहीं ते सहजच परधर्माच्या गोटांत अनन्यगतिक होऊन गेले. पांढरपेशावर्गांत सुधारणेला जें विकृत स्वरूप सध्यां प्राप्त झालेलें दिसत आहे त्याला कारण अनन्यगतिकत्वानें उत्पन्न झालेली ही बंडखोर वृत्ति. समाजाला बरोबर घेऊन जातां येत नाहीं म्हणून जो बंडखोर बनतो तो साहाजिकच कालान्तरानें त्या समाजाला डोईजड होतो. आजचा नवमतवाद, स्त्री-विवाह-विषयक प्रवृत्ति, श्लील-अश्लील मीमांसा, कला—नीतिवाद असल्या डोईजड बंडखोर व्यक्तींच्या टोळ्यांमुळेंच निर्माण झालेले आहेत. योग्य वेळीं योग्य त्या सुधारणा न्याय्य बुद्धीस अनुसरून न केल्यामुळें समाज आज क्रांतीच्या कड्यावर येऊन ठेपला आहे. घनघोर आंतरसमाज युद्ध होऊन अनेक गोष्टींचा चक्काचूर झाल्याशिवाय सुधारणेची आशा आतां उरलेली नाहीं. लोकहितवादींचा हितवाद ज्यांनीं अचाट पराक्रम करून गाडून टाकला त्यांच्यावर या आपत्तीची जबाबदारी इतिहासकार लादतील यांत संशय नाहीं.

लोकहितवादींच्या द्रष्टेपणाचा पुरावा त्यांच्या लिखाणांत सर्वत्र पसरलेला आहे. "आणखी निदान १०० वर्षें पाहिजेत तेव्हां हे लोक जागृतींत येतील". (३८३) असें त्यांनीं ९२ वर्षांपूर्वीं लिहिलें तें खरें नाहीं असें आज तरी कोण म्हणूं शकेल? सार्वजनिक काकांच्याहि पूर्वीं एक पिढी त्यांनीं स्वदेशीचा पुरस्कार केला होता, इंग्रजांच्या

राज्याचे दुष्परिणाम ओळखिले होते, आपल्या लोकांची कुवतहि जोखली होती. भटांच्या मूर्खपणाबद्दल जें त्यांनीं जीव तोडून लिहिलें व ब्राह्मणांच्या स्वार्थीपणाचें जें नागडें स्वरूप दाखविलें तें गेल्या शंभर वर्षांत विचारी पुरुषांच्या प्रत्ययास आलें आहे. जे थोडे सज्जन लोकहितवादींचा उपदेश खरा मानून, प्रचंड छळ सोसून त्याप्रमाणें वर्तत राहिले त्यांनींच तेवढीं भावी सुधारणेचीं बीजें राष्ट्रांत राखून ठेविलीं व म्हणूनच आज त्यांच्यावर लिहिण्याचा सुयोग प्राप्त झाला आहे. लोकहितवादींत दोष नव्हते असा या लिखाणाचा अर्थ नव्हे. त्यांच्यांत जे दोष होते ते ज्या भटी संस्कृतीवर ते टीका करीत होते तज्जन्यच होते. पेशवाईत प्रादुर्भूत झालेला ब्राह्मणांचा एकांगीपणा व दुबळेपणा लोकहितवादींतहि भरपूर उतरलेला होता. त्यामुळें त्यांचीं मतें कार्ल मार्क्स-इतकींच पायाशुद्ध असून त्यांना जोरानें प्रचलित करतां आलीं नाहीत. कार्ल मार्क्सच्या मतांनीं यूरोपांत संघटित साम्यवादी पक्ष निर्माण झाला. व त्यानें वीस वर्षांपूर्वींच रशियांत आपल्या विजयाची पताका फडकविली. इतर राष्ट्रांत इतका विजय त्यांच्या अनुयायांना मिळालेला नसला तरी त्याच्या विचारप्रणालीचा परिणाम जगांतील सर्व समाजावर कमीजास्त प्रमाणावर होतच आहे. लोकहितवादींचें दुबळेपण हें एका अर्थीं महात्मा गांधींच्या दुबळेपणासारखें आहे. विचार उत्तम, शास्त्रशुद्ध व अंतिम मानव हितकारी असूनहि व्यवहारांत भागत नाहीं. जगाचा इतिहास हा बहुधा अविचारी, आडमुठ्या मानल्या जाणाऱ्या व्यक्तींच्या पराक्रमानें बनलेला आहे. पाशवी शक्तीचेंहि मानवसमाजाच्या उत्क्रांतींत महत्त्वाचें स्थान आहे असा बोध यावरून होतो. लोकहितवादी सज्जन होते. त्यांजवळ असला आडमुठेपणा नव्हता. तो ज्यांच्याजवळ होता त्यांनींच महाराष्ट्राचा नंतरचा इतिहास बनविला. पण पाशवी शक्तीबरोबरच सत्यालाहि महत्त्वाचें अधिष्ठान आहे. त्याचा प्रादुर्भाव सध्या होत असलेला दृक्प्रत्ययास येत आहे. कदाचित् या दोहोंच्या आंदोलनानेंच भावी इतिहास बनणार असेल; कुणीं सांगावें ?

'लोकहितवादींचीं शतपत्रें' या ग्रंथाचें परीक्षण
'महाराष्ट्र साहित्य पत्रिका', जुलै, १९४०.

# न्यायमूर्ति रानडे

आपल्या विचारांत व तदनुरोधानें लेखनांत बदल करण्याचा काळ स्वातंत्र्याच्या आगमनानंतर या देशास प्राप्त झाला आहे. दहा वर्षांपूर्वीच्या सर्व लेखनावर ब्रिटिश राज्याची छाया सतत पडलेली असे. कोणत्याहि सार्वजनिक व्यक्तीच्या चरित्राचा विचार करतांना, ब्रिटिश राज्याबद्दल त्या व्यक्तीचें मत काय आहे हें प्रथम लक्षांत घेऊन तिच्या कर्तबगारीचें मूल्यमापन करण्याचा प्रघात त्या काळीं होता. आतां हा प्रकार बदलला पाहिजे. हें केवळ कार्यदृष्ट्याच नव्हे तर सत्यनिर्णयासाठींहि आवश्यक आहे. लोकमान्य टिळकांनीं रानड्यांवर लिहिलेल्या मृत्युलेखांत त्यांचें बुद्धिवैभव 'सर्वज्ञः स हि माधवः' या शब्दांनीं सूचित केलें होतें. त्यांच्या कर्तबगारीचें वर्णन, थंड पडलेल्या गोळयास ऊब देऊन महाराष्ट्र देश सजीव करणारे धन्वंतरी, असें केलें होतें. असें असलें तरी तत्पूर्वीं त्यांच्यावर टीका करतांना, 'रानडे यांस सद्‌बुद्धीची सनद कोणी दिली आहे' असें वादाच्या भरांत लिहितांना टिळकांनाहि आपण कांहीं अन्याय करीत आहों, असें वाटलेलें दिसत नाहीं. खरें पाहतां सद्‌बुद्धि हा रानड्यांच्या मनाचा सर्वांहून श्रेष्ठ असा विशेष होता. या सद्‌बुद्धीमुळेंच त्यांचे विचार व वागणूक एकांगी होत नसत. प्रतिपक्षालाहि सौजन्यानें वागविण्याच्या त्यांच्या पद्धतीमुळें, स्वतःच्या पक्षांतहि कधीं कधीं ते अप्रिय होत. पण कोणतेंहि सार्वजनिक काम निघालें कीं त्यांत ते नाहींत, असें कधींच झालें नाहीं. सरकारी नोकर असूनहि राजकारणी; यूरोपीय सुधारणेचे अभ्यासू चाहते असूनहि हिंदी संस्कृतीचे अभिमानी; प्रार्थनासमाजाचे सभासद असूनहि यात्रा करण्याइतके श्रद्धाळु; सुधारकांचे अग्रणी असूनहि वडिलांची मोहबत ठेवणारे सुपुत्र; ब्राह्मणी संस्कृतींत वाढलेले असूनहि धंदेउद्योगांत लक्ष घालणारे; गाढ विषयांत बुडून गेलेले असूनहि गांवांतील सभासंमेलनें, व्याख्यानें, वक्तृत्वाच्या चढाओढी, यांतहि हुरुपानें न चुकतां भाग घेणारे; असे रानडे हे तत्कालीन समाजाचे स्वयंभू पुढारी बनले तर त्यांत आश्चर्य कसलें ! लोकमान्य टिळकांनाहि त्यांचा सल्ला घ्यावासा वाटे. त्या काळीं पुणें-मुंबईत किंबहुना हिंदुस्थानांत अन्यत्रहि कांहीं नवीन काम आरंभावयाचें म्हटलें कीं, त्यांत रानडे नाहींत असें क्वचितच घडे. असें सर्वमान्य पुढारीपण रानड्यांस् कां मिळालें हें आपणांस जाणून घेतलें पाहिजे.

पहिली गोष्ट, रानडे हे त्या काळाची सामाजिक गरज भागविणारे होते. ब्रिटिशांचें

राज्य महाराष्ट्रांत होतांच येथील लोकांना कळून चुकलें कीं, आपले 'प्रभु' हे अनेक बाबतींत आपल्या फार पुढें गेलेले असल्यामुळें त्यांचें राज्य हिंदुस्थानांत झालें. केवळ आपल्यांतील दुही, वितुष्ट किंवा लढाईतील पराभव वा परक्यांची कुटिल राजनीति, यांमुळें हा मोठा चमत्कार घडून आलेला नाहीं. अर्थात् प्राप्त स्थितींत हिंदवासियांनीं करावयाची पहिली गोष्ट म्हणजे पाश्चात्य ज्ञान आत्मसात् करणें ही होय. तसा प्रयत्न पहिल्या पिढींत बाळ गंगाधरशास्त्री जांभेकर यांनीं केला. पुराणिकाच्या या मुलानें संस्कृत विद्येचा ध्यास न धरतां, अनेक भाषा शिकण्याचा उपक्रम करून सर्व शास्त्रांचें पायाभूत असें जें गणितशास्त्र, त्यांत पारंगतता मिळविली. तत्कालीन पहिली गरज शालोपयोगी पुस्तकें तयार करण्याची आहे हें ओळखून, सारांश-भाषांतररूप पुस्तकें त्यांनीं तयार केलीं. आपणास समजलेली विद्या शिष्यांत वितरित कशी करतां येईल, इकडे पहिल्या ट्रेनिंग कॉलेजचे प्रिन्सिपॉल होऊन त्यांनीं लक्ष पुरविलें. त्यांचेच गणितांतील शिष्य केरूनाना छत्रे, दादाभाई नौरोजी प्रभृति यांनीं त्या शास्त्राचा प्रसार पश्चिम हिंदुस्थानांत केला. 'दर्पण', 'दिग्दर्शन' वर्तमानपत्र व मासिक काढून पाश्चात्य ज्ञान, राज्यपद्धति, समाजसुधारणा, धर्मविचार, शास्त्र, कलाज्ञान याचा प्रसार त्यांनीं आरंभिला. तत्कालीन मुंबईतील नवीन कोणतीहि बाब असो, तिकडे लक्ष देण्याचें, तींत भाग घेण्याचें व पारंगत होण्याचें त्यांनीं टाळलें नाहीं. यूरोपियनांनीं काढलेली रॉयल एशियाटिक सोसायटी असो, भूगोल-संशोधन-संस्था असो, वाचनालय संस्था असो, किंवा न्यायखात्यांतील ज्यूरीची नवीन पद्धत असो, तींत त्यांनीं यथाशक्य भाग घेतला व ते मुंबई इलाख्यांतील पहिले मध्यमवर्गीय पुढारी झाले. त्या वेळीं सर्वांत मोठें संकट ख्रिस्ती धर्माचें होतें. त्याला तोंड देण्यांत त्यांनीं पदरमोड करून भाग घेतला. ते चौतिशींतच मरून गेले तरी त्यांनीं घातलेल्या ज्ञानाच्या पायामुळें, त्यांनीं केलेल्या लोकजागृतीमुळें व बरोबरीच्या नात्यानें इंग्रज राज्यकर्त्यांत मिसळून एतद्देशीयांचा न्यूनगंड त्यांनीं कमी केला असल्यामुळें, पुढील पिढी पुढचें पाऊल टाकण्यास समर्थ झाली.

ही पिढी दादोबा पांडुरंग, लोकहितवादी, बाबा पदमनजी, नाना शंकरशेट, फुले व दादाभाई नरौजी प्रभृतींची होय. त्यानीं जांभेकरांचा उपक्रम त्याहिपुढें नेला. तिसरी पिढी भांडारकर-रानडे प्रभृतींची. हिच्या वेळीं विश्वविद्यालयाची स्थापना होऊन ज्ञानाच्या अभ्यासाची पद्धतशीर सुरुवात झाली. विषयांची संख्या वाढली. त्याहूनहि महत्त्वाची बाब म्हणजे आमच्या इंग्रज प्रभूची प्रगतीहि ह्या मधील काळांत कल्पनेबाहेर झाली. आगबोटी, आगगाड्या, तारायंत्र, गिरण्या यांबाबत झपाट्यानें वाढ होऊन जनतेच्या नजरेसमोर इंग्रजांच्या शास्त्रज्ञानाचें प्रात्यक्षिक सुरू झालें. लोकशाहीच्या बाबतींतहि इंग्लंडची याच काळांत खरी प्रगति झाली. केवळ वाङ्मयच नव्हे तर सामाजिक शास्त्राचीहि वाढ याच काळांत सुरू होती. वॅलेस व डार्विन यांच्या शोधांनीं मानवजातीची उत्क्रांति समजून आली व या कल्पनेचा सर्व शास्त्रांवर परिणाम झाला. दलितांचे हक्क,

मजुरांची स्थिति, स्त्रियांची परवशता, समता आणि बंधुता यांचे खरे अर्थ व त्यांच्या मर्यादा, सरकारी रीत्या सामाजिक सुधारणा, असे अनेक प्रश्न नवीन जगांत उत्पन्न होऊन त्यांची चर्चा सार्वत्रिकरीत्या सुरू झाली.

सत्तावन सालच्या पर्यंत इंग्रजांच्या मनांत हिंदवासियांबद्दल सद्भावना होती. याच वेळीं ख्रिस्ती धर्माचें इंग्लंडांत पुनरुज्जीवन होत होतें. त्या पुनरुज्जीवनाचा एक भाग मिशनरी संस्था होत. मागासलेल्या लोकांना शिक्षण देऊन ख्रिस्ती करून मानव कोटींत आणून सोडणें हें खऱ्या ख्रिस्त्याचें कर्तव्य आहे, अशी भावना अनेक निष्पाप सज्जन इंग्रजांत वाढीस लागली होती. ख्रिस्ती धर्मप्रचार हा त्यांच्या मतें परोपकाराचा मार्ग होता. त्यामुळें या कार्यासाठीं मुक्त हस्तानें दान देऊन मागासलेलें जग सुसंस्कृत करण्याचा मार्ग त्यांनीं आरंभिला. जॉन विल्सन, रॉबर्ट मनी, नेसबिट, मरे मिचेल् प्रभृति मिशनऱ्यांनीं या दिशेनें अविश्रांत श्रम करून मुंबईत शाळा काढल्या. त्यांच्या प्रयत्नानें नीलकंठशास्त्री गोरे, बाबा पदमनजी यांसारखीं बुद्धिमान माणसें ख्रिस्ती झालीं व जे इतर ख्रिस्ती झाले नाहींत, त्यांच्यावरहि त्या धर्माची मोठी छाप पडली.

पाद्र्यांच्या टीकेनें हिंदुधर्मांतील व समाजांतील दोष उघडे पडले. इंग्रजी शिकलेल्यांतील हा मतिपालट पाहून सनातनी लोक हवालदिल झाले. इंग्रजी शिकणें म्हणजेच बाटणें असा समज समाजांत रूढ झाला. तो फक्त हिंदूंतच नव्हे तर पारशी, मुसलमान, यहुदी यांच्यांतहि रूढ झाला. सरकारी नोकरीसाठीं इंग्रजी शिकणें तर भाग, हेंच काय, पण कोणत्याहि नव्या ज्ञानासाठीं त्याची गरज होती. या नूतन आंग्लशिक्षित तरुण चमूचें छुपें बंड सुरू झालें होतें. पुण्यांत त्याचा आविष्कार लोकहितवादींच्या लिखाणांत सांपडतो. मुंबईत त्याचें स्वरूप अविचारी, उच्छृंखल, बालिश स्वरूपाचें होतें. ज्या वेळीं सावरकरांच्या मतें उत्तर हिंदुस्थानांत बंडाचा संकेत म्हणून चपात्या पाठविण्याचा प्रकार सुरू होता, त्या काळीं मुंबईतील परमहंस चमू गुप्तपणें कोठें तरी जमून चहांत पाव बुडवून खाऊन हिंदुधर्म बदलण्याच्या विचारांत गढून गेलेला होता. या मंडळींत दादोबा पांडुरंग, डॉ. भांडारकर यांसारखे सज्जन पुरुषहि होते.

रानडे १८५७ च्या आरंभीं मुंबईत येऊन एलफिन्स्टन हायस्कुलांत दाखल झाले. या गोष्टीचा त्यांच्या आयुष्यावर इष्ट असा परिणाम झाला. जर ते मिशनरी शाळेंत गेले असते, तर त्यांच्या बालधार्मिक प्रवृत्तीवर अनिष्ट परिणाम होण्याचा बळकट संभव होता, तो सहजगत्या टळला. ते नेहमीं अभ्यासांत बुडालेले असल्यानें भोंवतालच्या अनिष्ट वातावरणाचा त्यांच्यावर कांहींच परिणाम होऊं शकला नाहीं. त्या वेळीं मुंबईतील इंग्रजी शिक्षण बरेंच वरच्या पायरीस चढलेलें होतें. जांभेकरांच्या काळीं जीं पुस्तकें हिंदुस्थानांत श्रुतहि नव्हतीं व मेकॉलेच्या इतिहासाप्रमाणें कांहीं लिहिलींहि गेलीं नव्हतीं, तीं आतां सरकारी अभ्यासक्रमांत समाविष्ट झालीं होतीं. एलफिन्स्टन कॉलेजांत पहिले इंग्रज प्रोफेसर सर अलेक्झँडर ग्रँट यांसारखे विलायतेंतहि नामांकित असलेले लोक

होते. विद्यार्थ्यांची संख्या अत्यल्प असल्यामुळें, त्यांवर व्यक्तिशः लक्ष ठेवून त्यांकडून चोपून अभ्यास करून घेण्याची पद्धत त्या वेळीं होती. या गोष्टीचा रानड्यांसारख्या आज्ञाधारक व सरळ मार्गानें जाणाऱ्या विद्यार्थ्यांवर फारच चांगला परिणाम झाला.

जांभेकरांच्या पिढीचें लक्ष शुद्ध शास्त्रांच्या अध्ययनाकडे विशेष होतें, तें रानड्यांच्या पिढींत सामाजिक शास्त्राकडे वळलें. इतिहास, अर्थशास्त्र, तत्त्वज्ञान, राजनीति, वाङ्मय हे विषय प्रामुख्यानें पुढें आले, आणि त्यांचाच विशेष अभ्यास रानड्यांकडून घडला. त्यांची शक्ति संस्कृत भाषेचें व्याकरण घोकण्यांत किंवा जुनाट वाङ्मयाचा निरुपयोगी काथ्याकूट करण्यांत खर्चीं पडली नाहीं. त्याऐवजीं मराठीचाच अभ्यास त्यांकडून झाला व ही गोष्ट त्यांच्या पुढील पुढारीपणास उपकारक ठरली. मराठी सत्तेच्या उत्कर्षावर त्यांनीं पुढें जो ग्रंथ लिहिला, त्याचें बीज त्यांच्या मॅट्रिकच्या परीक्षेतील त्या विषयावरील निबंधांत होतें; व आपल्या निष्पाप मनानें त्यांनीं त्या वेळेस पेशवाईचें खरें स्वरूप जाणलें होतें, असें त्यांच्या निबंधावरून दिसतें. पण तदनंतर महाराष्ट्रांत काल्पनिक इतिहासाचा व मनोज्ञ ऐतिहासिक कादंबऱ्यांचा मनु उगवला व त्याचा परिणाम रानड्यां-सारख्या विचारी माणसावरहि झाल्याशिवाय राहिला नाहीं असें निदर्शनास येतें. सत्याप्रमाणें असत्याचाहि समाजावर फार मोठा परिणाम होऊं शकतो, याचें रानड्यांचा मराठ्यांच्या इतिहासावरील प्रबंध हें मोठें उदाहरण आहे.

रानड्यांची मनोभूमिका धार्मिक संताची होती. श्रद्धाळूपणा हा त्यांचा विशेष. अध्यात्मादि पारमार्थिक विषयांत या गुणापासून सामाजिक अनर्थ घडण्याचा संभव मुळांतच नसतो. पण इतिहासांत श्रद्धा व स्वाभिमान हे माणसास चुकीच्या मार्गावर नेण्यास समर्थ ठरतात. श्रद्धेमुळें रानड्यांना इंग्लंड–हिंदुस्थानचा घडून आलेला संबंध ईश्वरी कालसूत्राचा नियोजित परिणाम वाटला. श्रद्धावादी हा गूढवादीहि असतो. त्याला जगांत विपरीत असें कांहीं दिसत नाहीं. त्यामुळें तो कोणत्याहि गोष्टींत तक्रार करणारा किंवा झगडणारा असा होऊंच शकत नाहीं. जाणणें म्हणजेच क्षमा करणें होय. जर प्रत्येक गोष्टीचा उलगडा आपणांस होतो अशी एखाद्याची समजूत पटली तर तो टीकाकार किंवा कोणत्याहि विषयाचा अभिनिवेश बाळगणारा होणार नाहीं. तीच गत रानड्यांची होती. कांहीं एका मर्यादेपर्यंत सामाजिक क्षेत्रांत या भावनेचा उपयोग आहे. त्यामुळें कोणत्याहि क्षेत्रांतील प्राथमिक कार्य तंट्याबखेड्याशिवाय सुरळीत पार पडतें. पण कोणत्याहि सामाजिक प्रश्नाचा ऐतिहासिक अंतिम निकाल तीव्र झगड्यानेंच लागावयाचा असतो. त्याला इष्ट ती मनोवृत्ति रानड्यांजवळ नव्हती. लोकमान्य व गांधी यांना कमी श्रद्धाळु म्हणतां येणार नाहीं. त्यांची मनोवृत्ति रानड्यांइतकीच धार्मिक होती. पण त्यांनीं आपल्या श्रद्धाक्षेत्रांसाठीं झगडा पत्करला. रानड्यांना व दादाभाईंना तो करतां आला नाहीं. हा या महापुरुषांतील फरक लक्षांत ठेवला पाहिजे.

रानड्यांचा काळच प्राथमिक संघटनेचा असल्यानें त्यांचा स्वभाव तत्कालीन

कार्यास उपकारक ठरला. वीरत्वापेक्षां अभ्यासूपणाचीच त्या काळीं जास्त गरज होती व हा गुण रानड्यांत पुरेपूर होता. झगडा नसेल तेव्हां कोणत्याहि गोष्टीचा सर्वांगीण विचार, दोन्ही बाजूंचा विचार, शक्य होतो. तसा तो रानड्यांनीं केला. त्यामुळें राजकीय, सामाजिक, औद्योगिक व धार्मिक चळवळीची गाडी योग्य मार्गावर त्यांनीं चालू करून दिली. सारासार विवेकामुळें गतकालाचा दुरभिमान त्यांच्या कार्याला बाधला नाहीं किंवा दूरच्या टप्प्यावरील झगड्याची चिंता त्यांना वाटली नाहीं. लोकहितवादींना हिंदुस्थानांतील लोकांस इंग्रजांच्या बरोबरीस येण्यास शतकें लागतील असें वाटत होतें. रानड्यांना निदान एक शतक या कार्यासाठीं मोडावें लागेल असें वाटत होतें, व हें त्यांचें मत मूलभूत गोष्टींकडे पाहतां खरेंच होतें. लोकमान्यांना प्रथम राजकीय क्रांति घडून सत्ता आपल्या हातीं येईपर्यंत दुसऱ्या कोणत्याहि गोष्टीचें आचरण दुर्घट व म्हणूनच निरुपयोगी वाटत होतें. म्हणून त्यांनीं राजकीय मार्गावर घोडदौड आरंभिली. अर्थात् त्यांचें लक्ष जित व जेते यांच्या झगड्याच्या रचनेवर केंद्रित झालेलें होतें. रानड्यांचें मत, प्रथम समाजसुधारणा संपूर्ण होऊन लोकमनें आचारदृष्ट्या समर्थ होईपर्यंत राजकीय सुधारणा पचणार नाहींत, अर्थात् त्याची घाई करूं नये, असें होतें. त्यामुळें त्यांना इंग्रजांवरील टीका अप्रस्तुत वाटत होती. त्यांच्या मतांत पुष्कळच तथ्य होतें, हें आतां स्वातंत्र्यानंतर पदोपदीं अनुभवास येत आहे व म्हणूनच आज रानड्यांच्या शिकवणीचा अभ्यास आवश्यक झाला आहे. लोकमान्य टिळकांनीं पुढें नेलेला राजकीय झगडा नंतर गांधींनाहि थांबवितां आला नाहीं. सामाजिक सुधारणेवर अतिशय जोर देऊनहि अखेर गांधींचें मुख्य जीवितकार्य राजकीयच ठरलें. हा रानड्यांनंतर मिळालेल्या राजकीय कलाटणीचा व त्याहूनहि जास्त जगांतील क्रांतीच्या उदयाचा परिणाम होता. रशियन राज्यक्रांतीमुळें गांधींच्या कार्याचें स्वरूप पुष्कळच पालटलें व त्याचा वेगहि जगांतील बाह्य गोष्टींनींच ठरवून दिला. त्यामुळें गांधींचें त्यांच्याच मतानें प्रथम घडण्यास हवें असलेलें सामाजिक कार्य पूर्ण होण्यापूर्वींच स्वातंत्र्य आलें व त्याचे रानड्यांसारख्यांच्या मनांत असलेले दुष्परिणाम आज निदर्शनास येत आहेत.

मोठीं माणसें काळावर मात करणारीं असतात. रानड्यांनीं आपल्या काळांत अकल्पनीय वाटत असलेलें व हिंदुस्थानांत अश्रुतपूर्व असें नवीन सुधारणेचा पाया घालण्याचें कार्य विस्तृत क्षेत्रांत केलें. सुधारणेस आवश्यक ती गोष्ट लोकांस आवडत नसली तरी करावयाची, असा त्यांचा दंडक फार उपयुक्त होता. पण त्याबरोबरच लोकांना सोडून आपली वेगळी जात बनविण्याच्या ते सर्वस्वीं विरुद्ध होते. जी चूक पंजाबांत आर्यसमाजाकडून घडली तशी रानड्यांकडून घडली नाहीं. म्हणूनच महाराष्ट्रांत प्रार्थनासमाजी, सुधारक, नेमस्त, अशा धार्मिक, सामाजिक, व राजकीय जाती किंवा पक्ष वेळोवेळीं उद्भूत झाले तरी ते वाढीस लागले नाहींत. आज हे सर्व बहुजनसमाजांतच समाविष्ट झालेले आहेत. रानड्यांच्या औद्योगिक सुधारणेच्या संदे-

शाचा परिणाम महाराष्ट्रीयांपेक्षां पारशी व गुजराती लोकांवर जास्त झाला. याचें कारण त्यांच्यांत दादाभाई, वाच्छा यांसारखे अर्थशास्त्रज्ञ होते व गुजरातेंत वणिज्य वृत्ति मुळांतच होती. याबाबत महाराष्ट्र जागृत राहता तर आज तो सांस्कृतिक व राजकीय बाबतींत पुढारलेला असूनहि सत्तेच्या राजकारणांत जो मागें पडलेला दिसतो तसा तो राहिला नसता. रानडे धार्मिक व सामाजिक सुधारणांचे अध्वर्यु म्हणून समजले जाऊनहि त्यांचें मुख्य लिखाण ऐतिहासिक, आर्थिक व राजकीय विषयांतच झालें. याउलट लोकमान्य अद्वितीय राजकीय पुढारी होऊनहि त्यांचा महाग्रंथ अध्यात्मावर झाला, हा विरोध लक्षांत ठेवण्यासारखा आहे. त्यावरून त्यांची आंतरिक ओढ ध्यानांत येते. पुढाऱ्यांच्या अभिनिवेशाचे व कार्यांचे परिणाम समाजावर दीर्घकाल होतात व त्यांतील कांहीं कालाच्या ओघांत वाहूनहि जातात. आज मात्र महाराष्ट्रांत रानडे, टिळक व गांधी या तीनहि पुढाऱ्यांचे खोल ठसे जनमनावर उठलेले असूनहि त्यांतील वाईट तेवढ्या बाजू दुर्दैवानें पुढें सरसावलेल्या दिसतात. समाजसुधारणेच्या ऐवजीं सुखवस्तुपणा, रामदासांनींहि प्रशंसिलेल्या नेमस्तपणाऐवजीं संकुचित मध्यमवर्गीय भावना, राजकीय ध्येयवादाऐवजीं संधिसाधुपणा, विश्वबंधुत्वाऐवजीं क्षुद्र जातीयता, इत्यादि दुर्गुणांचा बुजबुजाट महाराष्ट्रांत दृष्टोत्पत्तीस येतो. अशा वेळीं रानड्यांच्या लिखाणांचें पुन्हा एकवार वाचन व त्यांच्या चरित्राचें मनन हितकर ठरावें अशी अपेक्षा आहे.

आकाशवाणीवरील भाषण : १६ जानेवारी १९५७

# लोकमान्य टिळक

ब्रिटिश अमदानींत पाश्चात्य शिक्षणाचे सुपरिणाम होऊन जीं कर्तबगार माणसें हिंदुस्थान देशांत गेल्या शतकांत निर्माण झालीं त्यांत सर्व बाजूंनीं विचार करतां लोकमान्य टिळक व महात्मा गांधी हे दोन पुरुष अनन्यसाधारण होत. या दोन पुरुषांचें कार्य एकमेकांस पूरक होऊन त्याचा ऐतिहासिक परिणाम भरतखंड इंग्रजांच्या मगरमिठींतून सुटण्यांत झाला ही गोष्ट महाराष्ट्राबद्दल प्रीतीचा अभाव असणाऱ्या सध्यांच्या काँग्रेस राजवटीसहि मान्य करावी लागत आहे. हें टिळकांच्या शतसांवत्सरिक जयंत्युत्सवाच्या उपक्रमानें उघड होत आहे, कालानें पुढला पुरुष हा मागील कार्यकर्त्यांच्या खांद्यावर बसूनच पुढें जात असतो याच अर्थानें नव्हे, तर ज्याच्या कार्यावांचून दुसऱ्याचें कार्य उद्भवूंच शकलें नसतें असें म्हणतां येईल असें अनन्यसाधारणत्व लोकमान्यांच्या राजकीय कार्यास इतिहासकारास द्यावें लागेल असा आमचा दृढ विश्वास आहे व म्हणूनच खालील विवेचन करण्याचें योजिलें आहे.

टिळक हे लोकमान्य होते असें आम्ही म्हणतों तेव्हां त्यांत दोन अर्थ गर्भित आहेत. पहिला अर्थ ते राजमान्य नव्हते, व याच अर्थी हें उपपद प्रथम योजिण्यांत आलें. टिळकांइतका इंग्रजसरकारास अप्रिय व दहशत वाटणारा पुरुष गेल्या शतकांत दुसरा झाला नसावा. त्यांच्या पूर्वीचे व बरोबरीचे हिंदुस्थानांतील सर्व राजकीय पुढारी बुद्धिदृष्ट्या सनदशीर राजकीय चळवळ करून व इंग्लंडच्या इतिहासाचें अनुकरण करून या देशाचा कारभार पायरीपायरीनें आपणाकडे आणावा या हेतूनें कार्यप्रवृत्त झाले होते. त्यांच्या प्रयत्नांत बुद्धि होती, विवेकहि होता, पण भावना नव्हती किंवा दूरदृष्टि नव्हती. दरेक पिढीच्या महत्त्वाकांक्षी पुरुषांत आपण पुढारी होऊन सत्ताधारी व्हावें अशी इच्छा असतेच. पण मानवाचें इतिकर्तव्य म्हणून या गोष्टीकडे क्वचितच कोणी वळतात, आणि अशा पुरुषांत टिळकांची गणना करावी लागते. टिळकांत विवेकाबरोबर त्याग, बुद्धिमत्तेबरोबर निरलसता, धाडसाबरोबर सावधपणा व उत्कट भावनेबरोबर दूरदृष्टि असे निरुपम गुण एकत्र आले होते. उपरिनिर्दिष्ट गुणांपैकीं एकेरे गुण बऱ्याच लोकांत दृग्गोचर होतात. रानड्यांत विवेक होता पण त्याग नव्हता, सावधपणा होता पण धाडस नव्हतें व त्यामुळें ते सद्भावनाशील दूरदृष्टि पुरुष असूनहि टिळकांप्रमाणें पुढारी होऊं शकले नाहींत, आणि त्यांना व दादाभाईंना सत्ता काबीज करण्यास अवश्य असलेलें लोकबल

निर्माण करण्यांत यश मिळूं शकलें नाहीं. असें बल लोकांत निर्माण होण्यास वीरत्व लागतें आणि वीरत्व हें व्यक्तीच्या सर्वच आचरणांत प्रतीत होत असतें. अशा तऱ्हेचें वीरत्व टिळकांनीं अनेकदां लोकांच्या प्रत्ययास आणून देऊन त्यांचा आपल्या पुढारीपणावरील विश्वास संपादन केला. माधवराव बर्व्यांवरील अब्रूनुकसानीच्या पहिल्याच खटल्यांत, हिंदुमुसलमानांच्या वादांत, प्लेगच्या धामधुमींत, रँडच्या खूनप्रकरणांत, ताईमहाराजांच्या प्रदीर्घकालीन खटल्यांत, सुरतेच्या काँग्रेसमध्यें, दावरसमोरील राजद्रोहाच्या मुकद्दम्यांत व शेवटीं चिरोलवरील दाव्यांत त्यांचें सर्व आघाडीवर निर्भय उभें राहणारें वीरमणित्व निदर्शनास येतें. आणि यांतून ते तरण्याचें कारण त्यांचें निष्कलंक चारित्र्य व आपल्या ध्येयावरील दृढ विश्वास हींच म्हणावीं लागतात.

टिळकांचा ध्येयावरील विश्वास हा मानसशास्त्रदृष्ट्या त्यांच्या ईश्वरावरील निष्ठेंतून उगम पावला होता व वेदांताच्या अभ्यासानें त्याचें दृढीकरण झालेलें दृष्टीस पडतें. टिळकांचा वेदांतावरील विश्वास इतका सर्वगामी होता कीं, हिंदु-मुसलमानांतील द्वैतभाव "मुसलमानांत शिक्षणाचा अधिक प्रसार व मुसलमानी धर्ममतांत आमच्या वेदांताची अधिक मिसळ झाल्यानें पूर्णपणें नाहींसा होईल" असें त्यांनीं लिहिलें आहे. रानडे व भांडारकर हे धर्मप्रचारक होते तरी त्यांचाहि इतक्या कोटीचा विश्वास असल्याचें दिसत नाहीं. आणि हाच उणेपणा सुधारकांच्या एकंदर कार्याला बाधला. तत्त्वें बरोबर असल्यानें समाजांत त्यांचा प्रसार होत नसून तो करणाराच्या जोरामुळें होत असतो. अज्ञेयवादाचा मुख्य दोष म्हणजे निराशावाद. हा तत्कालीन पाश्चात्यशिक्षित पुढाऱ्यांत सार्वत्रिक होता. त्यामुळें प्रत्येक बाबतींत ते भीतीनें पछाडलेले रहात. मग प्रश्न धार्मिक, सामाजिक, राजकीय कोणत्याहि जातीचा असो. लोकमान्य आचरणानें रामदासी होते. प्रपंच व परमार्थ यांची उत्तम सांगड त्यांनीं आपल्या मनाशीं घातली होती. 'केल्यानें होत आहे रे, आधीं केलेंचि पाहिजे' हेंच त्यांच्या आयुष्याचें सूत्र बनलें होतें. हें सूत्र लक्षांत घेतल्याखेरीज कोणालाहि टिळकांचें वेगवेगळ्या प्रकरणांत घडलेलें आचरण, तसें तें कां होतें हें समजणार नाहीं. वेगळ्या युगांत जन्माला येते तर टिळक सेंट पॉल किंवा शंकराचार्य यांप्रमाणें धर्मप्रसारक झाले असते. नामदार गोखल्यांनीं, ते पेशवाईत जन्माला येते तर त्यांनीं नवें राज्य स्थापिलें असतें, असें म्हटल्याची जी किंवदंती आहे तीवरूनहि हीच गोष्ट सिद्ध होते. ते सर्जनशील, स्वयंभू, युगकर्ते होते. 'राजा कालस्य कारणम्' हें त्यांनीं आपल्या आयुष्यानें सिद्ध केलें. अर्थात् ते लोकमूर्धाभिषिक्त राजेच होते. दोन महापुरुषांत तुलना करणें जरा गैर, तरीहि टिळक जितके लोकमान्य होते तितके गांधी नसावे असें वाटतें.

युगपुरुषाचीं आयुधें त्या कालाला अनुरूप अशींच असावीं लागतात. शस्त्रें हाताशीं होतीं म्हणून शिवाजीला सरळ बंड करून राज्य स्थापितां आलें. पण इंग्रजी राज्यांत ती स्थिति हत्यारांच्या कायद्यानंतर उरली नव्हती. खेरीज राणीच्या जाहीरनाम्यामुळें

सनदशीर मार्गाला अवसर ठेवला होता. म्हणून टिळकांनीं कायदेशीरपणावर सर्वांत भर दिला. इंग्रजी राज्य हें कायद्यानें प्रस्थापित आहे अशी त्याची प्रतिज्ञा होती. पण कायद्याचा अर्थ कसा लावावा, त्याचा कीस कसा काढावा, तो किती ताणावा, हें टिळकांनीं आपल्या आयुष्यांत दाखवून दिलें. सर्व कायदेशीर उपाय संपतात तेव्हा प्रजेनें बंड करून उठणें ही परिसमाप्ति कायद्याचीच आहे असें टिळकांचें ठाम मत होतें व म्हणून ते निर्भयपणें—निश्चित मतानें—कायद्याचा तारेवरील खेळ आयुष्यभर खेळत राहिले. त्यामुळेंच पुढें महात्मा गांधींना इंग्रजी राज्याचें हें मर्म लक्षांत ठेवून सत्याग्रहाची चळवळ आंखतां आली असें आमचें स्पष्ट मत आहे. टिळकांना इंग्रजी राज्याचें स्वरूपाविष्कारण हिंदी समाजासमोर करून दाखवावयाचें असल्यामुळें बहिष्कारयोग प्रचलित करावा लागला, त्याचेंच पुढें गांधीप्रणीत असहकारयोगांत रूपांतर झालेलें दृष्टीस पडतें. टिळकयुगांत इंग्लंडांतील सर्वांत उदारमतवादी लेखक व मुत्सद्दी जे मॉर्ले, त्यांनाहि हिंदुस्थानची स्वराज्यमागणी मुलानें चांदोबा मागण्यासारखी वाटत होती. त्यांनीं प्रचलित केलेल्या सुधारणांचें स्वरूप त्यांच्याच मतें स्वराज्यांत त्याची परिणति करण्यासाठीं नव्हतें. या गोष्टीला काळानेंच तोंड फोडलें. पहिल्या महायुद्धांतील संकटामुळें इंग्लंडला ‘स्वराज्य हें आमचें अंतिम ध्येय आहे’ असे उद्गार टिळकयुगाच्या अखेरीस काढावे लागले व हें सर्व टिळकांच्या प्रतिरोधी धोरणाचें फळ होतें. आयुष्यभर मुसलमानद्वेष्टे म्हणून म्हटल्या गेलेल्या टिळकांनीं लखनौचा करार, प्रमाणाबाहेर अधिकार मुसलमानांना देऊं करून घडवून आणला व अलीबंधूंकडून स्वतःस गुरु म्हणवून घेतलें. गांधींची अदूरदर्शी खिलाफतप्रकरणांतील घसट टिळकांच्या मुसलमानांना चुचकारण्याच्या धोरणाशीं अगदींच विसंगत होती. आपलीं अहिंसा, सत्यादि तत्त्वें मुसलमानांत उतरतील ही गांधींची अनैतिहासिक भाबडी भावना होती व ती टिळकांची नव्हती. त्यांनीं इंग्रज जें देणार तें स्वतःच हिंदूंकडून मुसलमानांना देववून एकोपा घडवून आणला. आज फाळणी-नंतरच्या भारतांतहि असाच आचार ठेवून कॉंग्रेसपक्षाला आपली राजवट बळकट करावी लागत आहे हें कोणींहि विसरूं नये.

मुत्सद्दी माणसाला प्रथम कालज्ञान करून घ्यावें लागतें. मुत्सद्दीपणा म्हणजे काळाशीं झुंज होय. स्वतःच्या पराक्रमानें ज्याची निर्मिति मुत्सद्दी करूं म्हणतो, त्याविरुद्ध कालाचे स्वनिर्मित किंवा दुसऱ्या मुत्सद्द्यांनीं निर्मित असे ओघ निर्माण होत असतात. त्यांतून स्वतः न बुडतां आपल्या कार्यासह तरून जाण्याची शिताफी मुत्सद्द्यास दाखवा-वयाची असते. जगावर विशेष ठसा उमटविणारे मुत्सद्दी कांहींतरी नवीन कल्पना काढून आपला छाप उठवीत असतात. महात्मा गांधी हे या वर्गांतील होत. पण लोकमान्यांच्या काळांत पाश्चात्त्य तत्त्वज्ञान, अर्थशास्त्र आणि राजनीति हीं ऐन तारुण्यांत असल्यामुळें त्यांच्याशीं समोर टक्कर नवीन विचार मांडून शक्य नव्हती. टिळकांना जी संधि नव्हती ती गांधींना पहिल्या महायुद्धाच्या स्फोटामुळें युरोपीय संस्कृति नागडी—

उखडी पडून अखिल मानवजात त्रस्त झाली तेव्हां मिळाली. लोकमान्यांना, मुख्यतः आपले जे बांधव पाश्चात्त्य तत्त्वज्ञानानें त्यावेळीं भारले होते व जे बहुसंख्य व सुप्रतिष्ठित बनले असून ज्यांच्या हातीं सर्व राजकारणाची सूत्रें होतीं, त्यांच्याशीं मुकाबला करावयाचा होता. दादाभाई, रानडे, भांडारकर, मलबारी, मेथा, यांसारख्या लोकांशीं सर्व आघाड्यांवर त्यांस तोंड देणें प्राप्त होतें व तें त्यांनीं किती झुंजारपणानें दिलें हें १८९० ते १९०५ पर्यंतचे 'केसरी' वाचणारास कळेल. त्या काळीं खरा सुशिक्षित वर्ग एवढा लहान होता कीं, सामान्य जन या थोड्या पुढाऱ्यांची केवळ 'री' ओढणारा झाला होता. त्यांविरुद्ध बोलणें हें सुद्धां धिटाईचेंच काम होतें. हिंदुमुसलमानांचे दंगे झाले तर त्याबद्दल हिंदूंचें स्वतंत्र मत स्पष्टपणें मांडण्यासाठीं त्यांची सभा भरवावी किंवा नाहीं, याबद्दल रानड्यांची आगाऊ परवानगी घ्यावी लागे व ती मागूनहि मिळत नव्हती. त्यासाठीं सभेंत करावयाच्या ठरावांची स्पष्ट माहिती आधीं आठ दिवस त्यांस पुरविण्यांत आली होती. जीं भाषणें व्हावयाचीं तींहि लिहून काढून आधीं त्यांना दाखविण्याची हिंदुपक्षाची तयारी होती. त्यांनीं सभेस येऊन आपला नैतिक पाठिंबा द्यावा अशी टिळकांची इच्छा होती. पण फिरोझशहा मेथांकडून नकार आल्यामुळें रानडेहि अशा सभेस येण्यास धजले नाहींत, किंवा त्यांनीं आपली मौन-संमति दाखविली नाहीं. तेव्हां मग "रानड्यांना तरी 'सद्बुद्धीची सनद' कोणीं दिली आहे?" असें टिळकांना खडखडावून बजावावें लागलें. लोकमत अशा धेंडांवर अवलंबून न ठेवतां त्याला स्वस्फूर्त वाचा फोडावी असा टिळकांचा प्रयत्न होता. ते या बड्या धेंडांशीं वादविवाद करीत, पण त्यानें इष्टसिद्धि होईल अशी खात्री नसल्यामुळें लोकमताच्या जोरावर सर्व अधिकारी शिष्टांना ते धुडकावून लावीत. ग्रॅहॅम वालास यांचा ग्रंथ निर्माण होण्यापूर्वीच त्यांना कळून चुकलें होतें कीं, "The empirical art of politics consists largely in the creation of opinion by the deliberate exploitation of sub-conscious non-rational inference." या नाजूक प्रहरणांचा उपयोग इष्टकार्य-सिद्धीसाठीं करून घ्यावयाचा तर, हिंदुस्थानांतील बहुसंख्य जे हिंदु त्यांची मनोरचना, त्यांच्या रूढी, संवयी, अंतःप्रेरणा, अभिमानविषय, या सर्वांची योग्य माहिती घेऊन व बूज राखून पुढें पाऊल टाकणें इष्ट होतें. एका मुसलमानाला दुखवावयाचें नाहीं म्हणून दहा हजार हिंदूंनीं आपलीं मनें मारावीं, हें तर्कशास्त्र टिळकांना कबूल नव्हतें व हाच त्यावेळीं व नंतरच्या गांधीयुगांत मूलभूत मुद्दा होता. मुसलमान हें इंग्रजांनीं उठविलेलें भूत आहे ही पक्की खूणगांठ मनाशीं बांधून, आगामी राजकीय सामना तिरंगी होणार आहे हें ते समजून चुकले होते. अशा स्थितींत वादविवादानें मन वळविण्याचा मार्ग राजकारणांत क्वचितच यशस्वी होतो. राजकीय सत्ता देण्याचें ज्यांच्या हातांत, ते सर्वस्वी एका अल्पसंख्य जमातीला आणि त्यांतहि मुसलमानांसारख्या अप्रबुद्ध, आडदांड आणि आपण हिंदुस्थानांत

राज्यकर्ते म्हणून नांदलेले लोक आहों अशी घमेंड असणाऱ्या जातीला पाठीशीं घालणारे आहेत हें ओळखून, या सामन्यांत मुसलमानांचे हितसंबंध व स्वार्थ जेणेंकरून रक्षिले जातील, त्या अनुरोधानें हें राजकारण पुढें चालणार आहे असें त्यांनीं निश्चित केलें. हिंदी राजकारणांतील हा एक प्रधान, इतिहासांतून निर्माण झालेला, व बगल न देण्यासारखा मुद्दा होता. या ठिकाणीं शुद्ध बुद्धि, नीतिमत्ता, सत्य–अहिंसा व भावना यांचा काडीमात्र उपयोग नव्हता. टिळक, या प्रश्नाकडे तार्किक दृष्टीनें न पाहतां व्यवहार-दृष्ट्या कायद्यावर बोट ठेवून वागावें, याबाबत मूलभूत मानवी समता व हक्क यांच्या विवेचनाचा उपयोग नसून ऐतिहासिक परंपरा व वागणुकीचे नियम काय चालत आलेले आहेत तें पाहून हा प्रश्न सोडवावा, असें सरकारास सुचवीत होते. संस्थानांत हे प्रश्न कां उद्भवत नाहींत व ब्रिटिश अंमलांतच कां पुढें येतात, त्याचा विचार करून हा प्रश्न सोडविण्याची रीत ठरविण्यास ते सांगत होते. ' जेथें ब्रिटिश अमदानींतहि मशिदीवरून वाद्यें वाजवीत हिंदु निःशंकपणें जात होते, तेथें सर सय्यद अहमद यांची अलीगड चळवळ सुरू होतांच पारडें कां फिरलें ? ' असें ते विचारीत. गांधींचा, शेजाऱ्यास सद्भावना दाखविण्यासाठीं आपण आपले न्याय्य हक्क डुबवून नेहमीं गम खावी हाच उपदेश रानडे प्रभृतींचा होता. हिंदूंनीं मात्र आपल्या धर्माचें स्तोम माजवूं नये, आणि मुसलमानांनीं मात्र सदासर्वदा धर्माखेरीज बोलूं नये, हा न्याय टिळकांस मान्य नव्हता. इंग्रज सरकार आपलें राज्य टिकविण्याचा एक मार्ग म्हणून हें मोहरें सतत पुढें आणणार हें ओळखून त्यांनीं मुसलमानांच्या अन्यायी मागणीला ' जशास तसें ' या रीतीनें तोंड देण्याची तयारी चालविली होती. यासाठींच शिवाजी-उत्सव, गणेश-उत्सव, गोरक्षण यांसारखे मार्ग त्यांनीं शोधून काढले वा प्रचलित केले. एल्फिन्स्टन-प्रभृति इंग्रज इतिहासकारांनीं फारसी तवारिखांचें भाषांतर करून, तोच हिंदुस्थानचा इतिहास म्हणून प्रचलित केल्यामुळें, मुसलमानी राजवटीला जी फुगवट आली होती ती ओसरण्यासाठीं महाराष्ट्रेतिहासाचें संशोधन त्यांनीं पुरस्कारिलें. शिवाजी-उत्सव हा अखिल-भारतीय व्हावा अशी त्यांची खटपट होती व त्याप्रमाणें बंगाल्यांत तो उत्सव सुरू होऊन शिवाजी, तुकाराम व रामदास यांचीं चरित्रेंहि बंगालींत लिहिलीं गेलीं. यामुळें महाराष्ट्र व बंगाल यांचा एकजीव होऊन वंगभंगाच्या राष्ट्रीय चळवळींत महाराष्ट्रानें बंगाल्याइतकाच भाग घेतला. याच मार्गानें अखिल हिंदुस्थान चालता, तर भारताची फाळणी कदापि झाली नसती. त्या ऐवजीं ग्रॅहॅम वालास यानें सन १९३१ मध्येंच लिहिल्याप्रमाणें ["India may have cause to regret for centuries Ghandhi's.refusal to allow his 'reason' to co-operate with his 'instinct' (=his inner voice.)."] खरोखरीच यापुढें शतकानुशतक बाधणारी फाळणी घडून आली आहे.

लोकमान्य टिळक यांची आधुनिक युगांतील स्वातंत्र्यप्रिय कोणा पुढाऱ्याशीं तुलना करावयाची तर, ते ग्लॅडस्टनप्रमाणें स्वधर्मनिष्ठ व स्वदेशभक्त पुढारी होते असें म्हणतां

येईल. ग्लॅडस्टनच्या मरणानंतर लॉर्डांच्या सभेंत दुःखप्रदर्शक ठरावावर बोलतांना त्यांचे कट्टर प्रतिस्पर्धी लार्ड सॅलिस्बरी म्हणाले कीं, ग्लॅडस्टन हे 'खिश्चन मुत्सद्दी' होते. अगदीं तसेंच वर्णन टिळकांचें करावें लागेल. म्हणूनच त्यांना हिंदीभाषी उत्तरीय 'भगवान् तिलक' व क्वचित् महात्मा टिळक असेंहि म्हणतांना आढळतात. त्यामुळें मंदलेस होते तेव्हां त्यांचें कुशलवृत्त विचारतांना एक अशिक्षित बैरागी, मुसलमान-बहुसंख्य काश्मिरांत, कालेलकरांना आढळला. हिंदूंच्या मनांत टिळकांबद्दलची आपुलकी रक्तांतून वाहात आल्यासारखी, उत्तर ध्रुवाकडील आर्यांच्या वसतिस्थानापासून उतरत आलेली भासत होती. हिंदुमात्राच्या हृदयांतील सर्वसूक्ष्म तारा त्यांच्या नामस्मरणानें हालत होत्या. याउलट गांधींची सर्वच सुधारणा या देशांत स्वखुषीनें क्वचितच कोणी मान्य केली असेल. त्यांनीं आपलीं मतें लादण्याचा प्रयत्न बेळगांव कॉंग्रेसमध्यें सुरू केल्या-बरोबर जिनासारखे मुसलमान तर कॅंग्रेस सोडून गेलेच, पण विठ्ठलभाई रागानें आपलें वैमनस्य दाखविण्यासाठीं ऑल इंडिया कॉंग्रेस कमिटीच्या बैठकींतून उठून गेले! म्हणजे मतपरिवर्तनानें पटलीं म्हणून गांधींचीं मतें हिंदुस्थानांत प्रचलित झालेलीं नसून, तीं लादलीं गेलेलीं आहेत व त्याचेंच अनुकरण आज नेहरूंच्या महाराष्ट्रीय आमदारांशीं वागण्यांत होत आहे. टिळक नीतिमत्तेचा स्वतंत्र उपदेश कधीं करीत नव्हते. याचा अर्थ त्यांचे याबाबत कांहीं विचारच नव्हते असें नव्हे. 'गीतारहस्य' हा मुख्यतः नीतिशास्त्राचाच ग्रंथ आहे. तेथें त्यांनीं सत्यासत्य, धर्म्याधर्म्य, कार्याकार्य या सर्वांचा यथास्थित विचार जाणत्यांसाठीं केला आहे. पण त्यांच्या वेळीं उपदेश न करतांहि हिंदुस्थानांत अज्ञजनांतहि जी नीतिमत्ता आढळत होती, ती गांधींच्या तीस वर्षांच्या सतत उपदेशानंतर नाहींशी झालेली दृष्टीस पडते! आज जितके असत्य, हिंसा इत्यादि अवगुण या देशांत बोकाळले आहेत तितके ते १९२० पूर्वीं निश्चित नव्हते.

हिंसा–अहिंसा याबाबत लोकमान्यांचें असें मत होतें कीं, कोणतीहि बहुजन-समाजाची चळवळ करावयाची म्हटली कीं तिचा उद्रेक हा क्वचित् कोणाकडून तरी व्हावयाचाच; पण त्यामुळें चळवळच करावयाची नाहीं किंवा ती थांबवावयाची असें नेमस्त किंवा गांधी यांप्रमाणें ते मानीत नव्हते. अत्याचार हे अत्युत्साही अनुयायांकडून कोणत्याहि चळवळींत होतच असतात. टिळकांच्या चळवळीमुळें रँडचा खून होतो असें म्हटलें, तर गांधींच्या अहिंसावादी चळवळीचाहि चौरीचौऱ्यांत विपरीत परिणाम होतांना आढळतो! तेव्हां याबद्दल दोघेहि पुढारी कारणीभूत नव्हेत हें उघड झालें. गांधींनीं स्वतःची चळवळ थांबविली तर टिळकांची इंग्रज सरकारनें बंद केली. पण दोघांच्या वागणुकींत फरक असा कीं टिळक हे कधींहि स्वपक्षीयांचा मनोभंग करीत नसत. याउलट गांधींची वर्तणूक असे.

स्वपक्षीयांना दुखवावयाचें नाहीं, त्यांचा उत्साहभंग करावयाचा नाहीं, असें ठाम धोरण टिळकांनीं ठेविल्यामुळें, त्यांच्यावर ते पुराणमतवादी ऊर्फ असुधारणावादी अस-

त्याचा आरोप आला आहे. वस्तुतः टिळक हे आगरकरांइतकेच बेन्थॅम, मिल, स्पेन्सर, सिज्विक यांच्या लिखाणांतून तयार झालेले होते. आता शंभर वर्षांनंतर या तत्कालीन बौद्धिक पुढाऱ्यांच्या विचारांत कोणते दोष होते, कोणत्या त्रुटी होत्या, हें आजच्या टीकाकारांनीं स्पष्ट केलें आहे. टिळकांच्या लक्षांत व्यक्तिशः या त्रुटी आल्या होत्या व त्यास अनुसरून त्यांनीं आपलें वर्तन ठेवलें. मात्र या गोष्टीची जाणीव या गुरूंच्या हुरळलेल्या तत्कालीन शिष्यांस नव्हती. त्यांनीं स्त्रियांच्या प्रश्नाकडे दुर्लक्ष केलें नव्हतें हें त्यांच्या 'फीमेल हायस्कुलांतील शिक्षणक्रम', 'स्त्रीशिक्षणाची दिशा', 'अब्र-लोन्नति'-लेखमाला, 'पुनर्विवाह', 'सामाजिक सुधारणेचे मार्ग' इत्यादि लेखांवरून उघड होतें. रानडे, भांडारकर व मलबारी यांच्यावरील टीकेंत त्यांनीं सामाजिक सुधारणेचें स्वरूपाविष्करण केलेलें आढळेल. एतद्विषयक तत्त्वज्ञानाचा विचार त्यांनीं गोळयांच्या 'ब्राह्मण आणि त्यांची विद्या' या ग्रंथावरील सुदीर्घ परीक्षण करतांना व रानड्यांच्या 'ब्रह्ममीमांसे'वर लिहितांना केलेला आढळतो. हर्बर्ट स्पेन्सर वारले तेव्हां त्यांच्यावर दीर्घ मृत्युलेख त्यांच्या गौरवपर त्यांनीं लिहिलेला आढळतो. असे गृहस्थ बुरसटलेल्या विचारांचे होते हें म्हणणें पुराव्यास टिकण्यासारखें नाहीं.

त्यांची स्वदेशभक्ति—आणि देश म्हणजे केवळ एक भौगोलिक मर्यादेंतील प्रदेश असें टिळकांचें मत नसून त्यांत असलेल्या सर्व लोकांच्या जातींच्या अभिमानांचे विषयांचा त्यांत अंतर्भाव होत असे—सर्वगामी असल्यामुळें त्यांचें धोरण सर्वांवर सारखी आपल्या मायेची पाखर घालण्याचें असे. पाश्चात्य शिक्षणाचा लाभ न झाल्यामुळें ज्या ज्या हिंदवासीयांना आपल्या वर्तनाचें व त्यामागील समजुतींचें समर्थन करतां येत नव्हतें, त्या सर्वांची बाजू टिळकांनीं उचलली. आपल्या पिलांच्या रक्षणासाठीं घार जशी तुटून पडते तोच प्रकार टिळकांचा होता. तीन हजार वर्षांची जगाच्या इतिहासांतील सर्वांत जुनी अतूट परंपरा चालविणाऱ्या वैदिक ब्राह्मणांवर अर्ध्या हळकुंडानें पिवळया झालेल्या पाश्चात्य मताभिमान्यांनीं तुटून पडावें, त्यांची टवाळी करावी आणि वैदिक विद्येची हानि व्हावी, हें टिळकांना सहन होण्यासारखें नव्हतें. त्यांचें लेखनशस्त्र 'आर्तत्राणाय' होतें, निरपराधी दीनदुबळ्यांवर उगारलेलें नव्हतें. दुसरें, त्यांना विचारानें कळून चुकलें होतें कीं, हिंदूंच्या सुधारणेबरोबर मुसलमानांची सुधारणा इंग्रजी राज्यांत होणारच नाहीं—आणि आतां काँग्रेस राजवटींतहि ती करतां येत नाहीं हें अनुभवास येत आहे, —मग त्यांनीं मात्र अरबी धर्मांत गुरफटून राहून जुनाट समजुतीच्या अभिमानानें हिंदूंवर जेथे तेथे कुरघोडी करावी आणि हिंदूंनीं मात्र पाश्चात्त्य विचारसरणीनें अभिमानशून्य दुबळें होऊन ती चालू द्यावी, असा अनवस्थाप्रसंग ओढवायचा! यासाठीं शाळेंत धर्मशिक्षणाची सोय झाली पाहिजे, इतर अभ्यासक्रमांत अध्यात्मविद्येचा समावेश अवश्य झाला पाहिजे, अशी त्यांची विचारसरणी होती. या विचारसरणींतील तथ्य आतां द्वितीय महायुद्धानें जग धुळीला मिळाल्यानंतर व अण्वस्त्रांचें सर्वनाशकारक

भय निर्माण झाल्यामुळें विचारवंतांच्या लक्षांत येत आहे, व टॉइनबीसारखे इतिहासलेखक धर्माचें पुनरुत्थान हाच त्यावर एकमेव उपाय मानीत आहेत. बुद्धधर्माचा पुळका नेहरूंना येण्याचें कारण हेंच. वस्तुतः बौद्धधर्मीयांनीं प्रशंसिलेलीं दशशीलें हिंदुधर्मात केव्हांच समाविष्ट झालेलीं आहेत. म्हणूनच आद्य शंकराचार्यांवर ते 'प्रच्छन्न बौद्ध' अशी टीका झाली, व लोकमान्यांच्या तत्त्वज्ञानाचा विपर्यास करण्यांत आला. लोकमान्यांनीं म्हटलें आहे कीं, बौद्ध धर्मानें बौद्धिक, आध्यात्मिक, नैतिक उन्नतीकडे वैदिक धर्माहून अधिक लक्ष पुरविलें. त्यांनीं वैदिकांचा संन्यासमार्ग स्वीकारून वर संन्याशांच्या पाठीमागें समाजसेवा लावली. स्वतः निर्वाण संपादून न राहतां इतरांनाहि त्या पदाप्रत आणण्यांत संन्याशानें शिकस्त केली पाहिजे असें बौद्धधर्माचें तत्त्व आहे व लोकमान्यहि कर्मयोगी होऊन जेझुइट पंथाप्रमाणें संस्था स्थापून देशसेवा करावी या मताचे होते. गांधी हे स्वतःस सनातनी हिंदु म्हणवीत, पण त्यांचा मनःपिंड ख्रिस्ताच्या धर्मावर, म्हणजेच मुख्यतः श्रद्धेवर, पोसलेला होता. बौद्धधर्मांत श्रद्धेपेक्षां विचारांना प्रधान स्थान देण्यांत आलेलें आहे आणि ही विचारप्रधानता हिंदूंच्या वेदांतांत समाविष्ट आहे. पण लोकमान्यांना ख्रिस्ती व बौद्ध—दोन्हीहि धर्मांतील ढोंग पसंत नव्हतें. मिशनऱ्यांनीं, एका गालावर मारल्यास दुसरा गाल पुढें करावा असा उपदेश करावा, आणि ख्रिस्ती राष्ट्रांनीं मात्र परस्वहरणाचा मार्ग वाटेल ती हिंसा करून चोखाळावा; तसेंच बौद्धभिक्षूंनीं दुसऱ्यांनीं स्वतःसाठीं मारलेल्या पशूचें मांस अहिंसावादी असूनहि खावें आणि अपरिग्रहाची थट्टा, स्वतःच्या हातावर पैसा न घेतां रुमालावर, भिक्षापात्रांत किंवा खिशांत तो टाकण्यास सांगून करावी, यांतील विसंगति व हास्यास्पदता टिळकांना मानवण्यासारखी नव्हती. म्हणून ते धडधडीत हिंदुधर्माचा पुरस्कार करून त्याप्रमाणें वागत. बोलणें आणि कृति, मतें आणि त्यांचें आचरण, यांत तफावत न दिसू देण्यावर त्यांचा कटाक्ष असे.

वरील सर्व विवेचनावरून वाचकांच्या लक्षांत टिळकांचें अनन्यसाधारणत्व कशांत आहे हें यावयास अडचण राहूं नये अशी अपेक्षा आहे. आमच्या मतें गांधी हे हिंदु मुत्सद्दी म्हणजे हिंदु धर्माचें, लोकांचें व संस्कृतीचें रक्षण करण्यासाठीं बद्धपरिकर झालेले परमदेशभक्त मुत्सद्दी नव्हते. आपलीं तत्त्वें जे स्वीकारणार नसतील त्यांचें काय झालें याची चौकशी करावयास त्यांस फुरसत नव्हती. इतके ते स्वतत्त्वभ्रमिष्ट होते हें त्यांच्या कांहीं प्रसंगींच्या लोकविरुद्ध आचारावरून सिद्ध आहे. टिळकांची सर्व मदार लोकरंजनावर म्हणजे लोकांना उत्तेजित करण्यावर, चेतविण्यावर व ते दुःखी, संकटग्रस्त असतील तेव्हां त्यांचें सांत्वन करण्यावर, त्यांना मुक्त करण्यावर होती. स्वातंत्र्यप्रियता हा या दोन्ही पुरुषांचा सारखाच विशेष होता. लोकमान्यांचा जन्म पारतंत्र्याची तीव्र जाणीव करून देऊन परक्यांविरुद्ध असंतोष निर्माण करण्यांत खर्ची पडला. या गोष्टीचा फायदा पुढें गांधींना मिळाला. टिळक परमदेशभक्त होते तरी ते हिट्लर किंवा मुसोलिनी

यांप्रमाणें इतरांना उपद्रव देणारे मूर्ख देशभक्त नव्हते. या मूर्ख देशभक्तांच्या विपरीत कृतीचा फायदा अगदीं अभावितपणें गांधींना मिळाला व त्यांतून ईश्वरी सूत्रानुरूप आशियाचें स्वातंत्र्य निर्माण झालें.

गणिती टिळक या देशाच्या परिवर्तनाचा विचार करतांना समाज स्थिर ठेवून फक्त दास्यविमोचनाचें राजकारण तेवढें चल करण्याच्या धोरणानें वागत होते. यांत त्यांचा हेतु जुन्यांतील चांगलें असेल तें सार्वत्रिक चलनांत नष्ट होऊं न देण्याचा होता. कारण त्याबद्दल त्यांना प्रेम होतें, आपुलकी वाटत होती. आज कोणतीहि गोष्ट स्थिर न मानतां एकसमयावच्छेदेंकरून अखिल मानवजातीचे सर्वच प्रश्न सोडविण्याचा जो प्रयत्न सुरू आहे त्याचे दुष्परिणाम आजहि पाहाणाराला दिसत आहेत. मानवजातीनें जोपासना केलेलीं बहुमोल जीवनमूल्यें धुळीस मिळत आहेत. अराजकता, वर्गविग्रह आणि अखेर हुकूमशाही यांचा उदय भारतीय समाजाच्या क्षितिजावर होतांना दिसत आहे. यांत ज्यांचा फायदा आहे तेच लोक आज समाज-आघाडी अडवून बसले आहेत. गोंधळांत, मारामारींत उचल्यांचें फावतें हा इतिहासाचा धडा आहे. लोकमान्यांच्या मतें कोणताहि प्रश्न सोडविण्याचा हा मार्ग नव्हे. पण इतिहासाकडे बुद्ध्या दुर्लक्ष करून नवीन इतिहास घडविण्यास जे निघाले आहेत, त्यांची मदार असिद्ध मानसशास्त्र, कल्पित मानवता, स्वयंभू सद्‌गुण, इत्यादिकांवर ठेवलेली आहे. यांतून काय भविष्य निर्माण होणार तें एका कालालाच माहीत.

'नवभारत', ऑगस्ट १९५६

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत.
अनुक्रम २६१२८ वि: ११ वं६
क्रमांक ९००३ नों: दि: ११२६०

# गांधी-प्रणीत समाजरचना अस्तित्वांत येणें शक्य आहे काय ?

गांधीजींच्या तत्त्वज्ञानानुसार नवी समाजरचना हिंदुस्थानांत किंवा अन्य देशांत आकारास येऊं शकेल काय?—या प्रश्नाचें उत्तर जवळपास 'नाहीं', असेंच द्यावें लागेल. शुद्ध गांधीतत्त्वानुसार तर अशक्यच. त्याची इतर तत्त्वांशीं भेसळ करून अंशतः शक्य. याचें कारण जगांत कोठेंहि हें तत्त्व आज रुजलेलें नाहीं व हिंदुस्थानांत त्याची सुरुवात करणें पाकिस्तान दिल्यामुळें सध्याच अशक्य झालें आहे. दुष्टांचा हृदयपालट कधींहि होऊं शकत नाहीं हें जसें या घटनेनें ठरलें, तसेंच आपल्या तत्त्वाविरुद्ध तडजोड करूनहि तो होत नाहीं हें नंतरच्या घटनांनीं स्पष्ट झालें आहे. पाकिस्तान देऊं नये, त्याविरुद्ध अखेरपर्यंत लढा द्यावा, असें गांधींचें खासगी मत होतें, असें गांधीवादी आचार्य सांगतात. म्हणजे जें झालें तें गांधींच्या आंतल्या आवाजाच्या विरुद्धच झालें आहे. मग तेणेंकरून त्यांची ईप्सित समाजरचना सुरू करण्यास कशी काय संधि मिळणार? अनन्यगतिक होऊन व मार खाऊन, तत्त्व सोडलेल्या नेहरू, पटेलप्रभृति काँग्रेस-चालकांच्या मताला गांधींनीं मान तुकविल्यामुळें, आपल्या हातानेंच आपलें अर्भक त्यांनीं पुरून टाकलें, असें होतें. गांधीतत्त्वांचा बिनतारी संदेशावरून, म्हणजे वाऱ्यावरून कितीहि बोलबाला झाला असला, तरी राष्ट्रसंघाचे आधारघटक या तत्त्वांच्या पासून किती दूर आहेत, हें काश्मीर घटनेनें चवाठ्यावर आलें आहे. दुष्टांचा नाश करण्याऐवजीं दुष्टांना उचलून धरण्यासाठींच राष्ट्रसंघ निर्माण झाला आहे असें भासतें. हा एवंगुणविशिष्ट नूतन संयुक्त राष्ट्रसंघ जुन्या राष्ट्रसंघाइतकाहि आयुष्मान् होणार नाहीं असा तज्ज्ञांचा अंदाज आहे. जगाच्या अंतिम हिताच्या दृष्टीनें गांधीतत्त्वज्ञान श्रेष्ठ आहे यांत वाद नाहीं. पण तें अंमलांत आणण्याची पूर्वतयारी जगांतील कोणत्याच देशांत आज झालेली नाहीं.

वस्तुतः पाकिस्तान न देण्याचा लढा लढण्यांतच गांधींचें तत्त्वज्ञान अजमावावयाला सर्वांत जास्त वाव होता. अहिंसेच्या जोरावर हिंसकांना तोंड देतां येतें कीं नाहीं याची त्यांत परीक्षा होऊन जाती. मग गांधींनीं माघार कां घेतली? राजकारणी म्हणतात, "काँग्रेसच्या अधिकृत पुढाऱ्यांनीं आपल्या संस्थेची कुवत ओळखून फाळणीला संमति

दिली म्हणून.' मग त्याविरुद्ध गांधींनीं आपलें सत्याग्रहाचें शस्त्र वा उपासाचें तंत्र कां अंमलांत आणलें नाहीं ? तर गांधीवादी आचार्य म्हणतात. "राष्ट्रसभेच्या नेत्यांविरुद्ध बंड करणें विवेकाचें नाहीं म्हणून." म्हणजे मग गांधींचें तत्त्वज्ञान सर्व ठिकाणीं लावावयाचें नसून कांहीं ठिकाणीं लावावयाचें, व इतर ठिकाणीं लावावयाचें नाहीं, असेंच ठरलें. विशेषतः मित्रांविरुद्ध तें अंमलांत आणावयाचें नसलें, तर मग तें खऱ्या अर्थानें नीतिपर तत्त्वज्ञान नसून, आपल्याला नको असणाऱ्यांविरुद्ध योजना करण्यासारखें एक राजकारणी तंत्र आहे असें ठरेल. असा अर्थ गांधीच्या विचारसरणीस लावण्यास आम्ही धजत नाहीं. गांधींचें तत्त्वज्ञान बरोबर असेल वा नसेल. पण ते मनांत एक, जनांत एक असें करणारे ढोंगी होते असें आम्हांस कधींहि वाटलें नाहीं. आणि ते भित्रे नव्हते हें त्यांच्या मृत्यूनंतर आतां सांगण्याची जरुरी राहिलेली नाहीं. मग आज गांधीशिष्य, गांधीवादी कॉंग्रेस व गांधींनीं डोक्यावर वरदहस्त ठेवलेले राजकारणी नेते तदितरांपासून आपला जो वेगळा मार्ग आंखतांना दिसतात त्याचें कारण काय ? याचें कारण असें आहे कीं गांधींनीं कॉंग्रेसचा ताबा घेतल्यापासून ज्या घोषणा वेळोवेळीं केल्या, जे संकल्प वेळोवेळीं सोडले, हिंदी जनतेला जीं वचनें दिलीं, तीं आज नेत्यांना नडत आहेत.

खरें पाहूं जातां फाळणी कबूल करणें ही एका अर्थीं हिंदी जनतेची वंचनाच होय. कट्टर हिंदुसभावादी टीकाकार टीका म्हणून जो आरोप कॉंग्रेसवर करीत होते तोच आरोप लागू होण्यासारखी गोष्ट कॉंग्रेसनेत्यांनीं सध्यां तरी केली आहे यांत संशय नाहीं. अर्थात् आपली चूक सुधारून दाखविण्याचा त्यांचा यापुढें वेत असणें सर्वस्वीं शक्य आहे. पण कुवत आणि इच्छा यांचें नेहमींच समप्रमाण असतें असें नाहीं. त्यांतहि सर्व गांधीवादी माणसांचे विचार सारखेच असतील असेंहि संभवत नाहीं. किंबहुना ते कांहीं मुद्यांवर एकमेकांविरुद्ध आहेत ही गोष्ट जगजाहीर आहे. पाकिस्तान देणें योग्य आहे असें समजणारे नव्हर्नर जनरल, मेलों तरी तें देणार नाहीं असें म्हणणारे मुख्य प्रधान, तलवारीला तलवारीनेंच उत्तर देऊं असें म्हणणारे उपपंतप्रधान, आपल्या जातीच्या हितासाठीं धर्महि बदलूं असा धाक घालणारे कायदेमंत्री, या उलट आपल्या सहकाऱ्यांच्या डोक्यांत शूळ उठविणाऱ्या हिंदुत्वाचा अभिमान बाळगणारे उद्योगमंत्री, जागेवर येईपर्यंत ज्यांचें काय मत होतें तें फारसें माहीत नसलेले संरक्षणमंत्री, ज्यांना आपल्या शिक्षणानें पांच मुसलमानहि स्वप्रांतांत निवडून आणतां आले नाहींत असे शिक्षणमंत्री, असला विचित्र संच एका खंडप्राय देशाचें भवितव्य बनविण्यास एकत्र झाला आहे. ही सर्व मंडळी मुळांतच गांधीवादी नाहींत. जे आहेत, त्यांतहि भिन्नभिन्न उपमतें आहेत. कोणाला हिंदूंबद्दल प्रेम वाटतें, तर कोणाला मुसलमानांबद्दल. कोणाला शुद्ध लोकशाही मंजूर, तर कोणाचा साम्यवादाकडे ओढा. कोणी छुपे भांडवलदारांचे पाठीराखे, तर कोणी आपल्या जातीपुरतेंच पाहणारे. अशी ही आवळ्याभोपळ्यांची मोट एकत्र राखणेंच दुरापास्त, तेथें ती नवीन उपक्रम कोठून करणार ?

गांधींची सर्व शक्ति, त्यांचें अनन्यसाधारण व्यक्तिमत्त्व, हीं त्यांच्या धार्मिक भावनेवर व नितांत ईश्वरनिष्ठेवर अवलंबून होतीं. अशी निष्ठा व भावना आजच्या हिंदुस्थानच्या नाड्या ज्यांच्या हातांत आहेत त्यांपैकीं कोणांतच नाहीं. आश्रमवासी गांधीशिष्य सुद्धां हें न्यूनत्व भरून काढूं शकणार नाहींत. त्यामुळें नवीन कल्पना अमलांत आणण्याचें ठरलें, तरी त्यामागें जरूर तितका पुढें ढकलणारा जोर संभवत नाहीं. दुसरें कारण असें कीं, ॲटम बॉंबचें भय जगांत उत्पन्न झाल्यापासून कोणत्याहि देशाला आपले अंतस्थ प्रश्न केवळ स्वतःच्याच इच्छेनुसार सोडवितां येणार नाहींत. या भौतिक घटनेमुळें प्रत्येक राष्ट्राचें स्वातंत्र्य आपोआपच संपुष्टांत आलें आहे. संस्थानी मुलुख सरमिसळ असल्यामुळें ज्याप्रमाणें दारूबंदीचा प्रयोग यशस्वी करण्यास पूर्वी ब्रिटिश हद्दींत अडथळे येत, ती स्थिति आज जगांतील वेगवेगळ्या स्वार्थांच्या व मतांच्या अस्तित्वामुळें जगांत निर्माण झाली आहे. तिसरें कारण, गांधी तत्त्वज्ञानच मूलतः अनैतिहासिक आहे. गांधींएवढा अनैतिहासिक मनाचा ऐतिहासिक पुरुष इतिहासांत आजवर झालाच नसावा. आजची मानवजात इतिहासानेंच सांप्रतच्या अवस्थेस येऊन पोचली आहे. तिच्यांत संपूर्णतया नवीन असें कांहीं घुसडणें अशक्यप्राय आहे. इतिहासज्ञानानें नसलें तरी उपजत शहाणपणानें व प्रत्यक्ष वागतांना आलेल्या अनुभवामुळें गांधींना हें कळत नव्हतें असें कसें म्हणतां येईल? पण मनुष्यजातींतील महात्मेहि मूलतःच एकांगी, एककल्पनेनें पछाडलेले असेच बहुधा असतात व म्हणूनच ते आपल्या कार्यांत कांहीं थोडी प्रगति करून आपला ठसा इतिहासांत उठवूं शकतात. गांधी आपल्या तत्त्वज्ञानाला सर्वोदयाचें तत्त्वज्ञान म्हणत, पण संपूर्ण ज्ञान प्राप्त झाल्या-नंतर ते असें म्हणत असें नाहीं. आयुष्य ही एक प्रयोगशाळा आहे व तींत सत्याचे प्रयोग सतत करीत पुढें पुढें जावयाचें आहे अशी त्यांची विचारसरणी होती. संपूर्ण ज्ञानाच्या मागें लागलेला माणूस समाजदृष्ट्या संन्यस्तच रहावा लागतो. ज्ञानोत्तर कर्म हें त्याला अवश्य वाटत नाहीं व शक्यहि होत नाहीं. म्हणजे जगांतील सर्व कर्ते पुरुष हे प्रायः अपूर्ण ज्ञानाचेच उरतात. विवेकानंदांनीं अशी एक गोष्ट सांगितलेली आठवते कीं, गौतमबुद्ध आपणास पहिला बुद्ध समजत नसून अनेक बुद्धांनंतर जन्मलेला बुद्ध असें समजत असे व तो शिष्यांना सांगे कीं, ‘त्याचे पूर्वगामी त्याच्यापेक्षां फार थोर व पूर्णज्ञानी होते व म्हणूनच ते अज्ञात राहिले. जगास ज्ञात होणारा ज्ञाता हा खालच्या दर्जाचाच असतो व तसा मी आहें.” ही विचारसरणी इतिहासास जुळते. चलनी नाणें शुद्ध धातूचें बनूंच शकत नाहीं. याचा अर्थ असा कीं, कोणत्याहि महात्म्याचें तत्त्वज्ञान साकार होण्यास त्यांत भेसळ करावी लागते.

गांधी आपले गुरु टॉलस्टॉय, ख्रिस्त, रस्किन्, गोखले व राजचंद्र असे अनेक सांगत. पण या गुरूंचे गुरूहि अनेक होते. गांधींचा पंथ साम्यवाद्यांप्रमाणें आपल्या तत्त्वज्ञानाचा अंतिम सामाजिक विकास राज्यसंस्था नष्ट होऊन प्रत्येक मानव स्वतंत्र

होण्यांत होणार असें मानतो. तो संस्थाप्रधान नाहीं. आरंभींच्या ख्रिस्तपंथानुयायांप्रमाणें छोटे छोटे सहकारी गट बनवून अखिल मानवांनीं स्वतंत्र रहावें असें त्यांचें मत आहे. पण हा ख्रिस्ती प्रयोग फसला व नंतर सर्वव्यापी रोमन साम्राज्य मोडलें, तरी त्यांतून अनेक राज्येंच निर्माण झालीं असा इतिहासाचा धडा आहे. कोणी गांधी-पंथ बौद्धपंथाशीं तुलतांना आढळतात. पण बुद्धाचें धर्मचक्र या भारतवर्षांतच चालू झालें होतें तरी पुढें त्याच्या पंथाचें जवळजवळ नांवहि उरलें नाहीं ! बुद्धाचें नांव दशावतारांत सामील करण्यांत आलें आणि त्याचें तत्त्वज्ञान आणि नीतिशास्त्रही हिंदी दर्शनांत विलीन झालीं. एखाद्या नवमताची वा पंथाची निर्मिति तेवढी ऐतिहासिक जरुरीमुळें होते व त्याचा नाश वा अंत मात्र अनैतिहासिक कारणामुळें होतो असें म्हणणें तर्कदृष्ट्या बरोबर नाहीं. मग जुन्या काळीं नष्ट झालेल्या या पंथाचें पुनरुज्जीवन आतां तरी या भरत-भूमीस कितीसें मानवेल हा प्रश्नच आहे. खेरीज ज्यावेळीं पूर्वी ख्रिस्ती पंथ किंवा साम्यवादी पंथ अस्तित्वांत नव्हते तेव्हां बौद्ध धर्म पसरला. आतां गांधीवादाशीं स्पर्धा करणारा व जगांत जास्त बद्धमूल, पसरलेला, वर्धिष्णु व जयिष्णु असा साम्यवादी पंथ हिंदुस्थान व त्या भोंवतालचे सर्व देश यांत रुजला आहे व इतर जगावर त्याचें आक्रमण यशस्वी रीतीनें सुरू आहे. ॲटम बॉंबचें रहस्य हातांत असूनहि अमेरिका व इतर युरोपीय राष्ट्रें या पंथाच्या जोरापुढें मागें मागें हटत आहेत. हिंदुस्थानप्रमाणें जातिसंस्थेनें विभागलेला वा इस्लामी संकटामुळें पीडिलेला नसूनहि चीन देश एक पिढी झगडूनहि त्यांच्या आक्रमणापुढें यशस्वी होतांना दिसत नाहीं. परक्यांच्या नेटाव्यानें तो कसाबसा उभा आहे इतकेंच. एरवीं तुकडे तुकडे होऊन राष्ट्रदृष्ट्या नष्ट होण्याच्या मार्गावर तो दिसतो. चिआंगसारख्या झुंझार पुढाऱ्याला थोपवितां येत नाहीं त्या पंथाला गांधींना गुरु मानणारे आमचे नवीन राज्यकर्ते कसें काय तोंड देणार ? चिआंगनें धर्माचा अभिमान इतका सोडला कीं, तो स्वतः पूर्वजांचा धर्म सोडून अलीकडे ख्रिस्ती झाला, पण त्याचें राष्ट्रीय व धर्मरहित असें पुढारीपण फळाला आलेलें दिसत नाहीं. मग हिंदु म्हणवून घेण्यास नाखूष असे गांधीवादी तरी जुने धर्म मागील वाटेस टाकण्याच्या आपल्या धोरणामुळें जास्त यशस्वी होण्याचा कितीसा संभव आहे ? चिआंगनें कन्फ्यूशिअसचें अडीच हजार वर्षें चालत आलेलें तत्त्वज्ञान शिकविणें कायद्यानें बंद पाडलें. पण त्यामुळें चिनी लोकांचा उठाव जास्त जोरदार झालेला दिसत नाहीं. मग जवळ जवळ त्याच मार्गावर असणारे आमचे गांधीवादी नूतनप्रभु त्यांहून जास्त यशस्वी होण्याचा कितीसा संभव म्हणावा ?

सुरुवातीच्या प्रश्नाचें हें संपूर्ण, साकल्यानें दिलेलें उत्तर नव्हे. या देशांतील भांडवलशाही, काळाबाजारशाही, जातिधर्मनिष्ठ स्वार्थी गट व अनेक पंथ व मतें यामुळें विभिन्न झालेलें आपलें राष्ट्र जागतिक संकटापुढें कसें उभें राहील याचा जेथें मुख्य प्रश्न आहे, तेथें नवीन समाजरचनेचा प्रयोग कसा आरंभिला जाणार वा यशस्वी होणार ?

'भवितव्य', २ ऑक्टोबर १९४८

# डॉ. श्रीधर व्यंकटेश केतकर

शनिवार ता. १० एप्रिल रोजीं रात्रौ दहा वाजतां डॉ. केतकर सासून हॉस्पिटलांतील एका खोलींत, कोणाहि चहात्याला त्यांच्या इस्पितळ-प्रवेशाचें वृत्त कळण्यापूर्वींच दिवंगत झाले. ज्या पुण्यांत ते नागपूर सोडून वीस वर्षांपूर्वीं रहावयास आले त्या पुण्याला अखेरपर्यंत त्यांची ओळख पटली नव्हती हें अशा रीतीनें पुनः एकदां सिद्ध झालें! महाराष्ट्राचें ऐतिहासिक व बौद्धिक केंद्र समजून अभिमानानें पुण्याकडे वळणाऱ्या, पण अनुभवानें निराशा पदरीं पडल्यानंतर त्यापासून विलग होणाऱ्या, अनेक कर्तबगार पुरुषांच्या दुःखस्मृतिमालिकेंत आणखी एक रत्न गुंफलें गेलें! आपल्या चित्पावनी ब्राह्मण्याचा केतकरांना केवढा जाज्वल्य अभिमान! त्यासाठीं 'वैजनाथस्मृति' लिहिण्याचीहि त्यांनीं तयारी केली होती! पण चित्पावनी ब्राह्मणी संस्कृतीच्या पुण्यासारख्या ऐतिहासिक केंद्रांत त्यांना जागा नव्हती! सदाशिव–नारायण–शनिवार पेठांच्या अस्सल कारकुनी (?) संस्कृतींत किंवा त्याच्या अपत्यसदृश डेक्कन जिमखाना वसाहतींत त्यांचें 'आशास्थान' नव्हतें! अभिमानामुळें त्यांनीं तेथें घर बांधण्याचा प्रयत्न करून पाहिला, पण त्यांची अंग्रेज बहादुरांच्या गारपिरावरील लष्करी वसाहतींत हकालपट्टी करण्यांत आली! तेथील महार, भंगी, चांभार, कोमाठी, गुजर, पारशी, यहुदी, मुसलमान, खोजे, बोहरी, बाटे, गोरे, निमगोरे, अकरमासे, अशांच्या अक्षरशः अठरापगड आणि बकाली वस्तींत दृष्टिआड जीवन व्यतीत करणें या संस्कृतीच्या पुरस्कर्त्या स्वाभिमानी पुरुषाच्या वांट्याला आलें! असल्या जीव नसणाऱ्या जीवनाचा शेवटहि तसाच सर्वांच्या दृष्टिआड, जणुं असल्या 'संस्कृतिरक्षकां'चें अंतसमयीं चुकून मुखावलोकन सुद्धां परलोकविघातक होईल अशा भावनेच्या मनःस्थितींत, सरकारी इस्पितळाच्या भावनाशून्य एकांतांत व्हावा हें युक्तच नव्हे काय?

जगाला केतकरांचा मृत्यु आकस्मिक म्हणजे पूर्वसूचना मिळालेली नसतांना आला असें वाटणें साहजिकच असलें तरी स्वतः त्यांना तो आकस्मिक नव्हता. मरणापूर्वीं बारा दिवस म्हणजे इस्पितळांत दाखल होण्याच्या दोनच दिवस आधीं त्यांची त्यांच्या उद्ध्वस्त 'आशास्थानां'त भेट घेऊन यवतमाळचे डॉ. यादवराव अणे परत गेले होते. त्यांजवळ केतकर "डॉक्टर ह्यावेळीं आम्हांस वांचवितील असें वाटत नाहीं." असें आपल्या आजाराबाबत बोलतांना उद्गारले होते. यावरून आपली घडी भरत आली

असल्याची जाणीव त्यांना होती असें दिसतें. आणि ज्ञानी पुरुषास अशी जाणीव कां नसेल? आपलें शरीर किती पोखरलें गेलें आहे याची धैर्यवान् पुरुष चर्चा करीत नसले तरी त्यांना कळत नसतें थोडेंच! जवळच्या माणसांस दुःख होऊं नये एतदर्थच ते बहुधा मौन स्वीकारीत असतात. श्रीमंतांनाच ज्याची बडदास्त ठेवणें शक्य, असला खानदानी रोग या नाममात्र 'श्रीधरा'ला झाला होता. बैठेपणा, बौद्धिक अतिश्रम, पथ्याहाराची आबाळणा, व्यायामाचा अभाव, काळजी इत्यादि कारणांनीं मधुमेह नामक कटु रोग होत असतो. महाबळेश्वरसारख्या ठिकाणीं रहाणें हा या रोगावर एक उपाय असतो. अल्प खर्चाचीं पिष्टमय अन्नें न खातां श्रीमंती शाकफलाहार करणें या रोगाला पथ्य असतें. त्या ऐवजीं पुस्तक विकण्याची वणवण करून श्रांत झाल्यानंतर क्षुधाशमनार्थ एक आण्याचीं भजींशेव व गळणारी शक्ति तवानी करण्यासाठीं वर लालभडक हॉटेली चहा, असला पौष्टिक पथ्यकारक खुराक सुरू झाल्यानंतर यमाजीपंताची तलब बसण्यास कितीसा अवकाश? केतकरांची शरीरयष्टि मूळची बळकट, तरुणपणींचें वाढीचें वय बऱ्या स्थितींत गेलेलें, वृत्ति खुली, आनंदी, आशावादी, आणि मोडणाऱ्या शरीरयष्टीला सांवरून धरण्यास शीलवती भार्या सेवेस हजर, यामुळेंच डॉक्टरांचीं गेलीं दहा वर्षें कशींबशीं रेटलीं गेलीं.

आणि यांतील शेवटची गोष्टच केतकरांच्या आयुष्यांत सर्वांत भाग्याची होती. 'पूर्वदत्तेषु या विद्या पूर्वदत्तेषु यद्धनम्। पूर्वदत्तेषु या भार्या अग्रे धावति धावति॥' असें कर्म-विपाकभाष्यपर सुभाषित आपण ऐकतों पण त्यांतील दैववाद किती सत्य आहे हें कितीकांच्या लक्षांत येतें? साम्यवादाच्या भावी विश्वामित्री नवसृष्टींत काय विधिघटना होणार असेल ती असो, पण आजच्या ढिलाईच्या जगांत तरी विद्या, धन आणि भार्या यांचा लाभ तर्कबाह्य गोष्टींवर अवलंबून दिसतो.

व्होल्तेअरच्या 'कँदिदें'तील तत्त्वज्ञानी डॉक्टराप्रमाणें एखादा वादपटु, जें होतांना दिसतें तें तसेंच व्हावयाला पाहिजे होतें व तेंच जगाच्या हिताचें आहे, असें प्रतिपादितांना दिसो, पण समाजनिरीक्षकांना ऑथेल्लोंतील देस्देमोनाच्या सखीप्रमाणें "असल्या रांगड्या नवऱ्याला इतकी चांगली बायको काय होय!" असेच उद्गार काढण्यासारखे उलटसुलट देखावे फार दिसतात हें खोटें नाहीं. केतकरांच्या सुदैवानें असला कांहीं त्रांगडा प्रकार न होतां त्यांना सुयोग्य अशीच सहधर्मिणी लाभली होती. जुन्या परंपरेंतील आर्यमहिला कोणत्याहि परिस्थितींत नवऱ्याला न सोडतां दारिद्र्य-दुर्दैवांचा संसारहि शक्य तितका सुखासमाधानाचा करण्यांत कष्टाळु, कुशल असत. पण आज सुशिक्षित समजला जाणारा जो नवपरिणीत वधूंचा संसार दिसतो त्यांत सुख आणि समाधान निदान पुरुषांच्या वांट्याला आलेलें दिसत नाहीं हें स्पष्ट आहे. ज्यांची घमेंडखोर विकृत वृत्ति पाहून प्रो. मायदेवांना—आपली 'आयुसीएस्' कविता रचावीशी वाटली अशांपैकीं, कॉलेजप्रणालींतून गेलेली एवढ्याच भांडवलावर विदुषी समजली जाणारी, कोणतीहि आधुनिक स्त्री डॉ. केतकरांबरोबर विवाह करण्यास तयार झाली असती असें वाटत नाहीं. अशाबरोबर लग्न

करण्यापेक्षां अविवाहित राहणें काय वाईट, त्याहून मरणहि पुरवलें, असें म्हणतांना त्या दिसतील. हा तारुण्यांतील अल्लडपणा कोणी म्हणेल. पण तारुण्य ओसरूं लागलें, तरी यांची वृत्ति पालटतांना आढळणार नाहीं. जर विलायतेंत असतांना मिस कोहनशीं केतकरांची मैत्री जुळून त्याचें गाढ प्रेमांत रूपांतर झालें नसतें तर केतकरांना सुशिक्षित वधू न मिळाल्यामुळें ब्रह्मचर्यच आचरावें लागतें. याहिउपर एखादी 'विदुषी' आरंभाला 'फसली' असती, तर निदान तिनें केतकरांची कलकत्त्याची प्रोफेसरी जातांच काडीमोड करून 'जन्माच्या विटंबनेंतून' सुटका करून घेतली असती खास! 'पूर्वदत्त' सुकृतामुळें केतकर असल्या विटंबनेंतून बचावले हें केवढें थोर भाग्य! हो! गोऱ्या पत्नीनें काडीमोड केली तर लोक ती क्रमप्राप्त गोष्ट म्हणतील, पण काळ्या विदुषीनें सोडचिठी देणें ही नवऱ्याचीच बदनामी!

१९२८ च्या सप्टेंबरांतील गोष्ट. दोन बहिणी वारल्यामुळें माझें मन अगदीं सुन्न होऊन गेलें होतें. म्हणून डॉ. सरदेसायांचें निमंत्रण स्वीकारून त्यांबरोबर खडकाळ्यास—यालाच आतां स्टेशनाच्या बदललेल्या नांवावरून कामशेत नांव पडलें आहे—त्यांच्या बंगल्यावर राहाण्यास गेलों. उत्तरांचा पाऊस खूप पडल्यामुळें जिकडेतिकडे पाणीच पाणी झालें होतें. चिखलांत पाय रुतत असल्यानें पादत्राणें हातांत काढून घ्यावीं लागत. घराबाहेर पडणें त्रासाचें वाटत होतें. नदीचें पाणीहि गढूळ झालें होतें. तरीहि सृष्टि अत्यंत प्रसन्न होती. उन्हाळ्यांत रखरखीत दिसणारे डोंगर यावेळीं हिरवळीनें आल्हाददायक भासत होते. पाण्याचे झरे ठिकठिकाणीं ओघळत होते. शेतें व झाडेंझुडपें हिरवींगार हंसत होतीं. शेताच्या कडेला पिंवळीं रानफुलें पातळाच्या किनारीसारखीं शोभत होतीं. बेडूक बेहोष झाले होते. पाखरें खिदळत होतीं. नदीकांठच्या क्षितिजावर शुभ्र बगळ्यांचे थवे वाऱ्याच्या झोंकानें उडतांना पाहून मौज वाटत होती. अशा एका दिवशीं डॉ. केतकर सहकुटुंब सहपरिवार समित्रगण पुण्याहून सरदेसायांकडे रहाण्यास आले.

मुद्दाम एकांताचा लाभ व्हावा म्हणून मी मुंबईहून खडकाळ्यास आलेला, तों तेथेंहि गर्दी झालेली पाहून माझें मन अप्रसन्न झालें. त्यामुळें या मंडळींत मिसळण्याच्या मनःस्थितींत मी राहिलों नव्हतों. शाल पांघरून स्वस्थ झोंपाळ्यावर पडून रहाण्याचा क्रम मी अवलंबिला. पण तोंडाला कुलूप घातलें तरी कान व डोळे थोडेच मिटले होते? या मिश्र दंपतीचा जीवनक्रम जवळून पहाण्याची संधि मला यावेळीं मिळाली. त्यावेळीं कामशेतला रस्ते झाले नव्हते. त्यामुळें सडकेपासून बंगल्यावर येतांना या यूरोपीय पोशाख्यांना आपलीं पादत्राणें हातांत घ्यावीं लागलीं, झगेविजारी न भिजण्यासाठीं वर ओढावीं लागलीं, मुलेंमाणसें चिखलांतून सांभाळीत गोगलगाईच्या वेगानें यावें लागलें, तो एक करमणुकीचाच विषय झाला. डॉक्टरांचें स्मित मेल्यानंतरहि मावळलें नव्हतें, तें काय असल्या अडचणींनीं झांकतें! आल्याबरोबर उदरावर हात फिरवीत "बुभुक्षा आहे" असें त्यांनीं न आशंकतां रियासतकारांस सांगितलें.

शीलवतीबाई, एक झगा सोडला तर, कोंकणांतील खेडवळ गृहिणीचीच एक प्रतिमा शोभल्या असत्या. कडेवर मानलेली कृष्ण कन्यका वानरीच्या पोराप्रमाणें बिलगून बसलेली, दुसऱ्या हातांत डोळे मिचकावीत चालणाऱ्या व्रात्य 'सनी'चा (पुत्रकाचा) हात धरलेला, पाठीमागून बोजा घेऊन–नोकर आया येत आहेत, अशा थाटांत अडखळत अडत, मोजेबूट काढल्यामुळें गुडघ्यापर्यंत पाय उघडे दाखवीत, या भटीणबाई तोंडानें गुड् इविनिंग म्हणत व मान डोलवीत प्रवेश करत्या झाल्या.

भटीणबाई उगाच नाहीं म्हटलें मी. शीलवतीबाई या यहुदी उपाध्यायाच्या खरोखरीच चिरंजीवी आहेत. खेरीज परक्या ठिकाणींहि न आशंकतां आपली सोय लावून घेण्याच्या बाबतींत डॉ. केतकर हे कोंकणांतील वाडेंपडेलच्या पडशीवाल्या पांथस्थ भिक्षुकाशीं स्पर्धा करणारे अंजनवेलचे भट खासच ठरण्यासारखे होते. वर त्यांच्या 'बुभुक्षे'चा मासला दिलाच आहे. मानापमानाच्या, औचित्याच्या किंवा वृथा सभ्याचाराच्या खोट्या कल्पनांना बळी पडून आपलें सुख क्षणभरहि नाहींसें करणारा त्यांचा स्वभाव नव्हता. आणि त्यांना यजमानहि रियासतकारांसारखे लाभले. मग ते खरोखरीच 'घर आपलें आहे,' हे उद्गार खोटे कां मानतील? खरें बोलावयाचें तर रियासतकारांचा मंडलिकी नियमितपणा या चारसहा दिवसांत साफ मोडून गेला. शिष्टागमनेऽनध्यायः! दुसरें काय?

रियासतकार सरदेसाई व ज्ञानकोशकार केतकर हे एका वर्गांत बसण्यासारखे पुरुष आहेत. रियासतकारांचें कार्य म्हणजे मराठींतील हिंदुस्थानच्या इतिहासाचा ज्ञानकोशच ठरण्यासारखें आहे. दोघांच्याहि कार्याचा उगम देशप्रेमांत झालेला आढळेल. स्वभाषागौरव हें त्याचें एक साधन. दोघेहि आधिभौतिक उपयुक्ततावादी, उद्योगी, महत्त्वाकांक्षी, स्वसंतुष्ट, आशावादी, भोगी. कर्तव्याकर्तव्य, न्यायान्याय, स्वार्थपरमार्थ यांच्या द्वंद्वांनीं दोघांनाहि कधींच भेडसावलेलें आढळणार नाहीं. लोकापवादास भीक न घालतां किंवा टीकेस न जुमानतां दोघांचाही आपलें आंखून घेतलेलें काम अविरत करीत रहाण्यांत हातखंडा. सामान्यतः आपण बरे, आपलें काम बरें; जगाच्या कारभारांत त्याचा कानोसा घेण्याइतकेंहि लक्ष न घालतां किंवा त्याबद्दल फुकटचें वाचीत बसण्यांतहि क्षण न घालवतां आपलें काम संपविण्याकडे दोघांची प्रवृत्ति. त्यामुळें मन द्विधा होण्याचा संभव मुळांतच खोडून काढलेला. कामांत साकसुरेख, उच्चनीच, शुद्धाशुद्ध, बरेंवाईट, मागलेंपुढलें, नीति-अनीति, यांचा सूक्ष्मासूक्ष्म विवेक पहाण्याचा चोखंदळपणा बेताचा. असाच चोखंदळपणाचा अभाव आयुष्यांतील बहुतेक बाबींत. जगावेगळें कांहीं तरी करून दाखविण्याची साहसी वृत्ति दोघांनाहि प्रिय. यामुळेंच या उभयतांचें जुळण्यासारखें पुष्कळच होतें.

पण या साम्याबरोबर वैषम्याच्या गोष्टीहि थोड्या किंवा कमी महत्त्वाच्या नव्हत्या. व्यक्तिदृष्ट्या सरदेसाई जितके स्वच्छतेचे भोक्ते तितकेच केतकर बुरसे. पहिले जितके

नीटनेटके तितके दुसरे गबाळ. पहिले जितके मोहक तितकेच दुसरे अनाकर्षक. सरदेसाई चपळ तर केतकर जड. नाना संयमी, डॉक्टर अनियमी. आर्थिक व्यवहारांत सरदेसाई चोख तर डॉक्टर ढिले. "भूत्यै न प्रमदितव्यम्" हें सरदेसायांचें आद्य आचारसूत्र तर केतकरांचें तिकडे तितकेंच दुर्लक्ष. रियासतकार साधे तितकेच दरबारी रुबाबदार. केतकरांच्या वागणुकींत एक प्रकारचा गांवढळ हलकेपणा दिसायचा. आणि अशा पतिराजांशीं संसार करण्याची पाळी शीलवतीबाईंवर आली होती.

रियासतकारांची निजावयाची खोली पटकावून केतकरांनीं तेथें संसार थाटला. शीलवतीबाईंच्या भगिनी व मिस सिंग नांवाची ख्रिस्ती तरुण फटाकडी शेजारीण याहि बरोबर असल्यानें त्यांनीं स्वतःच्या खान्याची सोय स्वतंत्र करण्याचें ठरविलें. पण डॉक्टरांचा खादाडपणा त्यांना तेवढ्यावर थोडेंच स्वस्थ बसूं देणार? डॉक्टर व त्यांची मंडळी अखेर दोन्हीकडे जेवूं लागली. दहीं, भात, भाजी, भाकरी खाऊन पावलोणी, अंडीं, चहा वर घेतला तर त्यांत काय बिघडतें? रात्रीं जेवल्यानंतर निजण्यापूर्वी शीलवतीबाईंना स्टोव पेटवून नवऱ्याला चहा करून द्यावा लागे. खेडेगांवच्या दुकानांत गेलें तर निदान भुईमुगाचे दाणे घेऊन पॅंटच्या खिशांत ठेवून रस्त्यानें खात जाण्यास काय हरकत! डॉक्टरांच्या जिव्हालौल्यानेंच त्यांना मधुमेह झाला असला पाहिजे हें स्पष्ट आहे! त्याच्याच जोडीला हिंदुस्थानी विद्वानांचा शारीरिक काम करण्याचा कंटाळा त्यांना बाधला. जी कार्यशक्ति व्यायामानें उत्पन्न व्हावयाची ती चहानें अर्ध्या अर्ध्या तासानें निर्माण करण्याची पाळी त्यांवर आली! याच्या उलट गोविंदरावनाना सरदेसाई. सत्तरीनंतर, मध्यें न बसतां रायगड, सिंहगड, एका दमांत चढण्याचा विक्रम करणारे रियासतकार खासगी आयुष्यांत आदर्श आहेत तें किती जणांना ठाऊक आहे? जन्मभर उपयोगी पडण्यासारख्या हितकर संवयी लावून घ्यावयाच्या असतील तर लहान मुलें नानांच्या स्वाधीन करावीं!

आणि असल्या नवऱ्याबरोबरचा संसार करणाऱ्या शीलवतीबाईंची किती स्तुति करावी? द्वाड मुलाला आई संभाळते त्याप्रमाणें डॉक्टरांचे दोष झांकण्याचा त्या प्रयत्न करीत. लाळेचे व शेंबडाचे हातरुमाल धुतां धुतां बापड्या बेजार होत. पैशांची चणचण तर त्याहि वेळीं मला दिसली. बाळंतपणांत आई वारल्यामुळें पोरकी झालेली काळी मुलगी बाईंनीं पाळावयास दत्तक घेतलेली. ती यावेळीं सर्व अंगभर अतिशय खरूज झाल्यामुळें तिडलेली. तिची खरूज धुतांधुतां व त्यावर पट्ट्या बांधतां बांधतां बाई मेटाकुटीस येत. त्यांतच डॉक्टरांचा लाडका, त्यावेळीं भुतानें पछाडलेला व्रात्य मुलगा! विजेची टॉर्च जेव्हां तेव्हां लावून लोकांच्या डोळ्यांवर तिचा प्रकाश पाडण्यांत हुषार! अशांतच डॉक्टरांचा उघडा जॉनसनी प्रणय! गुपचुप करावयाच्या गोष्टींतहि डॉक्टर उघडे! धाकट्या गॅरिकला जॉनसनचा प्रणय किल्लीच्या छिद्रांतून पहाण्याची लुच्चेगिरी करावी लागे. पण या महाराष्ट्रीय

जॉनसनचा प्रणय पहाण्यास इतके सायास नको होते! आपले डोळे न मिटण्याची खबरदारी घेतली कीं पुरे!

पण आयुष्याच्या अशा अनेक बाबींकडे पूर्ण दुर्लक्ष करणारे, किंबहुना त्यांच्या आवश्यकतेची जाणीवच नसणारे, असे केतकरांसारखे पुरुषच ज्ञानकोशकार होतांना जगांत दिसतात हें खोटें काय? जर त्यांना आपल्या दोषांची खबर असेल व जर ते अशा दोषांबद्दल स्वतःचें हृदय खात बसतील, तर त्यांच्या हातून लोकोपयोगी काम कधींच व्हावयाचें नाहीं. समाजसृष्टीची रचना अशीच चमत्कारिक आहे व म्हणूनच तिचें कौतुक वाटतें. अस्तु. हा प्रकार मी मुद्दाम बारकाईनें वर्णिण्याचें कारण एवढेंच कीं शीलवतीबाईसारख्या 'आर्य महिला' आमच्या 'सुशिक्षित विदुषीं'त क्वचितच आढळतात व त्यामुळें अनेक अज्ञात ज्ञानकोशकारांच्या कार्यास समाज मुकतो. अनेक कर्तबगार पुरुषांची जीवनप्रणाली जवळून पाहून माझी अशी खात्री झाली आहे कीं त्यांच्या कार्याचें अर्धें श्रेय त्यांच्या अर्धांगींनाच देणें योग्य होईल. कविवर्य मोरोपंतांनीं 'मी जरि अशक्त निर्धन कोपी तरि बहु भली रमा भार्या' असें लिहून आपल्या व्यंगांचा उच्चार व पत्नीची भलायकी वर्णिली आहे. अलीकडील विद्वानांपैकीं कै. वासुदेवशास्त्री खरे यांनीं असेच कृतज्ञतेचे उद्गार "दामू, माझ्या संशोधनकार्याचें अर्धेंअधिक श्रेय हिला आहे. हिनें जर असे कष्ट केले नसते तर त्या कामीं माझा वेळ खर्च होऊन माझ्या हातून झालें याच्या निम्मेंहि कार्य झालें नसतें. हिनें केलेली काटकसर माझ्या प्रकाशनकार्यास मदतरूप झाली." अशा शब्दांत काढले आहेत. रियासतकारांच्या कार्याची आंचहि त्यांच्या 'विदुषी' म्हणून न गाजलेल्या पत्नीनेंच सहन केली आहे. आधुनिक 'विदुषी' जळूप्रमाणें पतीचें रक्त शोषण करण्यांत बऱ्याच तरबेज दिसतात; पण पतीच्या कार्याचे ताण सोसतांना मात्र आढळत नाहींत. असें कां याचा विचार समाजशास्त्रज्ञांनीं करण्यासारखा आहे.

असवर्ण संमिश्र विवाहाचे परिणाम सुखाचे होतात कीं नाहीं हें जाणण्याची मला इच्छा असल्यानें मी एकदां केतकरांस विचारलें, "तुमचें दोघांचें कसें काय पटतें?" त्याला त्यांनीं उत्तर दिलें कीं, "आमचें दुमत होणें शक्यच नाहीं, कारण सर्वच गोष्टी पत्नीच्या इच्छेप्रमाणें करण्याचें मी ठरविलें आहे. मग वैमत्यास जागाच कोठली?" खरें पाहतां हा प्रश्न मी शीलवतीबाईंना विचारणें योग्य झालें असतें. कारण त्या सर्व गोष्टी केतकरांच्या सुखासाठीं ठीक चालल्या होत्या, पण बाईंच्या सुखाचें काय? बाईंच्या वर्तनांत केतकरांस तक्रार करावयास जागाच नव्हती, पण केतकरांच्या प्रत्येक गोष्टींत बाईंस भांडण्यास कारण सांपडण्यासारखें होतें हें उघड दिसे. पण एवढ्या बाबतींत तरी केतकर 'सनातनी' होते हेंच खरें.

यानंतर एकदां केतकर मुंबईस के. ई. एम्. इस्पितळांत मधुमेहाच्या उपचारासाठीं येऊन राहिले होते. त्यावेळीं शीलवतीबाई डॉ. सरदेसायांकडे असत. त्यावेळचें

व त्यानंतर त्यांनीं माहिमास बिऱ्हाड केलें होतें त्यावेळचें त्यांचें वर्तन पाहून माझी खात्री झाली कीं, या बाईच्या सहकार्यामुळेंच केतकरांकडून एवढें काम होऊं शकलें. एरवीं त्यांचे लोटले एवढेहि दिवस लोटते ना. एका महाराष्ट्रपंडिताच्या आयुष्यांत त्याला एका शार्मण्यदेशीय यहुदी कन्यकेचें साह्य लाभावें, पण ज्यांच्यासाठीं व ज्यांच्या अभिमानामुळें त्यानें विशिष्ट प्रकारचें आयुष्य पत्करलें त्यांच्याकडून त्याची उपेक्षा व्हावी हा कोण दैवदुर्विलास ? "सामाजिक तिरस्कार, उपहास व छळ हीं माझ्या जातीचीं ( यहुद्यांचीं ध्वजचिन्हें आहेत." असें शीलवतीबाई शेक्सपिअरच्या शब्दांत म्हणून दिवस कंठीत आल्या असतील, पण 'चित्पावन' मासिक काढून आपल्या जातीची अभिमानपूर्वक सेवा करण्याचा ज्यांचा बेत होता त्या केतकरांना त्या जातीनेंच आपल्या बालेकिल्ल्यांतून हांकून द्यावें याला कोणता कवि काय म्हणणार ?

केतकर उपयुक्ततावादी होते. कोणताहि मुद्दा पुढें आला तर त्यांची बघण्याची रीत याच दृष्टीची होती. योग्यायोग्य, शिष्टाशिष्ट, न्यायान्याय किंवा नीति-अनीति यांच्या विचारानें ते पहाण्याचा प्रयत्न करीत नसत. समाजांत आज अस्तिवांत काय आहे, त्यांतील बोंचणारा भाग कोणता, ज्यांना समाज बोंचतो त्यांचे प्रश्न कोणते, अशी त्यांची पहाण्याची सरणी होती. ते खडकाळ्यास असतां तेथील शेतांची नासाडी नदीकांठच्या तांबड्या खेकड्यांनीं केलेली त्यांनीं पाहिली. शेतांत ठिकठिकाणीं उकीर काढून या खेकड्यांनीं आंतील जितराप सगळें मारून टाकलें होतें. लागलींच केतकर म्हणाले, "मग या ठिकाणीं तुम्ही खेकडेच कां पिकवीत नाहीं ? धान्य पिकविण्याचाच तुमचा अट्टाहास कां ?"

दोन स्त्रीपुरुष एकत्र बोलतांना दिसलीं कीं त्यांनीं हळूच सुचवावें, "मग लग्न कां करून टाकीत नाहीं ?" समाज ज्यांना टाळूं पहातो वा दूर ठेवतो अशांकडे केतकरांची सहानुभूति हटकून झुकावयाची. मालिनीबाई खानसाहेबांशीं लग्न करण्यास निघाल्या तर केतकर फुकटचा ताशेरा झाडण्यास न लागतां "गोष्ट या पल्ल्याला आली तर खरी ! मला ती आवडत नसेल, ती समाजदृष्ट्या हिताचीहि नसेल, मुळांतच चांगली नसेल ! पण जर ती होणार हें निश्चित, तर माझें कर्तव्य तिच्याकडे सहानुभूतीनें पाहून तिला शक्य ती मदत करावयाची हेंच; कारण याच मार्गानें पुढेंमागें या घडणाऱ्या गोष्टीला शक्य तर सुधारणें शक्य होईल." असा विवेक करून वागत. शिंदळ बाई मूल घेऊन पुढें आली तर केतकर तिच्यापुढें नीतिमत्तेचे व पातिव्रत्याचे धडे न वाचतां तिच्या मुलाची व तिची कशी सोय लावावी याच्याच विचाराकडे लक्ष पुरवीत. आपल्या कादंबऱ्यांतून त्यांनीं असलेच अशिष्ट, अश्लील, चावट समजल्यामुळें चर्चेस न घेतले जाणारे विषय आणले आहेत. बोंचणारे प्रश्न दृष्टिआड करणें त्यांस रुचत नसे. कारण प्रश्न सोडवण्याचा तो मार्ग असें त्यांना वाटत नसे. आडपडदा तर ते कसलाच मानीत नसत. कारण शास्त्रीय चर्चेस घेतलेले विषय

अश्लील असे त्यांस कधींच वाटले नाहींत. वास्तवता हा शास्त्रीय चर्चेचा आत्मा, तेथें आडपडदा राखून खुली चर्चा शक्य नाहीं, हें ते जाणून होते. लेखनांत त्यांनीं व्यक्ति, जाति, पंथ, धर्म, मत, कोणाचीच भीड मानली नाहीं, यामुळेंच ते गोंडवनांतील अप्रियंवद 'गांवगुंड' ठरले.

आणि केतकरांना गांवगुंड ठरविणाऱ्या या शिष्टंमन्य अहंब्रुव शहरगुंडांच्या लीला त्यांच्या मृत्यूनंतरही थांबण्याचा रंग दिसत नाहीं. वैदिक संस्कृतीचें एवढें संशोधनपूर्वक उद्‌घाटन करणाऱ्या केतकरांच्या शवावर चार आण्यांचा हार घालण्याचा मोठेपणाहि कोणा पेशवाईचा पुनरुद्धार करूं पहाणाऱ्या समाजशास्त्रज्ञानें अथवा संस्कृतिसंरक्षक आहिताग्नीनें दाखविला नाहीं, किंवा नुसतें हजर रहाण्याची सहानुभूति दाखविली नाहीं. आपल्या या क्षुद्र मनोवृत्तीबद्दल आपणाविरुद्ध कोणी हूं चूं करतें काय, हें पहाण्याची जागरूकता मात्र या राजेश्रींनीं भरपूर दाखविली. उलट 'अरेरे, साहित्यिक गेला! आतां स्वतःचीं पुस्तकें विकण्याला आमच्या दारांत कोण येईल?' असले कुसके छद्मी उद्गार काढणारे नास्यछटालेखक शहरगुंड जोरानें पुढें सरसावतांना दिसत आहेत. चौपदरी घेऊन साहेबाच्या दारांत भीक मागण्याचा धंदा करणारे हे कारकुंडे 'शिरध्या केतकरा'च्या संशोधनाचें माप घ्यावयाला बाहेर पडले आहेत! टिळक जिवंत असतांना त्यांचें नांव निघतांच 'अब्रह्मण्यम्' म्हणणारे हे पंडित, शिरध्याच्या संशोधनाची योग्यता ठरविण्यासाठीं सॉलिसिटरची नोटीस देऊन टिळकांची साक्ष काढीत आहेत. संशोधनबाह्य कारणांमुळें जर एखाद्याचा संबंध अ, ब, क किंवा ढ यांशीं आला नाहीं किंवा येऊनहि त्याचें साह्य त्याला लाभूं शकलें नाहीं तर त्यामुळें त्या इसमाच्या कार्याची योग्यता ठरण्यास कशी मदत होते हें आमच्या तर्कशक्तीबाहेरचें कोडें आहे! तसेंच या प्रकारांत चाणाक्ष कोण? तो ढ कीं हा द, ग, ड, हेंहि आम्हांस समजत नाहीं! भर्तृहरीनें याच लोकांना उद्देशून

मृगमीनसज्जनानां तृणजलसंतोषहेतिवृत्तीनाम्।
लुब्धकधीवरपिशुना निष्कारणवैरिणो जगति॥

असें लिहिलें आहे. केतकरांनीं त्यांना भवभूतीचें पुढील काव्य सुनावलें असतें:

ये नाम केचिदिह नः प्रथयंत्यवज्ञाम्।
जानंतु ते किमपि तान्प्रति नैष यत्नः।
उत्पत्स्यतेऽस्ति मम कोऽपि समानधर्मा।
कालोह्ययं निरवधिर्विपुला च पृथ्वी॥

'प्रतिभा', १ जुलै १९३७

# ब्राह्मण्याचा ऱ्हास

बरोबर वीस वर्षांपूर्वी वरील नांवाचा प्रबंध लिहिण्याचें योजून त्यांतील 'ब्राह्मण्य' हा काय पदार्थ आहे याची व्याख्यारूप चर्चा मीं एप्रिल १९२८ च्या 'लोकशिक्षणां'त केली होती. माझ्या त्या चारपानी लेखानेंच कुतूहल निर्माण होऊन कै. तात्यासाहेब केळकरांसारखे इसमहि पुढील प्रकरणाची वाट पाहत होते हें मला पुढें कांहीं वर्षांनीं त्यांच्याकडूनच समजलें. पण आयुष्यांतील अनेक बाबींप्रमाणें तो प्रबंध लिहिणेंहि त्या व्याख्येवरच राहून गेलें. तो प्रबंध लिहिण्याची कल्पना मला स्पेंग्लरच्या 'पाश्चात्य संस्कृतीचा ऱ्हास' हा ग्रंथ वाचल्यामुळें सुचली होती. माझा ब्राह्मण्य हा शब्द ब्राह्मण जातीशीं निगडित नाहीं, हें मीं माझ्या व्याख्येंतच स्पष्ट केलें होतें. प्लेटोच्या तत्त्वज्ञानाप्रमाणें ब्राह्मण म्हणजे अखिल मानवसमाजाचें चिरंतन हित डोळ्यांसमोर ठेवून भौतिक परिस्थिति व मनुष्यमात्राची मनोरचना यांची वेळोवेळीं सांगड घालून देणारा अत्यल्पसंख्य वर्ग होय व या वर्गानें दिग्दर्शित जी अखिलमानव-हितसाधक समाजव्यवस्थिति तेंच ब्राह्मण्य होय असें मीं म्हटलें होतें. तीच गोष्ट डोळ्यांसमोर ठेवून मी पुढील विचार मांडीत आहें. ब्राह्मण हें नांव काढतांच अनेक सुशिक्षितांचें—ब्राह्मणजातींतील सुशिक्षितांचेंहि डोकें उठतें व ते देहभान विसरून बोलूंच नव्हे, तर देहभान विसरल्यासारखें आचरणहि करूं लागतात, हें महाराष्ट्रांत गांधींच्या खुनाच्या निमित्तानें उघड झालें आहे. पण याला भिऊन ३००० वर्षें सुप्रतिष्ठित झालेला आदर्श दाखविणारा शब्द भाषेंतून हांकलून देणें योग्य ठरतें असें आम्हास वाटत नाहीं. म्हणून वीस वर्षांपूर्वींच ठरविलेल्या अर्थानें तो शब्द योजून कांहीं लिहिण्याचें योजिलें आहे.

समाजहिताची कोणतीहि गोष्ट कोणी तरी अधिकारी पुरुषानें सांगितल्याशिवाय होत नसते. समाजाला वळण देण्याचा अधिकार कोणाचा याबद्दल मतभेद होणें साहजिक आहे. अधिकार लाटण्याच्या सध्यांच्या लग्नघाईत आपलीच अधिकारसंपन्नता तर्कशास्त्रांत वर्णिलेल्या अखेरच्या उपायानें म्हणजे लगुडप्रहारानें सिद्ध करण्याचा मार्ग आज बहुसंख्य मानवसमाज चोखाळीत आहे. जर हा मार्ग इतिहासांत आजवर चालत आलेला म्हणून पुढें चालू द्यावयाचा असेल तर मानवजात सुधारणेच्या मार्गावर आहे असें म्हणणें मुष्किलीचें ठरेल. मानवसमाजाची सर्व प्रगति त्याच्या नैतिक भावना बदलून उच्चतर होण्यावर अवलंबून असते. वेळोवेळीं जुन्या पाशवी भावना टाकून नवीन नैतिक

मूल्यें प्रस्थापित करणें हेंच उच्च मानवांचें इतिकर्तव्य होय. आपल्या सुदैवानें अशीं नवीं मूल्यें निर्माण करूं पाहणारा महापुरुष सर्वस्वीं हीनदीन झालेल्या आपल्या भरतभूमींत जन्मास आला व निराशेच्या निबिडांधःकारांत त्यानें जागती ज्योत पेटवून आपल्याला केवळ राष्ट्रहिताच्याच नव्हे तर मानवजातीच्या उद्धाराच्या मार्गावर चालू केलें. 'शमोदमस्तपः शौचं क्षान्तिरार्जवमेव च । दंड ज्ञानं विज्ञानमास्तिक्यं' इत्यादि ब्रह्मकर्मस्वभावज गुण ज्याच्यांत इतर कोणाहीपेक्षां ढळढळीत दिसले, असा हा स्वगुणोत्कर्षानेंच सिद्ध झालेला ब्राह्मण एका ब्राह्मणब्रुवाच्या हातून मारला जावा हें कोण दैवदुर्विलसित! ब्राह्मणानें अनिष्टाचा नाश खरोखरीं शापानेंच, म्हणजे तपश्चर्येचाच इष्ट कार्यासाठीं व्यय करून करावयाचा असतो. तो 'शरादपि' करावयाचा हें ज्याजवळ तपश्चर्या नाहीं, त्याचेंच केवळ आचरण; पण तेंहि समोर लढण्यासाठीं उभा असेल त्यावरच योजावयाचें अस्त्र. हिंदुधर्मावर अत्याचारानें जय मिळवूं म्हणणाऱ्या परधर्मीयांवर या अस्त्राचा प्रयोग करण्याचा ज्यांना कधीं धीर झाला नाहीं, त्यांनीं स्वकीयांतीलच खऱ्या ब्राह्मणावर त्याचा प्रयोग करणें, म्हणजे खऱ्याखुऱ्या अर्थानें ब्रह्महत्या होय.

खरी ब्रह्महत्या होणें ही गोष्टच ब्राह्मण्याचा ऱ्हासकाल दाखविते. ब्राह्मण्याचा उगम समाजांतील वेगवेगळ्या वर्गांत व गुणांनीं लहानथोर माणसांत एक प्रकारची समतोलता स्थापन करून समाजप्रकृतींत समधातपणा निर्माण करण्यासाठीं होत असतो. या समाजप्रकृतीवर वैद्याप्रमाणें सतत लक्ष पुरवून तिच्यांत बिघाड होऊं न देणें हेंच ब्राह्मणांचें कर्तव्य आणि असें करणारे तेच ब्राह्मण या नामाभिधानास योग्य. ज्या समाजांत, ज्या संस्कृतींत, ज्या जगतांत असा वर्ग उरत नाहीं, त्या समाजाची प्रकृति दिवसेंदिवस खालावत जाणें अपरिहार्य होतें. हिंदुस्थानांत इतर कोठेंहि दृष्टीस न पडणारी जातिसंस्था निर्माण झाली व बहुत काळ ती बिनबोभाट चालली, यावरून तिचा उगम भारतीय समाजांत निर्माण झालेले प्रश्न सोडविण्यासाठीं झाला व म्हणूनच ती लोकांना मानवून शेंकडों वर्षें सर्वमान्यतेनें चालली, असें इतिहासाभ्यासकास म्हणावें लागतें. ही संस्था आतां अडगळीसारखी वाटूं लागली आहे, तेव्हां तिचे दिवस भरले व उपयुक्तता संपली असा सामान्य बोध होतो; पण असें म्हटलें तरी २००० वर्षांवर चालत आलेली व या देशांतील हिंदुमात्राच्याच काय, पण इस्लामी व खिस्ती लोकांच्याहि अंगीं भिनलेली अशी संस्था एकदम जाहीरनामा काढून मोडणारीहि नव्हे हें उघड आहे. तसें झाल्यास साम्यवादाच्या प्रस्थापनेनंतर रशियांत जसा गोंधळ माजला, प्राणहानि झाली व संस्कृति उखडून निघाली, त्याच्याहूनहि फार मोठ्या प्रमाणांत फिरून कोणत्याहि उपायांनीं भरून न निघणारी हानि भरतखंडांत होण्याचा बळकट संभव दिसतो. आपल्या समाजाची प्रगति शांततामय लोकशाहीच्या मार्गानें होतांना दिसत नाहीं, असें धनंजयराव गाडगिळांसारखे विचारी पुरुष सांगतात. म्हणजे येथें वर सांगितलेला धोका निश्चितच संभवतो. आधुनिक लोकशाहीच्या उगमस्थानाशीं आपला सेव्यसेवक-

भाव एका शतकावर टिकून सुद्धां जर आपण इंग्लंडची शांतताप्रधान संक्रमणपद्धति आत्मसात् केली नसली, तर भारतवासी हे या विद्येबाबतचे अगदीं बथ्थड विद्यार्थीच म्हटले पाहिजेत; आणि अशी गोष्ट अहिंसेचा प्रसार पुरी एक पिढी एका सर्वमान्य महात्म्याकडून होऊनहि शिल्लक उरते, यावरून त्या महात्म्याच्या शिकवणीचा येथील लोकांवर कांहींच परिणाम झाला नाहीं असें म्हणावयाचें काय? याबाबत जगाचें मत अजमावयाचें तर ज्या अर्थीं नोबेलचें शांततापारितोषिक महात्मा गांधींना मिळालें नाहीं व याउलट अनेक राजकारणी खटपट्यांना दिलें गेलें, त्याअर्थीं पाश्चात्य लोक शांतता-प्रस्थापनेचें श्रेय गांधींना देऊं इच्छीत नाहींत हें स्पष्ट होतें. भारतीयांनीं याहि मताचा विचार करावयास नको काय?

गांधींच्या पूर्वी अग्रेसर ठरलेल्या लोकमान्य टिळकांना इंग्रजांनीं 'हिंदी असंतोषाचे जनक' अशी पदवी बहाल केली होती. 'असंतोषः श्रियो मूलम्' हें तर शाश्वत सत्य आणि गांधींनीं हिंदुस्थानला इंग्रजांशीं केलेल्या झगड्यांत जयश्री मिळवून दिली असें मानलें, तर ती श्रीहि त्याच उपायानें म्हणजे परक्या अंमलाविरुद्ध असंतोष निर्माण करून मिळविली गेली असें ठरतें. असंतोष निर्माण करणारा म्हणजेच मनाची समस्थिति ढळविणारा, शांतताप्रस्थापक कसा म्हटला जाईल? एवंच गांधींनीं हिंदुस्थानांत शांति स्थापन केली हें खरें नसून खळबळ निर्माण केली हेंच इतिहासदृष्ट्या खरें. व एकदां खळबळ निर्माण झाली म्हणजे ती केवळ परक्यांबद्दलच कशी उरेल? ती आपला प्रभाव घराबाहेरच्याप्रमाणें घरांतहि दाखविणारच! आणि तिनें तो आंतरराष्ट्रीय दृष्ट्या पाकिस्तान स्थापन करून दाखविलाहि आहे.

गांधींनीं टिळकांप्रमाणें एका राजकीय बाबींतच असंतोष निर्माण करून न थांबतां इतर सामाजिक प्रश्नहि हातांत घेऊन तेथेंहि समाजांतील वेगवेगळ्या गटांत वेगवेगळ्या कारणांबाबत असंतोष निर्माण केला. सर्व समाजच आमूलाग्र ढवळला गेल्यामुळें त्याला तोंड देणें परक्यांना अशक्य झालें हा गांधींच्या असंतोषनिर्मितींतील चांगला भाग होय. टिळकांच्या राजकीय असंतोषावर इंग्रजांनीं जातीयतेचा तोडगा शोधून काढून राजकीय चळवळींला पायबंद घातला. हा पायबंद किती बळकट होता हें गेल्या तीस वर्षांतील राजकारणांत दिसून आलें व पाकिस्तानची निर्मिति हीहि त्याच धोरणाचा चिरंतन परिणाम होय. गांधींनीं सर्व लोकांत असंतोष निर्माण करून इंग्रजांना हिंदुस्थान सोडणें भाग पाडलें असें म्हटलें, तरी त्यांनाहि इंग्रजांनीं स्वतःच्या रक्षणार्थ निर्माण केलेला समंध गाडून टाकतां आला नाहीं. असें होण्याचें कारण काय? कारण इतकेंच कीं त्यांनीं परकीय सत्तेच्या छत्राखालीं राजकीय दृष्ट्या सुरक्षित राहण्यासाठीं जें अहिंसेचें धोरण अवलंबिलें व इतरांवर राष्ट्रीय सभेच्या अनुज्ञेच्या रूपानें लादलें, तें त्यांना स्वतःला तत्त्वदृष्ट्या नीतिदृष्ट्या मंजूर असलें तरी इतरांनीं त्याचा अवलंब केवळ आप-आपल्या इष्टसाधनासाठीं केला होता. इंग्रजांच्या कायदेशीरपणाच्या तत्त्वाला गांधींच्या

या शांततामय मार्गाच्या घोषणेनें चांगलाच काटशह दिला. त्यामुळें गांधींची आक्रमक चळवळ सुद्धां कायद्यांना न जुमानतां फोफावूं शकली. इंग्रज कायदेबाज असल्यामुळें त्यांच्या विरुद्ध गांधींची मात्रा लागू पडली. आपल्याला कायदा सुरक्षित राखतां येत नाहीं असें दिसल्याबरोबर हिंदुस्थान सोडण्याचा निर्णय त्यांनीं आपल्या उपजत शहाणपणानें त्वरित घेतला; पण ज्यांनीं केवळ राजकीय सोंगाची बतावणी करण्यासाठीं अहिंसेचा बुरखा घेतला होता, त्यांचें खरें स्वरूप मात्र इंग्रज जाणार, जात आहेत, गेले, हें दिसण्याबरोबर निदर्शनास आलें. सत्ता काबीज करण्यासाठीं कोणताहि प्रकार अनैतिक नाहीं, अशी विचारसरणी सुरू झाली. गेल्या शंभर वर्षांत न दिसल्यामुळें जे प्रकार भरतभूमींतून नष्टच झाले असें आपण सर्व समजत होतों व ज्या समजाला गांधींच्या अहिंसेच्या मुलाम्यामुळें सद्यःस्थितीच्या चकाकीचा आभास निर्माण करतां आला होता, तो समज उण्यापुऱ्या एक वर्षांत रसातळाला गेला व आपल्या समाजांतील अमानुषतेचें खरें स्वरूप चवाठ्यावर आलें. इंग्रजांना नमविण्यांत यश आलेल्या गांधी-—नेहरूंनाहि या समंधासमोर साष्टांग नमस्कार घालावा लागला. जें कधींहि प्राण गेला तरी आपण कबूल करणार नाहीं किंवा देणार नाहीं असें ते म्हणत होते, तेंच कबूल न केलें तरी देणें त्यांना भाग पडलें.

मात्र या गोष्टीचे नैतिक दुष्परिणाम त्यांच्या लक्षांत आले नाहींत असें दिसतें. जुनी साम्राज्यशाही मोडण्यासाठीं इंग्रजांनीं साडेचार वर्षें पहिलें महायुद्ध खेळून कैसरला ठेंचून काढलें व त्यांतच झारशाहीची आहुति पडली; पण या महायज्ञांतून साम्यवादी क्रांतितंत्राचा नवा राक्षस निर्माण झाला. त्यापासून बचाव करण्यासाठीं वंशवादावर आधारलेल्या नव्या झोटिंगशाह्या पुढें आल्या. या झोटिंगशाह्यांना व त्यांच्यामागें असलेल्या मानवसमाजविघातक नव्या तत्त्वज्ञानाला गाडून टाकण्यासाठीं दुसरें महायुद्ध लढविण्यांत आलें. नव्या शस्त्रांच्या मदतीनें त्यांचा निःपात करण्यांत आला. हा निःपात अर्थातच नैतिक मार्गानें झाला नाहीं एवढेंच नव्हे, तर तो नव्या अनैतिक अमानुषतेच्या बळावर घडवून आणण्यांत आला. आपला हेतु—न्याय्य हेतु सुद्धां साध्य करण्यासाठीं अनैतिक मार्गाचा अवलंब करण्याचा प्रकार साम्यवादी तंत्रानें यापूर्वींच जगभर फैलावला होता, त्याला आतां राष्ट्रदृष्ट्या कायदेशीर स्वरूप आल्याप्रमाणें झालें. हें कायदेशीर स्वरूप नवीन निर्माण झालेल्या संयुक्तराष्ट्रसंघाच्या आधारभूत प्रमुख राष्ट्रांनीं आणून दिलें, ही याबाबत विशेष लक्षांत ठेवण्यासारखी गोष्ट होय. रेव्हरंड होम्ससारखे अमेरिकन ब्राह्मण ही गोष्ट 'अब्रह्मण्यं अब्रह्मण्यम्' म्हणून कितीहि निंदोत, पण ती अंमलांत आणिली गेली खरी! या अनैतिक घटनेचा कांहीं अकल्पित फायदा हिंदुस्थानला मिळाला व त्यामुळें हिंदुस्थानचें स्वातंत्र्य—अर्थात् द्विभक्त स्वातंत्र्य—येथील राजकीय पक्षांच्या अंदाजापूर्वींच अंमलांत आलें. जी गोष्ट दहापांच वर्षें लढूनहि कदाचितच सिद्ध व्हावयाची, ती आकाशांतील बापाकडून अशा रीतीनें अकस्मात् पदरांत टाकण्यांत आल्यामुळें हिंदुस्थानचा

राजकीय तोल मात्र पूर्णपणें गेला, ही गोष्ट खऱ्या अर्थानें महात्माजींच्याहि लक्षांत आली होती असें दिसत नाहीं.

जर हिंदुस्थानांतील एका संघटित व मोक्याच्या जागा धरून बसणाऱ्या अल्पसंख्य गटाला केवळ अनैतिक अमानुषतेच्या प्रभावानें हवें तें मिळूं शकतें, तर इतर अल्पसंख्याकांनाच नव्हे तर विशिष्ट भागांतील बहुसंख्याकांना ते चहातील तें कां मिळूं नये ? पाकिस्तान नाक मुठींत घेऊन देणें भाग पडल्यावर, कांहीं काँग्रेसपक्षीय राज्यशास्त्रकार झालेल्या अनिष्ट प्रकाराला असें गोंडस स्वरूप देऊं लागले कीं काँग्रेसनें जें केलें, तें तिला संमत अशा स्वयंनिर्णयाच्या तत्त्वानुसार जें जरूर तेंच केलें. हें स्वयंनिर्णयाचें पिल्लूं कोणत्या घरांत शिरून घर डोक्यावर घेईल याचा नेम नाहीं. पाकिस्तानच्या विचारसरणीच्या मागोमाग पठाणिस्थान, शीखिस्थान, द्रविडिस्थान असें होतां होतां मराठास्थानहि यावें, हें कालाच्या ओघास अनुसरूनच आहे.

या विचारसरणीमागील तत्त्वज्ञान खऱ्या अर्थानें वस्तुतः खोटें व पोकळ आहे; पण जर एखाद्या प्रदेशांतील बहुसंख्य लोक तसें करावयाचें म्हणतील, तर त्याला प्रतिबंधक शक्ति आजचे राजकारणी अंतर्गतरीत्या निर्माण करूं शकत नाहींत, हें स्पष्ट आहे. या विचारसरणीमागें मुख्यतः खोटा गर्व व नागडा स्वार्थ हींच मुख्य प्रवर्तक अंगें असतात, असें या तत्त्वांच्या इतिहासावरून दिसून येतें. जर्मन लोकांनीं आपल्या घरीं स्वतःला जगांतील सर्वश्रेष्ठ मानववंश असें म्हणवून घेतलें, तर त्यांत इतरांचें कांहीं वेंचत नाहीं. पण या सर्वश्रेष्ठतेच्या तत्त्वाचा प्रत्यक्षांत उपयोगांत आणावयाचा उपसिद्धांत असा कीं, ज्याअर्थीं आम्ही श्रेष्ठ, त्या अर्थीं इतरांनीं आमच्या अंमलाखालीं आलें व राहिलें पाहिजे. मुसोलिनीच्या फासिस्ट पक्षानें रोमन साम्राज्याच्या कल्पनेचें पुनरुज्जीवन केलें, त्यांतीलहि सद्यःकालीन उपयोगाचा भाग म्हणजे, जुन्या रोमन लोकांचे वंशज जे आजचे नादान इतालियन, त्यांचें राज्य इतरांवर व्हावें ! पठाण हे पूर्वीं कधींच पूर्णपणें परतंत्र नव्हते; मग आतां त्यांना पाकिस्तान येऊनहि स्वातंत्र्य कां मिळूं नये ? शीख रांगड्यांनीं एका काळीं बहुसंख्य मुसलमान प्रदेशावर ठोकून राज्य केलें होतें. मग आतां त्यांनीं इतर बहुसंख्यांत मिसळून नामशेष कां व्हावें ? त्यांना नव्या हिंदुस्थानांतहि शीखांचें बहुसंख्य मत हमखास चालेल असा प्रांत तोडून पाहिजे ! मराठ्यांचेंहि तसेंच. शिवाजीमहाराजांचें नांव घेऊन ते आजच्या मनूंत आपलें एकछत्री राज्य स्थापूं म्हणणार; मग असें करूं म्हणणाऱ्यांपैकीं एकालाहि शिवाजीमहाराजांच्या राज्यसंस्थापनेच्या मुळाशीं असलेल्या मूलभूत कल्पनांची व तंत्राची तिळमात्रहि ओळख नसेना कां ? अल्पसंख्य ज्ञात्यांचीं मतें गुंडाळून ठेवून स्वतःच्या स्वार्थाला तात्कालिक फायदेशीर अशा तंत्राचा अवलंब करून सत्ता बळकावणें हा नवा दंडक जगांतील राष्ट्रांत पडत चालला आहे. धूर्त साम्यवाद्यांनीं छोट्या राष्ट्रांच्या पुनरुज्जीवनाला व स्वातंत्र्याला मान्यता देण्याचा बूट कां काढला आहे, ही गोष्टहि गेल्या पिढींतील इतिहासावरून लक्षांत येण्यास अडचण पडत

नाहीं. यामागील खरा हेतु एकच व तो म्हणजे लोकसंख्येच्या पाशवी बळावर आपलें अधिष्ठान ठेवून, अत्यल्पसंख्य शहाण्यांच्या शाश्वत मूल्यांना मोडून काढण्याचा कांहीं धटिंगण पण कार्यक्षम स्वार्थी गटांनीं रचलेला कट होय. याचाच परिणाम म्हणजे ब्राह्मण्याचा ऱ्हास.

'म्हातारी मेल्याचें दुःख नाहीं. पण काळ सोकावतो;' म्हणून खोट्या गोष्टीला शहाण्या माणसानें कधींहि मंजुरी देतां कामा नये. याच तत्त्वाच्या परिपालनासाठीं गेलें महायुद्ध लढलें जाऊन हिटलर, मुसोलिनी व तोजो यांचें मत मोडलें गेलें. हें खरें असेल तर याच तत्त्वानुसार कॉंग्रेसनें पाकिस्तानला संमति द्यावयाला नको होती. तीन वर्षांपूर्वी हिटलर, मुसोलिनी मोडल्यामुळें हिंदुस्थानांतील त्याच विचारसरणीचा अवलंब करणारे स्थानिक पक्ष आपोआपच मलूल झाले. कालाच्या ओघावरून बोध घेऊन व शहाणे होऊन आपले मार्ग त्यांनीं बदलावयास हवे होते; पण ते न बदलतां जुन्याच अफिणीच्या तारेंत राहून त्यांनीं गेलीं दोन वर्षे आपलें कार्य त्याच सुरावर चालू ठेवलें होतें. याचाच परिणाम महात्माजींचा अमानुष खून होय. महात्माजींच्या विचारसरणींत केवढेहि ढोबळ दोष असोत; पण त्यांच्या अहिंसेच्या निःसंदिग्ध तंत्रामुळें त्यांच्याबद्दल त्यांच्या शत्रूंनाहि एक विश्वास होता, तो म्हणजे शुद्ध पाशवी बलावर ते कधींहि अत्याचार करणार नाहींत. याच विश्वासाचा गैरफायदा घेऊन जिनांनीं आपलें पाकिस्तानचें स्वप्न प्रत्यक्षांत उतरविलें. गांधींचा आपल्या मार्गाच्या खरेपणाविषयींचा विश्वास बेंबीच्या देंठापासून उत्पन्न झालेला होता, ही गोष्टहि आतां—त्यांच्या मृत्यूनंतर तरी त्यांच्या टीकाकारांना कबूल केली पाहिजे. पण म्हणूनच ऐतिहासिक विचारसरणीच्या माणसांना हा नितांत विश्वास राजकारणांतील ढोबळ दोष मानावा लागतो. गांधींचें तत्त्वज्ञान हें त्यांचें शिळोप्याचें खेळणें नसून जळजळीत जीवनकार्य असल्यामुळें त्यांनीं आपलें तत्वज्ञान रतिमात्रहि चळूं दिलें नाहीं ही व्यक्तिशः त्यांना अत्यंत भूषणावह व त्यांच्याबद्दल इतरांना विश्वास पटवणारी गोष्ट होय. मात्र याच तत्त्वामुळें पाकिस्तान अटळ झालें असा शेरा इतिहासकाराला मारावा लागेल. गांधींचा मार्ग हा सर्वांच्या—म्हणजे सर्व जगाच्या—हिताचा, चिरंतन हिताचा व जीवनांतील प्रत्येक क्षेत्रासाठीं हिताचा याबद्दल वादच नाहीं. मार्ग सोडण्यापेक्षां मरून जाणें हें गांधींना व्यक्तिशः मंजूर. तोच सिद्धान्त तर्काच्या अंतिम कसोटीला नेला तर त्याचा प्रत्यक्ष अर्थ म्हणजे सबंध हिंदुस्थान नष्ट झालें तरी चालेल; पण त्यानें पाशवी मार्ग सोडावा असें म्हणणें होय. जुन्या इतिहासकालांत अशी नष्ट करण्याची शक्यता मानवांच्या हातांत थोडीच होती; आतां मात्र हिरोशिमाचा प्रयोग करून कोणताहि देश संपूर्ण नष्ट करणें अशक्य कोटींतलें मानतां येणार नाहीं. अर्थात् या भीतीनें सर्वांनीं स्वस्थ बसावें असें कोणीच म्हणूं शकत नाहीं; पण गांधींच्या तत्त्वांशीं ज्यांचा प्रामाणिक मतभेद आहे त्यांचें मत समजून घेणें हें गांधीवाद्यांचेंहि आद्य कर्तव्य आहे. व म्हणून वरील विवेचन अवश्य समजून विस्तारानें येथें केलें आहे.

वरील विवेचनावरून वाचकांच्या लक्षांत येण्यास हरकत नाहीं कीं जग सध्या तर्कशास्त्रांतील शृंगापत्तीच्या धोक्यांत सांपडलेलें आहे. जर गांधींचा मार्ग अनुसरला तर पाकिस्तान अटळ होतें, तें देऊनहि जें युद्ध टाळण्यासाठीं तें दिलें त्या युद्धाचा ससेमिरा अंतर्गत किंवा जागतिक राजकारणांतहि पाठीमागचा सुटूं शकत नाहीं व आपण पुनः दुष्ट चक्राच्या फेऱ्यांत तसेच फिरत राहतों. गांधींचा मार्ग न अनुसरला तर जग कधींकाळीं सुधारेल ही आशाच सोडून द्यावी लागते. संकट येईल म्हणून युद्धाची तयारी व युद्धाची तयारी झाली म्हणून पुनः युद्धाचेंच संकट ही परंपरा अखंड चालू राहण्याचा धोका उत्पन्न होतो. धर्मदृष्ट्या याचा विचार गांधींप्रमाणें केला तर यांतील कोणता मार्ग अनुसरावा याबद्दल संशय उरत नाहीं. पण आजच्या काँग्रेसचे सारथीहि त्या अर्थानें धार्मिक आहेत असें दिसत नाहीं. ज्याअर्थीं जवाहरलाल काश्मीरचा लढा 'शेंडी तुटो कीं पारंबी तुटो' या पणानें लढण्याचा निश्चय करतांना दिसतात व अंतर्गत बंडाव्याचा बींमोड 'राक्षसी' इंग्रज सरकारची पद्धति अवलंबून करूं म्हणतात, त्या अर्थीं त्यांच्या गांधीवादाला मुरड पडलेली उघड दिसते. हीच मुरड काँग्रेसनें आधीं घालण्याचा विचार केला असता तर तिला सुचलें असतें कीं अंतःस्थ यादवीला भिऊन ती टळत नाहीं. गांधी वारल्यानंतर त्यांची अब्राहम लिंकन यांशीं तुलना करण्यांत आलेली दृष्टीस पडते. पण दोघांचा खून झाला या घटनेखेरीज दोघांच्या विचारप्रणालींत कांहींच ऐतिहासिक साम्य नाहीं हें तुलना करणारे विसरलेले दिसतात. लिंकननें तत्त्वासाठीं आपल्याच देशबांधवांविरुद्ध, जातिबांधवांविरुद्ध व धर्मबांधवांविरुद्ध निकराचें युद्ध पांच वर्षें चालविलें. बलाढ्य इंग्लंडसारखा आपला मायदेश शत्रुपक्षास आहे, याची तमा धरली नाहीं; सबंध राष्ट्र यादवी युद्धानें खिळखिळें झालें याचा दरकार बाळगिला नाहीं. तेव्हां युद्ध यशस्वी झाल्यानंतर त्याचा एका चिडलेल्या माणसाकडून खून झाला. गांधींनीं, त्यांचा मार्ग मुळांतच भिन्न असल्यामुळें, मुसलमान धर्मबांधव नव्हते तरी त्यांच्याशीं लढण्याचें नाकारून आपल्या खऱ्या समजाविरुद्ध पाकिस्तान देऊन टाकलें! आपले साथी अबदुल गफारखान यांच्यासारख्यांच्या भावी कुचंबणेचा विचार सोडून दिला! फाळणी अंमलांत आल्यानंतर जे अमानुष अत्याचार घडून निरपराध अल्पसंख्याकांची सर्वस्व जाऊन वर विटंबना झाली तीहि निमूटपणें सहन केली! व एवढें झाल्यानंतरहि करार मोडून मागील अंकावरून पुढें अत्याचार चालविणाऱ्या पाकिस्तानविरुद्ध अडवणुकीचा मार्ग धरूं नये म्हणून उपवास केला! अखेर त्यांचा चिडलेल्या एका धर्मबांधवानें खून केला. अशी गोष्ट घडण्याचें कारण म्हणजे धर्मवाक्यांचा दोन माणसांनीं केलेला परस्परविरुद्ध अर्थ होय. गांधींनीं भगवद्गीतेचा रूढार्थ वेगळा करून अर्जुनाप्रमाणें जें युद्धापूर्वींच शस्त्र खालीं ठेवलें, तें पुनः भगवंतांच्या उपदेशानेंहि वर उचललें नाहीं! याच्या अगदीं विरुद्ध स्वबांधवांशींहि युद्ध पुकारून त्यांना मारणें हें न्यायदृष्ट्या अपरिहार्य आहे अशी

भगवद्‌गीतेची शिकवण अंगीं भिनलेल्या माणसानें त्यांचा खून केला!

वरील विवेचन लक्षांत घेतल्याखेरीज गांधींच्या खुनामागील विरोधाभास उकलूं शकत नाहीं. प्रत्यक्ष हानि झाल्यामुळें ज्यांना चिडण्यास कारण होतें त्यांपैकीं कोणाकडून चिडून खून होण्याऐवजीं ज्यांना फाळणीची झळ विचाराशिवाय कोठेंहि लागलेली नव्हती त्यांपैकीं एकानें दूरवरून मुद्दाम खेपा मारून अखेर असला पराक्रम केला! आणि हा खून झाल्यामुळें ज्यांनीं चिडणें साहजिक त्या गुजराथ्यांकडून दंगल होण्याऐवजीं त्या खुनी इसमाच्या अर्थाअर्थी त्यांच्याशीं संबंध नसलेल्या प्रांतस्थांनीं त्याच्या किंवा त्याच्या सहकाऱ्यांच्या घरांची होळी करूनच केवळ न थांबतां त्याच्या जातीच्या सांपडेल त्या इसमाचें घर प्रांतभर जाळून आपला क्रोधाग्नि शांत केला! या गोष्टींची संगति कशी लावावयाची?

ही संगति फक्त इतिहासानेंच लागते, तात्कालिक कारणांनीं लागत नाहीं. वर सांगितलेंच आहे कीं, गांधींच्या उपदेशानें शांततास्थापना झाली नसून खळबळ निर्माण केली आहे. इंग्रजांच्या जाण्यानें एतद्देशीयांत एकी घडून येण्याऐवजीं बेकीचेंच भूत संचारलें आहे. किंबहुना 'हिंदुस्थान सोडा' या गांधींच्या घोषणेला 'हिंदुस्थान फोडा' असें इंग्रजांनीं दिलेलें हें उत्तर आहे. हिंदी लोक इंग्रजांनीं स्वातंत्र्य दिलें असें समजत असतील तर तें चूक असून त्यांनीं बेकी दिली हें जास्त खरें आहे. इंग्रज येथें नांदणार या समजुतीवर गेलीं शंभर वर्षें जें ब्राह्मण्य येथें निर्माण झालें होतें तें ते गेल्यामुळें आपोआपच मोडून पडलें आहे. हें ब्राह्मण्य धर्माच्या पायावर स्थापलेलें नसून केवळ भौतिक भूमिकेवर उभारलेलें होतें. गांधींनीं त्यांत नीतिधर्म समाविष्ट करण्याचा प्रयत्न केला, पण तो यशस्वी झाला नाहीं हें दिवसेंदिवस जास्त जास्त स्पष्ट होत जाणार आहे. राजकारणी लोकांच्या स्वार्थामुळें पाकिस्तान निर्माण झालें असें म्हणतां आलें तरी, हिंदुस्थानांत अपरंपार बोकाळलेल्या व कमी होण्याच्या बिलकुल मार्गावर नसलेल्या काळा बाजार ह्या अभूतपूर्व संस्थेची उपपत्ति त्यानें कशी लावतां येईल? विलायतेंत जीवनोपयोगी जिन्नस बरेचसे बाहेरून आणावे लागत असतांहि तेथें महायुद्धाच्या ऐन काळांतहि महागाई प्रमाणाबाहेर बोकाळली नाहीं. याउलट बरेचसे जीवनोपयोगी जिन्नस येथेंच निर्माण होत असूनहि हिंदुस्थानांत किंमती अनेक पटींनीं वाढल्या. समाजांतील अमूर्त व राज्यांतील मूर्त कायद्यांना धाब्यावर बसवून प्रजेला लुबाडणाऱ्या लोकांची या देशांत कल्पनातीत वाढ झाली. एवढ्यावरच न थांबतां या लोकांनीं समाजांत प्रतिष्ठित बनून राज्ययंत्रहि ताब्यांत घेण्याचा प्रयत्न सुरू केला आहे. पण त्यांना हात लावण्यास आजचे राज्यकर्ते भीत आहेत असें स्पष्ट दिसतें.

टिळक व गांधी दोघेहि सामाजिक असंतोषाचे जनक होते असें वर सांगितलें आहे; पण टिळक एका वेळीं समाजाची एकच बाजू घेऊन असंतोष निर्माण करूं पाहत होते, तर गांधींनीं सर्वच बाजू आपल्या सर्वोदयाच्या सिद्धांताप्रमाणें असंतोषाचें वारें भरून

उठविल्या आहेत. वादळ निर्माण करून त्या वादळाच्या जोरावर उडत जाणें हें हुषार डोंबाऱ्याचें काम असतें. गांधींनीं वादळ निर्माण करून इंग्रज तर उडविले, पण आतां हिंदी समाज कसा टिकतो याची काळजी निर्माण झाली आहे. नवनिर्मित सामाजिक झंझावातांत मोठमोठे राजवृक्ष उन्मुळून पडावे हें साहजिक असलें, तरी त्यांखालीं माणसें सांपडूं नयेत याची तरी काळजी घेतली पाहिजे ना? पण ती घेण्यास आमचे नवे प्रभु समर्थ दिसत नाहींत. नवीन राजवटीची सबब कांहीं मर्यादेपर्यंत ठीक; पण ती पुष्कळ गोष्टींना लावतां येण्यासारखी नाहीं. ज्याप्रमाणें अमेरिकेंत सर्वांत पुढारलेलें सरकार अधिकारारूढ असूनहि तेथील नीग्रोंना जाळणाऱ्या संस्थेचा वा आजतागायतच्या साधनांनीं लुटणाऱ्या व मारणाऱ्या टोळ्यांचा नायनाट होऊं शकलेला नाहीं, तशीच स्थिति हिंदुस्थानांत बद्धमूल होण्याचा बळकट धोका आहे. रामचंद्रपंत अमात्यांच्या राजनीतींत शिवाजीच्या राज्यव्यवस्थेचें मुख्य सूत्र असें सांगितलें आहे कीं, त्याच्या राज्यांत प्रजेवर राजसत्तेव्यतिरिक्त इतर कोणाचेंहि तिळमात्र स्वामित्व चालूं न देण्यावर त्याचा कटाक्ष होता. आजच्या हिंदुस्थानांत त्याच्या अगदीं विरुद्ध स्थिति आहे. समाजांत असे अनेक लोक उत्पन्न झाले आहेत कीं, जे सरकारला न भितां त्यांना इष्ट अशी ढवळाढवळ पाहिजे तेथें करूं शकतात. त्यांची सामाजिक प्रतिष्ठा एवढी वाढली आहे कीं, सरकार त्यांना हात लावूं शकत नाहीं किंवा त्यांचे चाळे बंद पाडण्यास धजत नाहीं! अशी स्थिति निर्माण होणें कोणत्याहि समाजाला भूषणावह नाहीं.

चतुर्विध पुरुषार्थांपैकीं मोक्ष हा काल्पनिक ध्येयवत्तेचा मार्ग आहे. धर्माला आद्यस्थान पूर्वकाळांत दिलें गेलें असलें तरी प्रस्तुत युगांत बावचळलेल्या ज्ञानाच्या सरमिसळ प्रसारामुळें या पुरुषार्थाची एकात्मता केव्हांच नष्ट झाली आहे; तो, सज्जन तेवढे मानतात आणि दुर्जन कधींच मानीत नाहींत या कोटींत जाऊन पडला आहे. मानवतेचा सर्व गाभा धर्मसमजुतींत असल्यामुळें तो अशा संकटांत सांपडला म्हणजे गांधींसारख्या धर्मप्रचारकांची कंबक्ती ओढवली असें समजावें. समाजांत आज ज्यांना कर्तबगार व म्हणूनच 'यः क्रियावान् स पण्डितः' या न्यायानें पंडितहि समजतात, त्यांपैकीं बहुसंख्य सध्यांच्या जगांत तरी अधर्मवान् आहेत, याबद्दल शंका नको. अर्थात् कर्तबगार म्हणजेच अधर्मवान् म्हणजेच दुर्जन, असें समीकरण बनूं पाहत आहे. या गोष्टीला अज्ञपणा हें मुख्य कारण असलें तरी, या अज्ञानाचा फायदा या दुर्जन, सत्ता बळकावून बसलेल्या पुढाऱ्यांना देतां येण्यासारखा नाहीं. तिसरा पुरुषार्थ जो अर्थ त्यालाच सध्या जगाच्या व्यवहारांत आद्यस्थान प्राप्त झालें आहे. सर्व कृत्यांचे आरंभ तंडुलप्रस्थ असले तरी धर्माचार्य सदैव 'अर्थशास्त्रात्तु बलवत् धर्मशास्त्रमिति स्थितिः' असें सांगत आले आहेत; पण आजच्या युगाला तें बिलकुल मंजूर नाहीं. अर्थशास्त्र हेंच सधयचें राज्यशास्त्र, म्हणजे सर्व धर्मांना वांकविणारें शास्त्र बनलें आहे. त्यामुळें आजचे कर्तबगार पुरुष समजले जाणारे जागतिक राज्यकर्ते मुख्यतः याच

वर्गांतून निवडलेले आहेत. यांचें इतर शास्त्रांकडे इतकें दुर्लक्ष झालेलें आहे कीं, त्यांच्या अज्ञानाचा परिणाम जगावर न झाला तरच आश्चर्य! कोणत्याहि धर्मांतील पूर्वींच्या सामाजिक आचारांत नित्यकर्मांचा समावेश पूर्वीं होत असे. आजच्या जगांतील अति-बहुसंख्य प्रजा या आचाराच्या नित्य कसरतीला अडगळ समजत असून त्यांतून मुक्त झाली आहे. गांधींसारखे धर्मपुरुष नित्यप्रार्थनेला एवढें महत्त्व कां देत, हें तिला समजेनासें झालें आहे. अनेकजन्मसंसिद्ध अशा कोटींत जन्माला आलेल्या गांधींसारख्या माणसालाहि, आपले आचार व विचार पापभावनेपासून अलिप्त ठेवण्यासाठीं, नित्यधर्माचरणाची तालीम आवश्यक वाटे व केवढेंहि मोठें काम असलें तरी जुन्या कर्मनिष्ठ ब्राह्मणांप्रमाणें त्यांनीं तींत कधीं खंड पडूं दिला नाहीं. पण पांढऱ्या टोप्या घालून गांधीवादी म्हणविणाऱ्या व आतां आपण राजे झालों असें समजणाऱ्या किती अहंमन्य लोकांना या आचाराची गरज भासते? मनांतून व खाजगी संभाषणांत त्यांपैकीं कितीकजण महात्माजींच्या प्रार्थनातंत्राची टवाळकी करणारे होते! जगांतील बहुसंख्य मानवांचा वेळ हल्लीं बहुधा अर्थ व काम यांच्याच व्यवधानांत संपतो. मोक्षावर कोणाचाच विश्वास नाहीं व धर्माची कोणालाच गरज उरलेली नाहीं. वर्तमानपत्रें, भिकार गोष्टींचीं मासिकें, कादंबऱ्या, वावदूक निबंध—लघुनिबंध, कशांतच कांहीं अर्थ नाहीं असें सांगणारे ग्रंथ, नाटक–गायन–सिनेमा व तज्जन्य छंदफंद, यांतच हल्लींच्या सुधारलेल्या माणसांचा काळ व्यतीत होत असतो. यांत धर्माचा संबंध कोठेंच दिसत नाहीं. याच परिस्थितीचे दुष्परिणाम जग सध्यां भोगीत असून अनेक 'मी मी' म्हणणारे पुढारीहि त्याला आळा घालण्यास असमर्थ ठरलेले दिसत आहेत. पक्वान्न किंवा मिठाई या वस्तू सर्वांना आवडत असल्या तरीहि ज्याप्रमाणें त्या नित्याहाराचा भाग बनतां कामा नयेत, तद्वतच वरील गोष्टींबाबतहि समजलें पाहिजे; पण लोक या मेवामिठाईतच मशगुल होऊन गेले आहेत! अर्थात् त्यांना जंतोदराची भावना होणें क्रमप्राप्तच आहे व याच स्थितीला आम्ही 'ब्राह्मण्याचा ऱ्हास' म्हणतों.

नुकतेंच वर्तमानपत्रांत वाचलें कीं, अमेरिकेजवळ जगांतील सर्व मानवजात नष्ट करण्यास पुरेसा ॲटमबॉंबचा संग्रह झाला आहे व तसाच तो प्रसिद्ध नसला तरी रशियाजवळ असण्याचा संभव आहे. या बातम्या काय दाखवितात? जग कोठल्या नैतिक मार्गावर आहे? लहानग्या वॉशिंग्टनला बापानें एक छोटी फरशी दिली, तेव्हां त्यानें एका बहुमोल झाडावरच त्या शस्त्राचा पहिला हात चालविला. आजच्या जगांतील राजकीय पुढारी हे धर्मनीतीच्या बाबत लहानग्या वॉशिंग्टनइतकेच अज्ञ ठरण्याचा संभव असल्यामुळें जगांतील कोणत्याहि सज्जन राष्ट्राचें अस्तित्व संशयातीत राहणार नाहीं. ही स्थिति जगाच्या मोठ्या राजकारणांत, मग ती छोट्या जगाच्या दैनंदिन कार्यक्रमांत किती असावी? बळाचा उन्माद बहुधा अनैतिक गोष्टी करण्यांतच खर्ची पडतो असा इतिहासाचा धडा आहे. याचेंच प्रात्यक्षिक गांधींच्या खुनांत व तदनंतरच्या जाळपोळींत

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत.
अनुक्रम २६१२९ वि: निबंध
क्रमांक ९२०३ नों: दि: ४/२/५०

प्रकट झालें आहे. यांत पुनः अशी विकृति दृष्टीस पडते कीं, अशा गोष्टी करणारे लोक हे 'अधर्मं धर्ममिति यः मन्यते तमसावृतः' या न्यायानें आपल्या कृती पूर्णपणें धर्म्यच आहेत असें प्रतिपादन करतांना आढळतील! साम्यवादी हे असल्याच 'धर्म-वादा'चें ठळक उदाहरण आहेत. या नव्या धर्माच्या अपरंपार वाढीमुळें मेरी कॉरेलीची पहिल्या महायुद्धानंतरची अखेरची कादंबरी 'गूढ शक्ति' हींत वर्णिलेला स्फोट सत्य-सृष्टींत उतरून, आपल्या ह्या पृथ्वीगोलाची अंतरालांत राख उडण्याचा संभव निर्माण झाला आहे.

गांधींचें तत्त्वज्ञान ब्राह्मण्याच्या आधारावरच उभारलेलें आहे व या दृष्टिकोणा-मुळेंच ते भांडवलवाल्यांशीं वागत असत तसें वागू शकत. मात्र त्यांचा दृष्टिकोण समाजांतील आजच्या ब्राह्मणांना म्हणजे बुद्धिवादी वर्गाला मंजूर नाहीं. हा वर्ग बहुधा साम्यवादी तंत्रप्रधान मताचा अनुयायी झाला आहे. याचें वैशिष्ट्य असें कीं, ते साध्या-साठीं कोणतेंहि साधन योग्य समजतात. वृत्तीनें कौटिल्याचे बाप असल्यामुळें दुसऱ्या कोणाहीबद्दल शंका घेणें व आपला खून होईल या भीतीनें आधींच दुसऱ्याचा खून करून बसणें, संशयास्पद गोष्टी वाढल्यास पुढें पुष्कळशी कत्तल करावी लागेल म्हणून आजच फारशी चौकशी न करतां संशय आलेल्या माणसांना मारून टाकणें, वगैरे प्रकार त्यांना नीतिदृष्ट्या वावगे वाटत नाहींत. ही विचारसरणी गुन्ह्यांचा बंदोबस्त करण्याच्या लोकशाही पद्धतीविरुद्ध आहे. शंभर गुन्हेगार सुटले तरी चालेल पण एकहि निरपराधी अन्यायानें फांशीं जातां कामा नये, या तत्त्वाशीं साम्यवाद्यांच्या तंत्राचा कांहींच संबंध नाहीं. याच विचारसरणीमुळें दहा वर्षांमागें रशियांत लागो-पाठ चार सर्पसत्रें घडून आलीं व त्यांत हजारों पहिल्या दर्जाचे साम्यवादीसुद्धां नाहींसे करण्यांत आले. ज्यांनीं तावत्कालपर्यंतचें आयुष्य साम्यवादी राजवट प्रस्थापित करण्यासाठीं व वाढविण्यासाठीं वेंचिलें होतें, त्यांचीहि कदर करण्यांत आली नाहीं. यानंतर महायुद्ध सुरू झालें तेव्हां साम्यवादाचा नाश करण्यासाठींच अवतार घेतलेल्या हिटलरशीं सुद्धां मैत्रीचा करार करण्यास रशिया मागें सरला नाहीं आणि या करारांचें कार्य पुरें झाल्याबरोबर पुनः दोस्तांशीं संगनमत करण्यासहि त्याला कांहीं लाज वाटली नाहीं. जुने राजकारणी याला वारांगनेसारखी राजनीति समजत; पण आजचे साम्यवादी या गोष्टीचें आपल्या 'गूढ' तत्त्वज्ञानानें समर्थन करूं शकतात. गांधींच्या एक पिढीच्या उपदेशानें हिंदुस्थानांत खरी अहिंसावृत्ति बाणण्याऐवजीं चळवळवृत्ति बाणली आहे असें वर सांगितलें. याचें खरें कारण, जे लोक गांधींच्या चळवळींत या साम्यवादी संधिसाधु वृत्तीमुळें सामील झाले होते. त्यांची दानतच खरी गांधीवादी नसून साम्यवादी तंत्राची म्हणजे नीति-अनीतीचा विचार न करणारी होती हें होय. हिंदुस्थानांतील दर एक प्रांतांत वेगवेगळे गट अगदीं भिन्न भिन्न कारणांसाठीं गांधींच्या मेळाव्यांत ठकसेनवृत्तीनें शिरले. त्यांचीं खरीं रूपें आतां कोठें थोडीं थोडीं दिसूं लागलीं आहेत.

एक पिढी गांधींच्या मेळाव्यांत राहूनहि या लोकांचा स्वभाव पालटला नाहीं त्याअर्थी, तो गांधींचा दोष न समजतां हे लोकच फसव्या वृत्तीनें मेळाव्यांत सामील झाले होते, असें म्हणणें भाग आहे.

जर आमचें वरील विवेचन खरें असेल, तर या गोष्टींचा बंदोबस्त करण्याचा मार्ग शिष्टसंमत कसा काय असणार ? यांच्याशीं शिष्टसंमत मार्गानें वागण्याचा यत्न करणें म्हणजे महात्माजींप्रमाणें मरून जाण्याची तयारी करणें होय. असला मार्ग देशाला परवडणार नाहीं व म्हणूनच राज्यकर्त्यांनीं तो सोडणें भाग आहे असें आम्हांस वाटतें. आम्ही या प्रश्नाचा विचार केवळ हिंदुस्थानांतील अनुभवानें करतों असें नसून, जागतिक उदाहरणांवरून या निश्चयावर येऊन पोहोंचलों आहों. आजच्या जगांतील सर्व खळबळ, वळवळ, या दोन तत्त्वांमधील झगड्याचाच स्पष्ट आविष्कार आहे.

जगांतील बहुतेक बरेचसे अनर्थ केवळ आळसामुळें व औदासीन्यामुळें घडून येतात असें इतिहासावरून स्पष्ट दिसतें. वेळींच एक टाका घातला तर नऊ टाके घालण्याची आपत्ति टळते, अशी इंग्रजी म्हण आहे. आज समाज फाटला आहे याचें कारण, वेळींच टाके घालण्याच्या या कामांत झालेला सार्वत्रिक आळस होय. आजहि तीच मनोवृत्ति आपत्प्रसंगीं सुद्धां दिसते. पुण्यासारख्या मोठ्या शहरांत शेंपाचशें भुसके लोक हातांत कायदा घेऊन शहराच्या एका टोंकापासून दुसऱ्या टोंकापर्यंत दिवसां मशाली लावून अग्निक्यपत्र घेत सर्वत्र संचार करूं शकतात. तरी त्यांना अडथळा असा नागरिकांकडून कोठेंच होतांना दिसत नाहीं, ही स्थिति आम्ही म्हणतों ती वस्तुस्थिति सोदाहरण शिकविते. अधिकारी-वर्गानें काय केलें किंवा काय न केलें, यापेक्षां ही परिस्थिति अत्यंत भयानक म्हटली पाहिजे. ज्या समाजांत—आणि हा समाज मोठा सुशिक्षित, पुढारलेला, राजकीय दृष्ट्या जागरूक, व आर्थिक दृष्ट्या साधनसंपन्न समजला जातो—असा अनर्थ क्षणाधींत घडून येऊं शकतो, तो समाज स्वराज्य उपभोगण्याच्या अखेरच्या पायरीवरहि नाहीं असें म्हणणें भाग आहे.

आतां आपणांला असलें करंटेपण सोडावयाचें असेल तर ज्यानें त्यानें, कोणाहि मूर्खानें, बुद्धि सांगण्याचा मार्ग बंद केला पाहिजे. मनुस्मृति जाळून टाकावी असें म्हणणारे पंडित आपल्या समाजांत हल्लीं पुष्कळ झाले आहेत; पण सर्व जुन्या स्मृतींतील आचाराध्याय व प्रायश्चित्ताध्याय यांकडे मूलग्राही दृष्टीनें कोणीच पाहूं इच्छीत नाहींत. वर्णाश्रमधर्म वर्णसंकर झाल्यामुळें आज त्या त्या स्वरूपांत ग्राह्य राहिले नसतील; पण म्हणून आचारधर्माच्या आवश्यकतेंतून मानवजात कधीं सुटेल असें म्हणतां येईल काय ? प्राचीन समाज साधा, सुटा होता; तर आजचा समाज अतिशय संमिश्र झालेला आहे. म्हणूनच त्याला वर्तनाच्या शिस्तींत राखणें महादुष्कर कर्म झालें आहे. दोन पिढ्यांपूर्वी खेडेगांवांतील अत्यंत अशिक्षित वर्गहि सदाचाराचे जे नियम मोडीत नसे ते आजचे पंडित, अधिकारी व पुढारी प्रत्यहीं मोडतांना दिसतात. अशीं माणसें ज्या समाजांत

झालीं, तो समाज सुस्थितींत कसा राहील? पूर्वीं समाजांतील वर्गांचीं कर्में समाजबंधनांनींच ठरविलीं जात. हल्लीं हें बंधनच नष्ट झाल्यामुळें कोणताच सदाचार रूढ न राहून अनाचार फैलावत आहे. मात्र तो अनाचार आहे असें कोणाला वाटतच नाहीं. गांधीच्या चळवळीमुळें इतर काय फायदे झाले असतील ते असोत, पण तेणेंकरून समाजाची नैतिक उंची वाढली आहे असें आमचें मत नाहीं. याचें कारण आम्हीं वर म्हटलें आहे त्याप्रमाणें, तींत बहुसंख्य अज्ञ व ढोंगी लोक आपापल्या स्वार्थासाठीं सामील झाले हेंच होय. सदाचाराचें एक प्रमुख अंग साधेपणा म्हणजेच कमी गरजा असणें हें आहे. गेल्या तीस वर्षांतील ओघ याच्या अगदीं उलट चालला आहे. गांधींनीं पायघोळ धोतर सोडून राजापुरी पंचा स्वीकारला, तर आमचे नूतन काँग्रेसमेन—ज्यांची आर्थिक स्थिति वस्तुतः लंगोटी पेहेरण्याचीच—एकदम पांढरा शुभ्र, पायघोळ, रस्ता झाडूं शकणारा लेहेंगा पेहेरावयास लागले. ज्यांना पूर्वीं साबण क्वचितच लागत असे, त्यांना आतां परीटघडी कपडे असल्यावांचून चालत नाहीं व येरवड्याच्या तुरुंगांतहि स्नानार्थ सुवासिक साबणाच्या पेट्या फस्त कराव्याशा वाटतात. पूर्वीं आठवड्यांतून एक वेळ हजामत म्हणजे फार, तर आज नित्य श्मश्रुकर्मांत व केवळ चेहऱ्याच्या मशागतींतच तासांवर तास मोडतात! पूर्वीं जीं माणसें बहुधा अनवाणी जात, त्यांना आतां छचोर चपला व अक्कडबाज बूट पाहिजेत. चहा, सिगारेट, पानपट्टी हीं व्यसनें उरलीं नसून सार्वत्रिक राहणीचीं अंगें बनलीं आहेत. ज्यांच्याकडून वस्तूंची निर्मिति मुळींच घडत नाहीं, त्यांची वस्तू वापरण्याची वृत्ति मात्र एवढ्या मोठ्या प्रमाणांत वाढली आहे कीं, कोणतेंहि सरकार त्यांचा पुरवठा करूं शकणार नाहीं. साम्यवाद बोकाळल्यामुळें प्रत्येक मुलाच्या राहणीचा दर्जा जवाहरलाल नेहरूंचा व प्रत्येक मुलीची ऐट मृदुला साराभाईची! अगदीं सहीन् सही तसें दिसण्याचा प्रयत्न सर्व तरुण पिढीचा! गांधी-सेवासंघाचे साधुसेवक कसे राहत असतील ते असोत, पण आज वर्तनाच्या बाबतींत गांधींचें अनुकरण होत नसून सिनेमा नट आणि नटी यांचेंच अनुकरण प्रायः होतांना दिसतें. समाजांत समानता स्थापन करावयाची याचा अर्थ नायकिणींचे पोषाख गरतींनीं घेण्यांत झाला आहे. पूर्वींचा समाजदंडक असा होता कीं, श्रीमंतांनींहि आपला व्यक्तिशः राहणीचा दर्जा प्रमाणाबाहेर वाढवितां कामा नये. त्यामुळें अनुकरणाच्या रूपानें समाजावर श्रीमंतीचा वाईट परिणाम होऊं शकत नसे. आजच्या श्रीमंतींत सामाजिक खर्च शून्यावर आणून वैयक्तिक खर्च वाटेल तितका वाढविण्यास वाव मिळूं लागला आहे. पूर्वीं श्रीमंतांच्या घरीं वर्षांतून अनेक वेळां गांवांतील गोरगरिबांना सुद्धां अनेकदां जेवावयास मिळे. आतांचे श्रीमंत धार्मिक व सामाजिक बाबतींत पुरोगामी झाल्यामुळें यांतील कोणताच खर्च ते करीत नाहींत. वर्षांत एकदां तरी आपल्याकडे गांवांतील सर्व आप्त-इष्ट जेवावयास यावे म्हणून अगदीं गरीब बायाबापड्या सुद्धां वर्षभर स्वतः तोंड शिवून राहत व त्या काटकसरीवर एक दिवसाचा समारंभ उत्तम

साजरा करीत. या स्वरूपाचा त्याग समाजांत आतां कोठेंच दिसत नाहीं. पूर्वीं हिंदुस्थानांतील कोठल्याहि खेड्यांत परक्या प्रवाशाला जेवूं घालणारे सद्‌गृहस्थ आढळत. आज पैसे मोजूनहि व घरांतील माणसें रिकामीं चकाट्या पिटण्यांत किंवा निद्रालापांत दंग असूनहि प्रवाशाला टळटळीत दुपारीं तसेंच पुढें जावें लागतें. आणि ही सर्व कमाई गेल्या एका पिढीचीच आहे ! तशांतच दुर्दैवानें हा काळ गांधींचा समजला जातो ! याहून विपरीत दैवदुर्विलसित तें काय असणार ?

आर्थिक प्रश्नांवर सर्व शिष्टांचें मन केंद्रित झाल्यामुळें सभ्य गृहस्थ व व्यापारी यांत कांहींच फरक उरलेला नाहीं. दुसऱ्याकडून किती पैसे एकाद्या वस्तूबद्दल उकळावयाचे याला मर्यादाच उरलेली नाहीं. पूर्वीं चार सहा टक्के व्याज सुटलें कीं व्यापारी समाधानी असत. आतां त्याच्या दसपट व क्वचित्प्रसंगीं शंभरपट फायदा मिळविणें यांत कांहींच वाटेनासें झालें आहे. त्यामुळें ज्याअर्थीं मुंबईच्या फूटपाथवर भटकणारा मुलगा देखील एकादी कंपनी स्थापूं शकतो, आरंभीं दुसऱ्यांचे पैसे 'लिमिटेड कंपनी' म्हणून वापरून 'अन्–लिमिटेड' फायदा मारूं शकतो व नंतर आठ वर्षांत ती स्वतःच्या नांवाची करून शिवाजीनगरशीं स्पर्धा करणारें स्वतःच्या नांवचें नगर उठवितांना दिसतो, त्याअर्थीं आजचे लोक शिवाजी महाराजांचे प्रपितामह म्हणण्याइतके पराक्रमी झाले असेंच म्हटलें पाहिजे. हा जो डोळ्यांवर धूर आल्यासारखा प्रकार रूढ झाला आहे, त्याचीच दुसरी बाजू, कोट्यवधि रुपयांच्या मालमत्तेची जाळपोळ असला सिनेमाचमत्कार पाहणारांकडून होते, ही आहे. समाजांतील एका माणसाला कोणताहि नैतिक किंवा बौद्धिक गुण त्याच्या अंगांत नसतांना—किंबहुना असा गुण अंगीं नसल्यामुळेंच—जर अभूतपूर्व पैसा मिळावयास लागला, तर त्यामुळें कमींत कमी दहा हजार माणसांची नीति चळली म्हणून खुशाल समजावें. हल्लीं वर सांगितल्यासारखे सभ्य ठगीचे प्रकार गांवोगांव निर्माण होत आहेत. आधुनिक तंत्रांचा अवलंब करून, शहरांत राहणारे लबाड लोक अर्थशास्त्राचें नांव घेऊन खेडेगांवांतील संपत्ति लुटण्यांत तरबेज होत आहेत.

परवांच अर्थमंत्री सर षण्मुखम् चेट्टी यांनीं हिंदुस्थानांतील श्रीमंत सरकारी कर चुकविण्यांत किती निष्णात आहेत हें सांगितलें. आम्हांला, दारांत दोन मोटारी ठेवणारा मुंबईतील व्यापारी आपलें उत्पन्न सालीना दोन हजारांहूनहि कमी आहे असें लिहून देतांना, पंचवीस वर्षांपूर्वींच आढळला होता. पण त्याला शिक्षा झाल्याचें मात्र कोठेंहि मागाहून ऐकलें नाहीं. आज हिंदुस्थानांतील अर्थशास्त्रज्ञ प्राप्तीवरील कराच्या महसुलावरून श्रीमंतांचें जें उत्पन्न कल्पितात तें वस्तुतः कमींत कमी दसपट मोठें असलें पाहिजे असें आमचें मत आहे. आणि या आंकड्यांच्या पायावर आमचें सरकारी काम चालतें. सरकारी पगारी नोकरांच्या उत्पन्नाखेरीज इतर कोणतेहि उत्पन्नाचे आंकडे प्रामाणिक असतील असें म्हणणें मुष्किलीचें आहे. आणि सांगण्याची मुख्य गोष्ट ही कीं यांतील

बहुसंख्य वर्ग राजकारणांत गांधींचा अनुयायी व बाह्यतः पांढऱ्या टोप्या घालणारा असतो. आजच्या भारतीय समाजाच्या सुधारणेला आरंभ व्हावयाचा, तर प्रथम कोणत्याहि व्यक्तीच्या संपत्तीचें मोजमाप करून तिच्या उगमाचा छडा लावणारें कायम सरकारी कमिशन नेमणें हा आहे, अशी आमची अनेक वर्षांच्या विचारानंतर पक्की समजूत झाली आहे. समाजांतील अन्याय शोधून काढण्यासाठीं पूर्वीचे हरून–अल्–रशीद किंवा अकबर यांसारखे बादशहा रात्रीं वेषांतर करून शहरांत हिंडत असत असें वाचण्यांत येतें, त्यांतील स्वारस्य आपल्या लक्षांत येत नाहीं. आम्हांला कोल्हापुरच्या शाहू छत्रपतींची तीस वर्षांपूर्वींच घडलेली एक गोष्ट कळली होती ती येथें आठवते. आठ रुपयांच्या मराठी कारकुनीपासून चाळीस रुपयांपर्यंत वाढलेल्या एका इसमाला त्यावर मर्जी खप्पा झाल्यामुळें त्यांनीं बोलाविलें, त्याची स्वतःच तपासणी केली व तो आपले तीन मुलगे डेक्कन कॉलेजांत दरमहा दीडशें रुपये पाठवून कसे ठेवूं शकतो असें त्याला विचारलें. आरंभीं त्याची वडिलार्जित संपत्ति किती होती त्याची त्यांनीं चौकशी केली आणि शेवटीं म्हटलें कीं, ज्याअर्थीं एवढ्या मोठ्या दर्जानें राहून तुमची पन्नास हजारांची मालमत्ता झाली आहे, त्याअर्थीं तुम्हांला माझ्या प्रजेला लुबाडूनच अशी गोष्ट करणें शक्य झालें असलें पाहिजे ! अर्थातच छत्रपतींनीं आपल्या राज्यांतील सर्वांचीच अशी चौकशी केली नाहीं हें खरें ! पण या पद्धतींत आम्हांला कांहींच वावगें दिसत नाहीं. किंबहुना अशी मतप्रणाली बद्धमूल झाल्याशिवाय लुटारू समाजकंटकांना कधींच पायबंद बसणार नाहीं. जर साम्यवाद हिंदुस्थानांत न बोकाळावा अशी इच्छा असेल, तर हाच एक मार्ग स्वीकारणें भाग आहे. एरवीं गांधीवादी नीतितंत्रानें वागणें खऱ्या अर्थानें शक्य होणार नाहीं.

वरील विवेचनांत आम्हीं गांधीवाद हा ब्राह्मण्याच्या पायावरच उभा आहे असें गृहीत धरलें आहे, तें आचारदृष्ट्या व भावनादृष्ट्या खरें असलें तरी ज्ञानदृष्ट्या खरें नव्हे. गांधीवादाचा चांगुलपणा त्यांतील अढळ श्रद्धेची प्रेरक शक्ति व तज्जन्य अविरत निष्काम कर्मयोग यांत दिसतो; पण ज्ञानाचा डोळसपणा मात्र त्यांत त्या प्रमाणांत दिसत नाहीं. ‘ केल्यानें होत आहे रे ’ या रामदासांच्या वचनाप्रमाणें गांधींनीं जें केलें तें झालें व त्यामुळें इंग्रज गेले. पण त्यांतील दुर्लक्ष झालेल्या भागामुळें आजचे अनर्थ हिंदुस्थानला जाचत आहेत. खरे गांधीवादी हिंदुस्थानांत निर्माण होते तर सर्व आपल्यापुरतें सूत कातणारे व कापड विणणारे झाले असते; पण त्याऐवजीं गिरण्यांचीच मगरमिठी देशाच्या गळ्यांभोंवतीं पडलेली दिसत आहे. म्हणजे भांडवलशाहीचे सर्व दोष येथें निर्माण झाले; पण त्यांवर यंत्रवादी समाजाचे जे तोडगे इंग्लंडसारख्या पाश्चात्य देशांत अंमलांत आले, ते गांधीवादामुळें येथें येऊं शकत नाहींत. तेथें सरकारी नियंत्रण व सर्वांना—अगदीं बेकारांना व म्हाताऱ्यांनाहि— पुरेसें अन्नवस्त्र देण्याची योजना मागेंच अंमलांत आली; पण येथें साधें नियंत्रणहि चालूं देण्यास महात्माजींचा आपल्या तत्त्वांवरील विश्वासामुळें नकार !

याचा प्राकृत अर्थ लुटारूंना तेवढें स्वातंत्र्य व इतरांची नागवणूक असा व्यवहारांत झाला आहे. यावर उपाय साम्यवाद्यांना पकडणें हा नसून सर्व पदार्थांच्या किंमती महायुद्धापूर्वींच्या दरावर आणून बसविणें हा आहे. किंबहुना असें न केल्यास इतर नवे नवे सामाजिक प्रश्न उत्पन्न होण्याचा बळकट धोका आहे. साम्यवादी हे असंतोषाचे जनक नसून त्याचा अनैतिक फायदा घेणारे आहेत. महागाई हाच असंतोषाचा खरा जनक आहे. आजच्या अनियंत्रित समाजव्यवहारांत कोण कोणाला किती प्रमाणांत लुबाडीत आहेत हें कळूं नये अशी रचना अंमलांत आली आहे. त्यामुळें कोणी कोणाला लुटूं नये असा दंडक राहण्याऐवजीं सर्वांनीं सर्वांना लुटण्याचा जास्तींत जास्त प्रयत्न करून काय होतें तें पाहावें, असा सध्यांच्या व्यवहारांचा सरळ सरळ उद्देश दिसत आहे. मनुष्यांच्या स्वभावांतील मूलभूत चांगुलपणामुळें व आज हजारों वर्षें चालत आलेल्या व अंगांत मुरलेल्या विशिष्ट सामाजिक आचारांमुळें कोणत्याहि समाजांतील बहुसंख्य लोक लुटारू होऊंच शकत नाहींत आणि त्यामुळेंच ते आधुनिक (अन्–) अर्थशास्त्राचा जागरूकपणें लुटारू कामासाठीं उपयोग करून घेणाऱ्या वाटमाऱ्यांच्या तडाख्यांत हटकून सांपडतात. आज किंमती अमुकपटीनें वाढल्या असें बाह्यतः सांगण्यांत व समजण्यांत येतें; पण त्या वस्तुतः त्यापेक्षां किती तरी जास्त पटींनीं वाढलेल्या असतात; कारण वस्तू असाव्या तशा न करण्याचा दुसरा अंतर्गत लुटारूपणा अनीतिमत्तेमुळें किती तरी वाढला आहे. वहाणेची किंमत बाह्यतः पूर्वींच्या तिप्पट चौपट असेल; पण पूर्वी तब्बल एक वर्ष वापरतां येण्यासारखी वस्तु जाऊन तिच्या जागीं मध्यें कार्डबोर्ड घातलेली व कच्च्या धाग्यानें कशी तरी चामडें न कमावतांच शिवलेली नूतन वहाण बाजारांत रूढ झाली आहे. ही वस्तु पूर्वींच्या तिसरा चौथा हिस्सा काळच टिकूं शकते. धोतरजोडी बाह्यतः दुप्पट तिप्पट महाग असेल; पण तिच्यांत पूर्वींच्या इतका कापूस सामावलेला नसतो, सूत पीळ दिलेलें नसतें व वीण चाळणीची असते. हाच प्रकार सगळीकडे चालू आहे. यामुळें समाजाची नीतिमत्ता किती खालीं गेली आहे तें तुलणेंहि कठीण झालें आहे. व यामुळेंच समाजांत निरनिराळे नवे चक्रवर्ती, राजे, महाराजे, जहागीरदार, मोकासदार निर्माण होऊन बद्धमूलहि झाले आहेत. एकीकडे जुने कैसर, झार व बादशहा कोसळून पडत असतां ही नवी बिननामधारी सरंजामशाही अस्तित्वांत आली आहे. यांत कापडराजे, नौराजे, भुईमूगराजे, नारळराजे, सुपारीराजे, साखरराजे, गूळराजे, मोटारराजे व इतर असंख्य लहानमोठे सत्ताधीश सर्वत्र अधिकारावर आले आहेत. आज हिंदुस्थानवर राज्य यांचेंच आहे. सरकारी नोकरांच्या पगारांतून सरकार कांहीं थोडा प्राप्तीवरील कर मुळांतच कापून घेतें; पण तो या राजांना बिनबोभाट द्याव्या लागणाऱ्या करांपुढें इतका अल्प भासतो कीं, तो लक्षांतहि घेण्यासारखा उरत नाहीं. दुसऱ्यांवर कर बसविणें हें राजाचें प्रधान लक्षण. जर सरकारी करांहून अधिक इतरच कर अशा तऱ्हेनें वसूल केले जातात, तर आतां चालू राज्य कोणाचें म्हणावयाचें? या राजांचा नायनाट करणें

हेंच आज खऱ्या राज्याचें पहिलें कर्तव्य ठरतें. तें ज्या प्रमाणांत करण्यास तें समर्थ होईल त्याच प्रमाणांत तें खरें राज्य; एरवीं त्याला राज्य ही संज्ञा सुद्धां लावतां येणार नाहीं. या अनर्थामुळें समाजांतील ब्राह्मण्य पार रसातळाला गेलें आहे! हा अनर्थ नष्ट करून जे राष्ट्राच्या व समाजाच्या प्रकृतींत नीतिजन्य समधातपणा निर्माण करूं शकतील, तेच आजच्या काळांतील खरे ब्राह्मण म्हटले जातील, हें सुज्ञांस सांगावयास नकोच. असे ब्राह्मण पुढें येवोत हीच प्रार्थना आपण सर्वजण करूं या. असे ब्राह्मण निर्माण होतील तर ब्राह्मणांच्या घरांची होळी करणारा वर्ग समाजांत एक दिवसहि उरणार नाहीं. 'ब्राह्मण' नाहींसे करण्याचा विचार सोडून खरे ब्राह्मण निर्माण करणारी रसायनशाळा उघडणें, हेंच आजचें इष्ट कार्य आहे.

'नवभारत', जून १९४८

# विश्वशांतीची समस्या

चालू युग म्हणजे मानवी बुद्धीच्या व प्रयत्नांच्या परम उत्कर्षाचा काळ. पृथ्वीचें रहस्य तर मानवानें आत्मसात् केलेंच पण तो प्रदेश पुरेसा न वाटून आतां तो बाहेर संचार करूं पाहत आहे. चंद्रावर वा मंगळावर पोहोंचण्याची त्याची धडपड चालू आहे, पण अशा ह्या मानवी आकांक्षांच्या सफलतेच्या काळांत मानव जास्त जास्त सुखी होत चालला आहे काय? या प्रश्नाचें उत्तर होकारार्थी देणें कठीण आहे. दुबळीं राष्ट्रें, मागासलेले लोक, रानटी जाती, यांचे प्रश्न तर सोडाच पण आधुनिक सुधारणेच्या शिखरावर जाऊन बसलेलीं राष्ट्रें पाहिलीं तरी कोणी सुखी, समाधानी किंवा तृप्त असलेला दिसत नाहीं. जो बघावा तो चिंतेनें व्यापलेला दिसत आहे. समृद्धीनें उतास जात असलेल्या अमेरिकेकडे पाहा किंवा तिलाहि शेरास सव्वा शेर भेटलेल्या रशियाकडे पाहा. कोणाच्या जिवाला शांति नाहीं. सर्व हवालदिल झाल्यासारखे दिसतात. जर ही थोरामोठ्यांची स्थिति तर मग मोडकळीस आलेल्या इंग्लंड, फ्रान्स, जर्मनी, जपान यांसारख्या सत्ताधीशांबद्दल काय बोलावें? चीन-हिंदुस्थानसारखीं संख्येनें मोठीं असणारीं नूतन प्रस्थापित स्वतंत्र राष्ट्रें तर अजून स्वतःच्या पायावर उभें राहण्यास समर्थ झालेलीं नाहींत, मग छोट्या नूतन राष्ट्रांबद्दल काय सांगावें? एकंदर जगाचा चित्रपट पाहतां कोठें शांति नाहीं, समाधान नाहीं, सुख नाहीं, निर्भयता नाहीं, अगदीं उद्यांच्या गोष्टीबद्दल निश्चिति नाहीं हें जर खरें, तर मानवी सुधारणेनें मिळविलें तरी काय? हा सारा खटाटोप, उभारणी, ज्ञानप्रसार, यंत्रांची वाढ, सत्तेची मजबुती, शस्त्रास्त्रांचे संभार, भूमीवरील जय व आकाशपाताळांतील विजय या सर्वांची फलश्रुति जर सर्वांना भीति, चिंता, व दुःख हीच असेल, तर झालेल्या व होणाऱ्या, तसेंच होऊं घातलेल्या मानवी व्यापाराबद्दल पुनः एकदा विचार करण्याची वेळ येऊन ठेपली आहे असें म्हणण्यास प्रत्यवाय कोणता?

जगांत सर्वत्र शांति पसरावी अशी इच्छा असल्याचें अतिशस्त्रधारी महाराष्ट्रेंहि बोलून दाखवीत असतात. पण आपली शस्त्रनिर्मिति थांबवा किंवा जरा कमी करा असें कोणी म्हटलें तर तें कोणाच्या मनास येत नाहीं. सर्व बाजूंनीं सुदैवी ठरलेल्या अमेरिकेस तुलनेनें मागासलेल्या रशियाचें भय वाटतें, कारण रशियाजवळ संपत्ति नसली तरी आधुनिक शस्त्रास्त्रांबाबत गुप्तपणें तो अमेरिकेच्या पुढें आहे काय अशी भीति तीस

वाटते. तसेंच रशियन जातीचा साम्यवाद जगांत पसरून त्याचा धोका अमेरिकेस पोहोंचू नये एतदर्थ वाटेल तितका पैसा खर्च करून त्याला शह देण्याची अमेरिकेची तयारी आहे. यामुळें रशिया आणि त्या भोंवतीचीं चीन प्रभृति साम्यवादी राष्ट्रें यांच्या भोंवतीं विरुद्ध मताचीं सज्ज राष्ट्रें उभीं करून साम्यवादाचा प्रसार थांबविण्याचा अमेरिकेचा प्रयत्न गेलें तप जारी आहे. साम्यवाद हें मत असल्याकारणानें त्याचे अनुयायी कोणत्याहि स्वतंत्र राष्ट्रांत निर्माण होणारच. पण तसे ते समसमान एखाद्या राष्ट्रांत झाले तर त्याचे तुकडे करून साम्यवादी गटाला साम्यवादी सरहद्दीकडे पिटाळण्याचा उपक्रमहि त्यांनीं सुरू ठेवला आहे. मग त्यामुळें कोरिया किंवा आनाम किंवा जर्मनी यांचे दोन विभाग झाले व राष्ट्रदृष्ट्या त्यांची कधींहि भरून न येणारी हानि झाली तरी त्याचें अमेरिकेला कांहीं वाटत नाहीं. पहिल्या महायुद्धांत पराभूत झालेल्या साम्राज्यांना कायम दुबळीं ठेवण्यासाठीं त्यांतून लहान लहान स्वतंत्र राष्ट्रें निर्माण करण्याचा उपक्रम लाईड जॉर्ज व क्लेमांसो या दोन महाशठ मुत्सद्यांनीं केला व तेव्हांपासून राष्ट्रविभजनाचा हा मार्ग इंग्लंडनें आपल्या साम्राज्याबाबतहि अनुसरला. आयर्लंड, अरबस्तान व हिंदुस्थान या ठिकाणीं त्यांनीं विभजनाचा मार्ग स्वीकारला व आश्चर्य असें कीं आज अमेरिकेनेंहि तो मार्ग चोखाळला आहे व तिच्या पुरस्काराखालीं निघालेल्या संयुक्त-राष्ट्रसंघानें त्याचा पाठपुरावा चालविला आहे. हा संघ निघाला तेव्हां जगांतील राष्ट्रांची संख्या साठहि नव्हती ती आतां ऐशींजवळ येत चालली आहे. यांतील कांहीं छोट्या राज्यांना स्वतंत्र राष्ट्र म्हणणें हेंहि हास्यास्पद वाटतें. राष्ट्रांतील संख्येच्या या वाढीनें जगांत शांति पसरविण्याचा मार्ग प्रचलित होत नसून अशांततेचेंच तें निदर्शक आहे हें स्पष्ट दिसतें. अशा स्थितींत राजकीय दृष्ट्या शांतीची समस्या कशी सुटणार ?

शांति म्हणजे निष्क्रियता नव्हे. अकर्मकृत् कोणीहि राहूं शकत नाहीं. ज्याला स्वतःला शांत व्हावयाचें आहे किंवा समाजांत, जगांत शांति प्रस्थापित करावयाची आहे त्याला कंबर बांधून कामासच लागलें पाहिजे. पण तत्पूर्वीं हें लक्षांत ठेवलें पाहिजे कीं शांति ही एकटीच कधीं अवतरूं शकणार नाहीं. आपल्या जुन्या वैदिक आशीर्वादांत 'शान्तिः पुष्टिस्तुष्टिश्चास्तु' असें म्हणण्याचा प्रघात आहे. तो याबाबत मोठा सूचक आहे. मनाची शांति असल्याखेरीज पुष्टि आणि तुष्टि यांच्यांतहि उणेपणा राहील पण पुष्टि आणि तुष्टीखेरीज शांति अशक्यप्राय आहे असाहि याचा अर्थ होतो. जो केवळ परमार्थाच्या मागें लागला त्याची गोष्ट सोडा, पण अतिबहुजनसमाजाला सर्वांआधीं पुष्टीची व त्याबरोबरच तुष्टीची आवश्यकता असते. या गोष्टींचा लाभ झाल्यानंतरच मग शांतीच्या उद्भवाची शक्यता संभवते. प्राणिमात्राच्या शारीरिक व मानसिक गरजा भागल्यानंतरच इतर गोष्टींकडे वळण्याची त्यांची प्रवृत्ति असते. वेदांताचा विचार चालू असतांनाहि टीका लिहितांना श्रीमधुसूदन सरस्वती यांनीं 'भोगाग्निवृत्तिः' असें यासाठींच सांगितलें आहे. क्षुधा निर्माण झाली तर तिला आहुति दिल्यानंतरच म्हणजे अन्नाचा भोग

घेतल्यानंतरच तिची निवृत्ति, हाच न्याय सर्वत्र लागू आहे. जगांतील बहुजनसमाजाला आवश्यक त्या वस्तूंनीं पुष्टि प्राप्त झाली व त्यामुळें हा समाज संतुष्ट झाला तर शांतीचा प्रयोग सफल होण्यास अनुकूल वातावरण निर्माण होईल हें स्पष्ट आहे. पण याचीच तर मुख्य उणीव भासत आहे. त्याबरोबरच ज्या तऱ्हेनें हा मूलभूत प्रश्न सोडविण्याचा जो मार्ग गेल्या शतकांत अनुसरला गेला त्याच्यामुळेंहि शांतीचा प्रश्न सुटण्याऐवजीं जास्त बिकट होऊन बसला आहे.

यामुळेंच टॉइनबीसारख्या, मानवाच्या इतिहासाचें आपाताल मंथन करण्यास उद्युक्त झालेल्या विद्वानाला 'पाश्चात्य संस्कृतीचें भवितव्य' असा स्वतंत्र विषय आपल्या महाभाष्यांत घेऊन त्यावर तीनशें पृष्ठें खर्चावींशीं वाटलीं. १९२१ सालीं तेरा भागांतील या आपल्या विषयाची योजना त्यांनीं आंखली तेव्हां त्यांना कल्पना नव्हती इतका फरक एका तपांत त्यांचे पहिले तीन खंड प्रसिद्ध होण्यापूर्वींच जगांत पडला. नंतर अर्ध्या तपानें पण दुसऱ्या महायुद्धापूर्वीं त्यांचे दुसरे तीन खंड प्रसिद्ध झाले, पण त्यानंतरच्या दुसऱ्या महायुद्धानें त्यांना पटवून दिलें कीं आपण ज्या पाश्चात्य यूरोपीय ख्रिस्ती संस्कृतीचा नितांत अभिमान बाळगतों त्या संस्कृतीचाच एक अग्रपूजित घटक जो जर्मनी त्यानें हिटलरच्या प्रमुखत्वाखालीं या पाश्चात्य संस्कृतीचें अंतर्दर्शन कशा तऱ्हेनें घडविलें व आजचा अत्यंत पुढारलेला व सुशिक्षित मानव पशुत्वाच्या कोणत्या पायरीप्रत उतरूं शकतो. पण इतकें होऊनहि या पाश्चात्य ख्रिस्ती संस्कृतीनें आपल्याच शत्रु म्हटलेल्या रशियालाच आलिंगन दिलें व त्याच्या मदतीनें हा विसाव्या शतकांतील रावण मारून काढला. इतकें करूनहि पुनः त्यांनीं नूतननिर्मित अण्वस्त्राचा प्रयोग यूरोपीयेतर जपानवर केला तसा तो जर्मनीवर करण्याचें त्यांच्या मनांतहि आलें नाहीं. यांतहि आजची ख्रिस्ती संस्कृति समता मानणारी नव्हे याचा भीषण अनुभव आला. प्रयोगासाठीं मारावयाचे असले तर ते श्वेतेतर असूं देत हा भेदभाव प्रत्ययास आला. याचे धुमसणारे दुष्परिणाम श्वेतेतर जनतेच्या अंतर्मनांत खोलवर घर करून कसे बसले आहेत याचा सुगावा जगत्प्रवासानें आतां टॉइनबींना लागल्यामुळें ते म्हणत आहेत कीं, यंत्रसाहाय्यानें वस्तुनिर्मिति अपरंपार वाढवून ती विकत घेण्याचें सामर्थ्य नसलेल्या गरीब काळ्या लोकांच्या पदरीं बांधण्याचा खटाटोप सोडून जर गोरे लोक आपली शक्ति धर्माकडे वळवितील तरच आजचा मानवजातीसमोरील शांततेचा प्रश्न सुटण्याचा संभव आहे, एरवीं नाहीं. (Vol.IX p. 640–42)

इंग्लंड हा देश पाश्चात्य संस्कृतीचा आधुनिक म्होरक्या. त्याची, सर्व फायदा इतरांहून जास्त लुटून वागण्याची रीत पाहिली तर ती मात्र बाह्यतः सौम्य, सत्यप्रिय, सालस समजुतदारपणाची. पण त्याच्या वर्तनाविषयींहि १९५२ सालीं चर्चा करतांना टॉईनबीला म्हणावें लागलें कीं इंग्लंडनें हिंदुस्थानला सुखासमाधानानें स्वातंत्र्य दिलें व त्याच सुमारास औद्योगिक क्रांतीमुळें निर्माण झालेला कामकऱ्यांचा प्रश्न त्यांच्या हातीं

सर्व देशाचा कारभार देऊन सोडविला या गोष्टी आज कितीहि उदारपणाच्या वाटत असल्या तरी त्या इतिहासदृष्ट्या शंभर वर्षांनीं उशिरां झालेल्या आहेत ! (Vol. IX P. 592) म्हणजे इंग्लंडनें हिंदुस्थान अठराशें सत्तावन सालच्या बंडापूर्वीच सोडून दिलें पाहिजे होतें व तसाच आपला राज्यकारभार मजूर वर्गाच्या हातीं चार्टिस्ट चळवळीच्या वेळींच सोपविला पाहिजे होता. या न्याय्य गोष्टी न केल्यामुळें दोन्ही देशांतील जनसमूह अगदीं वेगळ्या तऱ्हेचा बनवला गेला. झगड्यामुळें निर्माण झालेले हर्षामर्ष आतां यापुढें दोन्ही देशांतील प्रजेला किमान आणखी एक शतक छळींत राहतील इतके त्यांच्या मनाला पीळ पडलेले आहेत. आपलें राज्य टिकविण्यासाटीं इंग्रजांनीं सुरू केलेला हिंदुमुसलमानांचा, ब्राह्मणब्राह्मणेतरांचा, आदिवासी-पुढारलेल्यांचा—अशा तऱ्हेचे अनेक झगडे या देशाला किती काळ बाधतील व त्यांतून कोणत्या विकृती निर्माण होतील याचा अंदाज करणें कठीण !

उघड उघड न्याय्य दिसणारी गोष्ट स्वार्थासाठीं डावलण्याची जी परंपरा मानवी इतिहासांत अनुस्यूत झालेली दिसते ती पाहून मानवाच्या शहाणपणाबद्दल शंका निर्माण होते. स्वतःस खिस्तानुयायी म्हणविणाऱ्या पाश्चात्य राष्ट्रांनीं याबाबत सर्वांत अन्याय्य वृत्ति दाखविली आहे. खिस्त समतावादी, तर यांनीं काळागोरा भेद नव्यानेंच अंमलांत आणला. खिस्त अहिंसावादी, तर यांचा इतिहास म्हणजे एकामागून एक चालणाऱ्या आक्रमक युद्धांची मालिका. दुबळ्याबद्दल अनुकंपा हा खिस्ताचा विशेष, पण आमच्या या खिस्ती वीरांनीं जगांतील अनेक अत्यंत मागासलेल्या जाती नामशेष केल्या. स्वातंत्र्य, समता, बंधुता यांचा उद्घोष वस्तुतः धर्म सोडलेल्या फ्रेंच क्रांतिकारकांनीं केला असून खिस्त्यांनीं उगाच त्याचें श्रेय आपल्याला चिकटवून घेतलें आहे. याबाबत लक्षांत ठेवण्यासारखी दुसरी एक गोष्ट म्हणजे स्वातंत्र्य व न्याय या न जुळणाऱ्या गोष्टी आहेत. जर कांहीं उद्योगी व धाडसी अर्थपतींचें, वाटेल तो धंदा वाटेल तसा चालवून अर्थार्जन करण्याचें स्वातंत्र्य अबाधित राखावयाचें म्हटलें, तर इतर जनांना त्यामुळें अन्यायच होत जाणार. मग सरकारनें कोणती गोष्ट करावी ? शेतकऱ्याला व व्यापाऱ्याला आपल्या जवळील धान्यांचे दर हवे तितके घेण्याचें स्वातंत्र्य दिल्यामुळें आज भारतांत इतरांना किती अन्याय होत आहे हें सुशिक्षितांना चांगलेंच कळूं लागलें आहे. खरें पाहतां सामान्य कष्टाळु जनांना कायदेशीर स्वातंत्र्य किंवा समता यांचा थोडाच उपयोग आहे. त्यांना हवी असलेली वस्तु अखिल मानवजातींतील बंधुता ही होय. बंधुता म्हणजे आत्मौपम्यबुद्धीनें सर्व गोष्टींत दुसऱ्यांशीं वागणें. सर्व धर्मांच्या लोकांत हल्लीं आपापल्यापुरता ब्रदरहुड् स्थापन करण्याचा प्रघात जारी आहे. खिश्चन ब्रदरहुड्, त्यांच्या अनुकरणानें बुद्धिस्ट ब्रदरहुड्, हिंदु ब्रदरहुड् वा मॉस्लेम ब्रदरहुड् अस्तित्वांत आल्या आहेत. पण अशा या वेगवेगळ्या संस्था निर्माण झाल्या आहेत याचाच अर्थ या वेगवेगळ्या बंधुसमाजांत परस्परबंधुता नाहीं. क्वचित् दुसऱ्याबद्दल दुजाभाव निर्माण करण्यासाटींच

त्यांची निर्मिति आहे असाहि भास होतो. मग त्यांतून शांति कशी निर्माण होणार ?

जगाचा विचार सोडून आपल्याच भारताकडे वळलें जर येथील कल्पक, कर्तबगार व कूटस्थ पुढारी सभेवारची स्थिति पाहून काय उद्‌गार काढीत आहेत ? देशाच्या भावी भरभराटीसाठीं त्यांनीं अकटोविकट प्रयत्न करून पंचवार्षिक योजना चालविल्या आहेत. पण त्या यशस्वी होतांना दिसत नाहींत. उदाहरणार्थ, हा देश निदान धान्याच्या बाबतींत स्वयंपूर्ण करण्याची योजना. जर लोकवस्तीनें तुडुंब भरलेल्या या देशांत अन्नहि बाहेरून आणावयाचें असेल तर या देशांत राहण्यापासून लाभ तो कोणता ? याचें कारण सर्वच सांगतात कीं कोणत्याहि कार्याबद्दल जनतेंत उत्साह दिसत नाहीं ! न येणारें स्वातंत्र्य आलें तर त्यामुळें या देशांत उत्साहाचा पूर लोटलेला दिसावा, पण तो तर फक्त भोगलालसेचा लोटलेला दिसत आहे, कार्याचा अगदीं नाहीं. याला दुसरें एक कारण, कांहीं लोकांच्या प्रातींत स्वातंत्र्यामुळें झालेली बेसुमार वाढ. पन्नास वर्षांपूर्वीं धनाढ्य व गरीब यांच्यांत जितकें अंतर दिसत नव्हतें त्याच्या अनेकपट आज दिसत आहे. म्हणजे लोककल्याणासाठीं समाजवादी विचारसरणी अंमलांत आणण्याचा विचार चालू असतां प्रत्यक्षांत त्याच्या उलट गोष्टी घडत आहेत. आज सुशिक्षित मध्यम वर्गाची जी आर्थिक हलाखी व त्याहूनहि जास्त दुबळी अगतिकता निदर्शनास येत आहे तशी ती पन्नास वर्षांपूर्वीं या देशांतील गरिबाचीच काय पण भिकाऱ्याचीहि दिसून येत नव्हती हें जरा बारीक नजरेनें पाहणाऱ्याच्या सहज लक्षांत येण्यासारखें आहे. भारताचे मान्यवर पुढारी व लोकांच्या गळ्यांतील ताईत जवाहरलाल नेहरू यांच्याहि लक्षांत ही गोष्ट केव्हांच आली आहे. सन १९५१ सालीं दिल्लींत भरलेल्या यूनेस्कोच्या संस्कृतिविचार मंडळांत त्यांनीं उद्‌गार काढले कीं आजच्या मनुष्यसमाजांत जर त्यांना कांहीं फरक आढळत असला तर तो हाच कीं आधुनिक मानव स्वतःच्या मनाचा उपयोग करीनासा झाला आहे. पूर्वींच्या अशिक्षित गरीब माणसालाहि स्वतःच्या मनाचें, विचारांचें, भावनांचें असें एक स्वतंत्र जग होतें. पण आजचा सुशिक्षित माणूसहि कोणत्याहि गोष्टीचा स्वतः विचार न करतां समाजाच्या पुराबरोबर वहात चालला आहे. त्याचे विचार हे त्याच्या मनाच्या मुशींतून तावूनसुलाखून निघालेले विचार नसून बाहेरच्या गजबजाटामुळें कानांत शिरलेले विचार आहेत. ठरलेलें पोटाचें काम यंत्राप्रमाणें पार पाडावयाचें व बाकीचा वेळ समाजहुल्लडीमुळें उठलेल्या कोणत्या ना कोणत्या फॅशनच्या आराधनेंत घालवावयाचा असा या नूतन मानवाचा कार्यक्रम असतो. नेहरूंनीं आपल्या मांडणींत फक्त मनोव्यापारांचाच विचार आवर्जून केला. आत्म्याचा विचार मुद्दामच सोडला. कारण त्यांच्या मतें भुकेलेल्या माणसापुढें देवाविषयीं बोलणें अशक्य आहे आणि येथेंच या सर्व कूटप्रश्नांची मख्खी आहे. नेहरूंच्या मतें असाच क्रम चालला तर माणसाची मनःशक्ति कमी कमी होत जाऊन अखेरीस तिची वाढच खुंटेल ! मग नैतिक ऱ्हास त्या पाठोपाठ आलाच. जगाच्या इतिहासांत अनेक थोर संस्कृतींच्या

बाबतहि असेंच घडलें आहे. ज्या वातावरणांत पूर्वींच्या थोर संस्कृती वाढल्या व इतिहासांत मोलाची भर घालून गेल्या तसें वातावरण आपल्या भोंवतीं आहे काय? आपण एकामागून एक शोध करण्याचा सपाटा चालविला आहे, पण अखेर हे शोध मानवजातींत विग्रह निर्माण करून तिला कड्यावरून खालीं लोटणार नाहींत ना? एकीकडे आपण नवीन नवीन इमारती बांधण्याच्या नादांत आहों, पण दुसरीकडे या सर्व भस्मसात् तर होणार नाहींत ना असाहि विचार करीत आहों. यांत विसंगति नाहीं काय? माणूस सुधारून, खेडेगांव सोडून शहरांत जाऊन राहतो, सर्व प्रकारच्या सुखसोयी भोगतो पण अखेर असें आढळून येतें कीं तो कांहीं तरी गमावीत आहे, घालवून बसला आहे. पायाखालील माती, डोक्यावरील सूर्य यांना तो पारखा होत आहे. ही स्थिति स्पृहणीय आहे काय?

जुन्या काळीं जग एकमेकांपासून अलग अशा विभागांत पसरलेलें असल्यामुळें एका ठिकाणीं आपत्ति कोसळली तर तेथेंच काय तो नाश होई, पण इतर कोठेंतरी संस्कृतीचा धागा कायम राही व भरभराटीसहि येई. आजची हकीकत मात्र त्या विरुद्ध आहे. कोरियन युद्ध सुरू झालें तर हिंदुस्थानहि त्यांत ओढलें जातें व तज्जन्य महागाई क्षणार्धांत तारेनें जणुं सर्व जगभर पसरते. सुवेझचा कालवा बंद झाला तर सर्व जगाचा व्यापार अडविला जातो. याचा अर्थ आज कोणीहि सुरक्षित नाहीं. अशा वेळीं विशिष्ट परिस्थितींत सर्व जगावर कोसळणारें अरिष्ट टाळण्याचा काय उपाय आहे? शांति याचा अर्थ माणसाच्या मनाची स्थिरता, अविचलता, तसाच कोणत्याहि दैवी मानवी अरिष्टापासून सुटका असाहि आहे. त्यासाठीं करण्याच्या धार्मिक उपायासच पूर्वीं शांति ही संज्ञा प्राप्त झाली होती. आजहि अशी 'भुवनेश्वरी' शांति करण्याची वेळ प्राप्त झाली आहे. पण तिचे मंत्रतंत्र जाणणारा वैदिक कोणी दिसत नाहीं!

अतिबहुसंख्य मानवजात अल्पस्वल्प विचार तरी स्वतः करण्याचें सोडून झुंडीच्या राजकारणांत व समाजकारणांत सामील होत आहे. हिला सांप्रत लोकशाही असें ग्रीक नांव देण्यांत येत आहे. पण दोन हजार वर्षांपूर्वींच्या अथेन्समधील त्या लोकशाहीचा मागमूसहि आज शिल्लक नाहीं. अन्नवस्त्रादि अर्जनाचे प्रश्न दासांवर सोपवून केवळ समाजधारणा, संरक्षण, संस्कृति, तत्त्वज्ञान यांचाच विचार करण्यासाठीं एक नेता वर्ग नागरिक नांवानें त्या काळीं अधिकारावर होता. यांतील सर्व पुरुष एकमेकांना ओळखीत असत, प्रत्येकाची खरी योग्यता जाणीतच असत आणि सर्व गोष्टी एकत्र जमून परस्परांना पटवून करीत असत. वक्तृत्वाला या समाजांत फार महत्त्वाचें स्थान होतें. आजच्या लोकशाहींत यांतील काय शिल्लक आहे? आज राजकीय पक्षांचें वर्चस्व प्रस्थापित झालें आहे. पक्षांतील माणसांचें काम एकच व तें म्हणजे लोकशाहीचा देखावा कायम ठेवण्यासाठीं पक्षाचे कर्तुमकर्तुं सत्ता असणारे म्होरके यांच्यासाठीं मतदान करणें! ज्या ठिकाणीं केवळ निरक्षरच काय, पण एरवींहि सर्वस्वी पंगु, अज्ञ, मागासलेल्या

व त्याहूनहि जास्त भांबावलेल्या लोकांचा बहुसंख्य मतदार संघ आहे त्या ठिकाणीं त्यांची समजूत घालण्याचें कामच कोठें उरलें ? आणि आज बहुसंख्य राजकीय पुढाऱ्यांना बोलण्याचें कारणहि उरलेलें नाहीं. चारदोन धंदेवाईक तोंडपाटील सर्व पक्षाचा गाडा ओढतात. अगदीं नुकत्याच भरलेल्या एका जागतिक विचारपरिषदेंत इग्नाझिओ सीलोन या इतालींतील विचारवंतानें असें सांगितलें कीं अजून साम्यवाद सर्व जगांत प्रस्थापित झाला नसला तरी त्याची कार्यप्रणाली इतर जगांतहि न बोलतां अंमलांत आणली जात आहे ! याला तो लोकशाहीचें 'स्तालिनीकारण' म्हणतो. म्हणजे असें कीं स्तालिन, क्रुश्योव, माओत्सेतुंग, सोकार्नो किंवा पंडित नेहरु असा कोणीतरी एकेकटा पुरुष स्वतःवर सर्व कामाचाच नव्हे तर विचाराचाहि भार घेतो. स्वतःच्या बढतीसाठीं त्यांच्या-जवळ जमलेले मूठभर लोक बिनबोभाट त्यांच्या आज्ञाच काय, पण तर्कानें जाणलेल्या इच्छाहि अंमलांत आणण्याची कोशीस करतात. यामध्यें ज्या माणसांचा फायदा असतो अशीं दुसरीं अनेक माणसें त्यांचे प्रचारक हस्तक बनतात व अशा रीतीनें एक अजिंक्य पक्ष राजकारणांत पुढें येतो. राजकारणांत बहुसंख्य असणारा हा पक्ष अनेकांना अनेक गोष्टींचें प्रलोभन दाखवूं शकतो. गेल्या पन्नास वर्षांतील दोन महायुद्धांच्या अनुभवानें भांबावून स्वसंरक्षणास केवळ मतिमंद झालेला बहुसंख्य मानव अशा पक्षांत सामील होण्यांतच आपली धडगत आहे असें मानून अनन्यगतिक होऊन कोणत्या तरी पक्षाची पत्रिका आपल्या डोक्यास चिकटवितो. सीलोनच्या मतें आज इतालींत अशी स्थिति आहे कीं, कुटुंबाच्या संरक्षणासाठीं बाप एका मुलाला साम्यवादी गटांत जायला सांगतो, तसाच दुसऱ्याला कॅथोलिक पक्षांत सामील करून टाकतो ! हेतु हा कीं कोणताहि पक्ष अधिकारारूढ झाला तरी आपल्याला कमी पडूं नये. सीलोनच्या मतें पक्षाचें तिकिट म्हणजे रेशनिंगच्या दुकानांत पाव मिळण्याचें कार्ड ! कोणत्याहि पक्षास न मिळणारा विचारवंत व प्रामाणिक नागरिक या जमान्यांत उपाशीच मरावयाचा !

पंडित नेहरूंच्या तैलबुद्धीला हाहि धोका कळून चुकलेला दिसतो. त्यांनीं सात वर्षांपूर्वींच म्हटलें होतें कीं लोकशाही हाच आज मानवाला उपलब्ध असलेला राजकीय मार्ग असला तरी वयांत आलेल्या सर्व व्यक्तींना मत लाभल्यामुळें जे प्रचंड मानवसमूह पुढें येत आहेत, त्यांना सर्व सुखसोयी लाभूनहि विचार करण्याचें कोठें कामच पडत नाहीं. त्यांचा स्वतःचा अनुभव असा कीं लोकशाही पद्धतीनें निवडले जाणारे राजकीय प्रतिनिधि दिवसेंदिवस दर्जानें खालावत आहेत. याला कारण ते आजची जाहिरात–प्रचार–सुलभता प्रामुख्यानें मानतात. या गडबडगोंगाटांतून हुकुमशहा किंवा मूक राज-कारणी निर्माण केला जातो. जो या गडबडगोंधळांत लाकडाप्रमाणें मठ्ठ राहून दोन पायावर ताठ उभा राहतो तोच निवडून येतो. त्याचा त्याहून शंभरपट हुशार, बुद्धिमान, नीतिमान समाज–हितचिंतक प्रतिस्पर्धी कोसळून पडतो ! ही एक विचित्र कटु घटना आहे. जर मनुष्यजात सर्व विचाराचें काम दुसऱ्यावर सोंपवून अशीच वागत जाईल

तर संस्कृति निश्चित खालावेल. त्यामुळें मानवजातहि खालच्या पायरीवर ओढली जाईल व अखेरीस मानव म्हणून नष्ट होईल. मात्र हें सर्व वर सांगितलेल्या शब्दांत नेहरूंना कळत असूनहि त्यांनीं भारताच्या राज्यघटनेंत फरक करून तीन कोटी मतदारांचे अठरा कोटी मतदार एका फटकाऱ्यांत निर्माण केले, कीं ज्यांतील शेंकडा ८५ निरक्षर आहेत.

"आज पुष्कळ मोठे विचारवंत जगांत आहेत हें मी नाकबूल करीत नाहीं, पण ते अविचारी मानवांच्या झुंडींत गडप होण्याची पूर्ण शक्यता दिसते", असें नेहरु म्हणतात आणि हाच मानवजातीला खरा मोठा धोका आहे. भारतीय संस्कृतीनें ग्रीक लोकांप्रमाणें केवळ दासांचा वर्ग निर्माण न करतां चातुर्वर्ण्य व आश्रमसंस्था अंमलांत आणून समाजाचें नियमन करण्याचा यशस्वी प्रयत्न केला व तो उणापुरा दोन हजार वर्षें या देशांत चालू राहिला. अजूनहि त्याचा जोर एवढा मोठा आहे कीं या देशांतील लोकांच्या विचारसरणींत त्याला कायम स्थान राहील. भारतीय संस्कृति ही केव्हांहि एकांतिक नव्हती. समाजांतील प्रत्येक व्यक्तीचें मन, भावना, इच्छा, आकांक्षा व स्वार्थ वेगवेगळीं असतात हें त्यांनीं जाणलें होतें. त्यामुळें कोणतीहि समाजव्यवस्था केली तरी तींत सर्व व्यक्तींना सारखा न्याय लाभेलच असें ते मानीत नव्हते. माणूस हा पशुत्वांतून वर आलेला एक प्राणी आहे व तो कितीहि सुधारला तरी त्याचे प्रबल स्वभावधर्म पशुत्वजनित असतात. पशूंतील कळपाची भावना त्याच्यांतून कधींहि जाणें शक्य नाहीं हें समजून ही सर्व झुंड अनिवार होऊं नये म्हणून त्यांनीं मधें कुंपणें घालून त्यांचे गट पाडिले. त्यामुळें वर जवाहरलालांना वाटलेली ज्ञानी नेतावर्ग झुंडींत गडप होण्याची मानवांसमोर सतत असणारी भीति त्यांनीं गाडून टाकली होती. जर ब्राह्मणवर्गाच्या नियमनाचे स्मृतींत सांगितलेले सर्व नियम या ब्राह्मणवर्गानेंच कांटेकोरपणानें व न्यायबुद्धीनें पाळले असते तर आज बेफाट फुगलेली ब्राह्मणब्रुव-संख्या मुळांतच छाटली जाऊन संख्येनें आज दीड कोटी आहे ती दीड लाखहि उरली नसती! असें झालें असतें म्हणजे अनेक अज्ञ व समाजनेतेपणाचें वा हिताचें कोणतेंहि काम न करणारे अविचारी ब्राह्मण निष्कारण पोसण्याची जबाबदारी इतर हिंदु समाजावर पडली नसती. तसें न घडल्यामुळें आजचा अनवस्थाप्रसंग हिंदुस्थानांत निर्माण झाला आहे. ब्राह्मणानें कधींहि राजा व्हावयाचें नव्हतें व क्षत्रियाचें समाजसंरक्षणाप्रीत्यर्थ आवश्यक ठरणारें हिंसाकर्महि आचरावयाचें नव्हतें. पण ब्राह्मणांनीं हीं कर्में तर काय, पण वैश्याचें ब्राह्मणांना पापरूप असलेलें कुसीद ऊर्फ व्याजबट्टयाचें कर्महि आत्मसात् करून त्यावरच आपला नैवेद्य–वैश्वदेव प्रस्थापित करण्याची कारवाई केली. महंमद पैगंबरानें व आद्य ख्रिस्ती लोकांनीं सुद्धां व्याजबट्टा हें त्याज्यकर्म मानलें होतें. तें यहुदी लोकांचें काम, आपलें नव्हे, व हाच दोघांतील मूळ सामाजिक भेद असें ते मानीत. याच्याच जोडीला मद्यपानबंदी करून महंमदानें नूतन इस्लाम म्हणजेच

शांतिसमाज निर्माण करण्याचा प्रयत्न केला व तो जगाच्या अनेक भागांत निर्मात्याच्या इच्छेप्रमाणें यशस्वीहि झाला. वैदिक आर्यांनीं समतोलपणावर आधारलेला जो समाज निर्माण केला त्याची अधोगति प्राधान्यतः ब्राह्मणाच्या गैरवर्तनानें झाली. आजहि त्यांतील आद्य तत्त्वें समाजनियमनासाठीं स्वीकारण्याजोगीं आहेत असें आमचें मत आहे. आमच्या वर्णजातिविवेकावर टीका करणाऱ्यांनीं लक्षांत ठेवावें कीं आजच्या राष्ट्रव्यापी कामगार-संघटना, कीं ज्या क्षणार्धांत समाजाचें गाडें स्वतःच्या लहरीप्रमाणें हवें तेव्हां बंद पाडूं शकतात, त्याहून हिंदूंची वर्गव्यवस्था निश्चित जास्त चांगली होती. या विवेचनाच्या आरंभींच सांगितलें आहे कीं, एकांतिक न्यायदृष्टीवर ती उभारलेली नव्हती. प्रत्येक जातींतील अनेक व्यक्तींना ती अन्याय करणारी होती. पण हें नियमन अंगीं रुळल्यामुळें त्या व्यक्तींनाहि या अन्यायाची जाणीव होत नव्हती. आज अस्तित्वांत असलेल्या अत्यंत सुधारलेल्या समाजांत किंवा व्यक्तिगत अन्याय दूर करण्यास सज्ज झालेल्या रशियांतील साम्यवादी समाजांत तरी सर्वांना सारखा न्याय मिळत आहे काय? किंवा भविष्यांत तरी मिळण्याचा संभव दिसतो काय?

हिंदूंच्या समाजनियमनाची दुसरी किल्ली त्यांच्या आचारधर्मांत होती. धर्म हाच मुळांत आचारप्रभव आहे असें या नियमनकारांनीं निश्चित केलें होतें. म्हणजे मनुष्य हा मूळचा पशु असून आचाराच्या नित्य कसरतीनें कह्यांत राखावयाचा असतो हें त्यांनीं ओळखिलें होतें. आज त्या आचारांपैकीं काय शिल्लक उरलें आहे? हिंदु म्हणविणारे किती आधुनिक सुशिक्षित देवदर्शनाला जातात? अत्यंत शीत अशा हिमालयांतील प्रदेशांतहि हिंदु नित्य स्नानच काय, पण शीतस्नानहि करणारे होते व आजहि आहेत. अंगावर उवा पडतात म्हणूनच कधींबिधीं स्नान करणाऱ्या पाश्चात्यांना या गोष्टीचें मोठें कौतुक वाटतें. आज शहरांत राहणाऱ्या तथाकथित सुशिक्षित माणसांस उघड्या-वर स्नान करणें हेंहि लज्जास्पद वाटूं लागलें आहे. त्यांनीं मुळांत शीतनिवारणार्थ निर्माण झालेल्या पाश्चात्य निर्वात अंधाऱ्या खोल्यांचा स्नानार्थ उपयोग जारी केला आहे. त्यांना प्रयागास किंवा काशींत नदीवर मकरस्नान करणाऱ्या अशक्त, वृद्ध पण श्रद्धाळु नारीनरांचें काय होय! दोन पाशवी महायुद्धांत आपण अन्यायानें लुटलेली जागतिक संपत्ति व तीवर उभारलेली सत्ता नष्ट होत असलेली पाहून व तिसऱ्या भावी महायुद्धांत तर सर्व भस्मसात् होण्याचा धोका दृष्टीपुढें येऊन आतां टॉईनबीसारखे ख्रिस्ती संस्कृतीचे अभिमानी भयभीत होऊन म्हणूं लागले आहेत कीं, अर्थशास्त्रावरील मन काढून तें धर्माकडे लावल्याशिवाय पाश्चात्य संस्कृतीची धडगत नाहीं. शहाण्या सॉलोमनला स्वप्नांत देवानें म्हटलें, "मी तुला देणार आहें—हवें तें माग." तेव्हां सॉलोमननें ईश्वरनिर्मित जनांचा न्याय करण्यासाठीं आवश्यक असलेलें जाणतें हृदय ऊर्फ मन स्वतःस देण्याविषयीं ईश्वराची प्रार्थना केली. त्यामुळें त्याला तें तर मिळालेंच, पण वर भौतिक संपत्ति, सत्ता व ऐश्वर्यहि लाभलें. हाच आशय 'धर्मादर्थश्च कामश्च स धर्मः

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत.
अनुक्रम ............ वि: ...... .......
क्रमांक ... ............... नों: दि: ...............

किं न सेव्यते' किंवा 'अभ्युदयनिःश्रेयस्करः धर्मः' अशा वचनांनीं भारतीयांनीं प्राचीन काळींच व्यक्त केलेला आढळतो.

पण प्रस्तुत युगाची धाटणी त्याउलट झाली आहे. 'अर्थशास्त्रात्तु बलवद्धर्मशास्त्रमिति स्थितिः' हा दंडक जाऊन 'धर्मशास्त्रात्तु बलवदर्थशास्त्रमिति स्थितिः' अशी उफराटी रहाटी चालू झाली आहे. ज्या गोष्टी भारतीयांनीं मानवजातीच्या मागील अनुभवानें व भोंवतालच्या समाजनिरीक्षणानें दोन हजार वर्षांपूर्वींच निश्चित केल्या होत्या त्याप्रत यावयास जगाच्या इतिहासाचें आतां मंथन करावें लागलें व भारतीयांच्याच निर्णयाप्रत ते येऊन पोंचले! यावरून या भारतीयांची शास्त्रदृष्टि किती स्वच्छ व अचूक होती हें निदर्शनास येत नाहीं काय?

कोणताहि रागलोभ न ठेवतां, सत्तेचा धाक मनांत न बाळगतां, सरळ बुद्धीला पटेल तें कथन करण्यानें शास्त्रपूतता टिकू शकते. पण आज जवाहरलाल नेहरूंसारखे देशभक्तहि आजच्या तथाकथित लोकशाहीचा ऱ्हास स्वमुखानेंच कबूल करीत असतां या युगांतील झुंडमानसशास्त्राच्या दडपणानें अज्ञ लोकांच्या हातांत सत्तेचा उगम सोपवून लोकगंगा गढूळ व भ्रष्ट करण्यास कारणीभूत झाले आहेत. अपात्र माणसाला कोणत्याहि गोष्टीचें दान करणें हें पापमूलक आहे असें आपले पूर्वज समजत. समाजाला नाशाप्रत नेणारी याहून अन्य गोष्ट नाहीं. अपात्र मुसलमानांच्या हातीं पाकिस्तानची सत्ता ब्रिटिशांनीं सोंपविल्यामुळें लोकशाहीची गंगोत्री मानल्या जाणाऱ्या इंग्लंडच्या या कुपात्रदानास काय फळें येत आहेत हें आपल्या नित्य प्रत्ययास येत आहे. तोच प्रकार या देशांत अप्रस्तुत अशा पाश्चात्य लोकशाहीच्या अंधानुकरणानें जारी झाला आहे. मराठेशाहींत जितके जास्त घोडेस्वार आपल्या पथकांत ओढतां येतील तितके ओढून विसाजी भटाचे बाजीराव झाले, मेंढपाळ मल्हारीचे मल्हारराव झाले; तोच प्रकार आजच्या लोकशाहींत निदर्शनास येतो. एखाद्या शंभूच्या मागें लाख मतदार उभे राहिले कीं त्याचा संभाजीराव होण्याला उशीर काय? असे मत्त झालेले संभाजीराव आज हिंदुस्थानांत अधिकारावर आहेत व जगांतील बहुतेक भागांत असाच प्रकार कमीअधिक प्रमाणांत चालू आहे. हे घोड्यावर (आतां मोटारींत) आरूढ झालेले राव आपल्या रथामागें, पूर्वीं ज्याप्रमाणें दिग्विजय करून परत आलेले रोमन सेनानी बंदी करून आणलेल्या शत्रूंची फरड काढीत त्याप्रमाणें बहुजनसमाजाला फरफटावीत ऊर्फ बहकावीत मोठ्या दिमाखानें चालले आहेत. ज्ञानी व न्यायी माणसाला यांत कोठेंहि स्थान नाहीं. जनसंमर्दाच्या या प्रचंड अस्ताव्यस्त पसरलेल्या व खवळलेल्या अफाट दर्यांत उडी टाकण्यास कोण धजणार व त्यांतून पोहून पैलतीर गांठण्याची उमेद तरी कोणाला होणार? त्याचा शब्द या वेताळाच्या स्वारींतील कर्कश तुताऱ्या, भेऱ्या व दुंदुभी यांच्या कानठळ्या बसवणाऱ्या आवाजांत कोणास ऐकूं येणार? आणि या गलबलगलक्यांतून शांति, विश्वशांति कशी निर्माण होणार?

स्वातंत्र्यागमनापासून भारतीय संस्कृतीचा उद्घोष या देशांत निर्माण झाला आहे. पण त्याची व्याप्ति अलीकडच्या हिंदु संस्कृतींत त्याज्य मानलेल्या गाननर्तनादि विषयांपुरतीच राहिलेली दिसते ! धर्म या व्यापक नांवाखालीं सृष्टीची उत्पत्ति, स्थिति व एकंदरींत मानवी जीविताची सफलता, यांबाबत जो मूलभूत विचार आपल्या पूर्वजांनीं केला व समाजअरिष्टावर उपाय सुचविले त्यांचा विचार आजच्या तथाकथित सांस्कृतिक चळवळींत कोठेंच समाविष्ट दिसत नाहीं. त्यामुळें लोकमान्यप्रस्थापित सार्वजनिक गणपत्युत्सवासारख्या समाजधारणेसाठीं निर्माण करण्यांत आलेल्या उपक्रमांचें स्वरूप प्रमुखतः ज्ञानोपासना होतें, तें जाऊन आतां 'लोकनाट्याच्या' आविष्काराचें तें आगर बनून राहिलें आहे ! कोणताहि सार्वजनिक कार्यक्रम असो, त्यांत या लोकनाट्यानें आपला तंबू ठोकलेला आढळेल ! महात्माजी कोणत्याहि कार्यारंभीं प्रथम रघुपति राघव राजारामाची रामधून उठवीत. त्याला आतां इतकी ओहोटी लागली आहे कीं, महात्माजींच्या जन्मदिनीं साजऱ्या होणाऱ्या कार्यक्रमांत भाग घेणाऱ्या मुलींना हें भजन पाठ नसावेंसें दिसलें ! गांधींच्या पुण्याईवर जगणाऱ्या लोकांची ही स्थिति ! मग विचाराला व सुधारणेला वावच कोठें राहिला ? गांधींना एकानें त्यांच्या वर्तनाचा मनस्वी राग आल्यामुळें मारून टाकलें, पण त्यामुळें त्याच्या विचारसरणीच्या लोकांचा फायदा न होतां तो या तथाकथित भगतांचाच झाला आहे. महात्माजी गेल्यामुळें त्यांना आपल्या कृत्यांचा जाब विचारणारे वा कान उपटणारे कोणीहि राहिले नाहींत. सर्व सत्ता त्यांच्याच हातीं केंद्रित झाली आहे. सत्तामदानें ते अंध झालेले दिसत आहेत. विनोबाजी त्यांना मधूनमधून कांहीं गोष्टी सुनवितात. पण त्यांचें बोलणें जनांतिकच ठरतें. तें हवें त्यांच्या कानांवर पडतच नसावें.

कॉंग्रेस पक्ष यशस्वी झाला व सत्ताधारीहि बनला, पण त्यांच्या अधिकाराचें कार्य गांधीवाद प्रस्थापित होण्यांत दिसत नाहीं. त्यांच्या तकळीऐवजीं प्रचंड कारखानेच या देशांत उभारले जात आहेत. म्हणजे पाश्चात्य देशांत गेलीं दोनशें वर्षें जो क्रम चालला, तसाच भारतांत चालू करण्याचा जमाना निर्माण होत आहे. अर्थात् ज्या दुष्टचक्रांतून यूरोप गेलें त्याच चक्रांत आम्ही आपली मान अडकवीत आहोंत. मग त्याचीं फळें तरी न्यायाचीं, शांतीचीं कोठून निर्माण होणार ? महात्माजींनीं अहिंसेसाठीं आपला जीव तोडला, पण भारतीय संस्कृतीचा उच्च उद्घोष चाललेल्या सध्यांच्या संस्कृतीनें हजारों वर्षें निरामिष राहिलेले अनेक जनसमूह आपल्या डोळ्यांसमोर बोल बोल म्हणतां उजळ माथ्यानें मांसाहारी होत आहेत. महात्माजींच्या तपाला हेंच फळ यावें काय ?

साधेपणा सुटला कीं अपरिग्रहहि सुटलाच. त्याजागीं परिग्रह आला कीं त्याच्यामागें हिंसा धावलीच. हिंसा संचरली कीं अन्याय झालाच आणि अन्याय आल्यावर शांति कशी राहील ? शांतीची समस्या ही अशी चक्रारूढ आहे. या दुष्टचक्राचे आटे एकाला एक पुढें ढकलीत असतात.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत
अनुक्रमांक ........ वि: ........
क्रमांक ........ नों: दि: ........

शांतीबाबत एक आधुनिक यूरोपीय खिस्ती तत्त्वज्ञ म्हणतो, "माणसें ज्याला शांति म्हणतात तिचें स्वरूप दोन युद्धांमधील रिकामा काळ एवढाच असतो. एकमेकांच्या भयामुळें भांडणास उभे राहण्याची तयारी नसते तोंवरच हा शांतीचा तोल राहतो. पण अनुकूल काल येतांच म्हणजेच संधि सापडतांच झडप घालायला सारे तयार असतात. खऱ्या शांतीची ही थट्टा होय. एकमेकांच्या भीतीमुळें अंगांत चिलखतें चढवून सर्वच सज्ज असतात. या प्रकारामुळें कांहीं एक प्रकारची व्यवस्था मानवी समाजांत राहूं शकते. पण त्यामुळें माणसाला शांति मिळणें शक्य नाहीं. जोंवर मानवांच्या अंतर्हृदयांतील स्वयंभू सहज समाधानानें मानवी समाज-व्यवस्था आंखली जात नाहीं तोंवर खऱ्या शांतीची अपेक्षा करणें व्यर्थ आहे. प्रत्येक समाजांत अंतस्थ धुसपुशीचा अभाव, एकी, स्वनिर्मित सुव्यवस्था यांची स्थापना होऊं शकत नाहीं तोंवर मनुष्याच्या मनांतील अंतःप्रेरणेनें निर्मित अशी चिरंतन विश्वशांति कशी निर्माण होईल? 'समानमस्तु वो मनो' या ऋग्वेदांतील प्रार्थनेप्रमाणें सर्वांचीं मनें, सर्वांना मिळविण्यासारखें अंतिम इष्ट कोणतें आहे याचा एकच निर्णय करून, त्याच्या प्रेमानें भरित होऊन राहूं लागतील, त्या वेळीं एकाची इच्छा तीच सर्वांची इच्छा असें होऊन परस्परांच्या प्रेमानें निर्माण झालेल्या एकींतून सत्समाज स्थापित होईल. तेव्हां विसंवादी सूर कोठेंच निघत नसल्यानें सर्वत्र सुसंवादी अशी शांति विश्वांत अवतीर्ण होईल, तत्पूर्वी नाहीं." इति शम्.

जीवनविकास' : मार्च १९५९

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थलप्रत.
अनुक्रम २६११८ वि: ११४६
क्रमांक १२०७ नों: दि: ७२१६०
मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
९०२७४
दा. क्र.
REFBK-0010274